| - | IIT-JEE 2025 ERRORLESS MATHEMATICS VOLUME 1 |
| - | NEET 2025 ERRORLESS CHEMISTRY VOLUME 2 |
| - | NEET 2025 ERRORLESS CHEMISTRY VOLUME 1 |
| - | NEET 2025 ERRORLESS PHYSICS VOLUME 2 |
| - | NEET 2025 ERRORLESS PHYSICS VOLUME 1 |
| - | NEET 2025 ERRORLESS BIOLOGY VOLUME 2 |
| - | NEET 2025 ERRORLESS BIOLOGY VOLUME 1 |
| RA MAHATRAYA | NA PATHAVALEL PATRA न पाठवलेल पत्र |
| DIVATE HEMANT / DALVI MUSTANSIR | PARANOIA |
| KOTWAL GAUTAM | MAHARASHTRACHE KOHINOOR महाराष्ट्राचे कोहिनूर |
| BHONGALE SUDHEER | NEMKACHI BOLANE ( SHARAD PAWAR YANCHE VICHAR VISHWA ) नेमकची बोलणे ( शरद पवार येतात विचार विश्व ) |
| SAPATAHIK VIVEK साप्तहिक विवेक | SAPTARSHI सप्तर्षी |

# *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING FEBRUARY 2025*

| Author | Title |
|---|---|
| SAPATAHIK VIVEK साप्तहिक विवेक | RAM MANDIR TE RASHTRA MANDIR राम मंदिर ते राष्ट्र मंदिर |
| HAYWARD CARLE R. | AN OUTLINE OF METALLURGICAL PRACTICE |
| SINGH INDERBIR / PAL G. P. | HUMAN EMBRYOLOGY |
| VERMA P. S. / TYAGI B. S. / AGARWAL V. K. | CHORDATE EMBRYOLOGY |
| GANGANE S. D. | HUMAN GENETICS |
| SASTRI M. N. | SEPARATION METHODS |
| SENGUPTA SUBRATA | BASIC STREOCHEMISTRY OF ORGANIC MOLECULES |
| GRAYS HENRY F. R. S. | GRAYS ANATOMY |
| THATTE ARAWIND D. | SANGEET VIMARSHA ( A BOUQOUT OF THOUGHTS ABOUT THE NORTH INDIAN CASSICAL MJUSIC |
| GHAISAS S. M | BALGANDHARVA JIVAN SANGEET बालगंधर्व जीवन संगीत |
| DEVAL B. R. | AAVAJ SADHANA SHASTRA आवाज साधना शास्त्र |
| DATAR SHAILA | DEVGANDHARV देवगंधर्व |
| RATANJANKAR SHRIKRUSH-NA NARAYAN | HINDUSTHANI SANGEET PADHATTI ABHINAV GEET MANJIRI BHAG 1 हिंदुस्थानी संगीत पध्दती भाग १ अभिनव गीत मंजिरी |
| DEVAL GOVIND BALLAL देवल गोविंद बल्लाळ | SANGEET SANSHAY KALLOL संगीत संशय कल्लोळ |
| DEVAL GOVIND BALLAL | SANGIT MRUCHH KATIK संगीत मृच्छ कटिक - देवल गोविंद बल्लाळ |
| SAMNANT BAL | MARATHI NATYA SANGEET मराठी नाट्य संगीत |
| DUTTA ARUP KUMAR / KUL-KARNI BINDU MADHAV | ASSAMCHA DHADASI YODHA LACHIT BARPHUKAN आसामचा धाडसी योद्धा लाचित बरफुकन |
| DUTTA ARUP KUMAR / KUL-KARNI BINDU MADHAV | ASSAMCHA DHADASI YODHA LACHIT BARPHUKAN आसामचा धाडसी योद्धा लाचित बरफुकन |
| GAIKWAD RAMKRUSHNA | PHOENIX RISING : SLUM TO MILLIONAIRE फिनिक्स रायसिंग |
| GAWARI VILAS DUNDA | VASAHTIK MAHARASHTRATIL AADIVASINCEH UTHAV वासाहतिक महाराष्ट्रातील आदिवासींचे उठाव |
| KUYILAN JANARDHAN / PARALIKAR UMA | NIROGI JIAVN : KUNDALINI AANI ADHYATMA YA MARGACHE ANUKARAN KELYANE निरोगी जीवन : कुंडलिनी आणि अध्यात्म या मार्गाचे अनुकरण केल्यने |
| ZUNJARRAO RAJENDRA | CHAHUL चाहूल ( कविता संग्रह ) |
| CAMPBELL MALCOM A. / HEYER LAURIE J. | DISCOVERING GENOMICS PROTEOMICS AND BIOINFORMATICS |
| PRIMROSE S. B. TWYMAN R. M. | PRINCIPLES OF MANIPULATION AND GENOMICS |
| PRICE NICHOLAS / STEVENS LEWIS | FUNDAMENTALS OF ENZYMOLOGY |
| DAMSE RAMDAS | PUBLICATIONS ON HIGH ENERGY GUN PROPELLANTS |
| ELLIS ALBERT | ALL OUT |
| BHOWMIK SHARIT | STREET VENDORS IN THE GLOBAL URBAN ECONOMY |
| SIDHWA BAPSI | CITY OF SIN AND SPLENDOUR WRITINGS ON LAHORE |

# *News Paper Clippings : February 2025*




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .
[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf*]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous*** .



## *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

लोकसत्ता

लोकमान्य लोकशक्ती

# प्राध्यापक नियुक्तीच्या नव्या नियमावलीत बदलाच्या सूचना

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) प्राध्यापक नियुक्तीच्या नियमावलीमध्ये प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे यांनी काही महत्त्वपूर्ण सुधारणा सुचवल्या आहेत. त्यात कंत्राटी प्राध्यापकांचा कालावधी सहा महिन्यांऐवजी ११ महिने असावा, प्राध्यापक निवड प्रक्रियेत एकस्व अधिकार (पेटंट) स्वामित्व हक्क (कॉपीराइट) अशा बौद्धिक संपदेचा विचार करावा, अॅकेडमिक परफॉर्मन्स इंडिकेटर पद्धतीच्या धर्तीवर कामगिरी विचारात घेण्यासाठी समांतर प्रणाली असावी, अशा सूचनांचा त्यात समावेश आहे.

यूजीसीने अलीकडेच प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू निवडीच्या निकषांमध्ये प्रस्तावित बदलांचा मसुदा जाहीर केला. या बदलांची देशभरात चर्चा आहे. विशेषतः कुलगुरू निवडीमध्ये केलेल्या बदलांना काही राज्यांनी तीव्र विरोध दर्शवला आहे. यूजीसीने प्रस्तावित बदलांवर हरकती-सूचना सादर करण्यासाठी ५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर, डॉ. एकबोटे यांनी प्रस्तावित बदलांमुळे उद्भवणाऱ्या समस्या निदर्शनास आणून देत काही मूलभूत सुधारणा सुचवल्या आहेत.

परिषदांमध्ये शोधनिबंध सादर करणे महत्त्वाचे असते. त्यामुळे परिषदांमध्ये सादर केलेले शोधनिबंध एकूण शोधनिबंधांच्या संख्येत विचारात घेतले जावेत. कंत्राटी प्राध्यापक आणि संबंधित उच्च शिक्षण संस्था यांच्यात करार करण्याची तरतूद करण्यात आली असली, तरी त्याचा कालावधी किती असावा, तसेच करारासाठीच्या मुद्रांकाची रक्कम किती याबाबत स्पष्टता असावी, प्राध्यापकांच्या मंजूर पदांवर सहा महिन्यांसाठी कंत्राटी प्राध्यापक नेमण्यातून शिक्षण क्षेत्रात पळवाटा निर्माण होऊन त्याचा शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे कंत्राटी प्राध्यापकांचा कालावधी ११ महिने असावा अशा सूचना करण्यात आल्या आहेत.

05/02/2025 | Pune | Page : 09
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'एआय'च्या स्वदेशी प्रारूपाचा विकास

## संसदेतील अभिभाषणात राष्ट्रपतींचा निर्धार

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**नवी दिल्ली :** चीनचे कृत्रिम बुद्धिमत्तेचे (एआय) प्रारूप 'डीपसिक'च्या आव्हानांची जगभरात चर्चा होत असताना भारताने एआयचे स्वदेशी प्रारूप विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. भारताच्या या एआय मोहिमेचा उल्लेख राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी शुक्रवारी संसदेतील अभिभाषणात केला. विकसित भारताचे ध्येय गाठण्यासाठी केंद्र सरकारकडून होत असलेल्या डिजिटल तंत्रज्ञानाचा वेगाने विकास केला जात आहे. त्यामध्ये एआयचे प्रारूप महत्त्वाचा घटक असेल, असे मुर्मू यांनी स्पष्ट केले. राष्ट्रपतींच्या अभिभाषणातच नव्हे तर यंदाच्या आर्थिक पाहणी अहवालामध्येही 'एआय'आधारित आर्थिक धोरणांना महत्त्व देण्यात आले आहे.

संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाची शुक्रवारी सुरुवात झाली. दोन्ही सभागृहांतील सदस्यांना उद्देशून केलेल्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या तासाभराच्या अभिभाषणामध्ये केंद्र सरकारची आर्थिक धोरणे व विकास, सामाजिक योजनांद्वारे सामान्यांचे कल्याण आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या आधारे अर्थकारणाला गती देण्याचा निर्धार व्यक्त झाला. डिजिटल तंत्रज्ञानविषयक केंद्र सरकारच्या धोरणाचे प्रतिबिंब राष्ट्रपतींच्या अभिभाषणामध्ये होते.

याशिवाय मुर्मू यांनी देशातील डिजिटल क्रांतीचा उल्लेख करताना यूपीआय पेमेंट यंत्रणेच्या विस्तारावरही भाष्य केले. देशातील ५० टक्के पेमेंट यूपीआयच्या माध्यमातून होत आहे. ५ जी सेवा विकसित झाल्याने या डिजिटल पेमेंट यंत्रणेचा विकास झाला असल्याचे मुर्मू म्हणाल्या. त्याचबरोबर डिजिटल तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामधील सायबर गुन्हेगारीच्या आव्हानांवरही चिंता व्यक्त केली. चंद्रयान, गगनयान, डॉकिंग यंत्रणा, इस्त्रोचे यश आदी मुद्द्यांचाही त्यांच्या भाषणात समावेश होता.

जागतिक व्यासपीठांवर भारताचे महत्त्व वाढले आहे. क्वाड, ब्रिक्स, जी-२० अशा विविध आंतरराष्ट्रीय समूहांना भारताच्या नीतींबाबत विश्वास वाटू लागला आहे. जी-२० परिषदेतील दिल्ली घोषणापत्र हे त्याचे उत्तम उदाहरण मानता येईल, असे मुर्मू म्हणाल्या.

मुर्मू यांनी नवे शैक्षणिक धोरण, महिलांच्या आर्थिक विकासाच्या योजना, दलित- वंचित- आदिवासींच्या कल्याणासाठी राबवल्या जात असलेल्या योजना व धोरणांचाही उल्लेख केला. संस्कृती व प्रगती हातात हातू घालून जात असल्याचा दावाही मुर्मू यांनी केला.



### विकासात महाराष्ट्राचा वाटा

२०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी डिजिटल क्रांतीच्या बरोबरीने धोरणलकव्यातूनही बाहेर येण्याची गरज मुर्मू यांनी प्रतिपादित केली. करोनाच्या महासंकटानंतर पायाभूत सुविधांचा विकास केला जात आहे. मेट्रो रेल्वेचा देशात वेगाने विस्तार केला जात आहे. महाराष्ट्रामध्ये ठाणे, मुंबई, पुणे या शहरांमध्ये मेट्रोचा विस्तार केला जात आहे. बंदराचा विकासही केला जात असून वाढवण बंदर हा त्यातील प्रमुख प्रकल्प असल्याचेही त्या म्हणाल्या. केंद्र सरकारने मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याचा विशेष उल्लेखही मुर्मू यांनी केला.

### एक देश एक ओळख

देशवासीयांसाठी एक देश, एक ओळख म्हणजे भारत असून विकसित भारत हे प्रत्येक देशवासीयाचे ध्येय असल्याचेही मुर्मू म्हणाल्या. अनुच्छेद ३७० रद्द करून काश्मीरचे 'विलीनीकरण' केले गेले. काशी-तेलुगु संगम, काशी-तामिळ संगम या सांकृतिक कार्यक्रमांतून भारत ही ओळख निर्माण होण्यास मदत मिळत असल्याचाही दावा मुर्मू यांनी केला.

01/02/2025 | Mumbai | Page : 13
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# विद्यापीठ स्थापनेसाठी नवे निकष

## किमान २० एकर जमीन आवश्यक; अनुदान आयोगाचा अहवाल जाहीर

**पुणे, ता. ३१ : विद्यापीठ स्थापनेसाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या निकषांत बदल सुचविणारा अहवाल विद्यापीठ अनुदान आयोगाने जाहीर केला आहे. या अहवालानुसार, आता विद्यापीठ स्थापनेसाठी किमान वीस एकर जमीन आवश्यक असणार आहे. शहरी भागात दहा एकर, तर मुक्त विद्यापीठ आणि कॅम्पससाठी पाच एकर जमीन असणे आवश्यक असल्याचे या अहवालात नमूद केले आहे.**

विद्यापीठ अनुदान आयोगाने उच्च शिक्षण संस्थांसाठी आवश्यक जमीन निर्धारित करण्यासाठी नेमलेल्या तज्ज्ञ समितीचा अहवाल संकेतस्थळावर प्रसिद्ध केला आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार, देशातील उच्च शिक्षणातील एकूण प्रवेशाचे प्रमाण २०१८ मध्ये २६.३ टक्के इतके असून, २०३५ पर्यंत हे प्रमाण ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट आहे. देशातील उच्च शिक्षण संस्थांचे किमान तीन हजार विद्यार्थ्यांसह बहुविद्याशाखीय विद्यापीठे, समूह विद्यापीठे, ज्ञान केंद्रांत रूपांतर करण्याची शिफारस शैक्षणिक धोरणात आहे. नव्या उच्च शिक्षण संस्थांची स्थापना करून देशाच्या सर्व भागांमध्ये शिक्षणात सर्वसमावेशकता, उपलब्धता आणि समानता साध्य करण्यावर भर आहे. त्यानुसार २०३० पर्यंत प्रत्येक जिल्ह्यात किमान एक मोठी बहुविद्याशाखीय उच्च शिक्षण संस्था असली पाहिजे, असे धोरणात नमूद केले आहे.

### महत्त्वाचे

- तीन हजार विद्यार्थी असलेल्या विद्यापीठाच्या स्थापनेसाठी किमान वीस एकर जमीन असणे आवश्यक आहे. संबंधित जमीन बाजाररहित, फ्री होल्ड किंवा भाडेतत्त्वावरील असावी. भाडेकरार किमान ३० वर्षांसाठी असावा. एकूण जागेपैकी ४० टक्के जागा मोकळी ठेवणे आवश्यक
- विद्यापीठातील व्यायामशाळा, मैदान, ग्रंथालय अशा सुविधांचा नजीकच्या शिक्षण संस्था वापर करू शकतात
- मुक्त विद्यापीठ आणि ऑफ कॅम्पससाठी पाच एकर जागा असणे आवश्यक आहे. शहरी आणि डोंगराळ भागात विद्यापीठ स्थापनेसाठी किमान दहा एकर जागा उपलब्ध असावी. त्यातील तीन एकर जागा मोकळी असणे आवश्यक
- कायद्याने परवानगी असलेल्या ठिकाणी 'व्हर्टिकल' विस्तार करणेही शक्य. त्यानुसार बांधकामाचे क्षेत्र कमी होऊ शकते. मात्र, हरित संकुलासाठी मोकळी जागा किमान तीन एकर असावी

### सहा सदस्यांची समिती

- नव्या निकषांची शिफारस करण्यासाठी आयोगाकडून सहा सदस्यांची समिती
- राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांचाही त्यात समावेश
- समितीने अभ्यास करून नवे निकष प्रस्तावित केले असून, त्या शिफारशींचा अहवाल आयोगाकडून प्रसिद्ध

### ...तर स्वतंत्रपणे विचार

विद्यापीठ स्थापनेसाठी किमान किती जमीन असावी, याचे निकष निश्चित करतानाच प्रस्तावित निकषांची पूर्तता न करणाऱ्या विद्यापीठांच्या प्रस्तावांचा आयोगाकडून प्रस्तावनिहाय स्वतंत्रपणे विचार केला जाऊ शकतो, असेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.



Sakal 1.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# शैक्षणिक आराखड्यासाठी समिती

## राष्ट्रीय धोरणाच्या अंमलबजावणीसाठी पाऊल; पाच वर्षांचा होणार विचार

**पुणे, ता. ३१ :** राज्यात उच्च शिक्षणात आमूलाग्र बदल होत असताना आता पुढील पाच वर्षांचा सर्वसमावेशक शैक्षणिक आराखडा तयार करण्यात येणार आहे. हा आराखडा तयार करण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालयाने जळगाव येथील एम. जे. महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अनिल राव यांच्या अध्यक्षतेखाली १२ जणांची समिती नियुक्त केली आहे.

या आराखड्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील सर्व विद्यापीठांचा बृहत् आराखडा समाविष्ट असणार आहे. यानिमित्ताने उच्च शिक्षण विभागाने राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०ची सूत्रबद्ध पद्धतीने अंमलबजावणी होण्यासाठी आता एक पाऊल पुढे टाकले आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व अकृषी विद्यापीठातील विभाग आणि स्वायत्त महाविद्यालयांत राज्य सरकारच्या निर्णयानुसार नवीन अभ्यासक्रम पद्धती आणि श्रेयांक पद्धती लागू करण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उर्वरित संलग्न महाविद्यालयांत त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

एवढंच नव्हे तर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून वेळोवेळी मार्गदर्शक तत्त्वे, अधिसूचना, परिपत्रके काढण्यात येतात. त्याअनुषंगाने राज्यात होणाऱ्या बदलांसंदर्भात आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक तत्त्वांस अनुसरून पुढील पाच वर्षे अत्यंत महत्त्वाची आहेत. या पार्श्वभूमीवर वर्षनिहाय आणि पाच वर्षांचा सर्वंकष आणि सर्वसमावेशक शैक्षणिक आराखडा तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी समिती स्थापन केली आहे, अशी माहिती उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी दिली.

### समितीत यांचा समावेश

- माजी प्राचार्य अनिल राव यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या या समितीत शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. डी. कुलकर्णी, कवयित्री बहिणाबाई चौधरी, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. एल. माहेश्वरी, गडचिरोलीतील गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे, नाशिकच्या यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे, श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. उज्ज्वला चक्रदेव, उद्योजक महेश दबक, भरत अमळकर, तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर हे सदस्य असून, मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव हे सदस्य सचिव आहेत.

### समितीच्या कार्यकक्षा

- सर्व विद्यापीठांचा पाच वर्षांचा बृहत् आराखडा संबंधित विद्यापीठे तयार करणार
- राज्याचा उच्च शिक्षणाचा पंचवार्षिक बृहत् समग्र विकास आराखडा बनविण्यासाठी आवश्यक उद्दिष्टे, निकष, मार्गदर्शक तत्त्वे ठरविली जाणार
- अंतिम विकास आराखड्यासाठी शिफारशी करणे

Sakal 1.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण दिवास्वप्न दाखविणार

## सुखदेव थोरात : 'भारतीय संविधानाची तोंडओळख' पुस्तकाचे प्रकाशन

**पुणे, ता. ३१ :** "विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पारंपरिक शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणात पारंगत करण्यासाठी यापूर्वी प्रयत्न केले. परंतु, ते फोल ठरले. यातून धडा घेऊन नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) आखणी करणे अपेक्षित होते. परंतु, सध्याचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अभ्यासावर आधारित नसून, विद्यार्थ्यांना केवळ दिवास्वप्न दाखविणारा आहे. हे धोरणही अपयशी ठरणार आहे," अशी टीका विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष प्रा. सुखदेव थोरात यांनी केली.



**पुणे :** 'भारतीय संविधानाची तोंडओळख' या पुस्तकाचे प्रकाशन करताना या वेळी (डावीकडून) प्रा. अविनाश फुलझेले, नीता इनामदार, प्रा. सुखदेव थोरात, संजीवनी मुजुमदार, डॉ. रवींद्र होवाळ, डॉ. स्वाती मुजुमदार, प्रा. अजय चौधरी.

डॉ. रवींद्र होवाळ लिखित 'भारतीय संविधानाची तोंडओळख' या पुस्तकाचे प्रकाशन प्रा. थोरात यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. या वेळी 'सिंबायोसिस स्किल्स ॲण्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी'च्या प्र-कुलगुरू डॉ. स्वाती मुजुमदार, सिंबायोसिस सेंटर फॉर हायर एज्युकेशन रिसर्च ॲण्ड पॉलिसी ॲडव्होकेसी सिंबायोसिस इंटरनॅशनल'च्या संशोधन प्रा. नीता इनामदार, आर.टी.एम. नागपूर विद्यापीठाचे प्रा. अविनाश फुलझेले, अजय चौधरी, लेखक डॉ. रवींद्र होवाळ आदी उपस्थित होते.

### १८ टक्के कामगारवर्गाला प्रशिक्षण

**"२०२२-२३ राष्ट्रीय नमुना सर्वेक्षणाच्या आकडेवारीनुसार बिगर शेती क्षेत्रातील फक्त १८ टक्के कामगारवर्गाला प्रशिक्षण प्राप्त झाले. या तुलनेत जपान, जर्मनी, चीन या देशांत याचे प्रमाण अधिक असल्याचे दिसते. त्यामुळे अजूनही व्यावसायिक अभ्यासक्रमांची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे ही टक्केवारी वाढविण्यावर भर दिला पाहिजे," असे थोरात म्हणाले.**

थोरात म्हणाले, "आपल्याकडे पॉलिटेक्निक आणि आयटीआय मागे पडले, याचे कारण असे की, आपण त्याला आधुनिकतेची जोड दिली नाही. जुन्या अभ्यासक्रमांवर आपण अधिक भर दिला. मागणी लक्षात घेऊन नवीन आवश्यक विषयांचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला नाही. मात्र, आता यावर काम होताना दिसत आहे, ही बाब चांगली आहे.

Sakal 1.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# पाच हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

- १५ फेब्रुवारीपर्यंत इच्छुक विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची संधी
- अभियांत्रिकीचा पदवी आणि पदविका अभ्यासक्रम घेणाऱ्यांना मिळणार लाभ

**अ.भा. तंत्रशिक्षण परिषदेची घोषणा**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद अर्थात एआयसीटीईने विद्यार्थ्यांसाठी यंग अचिव्हर्स स्कॉलरशिप ॲण्ड होलिस्टिक ॲकॅडमिक स्किल्स एंटरप्राइझ इनिशिएटिव्ह स्कीम २०२५ सुरू केली आहे. या योजनेंतर्गत पाच हजार २०० विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.**

या योजनेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञानाच्या प्रमुख शाखांमध्ये तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करणे आहे. इच्छुक विद्यार्थ्यांना १५ फेब्रुवारीपर्यंत एआयसीटीईच्या अधिकृत वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज करता येणार असल्याचे स्पष्ट केले आहे. ही शिष्यवृत्ती फक्त अभियांत्रिकी शाखांमध्ये पदवी आणि पदविका अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहे. या योजनेंतर्गत पाच हजार २०० शिष्यवृत्ती दिल्या जातील, त्यापैकी दोन हजार ५९३ पदवी विद्यार्थ्यांसाठी आणि दोन हजार ६०७ डिप्लोमा विद्यार्थ्यांसाठी राखीव आहेत. पदवी विद्यार्थ्यांना दरवर्षी ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल आणि डिप्लोमा विद्यार्थ्यांना दरवर्षी ३० हजार रुपयांची मदत दिली जाईल. ही मदत पदवीच्या विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त चार वर्षांसाठी आणि डिप्लोमाच्या विद्यार्थ्यांसाठी जास्तीत जास्त तीन वर्षांसाठी दिली जाईल. सर्व अर्जांची पडताळणी संस्थेकडून केली जाईल आणि एआयसीटीई स्तरावर त्यांची उलटतपासणी केली जाईल. निवडलेल्या विद्यार्थ्यांना ही रक्कम डायरेक्ट बेनिफिट ट्रान्सफर अर्थात थेट लाभ हस्तांतर योजनेद्वारे दिली जाणार आहे.

विद्यार्थ्याने एआयसीटीई मान्यताप्राप्त संस्थेत पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात किंवा दुसऱ्या वर्षी लॅटरल एन्ट्रीद्वारे प्रवेश घेतलेला असावा. उमेदवाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. उत्पन्नाचा दाखला राज्य, केंद्रशासित प्रदेश सरकारने प्रसिद्ध केला पाहिजे. पात्रता परीक्षा आणि पदवी, पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशामधील अंतर जास्तीत जास्त दोन वर्षांचे असावे. जर विद्यार्थी राखीव प्रवर्गातील असेल आणि त्याची निवड सामान्य श्रेणीतील गुणवत्ता यादीत झाली तर त्याला/तिला फक्त सामान्य श्रेणीतच विचारात घेतले जाईल. ही शिष्यवृत्ती फक्त मुख्य अभियांत्रिकी अभ्यासक्रमांसाठी आहे. जर विद्यार्थ्याने दुसऱ्या शाखेत बदली केली तर तो शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरेल आणि त्याला संपूर्ण रक्कम परत करावी लागेल, असे शिष्यवृत्तीसाठीच्या पात्रतेचे निकष ठेवण्यात आले आहेत.

Pune Edition
Feb 01, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# नेट-सेट, पीएच.डी.धारक संघर्ष समिती करणार आंदोलन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र शासन व यूजीसीच्या निर्देशानुसार शंभर टक्के प्राध्यापक भरती करावी, तसेच सीएचबी पद्धत कायमची बंद करून समान काम समान वेतन (वर्षभराच्या नियुक्तीसह ८४ हजार रुपये दरमहा वेतन) लागू करावे, विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये कायमस्वरूपी पूर्णवेळ सहाय्यक प्राध्यापकांची नियुक्ती करावी, या प्रमुख तीन मागण्यांसाठी नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने येत्या २० व २१ फेब्रुवारी रोजी सत्याग्रह आंदोलन व संघर्ष पदयात्रेचे आयोजन केले आहे.

राज्यातील अशासकीय महाविद्यालयात नवीन शैक्षणिक धोरण लागू झाले. परंतु यूजीसीच्या नियमानुसार प्रत्येक महाविद्यालयांमध्ये कमीत कमी ८० टक्के प्राध्यापक पूर्णवेळ असायला हवे. महाराष्ट्र शासनाने मात्र याला हरताळ फासला आहे. आजच्या स्थितीत प्रत्येक महाविद्यालयात केवळ ३० ते ४० टक्के प्राध्यापक कार्यरत आहेत.

- **प्राध्यापक भरतीसह अन्य मागण्यांसाठी २० आणि २१ फेब्रुवारीला संघर्ष पदयात्रेचे आयोजन**

उर्वरित सीएचबी पद्धतीवर काम करत आहेत. त्यामुळे वरिष्ठ महाविद्यालयात १०० टक्के पदभरती करण्यात यावी. याबरोबरच सीएचबी तत्त्वावर ज्या प्राध्यापकांची भरती केली जाते त्यांना अल्प मानधन दिले जाते. परंतु, यूजीसीच्या नियमानुसार १० टक्केच फक्त सीएचबी तत्त्वावर प्राध्यापक भरती असेल. पण ही भरती करत असताना पूर्णवेळ प्राध्यापकाच्या पगाराएवढाच त्यांनाही पगार मिळाला पाहिजे, अशी तरतूद असताना महाराष्ट्र शासनाकडून सीएचबी प्राध्यापकांना केवळ १५ ते २० हजार रुपये मानधन देण्यात येते. त्यामुळे समान काम समान धोरण लागू करावे. विनाअनुदानित महाविद्यालयांमध्ये संस्थाचालक पूर्णवेळ प्राध्यापक भरती केली जावी, अशी मागणी संघटनेकडून के ली जात आहे.

Pune Edition
Feb 01, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

City | Pune Times Mirror

Saturday, February 1, 2025

# 11K professors' posts vacant

## Govt to start process of recruitment; Governor's office, however, puts brakes on drive in all universities

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror



PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSES ONLY

**The state's Higher and Technical Education Minister Chandrakant Patil has discussed this with the state's Finance Minister and Deputy Chief Minister Ajit Pawar**

The University Grants Commission (UGC) has advised varsities from time to time to fill up the vacant posts of professors. As a result, the quality and standard of education is declining. Against this backdrop, the implementation of the National Education Policy (NEP) has started in the state and it is necessary to have the necessary manpower for the effective implementation of the NEP. Therefore, the state's Higher and Technical Education Minister Chandrakant Patil insists that vacant posts of professors in the state be filled up. Therefore steps are being taken to fill up most of the pending posts in the state, reliable sources said. There is a huge number of vacant posts of professors in public non-agricultural universities and affiliated higher education institutions. The number of posts vacant after reservation, is 11,087 across the state.

Currently, there are 31,185 professor posts approved for filling in the state of Maharashtra. Earlier, 22,236 of them were filled. Also, 3,580 posts have been filled up since 2018. Currently, it has been reported that 11,087 posts are vacant. The state's Higher Education Department recently issued a circular and reviewed the vacant professor posts. Therefore, sources gave reliable information that the recruitment of professors will definitely speed up in the future.

In view of the implementation of the National Education Policy, it is expected that 75 percent of the professor posts should be filled in all universities and colleges. The University Grants Commission issued a circular from time to time and informed all the states about filling up the posts of professors. Since the posts of professors are vacant, how will the National Education Policy (NEP) be implemented? This question is being raised from time to time. Therefore, the state's Higher and Technical Education Minister Chandrakant Patil has discussed this with the state's Finance Minister and Deputy Chief Minister Ajit Pawar, senior officials of the Higher Education Department said.

Although Higher and Technical Education Minister Chandrakant Patil insists on filling up the vacant posts of professors, the Governor's office has currently put a moratorium on the recruitment of professors in all universities. The Governor's office has taken the stand that these posts should be filled through an independent commission.

Therefore, it is clear that the posts of professors will have to be filled according to the prevailing method of the UGC. Therefore, the future of the recruitment drive depends on what decision the Governor's office and the finance department take.

Pune Mirror 1.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

नवभारत
www.navbharatlive.com

# एम.फिल. डिग्री धारक प्राध्यापकों को नेट से छूट

### उच्च शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटिल ने दी जानकारी

**पुणे.** राज्य के 12 गैर-कृषि विश्वविद्यालयों से संबद्ध महाविद्यालयों में कार्यरत 1,447 एमफिल धारक प्राध्यापकों को आखिरकार न्याय मिला है. उच्च एवं तकनीकी शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटिल ने घोषणा की है कि विश्वविद्यालय अनुदान आयोग (यूजीसी) इन प्राध्यापकों को नेट परीक्षा से छूट देने का निर्णय लेने वाला है. उच्च शिक्षा क्षेत्र के लिए यह महत्वपूर्ण निर्णय होने के कारण इस पर सभी की नजरें टिकी हुई हैं. संशोधित प्रस्ताव अब उच्च शिक्षा निदेशालय को प्राप्त हो रहे हैं. अंतिम समीक्षा के बाद, उन्हें यूजीसी को भेजा जाएगा. इस निर्णय से कई प्राध्यापकों को राहत मिलेगी.

**15 वर्षों का इंतजार समाप्त :** राज्य के विभिन्न महाविद्यालयों में 1 जनवरी 1994 से 11 जुलाई 2009 के बीच एमफिल धारक प्राध्यापकों की नियुक्ति की गई थी. पिछले 15 वर्षों से ये प्राध्यापक नेट परीक्षा से छूट की मांग कर रहे थे. फरवरी 2024 में उच्च एवं तकनीकी शिक्षा मंत्री चंद्रकांत पाटिल ने यूजीसी अध्यक्ष जगदीश कुमार से बैठक की. इस बैठक में एमफिल धारकों को अंतिम अवसर देने का निर्णय लिया गया.

**शर्तें और मानदंड निर्धारित :** यूजीसी ने नेट परीक्षा से छूट देने के लिए कुछ शर्तें निर्धारित की हैं. इसके अनुसार, नियुक्ति 14 जून 2006 या उससे पहले की गई हो, प्राध्यापक नियमित और स्थायी पद पर कार्यरत हो और 1 जनवरी 1994 से 11 जुलाई 2009 के बीच एमफिल डिग्री प्राप्त की हो.



## प्रस्ताव प्रक्रिया अंतिम चरण में

इस निर्णय को लागू करने के लिए उच्च शिक्षा निदेशक डॉ. शैलेंद्र देवलाणकर ने राज्य के सभी विश्वविद्यालयों के कुलसचिवों को संबंधित प्राध्यापकों के प्रस्ताव प्रस्तुत करने के निर्देश दिए थे. इस प्रक्रिया के तहत 12 विश्वविद्यालयों से कुल 1,447 प्रस्ताव प्राप्त हुए.

Pune plus Edition
Feb 02, 2025 Page No. 2
Powered by: navbharatlive.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता

१० । सोमवार, ३ फेब्रुवारी २०२५ पुणे दिनांक WWW.LOKSATTA.COM लोकसत्ता

### विद्यापीठातील निकालांची रखडपट्टी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी घेतलेल्या सत्र परीक्षेच्या निकालाची रखडपट्टी झाली आहे. अंतर्गत आणि बाह्य मूल्यमापनाच्या मूल्यांकन पद्धतीच्या अनिश्चिततेचा फटका निकालांना बसला असून, आता नव्या परिपत्रकामुळे निकाल तयार केलेल्या विभागांवर पुन्हा नव्याने निकाल तयार करण्याची वेळ आली आहे.

विद्यापीठातील विभागांमध्ये आतापर्यंत ५० टक्के गुण अंतर्गत मूल्यमापन आणि ५० टक्के गुण बाह्य मूल्यमापनाला अशी ५०:५० मूल्यांकन पद्धती लागू होती. गेल्यावर्षी ही पद्धती बदलून ७०:३० मूल्यांकन पद्धत लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र त्याची अंमलबजावणी झाली नाही. या वर्षी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर पुन्हा ७०:३० मूल्यांकन पद्धत लागू करण्याबाबतची सूचना देण्यात आली. त्याला विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी विरोध केला होता. त्यानंतर विद्यापीठातील विभागांमध्ये हिवाळी परीक्षा झाल्या. मूल्यांकन पद्धती निश्चित नसल्याने निकाल प्रलंबित राहिले आहेत. २४ जानेवारीच्या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील विभागांना ५०:५० मूल्यांकन पद्धत लागू करण्यास मान्यता देण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, काही विभागांनी पूर्वीच्या आदेशानुसार ७०:३० मूल्यांकन पद्धतीनुसार निकाल तयार करण्याची प्रक्रिया राबवली होती.

या पार्श्वभूमीवर, विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, विद्यापीठातील शैक्षणिक विभागांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना ५०:५० मूल्यांकन पद्धती शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ विभागातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून आणि पदवी अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आले आहे.

03/02/2025 | Pune | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 4 Feb 2025_015
04 Feb 2025

### विद्यापीठातील निकाल लांबणीवर पडणार

#### मूल्यांकन पद्धतीत बदल झाल्याचा परिणाम

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांना ऐनवेळी नवी मूल्यांकन पद्धती लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे तयार करण्यात आलेला निकाल पुन्हा नव्याने करावे लागणार आहे. अचानकपणे मूल्यांकन पद्धतीत बदल झाल्याने त्याचा फटका निकालांना बसणार आहे. त्यामुळे विभागातील सत्र परीक्षेचा निकाल लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत.

आतापर्यंत विद्यापीठातील शैक्षणिक विभागांमध्ये ५० टक्के गुण अंतर्गत मूल्यमापन आणि ५० टक्के गुण बाह्य मूल्यमापन अशी पद्धत होती. गतवर्षी ही पद्धत बदलून ७०:३० मूल्यांकन पद्धत लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. यावर्षी शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर पुन्हा ७०:३० मूल्यांकन पद्धत लागू करण्याबाबतची सूचना देण्यात आली. त्याला विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी विरोध दर्शविला आहे.

विद्यापीठातील विभागांमध्ये हिवाळी परीक्षा झाल्या. मूल्यांकन पद्धती निश्चित नसल्याने निकाल प्रलंबित राहिले आहेत. २४ जानेवारीच्या परिपत्रकाद्वारे विद्यापीठातील विभागांना ५०:५० मूल्यांकन पद्धत लागू करण्यास मान्यता देण्यात आल्याचा निर्णय घेण्यात आला. मात्र, काही विभागांनी पूर्वीच्या आदेशानुसार ७०:३० मूल्यांकन पद्धतीनुसार निकाल तयार करण्याची प्रक्रिया राबवली होती. या सर्व पार्श्वभूमीवर निकाल तयार करण्यावरुन संभ्रम निर्माण झाल्याचे चित्र आहे.

दरम्यान, विद्यापीठाच्या परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रक प्रसिद्ध केले. त्यानुसार विद्यापीठातील शैक्षणिक विभागांतील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना ५०:५० मूल्यांकन पद्धती शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात City 4 Feb 2025_015 04 Feb 2025

### एमएड अभ्यासक्रम एक वर्षाचा होणार

**राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेचा निर्णय**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषदेने (एनसीटीई) नुकताच एक वर्षाचा बॅचलर ऑफ एज्युकेशन अर्थात बीएड अभ्यासक्रम पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर आता शिक्षणशास्त्रातील मास्टर ऑफ एज्युकेशन अर्थात एमएड हा पदव्युत्तर अभ्यासक्रमही देशभरात एक वर्षाचा असणार आहे. आतापर्यंत एमएड व बीएड दोन वर्षांचा अभ्यासक्रम होता. आता २०२६ पासून दोन वर्षांच्या बीएड अभ्यासक्रमाचे प्रवेश बंद केले जाणार आहेत.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०च्या शिफारशींच्या आधारे यूजीसीने जून २०२४ मध्ये पदव्युत्तर म्हणजेच पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे प्रसिद्ध केली होती. त्याच मार्गदर्शक तत्वांनुसार एक वर्षाचा एम.एड.अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे, अशी माहिती एनसीटीईचे अध्यक्ष प्रा. पंकज अरोरा यांनी दिली आहे. एक वर्षाचा बी.एड. दोन वर्षांचा पदवी शिक्षण कार्यक्रम किंवा ४ वर्षांचा एकात्मिक शिक्षक शिक्षण कार्यक्रम (आयटीईपी) अभ्यासक्रम अशा तिन्ही श्रेणी पैकी कोणत्याही एक अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेला विद्यार्थी एक वर्षाच्या एम.एड अभ्यासक्रम करण्यास पात्र राहणार आहेत. एक वर्षाच्या एमड अभ्यासक्रमसाठी २०२५ मध्ये शिक्षण संस्थांकडून अर्ज मागवले जातील. त्यानंतर हा अभ्यासक्रम २०२६-२७ या शैक्षणिक वर्षापासून सुरु केले जाणार आहे.

#### प्रवेशाच्या जागा वाढतील?

यापूर्वी बीएड व एमएड अभ्यासक्रम एक वर्षाचे होते. त्यानंतर उत्तीर्ण विद्यार्थी शाळा व महाविद्यालयात शिक्षक म्हणून पात्र ठरत असत. आता शिक्षकांच्या नोकरीची शाश्वती नाहीत. त्यातच बीएड व एमएड अभ्यासक्रम दोन वर्षांचा करण्यात आला होता. त्यामुळे विद्यार्थी या अभ्यासक्रमांकडे प्रवेश घेण्यास अनुत्सुक होते. परिणामी, हजारो जागा रिक्त राहत असत. आता एक वर्षाचा अभ्यासक्रम केल्याने किमान प्रवेशाच्या जागा वाढण्याची शक्यता आहे.

---

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### बीबीए, बीसीएससह १८ अभ्यासक्रमांचा शिष्यवृत्ती योजनेत नव्याने समावेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे राबवण्यात येणाऱ्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये संगणक उपयोजन पदवी (बीसीए), व्यवस्थापनशास्त्र पदवी (बीबीए, बीएमएस) यांसह १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना या योजना लागू होणार आहेत. उच्च व तंत्रशिक्षण विभागाने याबाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध केला आहे.

**उच्च व तंत्रशिक्षण विभागाचा महत्त्वाचा निर्णय**

बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम यंदा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अखत्यारीत गेले आहेत. राज्यात या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया समाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे (सीईटी सेल) राबवण्यात आली. त्यामुळे या अभ्यासक्रमांना आता व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत असलेल्या या अभ्यासक्रमांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नव्याने समावेश करण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखालील सचिवस्तरीय प्रदत्त समितीच्या १२ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आला आहे. सचिवस्तरीय प्रदत्त समितीच्या निर्णयानुसार, बीसीए, बीबीए, बीएमएस यांसह पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, आयसी मॅन्युफॅक्चरिंग, ॲडव्हान्स्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, टेक्निकल टेक्सटाइल, आर्किटेक्चरल असिस्टंटशिप, एकात्मिक एमबीए, एमबीए फार्मा टेक, एमबीए टेक कॉम्प्युटर इंजिनिअरिंग अशा १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये २०२४-२५ पासून लागू करण्यास मान्यता दिली आहे. अर्थसंकल्पित तरतूद करण्याची कार्यवाही तंत्रशिक्षण संचालकांनी करण्याचे निर्देशही दिले आहेत.

Pune Edition
Feb 04, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# मूल्यांकन पद्धतीत अनिश्चितता

**नव्या परिपत्रकामुळे सत्र परीक्षांचे निकाल लांबणीवर**

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी घेतलेल्या सत्र परीक्षेच्या अंतर्गत आणि बाह्य मूल्यमापनाच्या मूल्यांकन पद्धतीत अनिश्चितता असल्याने निकाल लांबणार आहे. त्यातच आता नवे परिपत्रक काढून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या मूल्यांकन पद्धतीनुसार निकालाची अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले आहे. काही विभागांना पुन्हा निकाल तयार करावा लागणार असल्याने सत्र परीक्षांचे निकाल लांबण्याची शक्यता आहे.

परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी निकालाबाबत परिपत्रक काढले आहे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांना ५०:५० मूल्यांकन पद्धती शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली आहे; तसेच विद्यापीठ अधिकार मंडळाने वेळोवेळी घेतलेल्या निर्णयानुसार विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था, विद्यापीठ विभागांतील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २३-२४ पासून आणि पदवी अभ्यासक्रमांना २४-२५ पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू करण्यात आले आहे. त्यानुसारच्या मूल्यांकन पद्धतीनुसार प्रत्येक विषयाच्या अंतर्गत आणि बहिःस्थ परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येकी ४० टक्के गुण आणि एकूण गुणांच्या ४० टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे. या अनुषंगाने संबंधित पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या सत्र एकच्या ऑक्टोबर २०२४ च्या परीक्षांचे निकालपत्रक निश्चित केलेल्या मूल्यांकन पद्धतीनुसार परीक्षा विभागाकडे सादर किंवा फेरसादर करावे, असे आदेश देण्यात आले आहेत.

दरम्यान, विद्यापीठातील विभागांमध्ये आतापर्यंत अंतर्गत आणि बाह्य मूल्यमापनाला प्रत्येकी ५० टक्के मूल्यांकन पद्धत लागू होती. गेल्या वर्षी ही पद्धती बदलून ७०:३० मूल्यांकन पद्धत लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला, मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही. यंदा शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर पुन्हा ७०:३० मूल्यांकन पद्धत लागू करण्याबाबतची सूचना देण्यात आली. त्याला विद्यापीठातील शैक्षणिक विभागांनी विरोध केला होता. त्यानंतर विद्यापीठातील विभागांमध्ये हिवाळी परीक्षा झाल्या. मूल्यांकन पद्धती निश्चित नसल्याने निकाल प्रलंबित आहेत.

Maharashtra Times 4.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# मराठीत बोला; अन्यथा कारवाई

## राज्य सरकारकडून पुन्हा निर्देश

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

मराठी भाषा धोरण जाहीर होऊन जवळपास वर्ष होत आले, तरीही सरकारी कार्यालयांत मराठीबाबत पुरेशी जागरूकता दिसत नसल्याने राज्य सरकारने याबाबत पुन्हा आदेश काढले आहेत. सरकारी कार्यालयांत मराठीतून संवाद न साधणाऱ्या कर्मचाऱ्यांविरोधात शिस्तभंगाची कारवाई करण्यासह, केंद्रीय कार्यालये, बँकांमध्ये फलक, अर्जांची भाषा मराठीच असावी आणि संस्थांची नावे मराठीच वापरावीत, या शिफारशींची अंमलबजावणी करण्यात येणार आहे.

मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्यापासून तिचे संवर्धन आणि प्रसारासाठी विविध सूचना आणि निर्देश राज्य सरकारकडून जारी करण्यात येत आहेत. मार्च २०२४मध्ये महायुती सरकारने मराठी भाषा धोरण जारी केले होते. भारतीय स्वातंत्र्याच्या शतकमहोत्सवी वर्षांपर्यंत, म्हणजेच २०४७ पर्यंत पुढील सुमारे २५ वर्षांत मराठी भाषा तिच्या अंगभूत सामर्थ्यासह ज्ञान आणि रोजगाराची भाषा म्हणून प्रस्थापित व्हावी, हा मूळ उद्देश या धोरणामागे आहे.

यात प्रशासकीय पातळीवर मराठी भाषेचा वापर बंधनकारक असावा, यासाठी या शिफारशीची काटेकोर अमलबजावणी करण्याचे निर्देश नियोजन विभागाने सोमवारी पुन्हा जारी केले. यात सर्व सरकारी, निमसरकारी कार्यालये, महामंडळे आणि सरकारी अनुदानित कार्यालयांत मराठी भाषेतूनच बोलणे अनिवार्य असेल. तसेच मराठीत बोलणे अनिवार्य असल्याचे फलकही या कार्यालयांत लावावे लागणार आहेत.

मराठीत संभाषण न करणारे सरकारी अधिकारी, कर्मचारी यांच्याबाबत कार्यालय प्रमुख वा विभागप्रमुख यांच्याकडे तक्रार करता येऊ शकते. तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी दोषी आढळल्यास त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई होऊ शकते, असे या आदेशात म्हटले आहे.

### केंद्रीय कार्यालये, बँकांतही मराठी सक्तीची



केंद्र सरकारच्या त्रिभाषा सूत्रानुसार राज्यातील केंद्र सरकारची सर्व कार्यालये तसेच सर्व बँका इत्यादींमध्ये दर्शनी भागात लावण्यात येणारे सूचनाफलक, अधिकाऱ्यांचे नामफलक, अर्ज नमुने मराठीतून असणे अनिवार्य असेल. तसेच सरकारी-निमसरकारी आस्थापने, महामंडळे, शासन अंगीकृत उपक्रम, कंपन्या यांची सरकारने निश्चित केलेली मराठी नावेच कामकाजात वापरली जातील. नवीन नावे निश्चित करताना मराठीतील एकच नाव निश्चित केले जाईल. त्याचे इंग्रजीत भाषांतर न करता येणार नाही. ज्या आस्थापनांना द्विभाषिक नावे आहेत त्यांचा कारभार यापुढे मराठी नावाने होईल, असे या नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.

Maharashtra Times 4.2.2025

# 'पीएम विद्यालक्ष्मी' योजनेअंतर्गत नवे आकाश

## तब्बल ३८ लाख विद्यार्थ्यांचे अर्ज : उच्च शिक्षणासाठी अल्प व्याजदरात कर्ज

**पुणे, ता. ३ : आर्थिक परिस्थिती विकट असल्यामुळे उच्च शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्र सरकारने 'पीएम विद्यालक्ष्मी' योजनेअंतर्गत नवे आकाश दिले आहे. या योजनेअंतर्गत उच्च शिक्षणात कमी व्याजदरात शैक्षणिक कर्ज घेण्यासाठी देशातील तब्बल ३८ लाख ७३९ विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहेत, तर आतापर्यंत दहा लाख ६३ हजार ६३९ विद्यार्थ्यांचे अर्ज मंजूर झाले आहेत.**

केंद्रीय मंत्रालयाने ६ नोव्हेंबर २०२४ रोजी 'प्रधानमंत्री विद्यालक्ष्मी' योजनेला मान्यता दिली आहे. देशातील ८६० गुणवत्तापूर्ण उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेणाऱ्या २२ लाख विद्यार्थ्यांना दरवर्षी ही योजना लागू करण्याचे उद्दिष्ट आहे. याद्वारे विद्यार्थ्यांना देशातील शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी दहा लाख रुपयांचे शैक्षणिक कर्ज देऊन आधार दिला जातो. शैक्षणिक कर्ज घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'विद्या लक्ष्मी' हे पहिलेच पोर्टल कार्यान्वित केले आहे. अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : 'https://www.vidyalakshmi.co.in/' या संकेतस्थळाला भेट द्या.

| योजनेची उद्दिष्टे | योजनेचे फायदे | पात्रता |
|---|---|---|
| ■ आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षण घेऊ न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करणे | ■ १० लाखांपर्यंत शैक्षणिक कर्ज उपलब्ध | ■ विद्यार्थी भारतीय नागरिक असावा |
| ■ विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या क्षेत्रात शिक्षण घेण्यास प्रोत्साहित करणे | ■ कमी व्याजदरात कर्ज | ■ मान्यताप्राप्त शिक्षण संस्थेत प्रवेश घेतलेला असावा |
| ■ देशात उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढवणे | ■ कर्जाची परतफेड करण्याची मुदत सोईस्कर | ■ कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखांपेक्षा कमी असावे |

Sakal 4.2.2025

*News Paper Clippings During February 2025*

*Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# संशोधन केंद्रांचे लेखापरीक्षण

## माहिती सादर करण्यासाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे संशोधन केंद्रांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. या लेखापरीक्षणासाठी आवश्यक माहिती सादर करण्यासाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षणाबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. या परिपत्रकानुसार संशोधन केंद्रांना माहिती भरण्यासाठीची सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाइन माहिती भरल्यानंतर त्या माहितीनुसार संशोधन केंद्रात उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नियुक्त केली जाणार आहे. ही समिती संशोधन केंद्राला भेट देऊन खातरजमा करणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. या पूर्वी तीन वर्षांपूर्वी विद्यापीठाने शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण केले होते. त्यात काही संशोधन केंद्रांमध्ये अनियमितता होत असल्याचे प्रकार निदर्शनास आले होते. त्यानंतर आता पुन्हा एकदा शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे.

शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षणाबाबत विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर म्हणाले, विद्यापीठातर्फे तीन वर्षांपूर्वी प्रत्यक्ष (ऑफलाइन) शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात आले होते. आता ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यात संशोधन केंद्रांनी त्यांची माहिती ऑनलाइन प्रणालीत भरायची आहे. त्यानंतर समितीकडून भेट देऊन पडताळणी केली जाणार आहे. लेखापरीक्षणाद्वारे संशोधन केंद्रात पीएच.डी. प्रवेशाशिवाय पेटंट किती, संशोधन किती हे तपासले जाणार आहे. याद्वारे संशोधन केंद्रांची गुणवत्ता, कामकाज, सोयीसुविधा याबाबतची माहिती समजणार आहे.



### संशोधन केंद्रांना उद्दिष्ट

लेखापरीक्षणानंतर एक नवीन संकल्पना राबवण्याचा मानस आहे, विद्यापीठाशी संलग्न सुमारे तीनशे संशोधन केंद्रे आहेत. संशोधनाची गुणवत्ता उंचावण्यासाठी प्रत्येक संशोधन केंद्राचे काहीतरी उद्दिष्ट, विषय निश्चित केले पाहिजेत. जेणेकरून संशोधन विषयांनुसार प्रवेश प्रक्रिया राबवणे शक्य होईल. केवळ संशोधन करणे, शोधनिबंध प्रसिद्ध होणे या पलीकडे जाऊन सखोल संशोधन, बौद्धिक संपदा निर्मिती करण्यावर भर देण्याची गरज आहे. गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी कार्यशाळांद्वारे मार्गदर्शन करण्यात येत आहे, असे डॉ. काळकर यांनी सांगितले.

04/02/2025 | Pune | Page : 18
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# स्वदेशी 'एआय' तंत्रज्ञान लवकरच

**चीन आणि अमेरिकेने आपले 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' अर्थात 'एआय' तयार केले आहे. 'चॅटजीपीटी' आणि 'मेटाएआय'सारख्या 'एआय प्लॅटफॉर्म'ची निर्मिती अमेरिकेत झाली. जगभर धुमाकूळ घालणारे 'डीपसीक' 'मेड इन चायना' आहे; त्यामुळे प्रश्न पडतो की, या स्पर्धेत भारत कुठे आहे, याचा घेतलेला वेध...**

विहंग घाटे

'एआय'मुळे विस्तारणारी जगाची बाजारपेठ लक्षात घेऊन अनेक बड्या देशांनी त्यात लक्ष घातले आहे. नुकतीच 'डीपसीक' या चिनी 'एआय प्लॅटफॉर्म'ने जगाची झोप उडवली. 'एआय'च्या बाबतीत चीन आणि अमेरिकेने जगाला मागे टाकले असून, आता जगाचे लक्ष भारतीय 'एआय'कडे लागले आहे. या पार्श्वभूमीवर 'एआय' तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी भारत काय पावले टाकत आहे, हे लक्षात घेण्याची गरज आहे.

देशी 'एआय प्लॅटफॉर्म'ची निर्मिती करण्यासाठी आता भारतानेही कंबर कसली असून, आवश्यक पायाभूत सुविधांची निर्मिती करण्याचे शिवधनुष्य हाती घेण्यात आले आहे. 'एआय प्लॅटफॉर्म'साठी सर्वप्रथम स्वतःची डेटा सेंटर उभारावी लागणार आहे आणि त्यासाठी शक्तिशाली 'जीपीयू'ची व्यवस्थाही करावी लागणार आहे. गेल्याच आठवड्यात केंद्र सरकारने येत्या काही महिन्यांत शक्तिशाली आणि स्वस्त 'एआय' मॉडेल्स सादर करण्याची घोषणा केली. गेल्या वर्षभरापासून सरकार याची तयारी करीत असल्याचे आयटी मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. मार्च २०२४ मध्ये १०,३७२ कोटी रुपयांच्या तरतुदीसह 'मिशन इंडिया एआय'ला मंजुरी देण्यात आली. मागील अर्थसंकल्पात (२०२४-२५) या मिशनसाठी ५५१.७५ कोटींची तरतूद करण्यात आली.

**देशाचे 'एआय' मॉडेल महत्त्वाचे का?**

देशात तयार होणारा 'एआय प्लॅटफॉर्म' त्या देशाविषयी अधिक अचूक आणि विश्वासार्ह माहिती देतो, असे दिसून आले आहे. काही वादग्रस्त विषयांवर त्या प्लॅटफॉर्मची निर्मिती ज्या देशांमध्ये झाली, ते त्यांनाच प्राधान्य देत असल्याचेही आढळले आहे. उदाहरणार्थ, अनेक प्रकरणांमध्ये असे दिसून आले आहे, की 'डीपसीक' हे चीनशी संबंधित वादांवर टाळाटाळ करणारी उत्तरे देते किंवा अजिबात उत्तर देत नाही. 'चॅटजीपीटी'बाबतही सुरुवातीला असेच प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. भारताची प्रादेशिक विविधता आणि विविध भाषा लक्षात घेऊन तयार केलेले 'एआय मॉडेल' अधिक उपयुक्त ठरू शकते. मात्र, त्यासाठी चांगले तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज आहे.

**'एआय' तंत्रज्ञानाबाबत मतमतांतरे**

स्वदेशी 'एआय' तंत्रज्ञानाबाबत आपल्याकडे दोन मतप्रवाह आहेत. एक म्हणजे 'एआय'चा पाया देशात तयार असून, त्याद्वारे स्वतःचे मॉडेल तयार करण्याची आवश्यकता आहे; जेणेकरून आपल्या गरजेनुसार उत्पादने (चॅटबॉट्स, इमेज जनरेटर, व्हिडिओ जनरेटर, हेल्थ ट्रॅकर्स) तयार करता येतील. दुसऱ्या बाजूच्या मंडळींच्या मते, आपण 'एआय'च्या निर्मितीसाठी मोठी गुंतवणूक करू नये. त्याऐवजी, इतर देशांनी विकसित केलेल्या मॉडेल्सचा वापर करावा. त्याच मॉडेलपासून भारतीय उत्पादने तयार केली पाहिजे. विदेशी 'एआय' मॉडेलची भारताविषयीची समज पाहता निःपक्षपाती आणि अचूक माहितीसाठी देशातच 'एआय' मॉडेल तयार करावेत, यासाठी अनेकांचा आग्रह आहे. स्वदेशी 'एआय' मॉडेलचा पाया देशात तयार असून, त्याचा सर्व्हरही भारतातच असल्याचे सांगितले जात आहे. आगामी काळात त्याचे डेटा सेंटरही आपल्याच देशात असावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.



**भारतासमोरील 'एआय' निर्मितीची आव्हाने**

- पायाभूत सुविधा
- स्वदेशी डेटा सेंटर
- स्वदेशी 'एलएलएम'
- स्वदेशी ग्राफिक्स प्रोसेसर युनिट (जीपीयू)

**हजारो कोटींचा खर्च येणार**

केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, की 'इंडिया एआय मिशन'च्या १०,३७२ कोटी रुपयांच्या तरतुदीचा मोठा भाग देशातच 'एलएलएम मॉडेल' विकसित करण्यासाठी खर्च केला जाईल. 'एलएलएम' म्हणजे 'लार्ज लँग्वेज मॉडेल.' सोप्या भाषेत सांगायचे तर, 'एआय'ला त्याची भाषा शिकण्यासाठी सर्वांत आवश्यक गोष्ट म्हणजे 'एलएलएम.' 'एलएलएम'च्या मदतीने 'एआय'ला एकाच वेळी भरपूर डेटा दिला जातो. त्या डेटाच्या मदतीने 'एआय' माणसांच्या भाषेचे प्रशिक्षण घेते. त्याच आधारावर, ते यूजरचे इनपूट समजून घेते आणि नंतर स्वतःचे आकलन तयार करते.

'एलएलएम'मध्ये एकाच वेळी मोठ्या प्रमाणावरील डेटावर प्रक्रिया करण्यासाठी शक्तिशाली प्रोसेसरची आवश्यकता असते. याचा अर्थ 'एलएलएम'च्या विकासात 'जीपीयू'चे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

देशाला आवश्यक एकूण 'जीपीयू'पैकी जवळपास निम्मे 'जीपीयू' 'योटा'कडून येणार आहेत. कंपनी नऊ हजार २१६ 'जीपीयू' देणार आहे. मोठ्या कंपन्यांना 'एआय' मॉडेलच्या निर्मितीसाठी सुमारे १६ हजार 'जीपीयू' चिप्सची गरज असते. केवळ दोन हजार 'जीपीयू' चिप्समध्ये 'डीपसीक'ची निर्मिती केल्याचा दावा चीनने केला आहे. मोठ्या 'एआय कंपन्यां'नी आपापले 'एआय' मॉडेल तयार करण्यासाठी 'एनव्हीआयडीआयए एच १००' हा 'जीपीयू' वापरला आहे. 'डीपसीक'च्या निर्मितीसाठी मात्र 'एच ८००' या जुनाट 'जीपीयू'चा उपयोग केल्याचाही चीनचा दावा आहे; त्यामुळे त्यांचा खर्च कमी झाला. असे असले, तरी 'डीपसीक'च्या या दाव्यावर अनेकांनी संशय व्यक्त केला आहे. भारताच्या 'एआय' मॉडेलची निर्मितीही प्रामुख्याने 'एनव्हीआयडीआयए एच १००'याच 'जीपीयू'वर होणार आहे. याशिवाय अन्य 'जीपीयू'ही वापरली जाणार आहेत.

vihang,ghate@timesofindia.com

**कोणत्या 'जीपीयू'ची निवड झाली?**

भारतीय 'एआय' मॉडेलच्या निर्मितीसाठी १८,६९३ 'जीपीयूं'ची आवश्यकता भासणार आहे. त्यांचा पुरवठा करण्यासाठी केंद्र सरकारने १० कंपन्यांची निवड केली आहे. त्या याप्रमाणे...

- योटा (हिरानंदानी समूह)
- जिओ प्लॅटफॉर्म
- टाटा कम्युनिकेशन्स
- ई टू ई नेटवर्क
- सीएमएस
- कंट्रोल्स डेटासेंटर्स
- लोकुज एंटरप्राइझ सोल्युशन्स
- नेक्स्टजेन डेटासेंटर
- ओरिएंट टेक्नॉलॉजीज
- वेन्सिस्को टेक्नॉलॉजीज

Maharashtra Times 4.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*



City | Pune Times Mirror Tuesday, February 4, 2025 9

# New land norms for varsities

**The aim is to set up at least one large multidisciplinary higher education institution in every district by the year 2030**

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror

The University Grants Commission (UGC) has changed the norms of land required for establishing a university. Now, at least 20 acres of land is required for establishing a university. Ten acres in urban areas, while five acres of land is required for open and off-campus universities.

The UGC has issued a circular in this regard. According to the National Education Policy (NEP) 2020, the target is to increase the gross enrollment ratio in higher education in the country to 50 percent by 2035. The policy recommends converting higher education institutions in the country into multidisciplinary universities, cluster universities, and knowledge centres with at least 3,000 students. The focus is on achieving accessibility, inclusiveness, and equality of education in all parts of the country by establishing new higher education institutions. Accordingly, the policy states that there should be at least one large multidisciplinary higher education institution in every district by 2030.

Against this backdrop, the UGC had appointed a six-member committee to recommend new criteria for the establishment of a university, considering the existing criteria. It also included Vikas Chandra Rastogi, Principal Secretary of the State Higher and Technical Education Department. The committee has proposed new criteria after studying the laws of the states across the country, land requirement rules, and criteria of various apex institutions. For this, factors like multidisciplinary education, availability of land, online education, and open space were taken into account.

According to the new criteria, at least 20 acres of land is required for the establishment of a university with 3,000 students. The relevant land should be unencumbered, freehold, or leased. The lease agreement should be for at least thirty years. Forty percent of the total land should be kept vacant. Facilities like gymnasium, grounds, and library in the university can be used by nearby educational institutions. Five acres of land is required for open universities and off-campus. At least 10 acres of land should be available for establishing a university in urban and hilly areas. Out of this, three acres of land must be vacant. Permission can be given even if the land is scattered. It is also possible to do 'vertical' expansion in places where it is permitted by law. Accordingly, the construction area can be reduced. However, it has been stated that at least three acres of open space should be maintained for green complexes.



**UGC to also consider varsities not meeting criteria**

While determining the minimum land requirement for establishing a university, it has been mentioned that the proposals of universities not meeting the proposed criteria may be considered separately by the UGC on a proposal-by-proposal basis.

Pune Mirror 4.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
City 5 Feb 2025_005
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे 05 Feb 2025
www.dainikprabhat.com

# बीबीए, बीसीएच्या विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ४ -** राज्यातील विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती योजनांमध्ये आता बीसीए, बीबीए व बीएमएस यासह १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या योजनेतून विद्यार्थ्यांचे ५० टक्के शैक्षणिक शुल्क माफ होणार आहे.

आर्थिक दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे राबवण्यात येणाऱ्या राजर्षि छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ताआदी सवलती या विद्यार्थ्यांना आता मिळू शकणार आहेत. बीबीए, बीएमएस, बीसीए अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अखत्यारित गेले आहेत. राज्यात या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया समाईक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे (सीईटी सेल)

**राज्य शासनाचा निर्णय : विद्यार्थ्यांना मोठा दिलासा**

राबवण्यात आली. त्यामुळे या अभ्यासक्रमांना आता व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा मिळाला आहे. या पार्श्वभूमीवर तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील या अभ्यासक्रमांना २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून नव्याने समावेश करण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला आहे. या बाबतचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला आहे.

**निर्वाह भत्ताही द्यावा लागणार**

बीबीए, बीसीएसह १८ अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना लागू करण्यात आली आहे. त्यामुळे आठ लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या मुलांना ५० टक्के शुल्क भरावे लागेल. या अभ्यासक्रमाचे विद्यार्थी वसतिगृहात राहत असतील, त्यांना निर्वाह भत्ताही दिला जाणार आहे.

**या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना फायदा**

नव्या निर्णयानुसार बीसीए, बीबीए, बीएमएस यासह पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, आयसी मॅन्युफॅक्चरिंग, डव्हान्स्ड कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, टेक्निकल टेक्सटाइल, आर्किटेक्चरल असिस्टंटशिप, एकात्मिक एमबीए, एमबीए फार्मा टेक, एमबीए टेक कॉम्प्युटर इंजिनिअरिंग अशा एकूण १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश या योजनेत करण्यात आला आहे. त्यामुळे या निर्णयाची अंमलबजावणी करीत शैक्षणिक संस्थांना विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याची कार्यवाही करावी लागणार आहे.

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

City 5 Feb 2025_015
05 Feb 2025

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# विद्यापीठाच्या ढिसाळ कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

## परीक्षा विभाग संचालकपद नियुक्तीबाबत कोणतीही प्रक्रिया नाही

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ४ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची कुलसचिव निवड प्रक्रिया अजूनही वादात आहे; त्यातच आता विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ येत्या १० तारखेला पूर्ण होत आहे. त्यामुळे कुलसचिवानंतर आता परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालकपदही प्रभारीच राहणार असल्याचे स्पष्ट होत आहे.

परीक्षा विभागाचे नवे संचालक नेमण्याची प्रक्रिया किमान सहा महिने आधीच सुरु



करणे अपेक्षित होते. मात्र विद्यापीठाने संचालक पदासाठी नियुक्तीची कोणतीही प्रक्रिया राबविली नसल्याचे दिसून येत आहे. विद्यापीठाच्या ढिसाळ कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. परीक्षा विभागाच्या संचालकपदाचा कार्यकाल कधी संपणार आहे, याची विद्यापीठ प्रशासनास

### कुलसचिवानंतर परीक्षा विभाग संचालकपदही प्रभारी

माहिती नाही का? असा प्रश्नही यानिमित्ताने निर्माण होत आहे.

विद्यापीठात कुलगुरु, प्र-कुलगुरु, कुलसचिवानंतर परीक्षा विभागाचे संचालकपद हे महत्त्वपूर्ण प्रशासकीय पद आहे. परीक्षा विभागाची सर्व जबाबदारी या संचालकावर असते. परीक्षा विभाग हा नेहमीच संवेदनशील विभाग राहिला आहे. या विभागातून एकही चूक झाल्यास त्याचा लाखो विद्यार्थ्यांना फटका बसतो. त्यामुळे ७ लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे नियोजन करणाऱ्या संचालकाचे पदही आता प्रभारी राहणार आहे, ही बाब शैक्षणिकदृष्ट्या गंभीर मानली जात आहे.

परीक्षा विभागाकडून पहिल्या सत्राच्या निकालाचे काम सुरू आहे. त्यानंतर आता मार्च-एप्रिल महिन्यात दुसऱ्या सत्राची परीक्षा सुरु होणार आहे. त्याची कार्यवाही अद्याप सुरु झालेली नाही. पूनर्मूल्यांकनाचे काम वाढणार आहे. त्यातच कमी मनुष्यबळात सर्व कामे वेळेत करणे हे मोठे आव्हान आहे. अशा सर्व परिस्थितीत कुलगुरुंनी नव्या संचालकपदासाठी यापूर्वीच नियुक्तीची प्रक्रिया सुरू करणे गरजेचे होते. मात्र तसे न झाल्याने परीक्षा विभागाचे कामकाज योग्य पद्धतीने होईल का, याविषयी सांशकता व्यक्त केली जात आहे.

### डॉ. महेश काकडे यांना मुदतवाढ?

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांचा कार्यकाल दि. १० फेब्रुवारीला संपत आहे. पुढच्या महिन्यांपासून परीक्षा सुरु होत आहे. त्या पार्श्वभूमीवर डॉ. काकडे यांनीच आणखी-तीन चार महिने आपल्या पदावर राहावे, त्यासाठी मुदतवाढ देण्याची चर्चा विद्यापीठात रंगली आहे.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 5 Feb 2025_03
05 Feb 2025

# संवेदनशील परीक्षा केंद्रांची ड्रोनद्वारे निगराणी

### इयत्ता दहावी, बारावी परीक्षांसाठी यंदाही कॉपीमुक्त अभियान

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि ४ -** इयत्ता दहावी, बारावीच्या संवेदनशील परीक्षा केंद्रांच्या परिसरात जिल्हा प्रशासनामार्फत ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे निगराणी करण्यात येणार आहे. इयत्ता बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च २०२५ व दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत.

या संदर्भात मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली व शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजीतसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांच्या उपस्थितीत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दूरचित्र प्रणालीव्दारे बैठक घेण्यात आली. या वेळी मुख्य सचिवांनी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. परीक्षा सुरू होण्याअगोदर एक दिवस आधी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का? याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री करण्यात येणार आहे. परीक्षा केंद्रांबाहेर व्हिडिओ चित्रीकरण करण्यात येईल. जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व बैठी पथके उपलब्ध होतील, याचे नियोजन करण्यात येणार आहे.

जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित घटकांची चेहरा ओळखण्याच्या प्रणालीव्दारे तपासणी करण्यात येईल. विभागीय मंडळामार्फत परीक्षेशी संबंधित सर्व घटकांना अधिकृत ओळखपत्र देण्यात येईल. कोणत्याही परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येईल.

परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार आहेत तसेच संबंधित परीक्षा केंद्राच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येईल, असे राज्य मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी सावरकर यांनी स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# दहावी, बारावीच्या परीक्षेवर ड्रोनची नजर

### कॉपीमुक्त अभियानाच्या कठोर अंमलबजावणीचे आदेश

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च दरम्यान होणाऱ्या इयत्ता १२ वी आणि १०वी च्या परीक्षेदरम्यान कॉपी प्रकरणास पूर्णतः प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान कठोरपणे राबविण्याचे आदेश मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिले. गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षा केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख ठेवण्यात येणार आहे.

राज्यात उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी बारावी आणि दहावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त आणि निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात यासाठी शालेय शिक्षण विभाग आणि राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाने प्रयत्न करण्याचे आदेश दिले होते. या पार्श्वभूमीवर मुख्य सचिव सौनिक यांनी आढावा घेतला. शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल या वेळी उपस्थित होते. शालेय शिक्षण आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त व मुख्य कार्यकारी अधिकारी दूरचित्र संवाद माध्यमातून सहभागी झाले.



### कॉपी टाळण्यासाठी आदेश काय?

- परीक्षांच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी परीक्षा केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख करण्यात यावी.
- परीक्षा केंद्रांबाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडिओ चित्रीकरणही करण्यात यावे.
- परीक्षा सुरू होण्याआधी एक दिवस परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का याची जिल्हा प्रशासनाकडून खात्री करावी.
- सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके, बैठी पथके उपलब्ध करावीत.
- जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केंद्रसंचालक, पर्यवेक्षक, परीक्षेशी संबंधित सर्व घटकांची 'चेहरा पडताळणी व्यवस्थे'(फेस रेकग्निशन) तपासणी करण्यात येणार आहे. तसेच संबंधितांना स्वतंत्र ओळखपत्र देण्यात येणार आहे.

### गैरप्रकार घडल्यास गुन्हा दाखल

परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास त्याला उद्युक्त करणारे, मदत करणारे यांच्यावर दखलपात्र, अजामीनपात्र गुन्हा दाखल करावा. परीक्षा केंद्रापासून ५०० मीटर परिसरातील झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात यावीत. परीक्षा केंद्रांच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले आहे.

05/02/2025 | Mumbai | Page : 05
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# जाचक अटींमुळे विद्यार्थी लाभापासून वंचित

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना : सूचनांची दखल घेण्याची मागणी

**पुणे, ता. ४ : अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, म्हणून 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने'चा विस्तार तालुकास्तरावरदेखील करण्यात आला आहे. यासंदर्भात २६ डिसेंबर २०२४ मध्ये सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. मात्र, या निर्णयामध्ये अनेक जाचक अटींचा समावेश करण्यात आला असल्यामुळे अनेक विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले आहे.**




राज्यात दिवसेंदिवस व्यावसायिक, बिगर व्यावसायिक महाविद्यालयांची संख्या वाढत आहे. त्यामुळे तेथे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्यादेखील मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. या सर्वच विद्यार्थ्यांना वसतिगृहातील जागेची मर्यादा लक्षात घेता प्रवेश देणे शक्य होत नाही. पर्यायाने मोठ्या प्रमाणात विद्यार्थी शासकीय वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी विविध अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस मर्यादा येतात. ही बाब लक्षात घेऊन सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या चांगल्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' राबविली जाते. मात्र, आता या योजनेमध्ये सुधारणा करण्यात आल्या असून, जाचक अटींच्या समावेशाने या योजनेचा लाभ घेता येत नसल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

ज्या विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेला आहे, मात्र, त्यांना प्रवेश क्षमतेअभावी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही असे विद्यार्थी या योजनेसाठी पात्र असतील, अशी अट शासन निर्णयामध्ये नमूद करण्यात आली आहे. यावर विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतला आहे. विद्यार्थी म्हणतात, 'जर एखाद्या विद्यार्थ्याने वसतिगृहासाठी अर्जच केला नसेल तर तो विद्यार्थी पात्र असूनदेखील या अटीमुळे त्याला योजनेपासून वंचित राहावे लागत आहे.' तसेच 'अनेक ठिकाणी शासकीय वसतिगृह हे महाविद्यालयापासून खूप दूर आहेत. त्यामुळे दृष्टिहीन, अपंग विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. असे विद्यार्थी स्वाधार योजनेचा लाभ घेऊन महाविद्यालयाच्या जवळ वास्तव्यास राहू शकतात. मात्र, या जाचक अटींमुळे त्यांना महाविद्यालयापासून दूर असलेल्या वसतिगृहामधून महाविद्यालयापर्यंत पायपीट करावी लागत आहे.'

महापालिका हद्दीपासून पाच किलोमीटर परिसरात असलेल्या महाविद्यालयात किंवा शिक्षण संस्थेत शिकत असलेले विद्यार्थीसुद्धा या योजनेचा लाभ मिळण्यास पात्र असतील अशी अट यामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. त्यामुळे या हद्दीबाहेर असलेल्या महाविद्यालयात किंवा शिक्षण संस्थेत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना या योजनेच्या लाभापासून वंचित राहावे लागत असल्याने किलोमीटरची अट कशासाठी? असा प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केला आहे, तसेच स्वयंघोषणापत्र संदर्भात शासन निर्णय असतानादेखील विद्यार्थ्यांकडून भाड्याने राहत असल्याबाबत आणि स्थानिक रहिवासी नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करण्यास सांगितले आहे. त्यामुळे प्रतिज्ञापत्रांसाठी नाहक खर्च करावा लागत आहे.

> स्वाधार योजनेचा लाभ घेण्याची प्रक्रिया ही स्वतंत्रपणे राबविण्यात यावी. वसतिगृह आणि स्वाधार प्रक्रिया एकत्र राबवून शासनाने विद्यार्थ्यांना वेठीस धरले आहे. वसतिगृहापासून विद्यार्थ्यांचे महाविद्यालय लांब असल्यास प्रवासातच विद्यार्थ्याला दररोजचे दीड-दोन तास घालवावे लागतात. त्यामुळे विद्यार्थ्याला स्वाधार किंवा वसतिगृह निवडीचे पर्याय देण्यात यावे.
>
> **- सचिन साबणे**, प्रदेश अध्यक्ष, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी हक्क समिती महाराष्ट्र राज्य

> शासन निर्णयात तालुकास्तरावर ही योजना राबविण्याबाबत कुठली स्पष्टता मिळाली नाही. माझे महाविद्यालय महापालिका हद्दीपासून २० किलोमीटर अंतरावर असल्याने मला स्वाधार योजनेसाठी अर्ज करता येत नाही. त्यामुळे मी दोन वर्षांपासून वंचित राहत आहे, परिणामी कर्जाचा भार वाढला आहे.
>
> **- सुदेश मोरे**, विद्यार्थी

> विद्यार्थ्यांद्वारे स्वाधार योजनेतील त्रुटींबद्दल निवेदने प्राप्त झाली आहेत. त्याची दखल घेत विद्यार्थ्यांनी सुचविलेल्या सुधारणा करण्याबाबत समाज कल्याण विभागातर्फे शासनाला पत्र पाठविण्यात आले आहे.
>
> **- प्रमोद जाधव**, सहआयुक्त, महाराष्ट्र राज्य

Sakal 5.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# ३१ लाखांवर विद्यार्थी देणार दहावी-बारावीची परीक्षा

**पुढारी विशेष**

- **राज्य मंडळ परीक्षेसाठी सज्ज**
- **कॉपीमुक्त अभियानाची होणार कडक अंमलबजावणी**
- **परीक्षा सुरळीत पार पाडण्यावर राज्य मंडळाचा भर**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेत यंदा १४ लाख ९४ हजार बारावीचे विद्यार्थी, तर १६ लाख ७ हजार दहावीचे, असे एकूण ३१ लाखांवर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षेसाठी तब्बल १ लाख ८० हजारांहून अधिक मनुष्यबळ कार्यरत राहणार आहे. राज्य मंडळाकडून परीक्षांची आवश्यक सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून, परीक्षा सुरळीत पार पाडण्यावर राज्य मंडळाचा भर असल्याचे राज्य मंडळातील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.**



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, दहावी-बारावीच्या परीक्षांसाठी राज्य मंडळाने यंदा जोरदार तयारी केली आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च आणि दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्चदरम्यान घेण्यात येणार आहेत. त्यानुसार दोन्ही इयत्तांच्या विद्यार्थ्यांना हॉलतिकीट उपलब्ध करून देण्यात आले आहे. दहावी-बारावीच्या परीक्षेत दरवर्षी कॉपी केसेस, बोगस विद्यार्थी सापडणे, समूह कॉपी, पेपर व्हायरल होणे, असे प्रकार सर्रास घडताना दिसतात. यंदा मात्र राज्य मंडळ गैरप्रकारांवर आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करणार आहे. त्यासाठी राज्यमंडळाकडून कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांतर्गत शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या मार्गदर्शनाखाली दहावी-बारावीच्या परीक्षा कॉपीमुक्त, भयमुक्त व निकोप वातावरणामध्ये सुरळीत पार पडाव्यात, यासाठी महाराष्ट्र शासन व राज्य मंडळ प्रयत्नशील आहे. यासंदर्भात मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, सर्व पोलिस आयुक्त, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दूरचित्र प्रणालीद्वारे बैठक घेण्यात आली. या दूरचित्र प्रणाली बैठकीमध्ये कॉपी प्रकरणास पूर्णत: प्रतिबंध करण्यासाठी राज्यभर कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### यंदा नेमके बदल कोणते

- संवेदनशील परीक्षा केंद्रांची ड्रोन कॅमेऱ्याद्वारे निगराणी.
- परीक्षा सुरू होण्याअगोदर एक दिवस आधी परीक्षा केंद्रावर आवश्यक भौतिक सुविधा सुव्यवस्थित आहेत का? याची खात्री पटविणार.
- परीक्षा केंद्राच्या बाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करणार.
- कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व बैठी पथके राहणार.
- परीक्षा केंद्रांवर नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित घटकांची फेशिअल सिस्टिमद्वारे तपासणी होणार.
- परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे व प्रत्यक्ष गैरमार्ग करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार.
- परीक्षा केंद्रांपासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार.
- परीक्षा केंद्रांच्या परिसरात १४४ कलम लागू करण्यात येणार.

"मुख्यमंत्र्यांच्या निर्देशानुसार राज्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार आहे. राज्यात चांगल्या वातावरणात परीक्षा पार पाडण्यासाठी राज्य मंडळासह प्रशासन सज्ज आहे. विद्यार्थ्यांनी देखील परीक्षेचा कोणताही ताण न घेता परीक्षेला सामोरे जाणे गरजेचे आहे. परीक्षा कोणत्याही गैरप्रकाराशिवाय सुरळीत पार पडावी, यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना राज्य मंडळाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.

**- शरद गोसावी,**
अध्यक्ष, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

Pune Edition
Feb 05, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# विद्यापीठाकडून संशोधन केंद्रांचे लेखापरीक्षण

## माहिती सादर करण्यासाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे संशोधन केंद्रांचे शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे. या लेखापरीक्षणासाठी आवश्यक माहिती सादर करण्यासाठी १५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षणाबाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे.

या परिपत्रकानुसार संशोधन केंद्रांना माहिती भरण्यासाठीची सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑनलाइन माहिती भरल्यानंतर त्या माहितीनुसार संशोधन केंद्रात उपलब्ध करून दिलेल्या सोयी-सुविधांची प्रत्यक्ष तपासणी करण्यासाठी विद्यापीठाकडून समिती नियुक्त केली जाणार आहे. ही समिती संशोधन केंद्राला भेट देऊन खातरजमा करणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तीन वर्षांपूर्वी विद्यापीठाने शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण केले होते. त्यात काही संशोधन केंद्रांमध्ये अनियमितता होत असल्याचा प्रकार निदर्शनास आला होता. त्यानंतर आता पुन्हा एकदा शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात येणार आहे.

विद्यापीठातर्फे तीन वर्षांपूर्वी ऑफलाइन शैक्षणिक आणि प्रशासकीय लेखापरीक्षण करण्यात आले होते. आता ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे. त्यात संशोधन केंद्रांनी त्यांची माहिती ऑनलाइन प्रणालीत भरायची आहे. त्यानंतर समितीकडून भेट देऊन प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. लेखापरीक्षणाद्वारे संशोधन केंद्रात पीएच.डी. प्रवेशाशिवाय पेटंट किती, संशोधन किती हे तपासले जाणार आहे. याद्वारे संशोधन केंद्रांची गुणवत्ता तपासण्यात येणार असल्याचे दिसून येत आहे.

Pune Edition
Feb 05, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# शिक्षकांच्या नेमणुका कंत्राटी पद्धतीने

**प्रत्येक राज्यामध्ये तात्पुरत्या पदावर शिक्षक नियुक्तीची पद्धत वेगळी आहे. महाराष्ट्रामध्ये तासिका तत्त्वावर शिक्षक नेमले जातात; त्यामुळे प्रवेश, परीक्षा, पेपर तपासणी व निकाल या प्रक्रियेमध्ये तासिका तत्त्वावरील शिक्षक उपलब्ध होत नाहीत.**

**डॉ. संजय खरात**



संपूर्ण देशात सुमारे ४५ हजार महाविद्यालये आहेत. केंद्रीय विद्यापीठे, राज्य विद्यापीठे; तसेच आयसर, आयआयएम, आयआयटी यांसारख्या नामवंत शैक्षणिक संस्था यामध्ये सुमारे चार कोटी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. सुमारे १६ लाख शिक्षक महाविद्यालये व विद्यापीठातून ज्ञानदानाचे काम करत असतात, याचबरोबर सुमारे १२ लाख शिक्षकेतर कर्मचारी काम करत आहेत. सर्व उच्च शिक्षण संस्थांमध्ये सुमारे ४५ टक्के शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत, असे विविध वर्तमानपत्रातून वाचायला मिळाले आहे. मागील १०-१२ वर्षांपासून शिक्षक-शिक्षकेतर पदाच्या भरतीबाबत सकारात्मक चित्र नाही. दरवर्षी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत असलेले शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांच्या संख्येत भर पडत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या प्रसिद्ध झालेल्या मसुद्यामध्ये रिक्त जागा भरताना मान्यता प्राप्त पदावर केवळ सहा महिन्यांसाठी नियुक्ती करण्याचे सूचित केले आहे. या कालावधीच्या नेमणुकांसाठी नियमित शिक्षकी पदांना आवश्यक असणारीच शैक्षणिक पात्रता व इतर निकष असतील. सहा महिन्यांसाठी नियुक्त केलेल्या तात्पुरत्या शिक्षकी पदांना त्यांच्या कामाचा आढावा घेऊन पुढील सत्रासाठी तात्पुरत्या पदावर नियुक्त करता येईल; तसेच नियमित शिक्षकी पद भरल्यानंतर त्या शिक्षकास जेवढा पगार मिळेल, तेवढा एकत्रित पगार तात्पुरत्या नियमित शिक्षकास मिळावा, असे सुचित केले आहे.

प्रत्येक राज्यामध्ये तात्पुरत्या पदावर शिक्षक नियुक्तीची पद्धत वेगळी आहे. महाराष्ट्रामध्ये तासिका तत्त्वावर शिक्षक नेमले जातात; त्यामुळे प्रवेश, परीक्षा, पेपर तपासणी व निकाल या प्रक्रियेमध्ये तासिका तत्त्वावरील शिक्षक उपलब्ध होत नाहीत. परिणामी, महाविद्यालय व विद्यापीठांचे निकाल उशिरा लागण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. तासिका तत्त्वावरील नेमणुका किंवा तात्पुरत्या स्वरूपाच्या नेमणूका हा नियमित नेमणुकांना पर्याय होऊ शकत नाही. नियमित शिक्षक नेमले नाहीत, तर महाविद्यालयांना स्थायी संलग्नीकरण मिळणार नाही. संशोधन केंद्रही सुरू करता येणार नाहीत अथवा अस्तित्वात असलेल्या संशोधन केंद्रातील शिक्षक सेवानिवृत्त झाल्यास ती संशोधन केंद्र बंद होतील. त्याचा संशोधनावर विपरीत परिणाम होईल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ नुसार, विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावर नियुक्तीसाठी अथवा अधिकार मंडळाच्या निवडणुकीस पात्रतेच्या निकषांनुसार नियमित कायमस्वरूपी शिक्षक उपलब्ध नसल्यास विद्यापीठ अधिकार मंडळातील जागा रिक्त राहतील. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मागे झालेल्या निवडणुकांमध्ये याची सुरुवात झाल्याचे जाणवले; त्यामुळे तात्पुरत्या शिक्षकी पदाच्या नियुक्ती ऐवजी पूर्ण वेळ, नियमित शिक्षक- शिक्षकेतर पदे भरणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत काही महाविद्यालयांमध्ये प्रशासकीय शिक्षकेतर पदांपैकी सर्व शासनमान्य पदे रिक्त आहेत, अशी परिस्थिती आहे.

**(लेखक मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत.)**

### प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिस

व्यावसायिक क्षेत्रातील तज्ज्ञांच्या अनुभवाचा विद्यार्थ्यांना फायदा होण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने ही योजना निर्माण केली आहे. त्याचा निश्चित फायदा होऊ शकतो. मान्यताप्राप्त पदाच्या १० टक्के प्रोफेसर ऑफ प्रॅक्टिसची नियुक्ती करता येऊ शकेल. विद्यापीठ अनुदान आयोगाने याबाबतच्या मार्गदर्शक सूचना यापूर्वीच घोषित केल्या आहेत. नियुक्तीचा कालावधी मानधन आणि नियुक्तीची प्रक्रिया याबाबत सूचना केल्या आहेत.

Maharashtra Times 5.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# 'सेट'साठी मोफत मार्गदर्शन

पुणे टाइम्स टीम

राज्यातील सरकारी विद्यापीठे आणि महाविद्यालयातील प्राध्यापक पदासाठी घेण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय पात्रता परीक्षेसाठी (सेट) मोफत मार्गदर्शन देण्यात येणार आहे. विद्यापीठ कट्ट्याच्या वतीने हे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील माजी विद्यार्थ्यांनी हा कट्टा स्थापन केला आहे. या कट्ट्याच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात दर रविवारी तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती कट्ट्याचे समन्वयक अमोल व्यवहारे यांनी दिली. विद्यापीठातील पर्यावरणशास्त्र विभागाच्या सभागृहात दर रविवारी सकाळी १० वाजता ही व्याख्याने आयोजित करण्यात आली आहेत. तत्पूर्वी विद्यार्थ्यांकडून प्रश्नसंच सोडवून घेत परीक्षेचा सरावही घेण्यात येणार आहे.



गेल्या वर्षी तीन जानेवारी २०२४ मध्ये स्थापन झालेल्या विद्यापीठ कट्ट्याला वर्ष पूर्ण झाले आहे. आज वर ४० हून अधिक विद्यार्थी सेट उत्तीर्ण झाले आहेत. सेटबरोबरच नेट आणि पेट परीक्षेसाठी मोफत मार्गदर्शन पुरविले जाते. नेट परीक्षेमध्ये ७ आणि पेट परीक्षेमध्ये ७१ विद्यार्थी उत्तीर्ण झालेत, असेही व्यवहारे यांनी सांगितले.

नवीन सेट बॅचसाठी पूर्वनोंदणी आवश्यक असून, https://vidyapeethkatta.org/ या वेबसाइटवर अधिक माहिती उपलब्ध आहे.

# बीबीए, बीसीएच्या १८ अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती

पुणे टाइम्स टीम

राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना; तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेमध्ये बीसीए, बीबीए, बीएमएस यांसह १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे या योजना राबवण्यात येतात.

या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन प्रकारच्या शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार असल्याने विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर दिलासा मिळणार आहे.

बीबीए, बीएमएस, बीसीए हे पदवी अभ्यासक्रम अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या (एआयसीटीई) अखत्यारित आहेत. या अभ्यासक्रमांना आता व्यावसायिक अभ्यासक्रमांचा दर्जा मिळाला आहे. राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती मिळते. या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया राज्य सामाइक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे (सीईटी सेल) राबवण्यात आली.

या पार्श्वभूमीवर तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित असलेल्या या अभ्यासक्रमांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नव्याने समावेश करण्याचा निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला आहे. यामध्ये १८ व्यावसायिक अभ्यासक्रमांचा समावेश आहे. या अनुषंगाने २०२४-२५ साठीची अर्थसंकल्पित तरतूद करण्याची कार्यवाहीही होणार आहे.

### या अभ्यासक्रमांना शिष्यवृत्ती मिळणार

बीसीए, बीबीए, बीएमएस यासह पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी स्तरावरील इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, आयसी मॅन्यूफॅक्चरिंग, अॅडव्हान्स्ड कम्प्युटर अॅप्लिकेशन, टेक्निकल टेक्सटाइल, आर्किटेक्चरल असिस्टंटशीप, एकात्मिक एमबीए, एमबीए फार्मा टेक, एमबीए टेक कम्प्युटर इंजिनिअरिंग अशा एकूण १८ अभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

Maharashtra Times 5.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

हर्ष दुधे

# मराठीतून 'कुशल' व्हा!

## एआय, एमएल, ड्रोन टेक्नॉलॉजीसारखे नवे अभ्यासक्रम; कौशल्यावर भर

महाराष्ट्रात सर्वसमावेशक आणि सक्षम कौशल्य विकास प्रणालीला चालना देण्यासाठी सात हजारांहून अधिक कौशल्य विकास अभ्यासक्रम मराठीतून शिकण्याची संधी मिळणार आहे. 'स्किल इंडिया डिजिटल हब' (सिद्ध) या प्लॅटफॉर्मवर ही संधी मिळणार असून, यात इंडस्ट्री ४.०, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशिन लर्निंग आणि ड्रोन टेक्नॉलॉजी यांसारख्या आधुनिक विषयांचा समावेश असेल.

या प्लॅटफॉर्मच्या मराठी वेबसाइटचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नुकतेच झाले. 'सिद्ध' हा एक सर्वसमावेशक 'डिजिटल प्लॅटफॉर्म' आहे. कौशल्य विकासाच्या संधी, करिअर मार्गदर्शन आणि देशांतर्गत; तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील रोजगाराच्या संधींसाठी हा प्लॅटफॉर्म विकसित करण्यात आला आहे. यामुळे व्यावसायिक, विद्यार्थी आणि संशोधकांना महत्त्वपूर्ण माहिती अधिक प्रभावीपणे वापरता येईल. त्याचप्रमाणे मराठीतून व्यापक ज्ञानप्रसार होण्यासही मदत होईल. या उपक्रमाच्या माध्यमातून भाषेचे अडथळे दूर करून विद्यार्थ्यांना मातृभाषेत आवश्यक माहिती सहज उपलब्ध करून देण्यास चालना देण्यात आली आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणात मातृभाषेला महत्त्वाचे स्थान देण्यात आल्याने ही वेबसाइट मराठीतून उपलब्ध करून देण्यात आली आहे. या प्लॅटफॉर्मद्वारे तरुणांना सात हजारांहून अधिक कौशल्य विकास अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळेल. या प्लॅटफॉर्मवर इंडस्ट्री-स्पेसिफिक कौशल्य मॉड्यूल, प्रमाणपत्र कार्यक्रम आणि एम्प्लॉयर म्हणजे नियोक्त्यांनी तयार केलेले रोजगारक्षम प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध असतील.

इच्छुकांनी https://www.skillindiadigital.gov.in/ या वेबसाइटवर संपर्क साधण्याचे आवाहन 'एनएसडीसी इंटरनॅशनल'चे व्यवस्थापकीय संचालक वेदमणी तिवारी केले आहे.

या वेबसाइटवर गेल्या वर्षभरात राष्ट्रीय स्तरावर १.२६ कोटीहून अधिक उमेदवारांची नोंदणी झाली आहे. या नोंदणीचा विचार करता, महाराष्ट्र देशातील आघाडीच्या राज्यांपैकी आहे. त्याचप्रमाणे वापरकर्त्यांच्या संख्येनुसार ३० टक्के वापरकर्ते महाराष्ट्रातील असून, राज्यातील क्रमांक दुसरा आहे. वापरकर्त्यांच्या संख्येनुसार उत्तर प्रदेश पहिल्या क्रमांकावर आहे.

राज्यभरातील एक हजार ५०० हून अधिक उद्योग आणि दोन लाखांहून अधिक प्रशिक्षणार्थी सर्वेक्षणात सहभागी झाले होते. पारंपरिक आणि नव्या युगातील क्षेत्रांमधील कौशल्य तफावत समजून घेण्यासाठी हे सर्वेक्षण करण्यात आले. यात इलेक्ट्रॉनिक्स, ऑटोमोटिव्ह, कृषी, बीएफएसआय आणि आयटी/आयटीईएस या क्षेत्रांमध्ये कौशल्यविकासासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे स्पष्ट झाले.

harsh.dudhe@timesofindia.com

**"मातृभाषेत अधिक प्रभावीपणे शिकता येते; त्यामुळे कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालय; तसेच 'एनएसडीसी' यांनी स्थानिक भाषांमध्ये कौशल्य विकास अभ्यासक्रम उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. त्याचा अधिकाधिक लाभ उमेदवारांना मिळू शकेल.**

- वेदमणी तिवारी, व्यवस्थापकीय संचालक, एनएसडीसी इंटरनॅशनल

### वेब डिझाइन, सायबरसुरक्षा आणि किसान ड्रोन ऑपरेटर लोकप्रिय अभ्यासक्रम

राज्यात वेब डिझाइन, सायबरसुरक्षा आणि किसान ड्रोन ऑपरेटर हे सर्वाधिक लोकप्रिय अभ्यासक्रम आहेत. विविध ऑनलाइन अभ्यासक्रमांसाठी ४३ हजारांपेक्षा अधिक महिलांनी नोंदणी केली असून, त्यापैकी ८० टक्क्यांहून अधिक महिला ३० वर्षांखालील आहेत. महाराष्ट्रातून सर्वाधिक नोंदणी आयटी-आयटीईएस, उद्योजकता आणि इलेक्ट्रॉनिक्स या क्षेत्रांमध्ये झाली आहे.




Maharashtra Times 5.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### महाविद्यालयांनो, शिष्यवृत्ती अर्जाची छाननी करूनच पाठवा

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी त्यांच्या स्तरावर शिष्यवृत्ती अर्जांची पूर्ण छाननी करूनच संबंधित अर्ज सहसंचालक कार्यालयात पाठवावेत, असे स्पष्ट निर्देश विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी संलग्न महाविद्यालयांच्या प्राचार्यांना दिले आहेत.

डॉ. रासवे यांनी दिलेल्या निर्देशानुसार, महाडीबीटी पोर्टलवरील शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाइन अर्जाची पडताळणी महाविद्यालय स्तरावरून करण्याबाबत वेळोवेळी परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात, तसेच सहसंचालक कार्यालयामार्फत व्हॉट्सॲपवर जिल्हानिहाय ग्रुपमध्ये वारंवार सूचनांद्वारे कळविण्यात येते. तरीही कोणत्याही प्रकारची तपासणी वा छाननी न करताच महाविद्यालये शिष्यवृत्ती अर्ज

■ **विद्यापीठाचे संलग्न महाविद्यालयांना निर्देश**

जसेच्या तसेच सहसंचालक कार्यालय स्तरावर पाठवत आहेत. सहसंचालक स्तरावर पाठविलेल्या अर्जांमध्ये अनेक त्रुटी आढळून येत आहेत. त्यामुळे सर्व महाविद्यालयांतील नोडल अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जातील सर्व बाबींची छाननी करूनच अर्ज सहसंचालक स्तरावर पाठवावे अन्यथा सहसंचालक कार्यालयाकडून नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल, तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवर त्याचा परिणाम झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयांची राहणार असल्याचा इशारा विद्यापीठातर्फे संलग्न महाविद्यालयांना देण्यात आला आहे.

My Pune Edition
Feb 06, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

### छाननीविना अर्ज पाठविल्यास कारवाईचा विद्यापीठाचा कॉलेजांना इशारा

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या ऑनलाइन अर्जांची छाननी, छाननी न करताच ते सहसंचालक कार्यालयाकडे पाठविण्यात येत आहेत. त्यामुळे संबंधित अर्ज हे महाविद्यालय स्तरावरच छाननी करूनच पुढे पाठवावेत; अन्यथा कारवाई केली जाईल, असा इशारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने बुधवारी दिला.

अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज 'महाडीबीटी' संकेतस्थळावर पाठविणे, एकाच विद्यार्थ्याची गुणपत्रिका अनेकांच्या अर्जासोबत जोडणे, अनेक विद्यार्थ्यांनी अर्जासोबत सारख्याच आई-वडिलांची नावे असलेले कागदपत्र जोडणे, उत्पन्न प्रमाणपत्र जुन्या वर्षाचे जोडलेले असणे, तर काही उत्पन्न प्रमाणपत्र तहसीलदारांच्या स्वाक्षरीचे नसतात. रहिवासी दाखला, कुटुंब प्रतिज्ञापत्र सदोष असणे असेही अर्ज पुढे पाठविण्यात येतात. ज्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणामध्ये खंड पडलेला आहे, अशा विद्यार्थ्यांचे खंड प्रमाणपत्र (गॅप सर्टिफिकेट) न जोडताच शिष्यवृत्ती अर्ज पुढे पाठविले जातात. त्यामुळे महाविद्यालयांतील समन्वय अधिकाऱ्यांनी अर्जातील सर्व बाबी तपासून, छाननी करूनच सहसंचालक स्तरावर पाठवावेत; अन्यथा कारवाई केली जाईल. संबंधित विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीवर त्याचा परिणाम झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयावर राहील, असाही इशारा उपकुलसचिव डॉ. मुंजाजी रासवे यांनी परिपत्रकात दिला आहे.

Maharashtra Times 6.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# 'स्वयं'च्या कोर्सकडे विद्यार्थ्यांची पाठ

## ऑनलाइन कोर्स प्लॅटफॉर्मवर कालबाह्य माहिती असल्याचा ठपका

**नवी दिल्ली, ता.५ (पीटीआय)** : केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करत सुरू केलेल्या 'स्वयं' या फ्री ओपन ऑनलाइन कोर्स प्लॅटफॉर्मचा फज्जा उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

साधारणपणे २०१७ पासूनचा कालावधी विचारात घेतला तर या प्लॅटफॉर्मवर नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ चार टक्के विद्यार्थ्यांनीच विविध कोर्स हे पूर्ण केले असल्याची धक्कादायक माहिती उघड झाली आहे. कालबाह्य माहिती, शिकवणीच्या चुकीच्या वेळा आणि अत्यंत निकृष्ट दर्जाच्या पायाभूत सेवा यामुळे हा प्लॅटफॉर्म अडचणीत आल्याचा ठपका संसदीय समितीकडून ठेवण्यात आला आहे.

राज्यसभेचे सदस्य असलेल्या दिग्विजयसिंह यांच्या नेतृत्वाखालील या समितीने संबंधित प्लॅटफॉर्मला विद्यार्थ्यांचा फारसा प्रतिसाद मिळाला नसल्याचे म्हटले आहे. महिला, युवक कल्याण आणि क्रीडाविषयक स्थायी समितीने आपला अहवाल मंगळवारी राज्यसभेमध्ये सादर केला. केंद्रीय शिक्षण मंत्रालय हे संबंधित विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटबाबत निर्णय घेत नाही तोपर्यंत फार काही होणार नाही. असेही या समितीने सूचित केले आहे.

'स्वयं'वर कार्यरत असलेल्या अनेक शिक्षकांना पुरेसे प्रशिक्षणच देण्यात आलेले नाही, असेही आढळून आल्याचे संसदीय समितीच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

### वेगळ्या सेलची शिफारस

**■ सध्या ऑनलाइन पद्धतीने सुरू असलेल्या अनेक बड्या प्लॅटफॉर्मवर विद्यार्थ्यांकडून संबंधित कोर्स पूर्ण केले जाण्याचे प्रमाण खूपच कमी आहे. त्यामुळे 'स्वयं' हाताळणाऱ्या विभागांनीदेखील याचा काळजीपूर्वक विचार करून नियोजन आखायला हवे अशी सूचना या समितीकडून करण्यात आली आहे.**

Sakal 6.2.2025

**लोकमत**

मस्ट READ

# विद्यापीठात 'मंदिर व्यवस्थापन'चे धडे; संविधानिक मूल्यांना धक्का

लोकमत न्यूज नेटवर्क



**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने 'मंदिर व्यवस्थापन' या विषयात पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विशिष्ट धर्माला समोर ठेवून अभ्यासक्रम राबविणे म्हणजे संविधानाच्या सर्वधर्मसमभाव आणि धर्मनिरपेक्षता या आशयाला छेद देणे होय, अशा शब्दांत विद्यापीठ प्रशासनाच्या निर्णयावर विचारवंतांनी टीकास्त्र सोडले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सहा महिने मुदतीच्या मंदिर व्यवस्थापन या अभ्यासक्रमातून व्यावसायिक पद्धतीने मंदिर व्यवस्थापनाची कौशल्ये, मंदिर व्यवस्थापनाचे सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलू या विषयीचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे. पुणे येथे जूनपासून अभ्यासक्रमाचे प्रवेश सुरू करण्यात येणार आहेत. मंदिर व्यवस्थापन अभ्यासक्रमासाठी विद्यापीठाने टेम्पल कनेक्ट या संस्थेशी सामंजस्य करार केला आहे. मात्र, धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम विद्यापीठाचे आहे का? त्यासाठी विविध धर्माच्या संस्था कार्यरत आहेत, असा अभ्यासक्रम विद्यापीठात शिकवून तरुणांना पूजापाठ करूनच नोकऱ्या मिळणार आहेत, असे सरकारला वाटते. हा अत्यंत हास्यास्पद आणि निंदनीय प्रकार आहे, अशी नाराजी विचारवंतांनी 'लोकमत' कडे नोंदविली आहे.

" सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मंदिर व्यवस्थापन अभ्यासक्रम सुरू करण्याचा घेतलेला निर्णय हा जनतेच्या हिताचा नाही. हा अत्यंत हास्यास्पद आणि निंदनीय प्रकार आहे. विद्यापीठाने अन्य काहीही करायचे नाही, केवळ 'पूजा' करायला लावायचे, असे हे झाले आहे. मूळ प्रश्न सोडविता येत नाहीत म्हणून भावनिकतेला हात घातला जात आहे.

**डॉ. बाबा आढाव,**
ज्येष्ठ कामगार नेते

" धर्मनिरपेक्षतेची संकल्पना ही अधिक व्यापक आहे. तिथे सर्वधर्मसमभाव म्हणून गफलत करू नये. मंदिरे ही आस्था आणि श्रद्धेची ठिकाणे आहेत. प्रत्येक धर्माच्या संस्थाच्या माध्यमातून धर्माचे शिक्षण देण्यासाठी स्वतंत्र सुविधा केलेल्या आहेत. त्यामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने असा अभ्यासक्रम राबविण्याची गरज आहे, असे वाटत नाही.

**शमशुद्दीन तांबोळी,**
अध्यक्ष, मुस्लीम सत्यशोधक मंडळ

" सर्वोच्च न्यायालयाने 'संविधान" हे धर्मनिरपेक्षच आहे, असा नि:संदिग्ध निर्वाळा काही महिन्यांपूर्वीच दिला आहे. संविधानातील २५ व्या कलमात धर्मनिरपेक्षतेचा आशय सामावलेला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुठल्याच धर्माचे शिक्षण देता येत नाही. अशा प्रकारे धार्मिक स्थळांच्या व्यवस्थापनाचा विषय अभ्यासक्रमात घेणे म्हणजे धर्मनिरपेक्षतेच्या आशयाला छेद देणारे आहे.

**सुभाष वारे,**
समाजवादी नेते

Pune Main
Page No. 2 Feb 06, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे जीवनसाधना गौरव पुरस्कार जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे देण्यात येणारे जीवनसाधना गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. विद्यापीठाच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त १० फेब्रुवारी रोजी होणाऱ्या कार्यक्रमात राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे पुरस्कारांची माहिती दिली. जीवनसाधना गौरव पुरस्कारासाठी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, कृषी, विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग, सहकार, पर्यावरण, कला अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिलेल्या व्यक्तींची जीवनसाधना गौरव पुरस्कारासाठी निवड करण्यात येते. त्यानुसार यंदा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एकनाथ वसंत चिटणीस, शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार, पुरातत्त्व आणि मूर्तिस्थापत्य संशोधक डॉ. गो. बं. देगलूरकर, ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. तारा भवाळकर, योगाचार्य डॉ. विश्वास मंडलिक, सामाजिक कार्यकर्त्या हेमलता बीडकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. शिवाजीराव कदम, शल्यविशारद डॉ. संजय कुलकर्णी, ज्येष्ठ प्राध्यापक आणि सहकारतज्ज्ञ डॉ. मुकुंद तापकीर आणि ज्येष्ठ उद्योजक आर. एन. शिंदे जीवनसाधना गौरव पुरस्काराचे मानकरी ठरले आहेत.

Loksatta 7.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# 'यूजीसी'च्या नियमावलीस सहा राज्यांचा विरोध

## विरोधकांचे खोटे कथन : केंद्रीय शिक्षणमंत्री

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नव्या नियमांच्या मसुद्याला भाजपेतर पक्षांची सत्ता असलेल्या सहा राज्यांनी विरोध केला आहे. या राज्यांनी १५ कलमी ठराव मंजूर करीत हा मसुदा तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी गुरुवारी केली . त्यावर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी टीका करीत 'आपले कालबाह्य राजकीय खोटे कथन टिकवण्यासाठी विरोधक प्रगतिशील शैक्षणिक सुधारणांबाबत विनाकारण बाऊ करीत आहेत,' असे प्रत्युत्तर दिले.

कर्नाटकचे मंत्री एम. सी. सुधाकर यांनी बेंगळुरूमध्ये आयोजित केलेल्या राज्यांच्या उच्च शिक्षणमंत्र्यांच्या संमेलनात कर्नाटक, तेलंगण, केरळ, तमिळनाडू, हिमाचल प्रदेश आणि झारखंड या सहा राज्यांतील मंत्री किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी गुरुवारी यूजीसीच्या २०२५च्या नियमावली मसुद्याविरोधात १५ कलमी ठराव मंजूर केला. राहुल गांधी यांच्यासह समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनीही या मसुद्याला विरोध केला. नवी नियमावली कठोर आणि राज्यघटनाविरोधी असल्याची टीका काँग्रेसने केली. तर, ओडिशातील बिजू जनता दलाने नव्या नियमावलीवर चिंता व्यक्त केली आहे.

या आरोपांना केंद्रीय शिक्षणमंत्री प्रधान यांनी प्रत्युत्तर दिले.'जे लोक वास्तवापेक्षा वक्तृत्वाला प्राधान्य देतात त्यांच्यासाठी सत्य हे अडचणीचे असते. विरोधी पक्षनेत्यांसह विरोधक प्रगतिशील शिक्षणाच्या नियमांना काल्पनिक धोके ठरवत आहेत, हे अत्यंत दुर्दैवी आणि चिंताजनक आहे. राहुल गांधी आणि राज्यघटनेचे स्वयंघोषित संरक्षक यांनी नियमावली मसुदा वाचण्यासाठी काही वेळ खर्च करावा,' असा टोला त्यांनी लगावला.



### अभिप्रायांसाठी मुदतवाढ

यूजीसीने नव्या नियमावलीच्या मसुद्यावर अभिप्राय देण्याची अंतिम तारीख २८ फेब्रुवारीपर्यंत वाढवली आहे. याआधी ही मुदत ५ फेब्रुवारीपर्यंत होती. यूजीसीने गेल्या महिन्यात (विद्यापीठे आणि महाविद्यालयांमधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या नियुक्ती आणि पदोन्नतीसाठी किमान पात्रता आणि उच्च शिक्षणातील मानकांच्या देखभालीसाठी उपाय) २०२५ नियमांचा मसुदा जारी केला आहे. नवी नियमावली २०१८च्या मार्गदर्शक तत्त्वांची जागा घेणार आहे. या नियमावलीच्या मसुद्यावर अभिप्राय पाठवण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी काही राज्यांनी केली होती, असे यूजीसीचे सचिव मनीष जोशी यांनी सांगितले.

### नेमका विरोध या मुद्द्यांना

- राज्यांच्या कायद्यांनुसार स्थापन झालेल्या सार्वजनिक विद्यापीठांच्या कुलगुरूंच्या नियुक्तीत राज्य सरकारांची कोणतीही भूमिका नव्या नियमावलीत विचारात घेतलेली नाही.
- कुलगुरूंची निवड करण्यासाठी समित्या गठीत करण्याच्या राज्यांच्या अधिकारांना ही नियमावली मोठ्या प्रमाणात बंधन आणते.
- कुलगुरू म्हणून शैक्षणिक क्षेत्रात नसलेल्या व्यक्तींची नियुक्ती करण्याची तरतूद.
- शैक्षणिक कामगिरी निर्देशक (एपीआय) मूल्यांकन प्रणाली काढून टाकणे आणि नवीन प्रणालीचा समावेश करणे.
- सहायक प्राध्यापकांच्या नियुक्तीबाबत संबंधित मुख्य विषयातील मूलभूत पदवीची आवश्यकता नसण्याची तरतूद.
- नवी नियमावली व श्रेणी मापदंड खासगी संस्थांना प्रोत्साहन देण्यासाठी असल्याने सरकारी/सार्वजनिक संस्थांच्या हिताकडे दुर्लक्ष.
- मूलभूत पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश परीक्षा अनिवार्य करणे समावेशक शिक्षण देण्याच्या मार्गातील मोठा अडथळा आहे.

Maharashtra Times 7.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### विद्यार्थ्यांनो सावधान! कॉपी केल्यास थेट अजामीनपात्र गुन्हा

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार (कॉपी) करताना सापडल्यास त्यावर थेट दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल होणार आहे. यामध्ये अशा गैरप्रकाराना उद्युक्त करणारे, मदत करणाऱ्यावरही थेट कारवाई केली जाईल, असा इशारा शुक्रवारी (दि.७) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी आणि बारावीच्या परीक्षांना सामोरे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला आहे.

बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारीपासून सुरू होत असल्यामुळे कॉपी व अन्य गैरप्रकार पान ८ वर ▶

Pune Edition
Feb 08, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

### विद्यार्थ्यांनो सावधान! कॉपी केल्यास थेट अजामीनपात्र गुन्हा

पान १ वरून...

करताना पकडल्या गेलेल्या विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर हा निर्णय गंभीर परिणाम करणारा ठरू शकतो. यामुळे राज्य मंडळाने कॉपीमुक्त अभियानाच्या कडक अंमलबजावणीबाबत सावधानतेचा इशारा दिला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षेत यंदा १४ लाख ९४ हजार बारावीचे विद्यार्थी, तर १६ लाख ७ हजार दहावीचे, असे एकूण ३१ लाखांवर विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. परीक्षेसाठी तब्बल एक लाख ८० हजारांहून अधिक मनुष्यबळ कार्यरत करण्यात येणार आहे.

**कॉपी न करण्याचे आवाहन**

विद्यार्थी आणि त्यांना कॉपी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्यांवरही थेट गुन्हा दाखल केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये, शांतपणे पेपर लिहावेत. कॉपी करू नये, असे आवाहन मंडळाने केले आहे.

**हॉल तिकीट विसरले तरी परीक्षेची मुभा**

हॉल तिकीट विसरलेल्या विद्यार्थ्याला परिक्षेला त्या दिवशी बसू दिले जाईल. मात्र त्याच्याकडून हमी पत्र लिहून घेतले जाईल आणि दुसऱ्या दिवशी मात्र त्याला हॉल तिकीट आणावे लागेल. परीक्षेला कोणत्याही वेशभूषेत येता येईल, असेही परीक्षा मंडळाने स्पष्ट केले आहे.

**विद्यार्थ्यांवर असणार कडक निर्बंध**

- परीक्षा केंद्रांवर गैरप्रकारांना कोणत्याही प्रकारे मदत करणाऱ्यांवर दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यात येणार.
- संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्यांद्वारे नजर
- परीक्षा केंद्राबाहेर जिल्हा प्रशासनामार्फत व्हिडीओ चित्रीकरण करणार.
- कॉपीमुक्त परीक्षा होण्यासाठी सर्व परीक्षा केंद्रांवर भरारी पथके व बैठी पथके राहणार.
- परीक्षा केंद्रांवर नियुक्त केलेल्या केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित घटकांची फेशिअल सिस्टीमद्वारे तपासणी होणार.
- परीक्षा केंद्रांपासून ५०० मीटर परिसरात झेरॉक्स सेंटर परीक्षा कालावधीत बंद ठेवण्यात येणार.
- परीक्षा केंद्रांच्या परिसरात १४४ कलम लागू करणार.

Pune Edition
Feb 08, 2025 Page No. 08
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### कलागुणांचे प्रस्ताव १५ एप्रिलपर्यंत पाठवा

- राज्य मंडळाचे शाळा, महाविद्यालयांना निर्देश

पुणे : पुढारी वृत्तसेवा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दहावी- बारावीच्या विद्यार्थ्यांना कलागुण तसेच सवलतीचे गुण देण्यात येतात. संबंधित कलागुणांचे प्रस्ताव यंदा १५ एप्रिलपर्यंत राज्य मंडळाकडे सादर करण्यात यावेत, असे स्पष्ट निर्देश मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिले आहेत.

दरवर्षी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा दहावी व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा बारावी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईडमधील विद्यार्थ्यांना शासन निर्णयानुसार सवलतीचे वाढीव गुण देण्यात येतात. त्या अनुषंगाने फेब्रुवारी- मार्च २०२५ मध्ये परीक्षेत सहभागी विद्यार्थ्यांचा वाढीव गुणांचा प्रस्ताव पाठवण्याचे आदेश महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने विभागीय मंडळे व सर्व शिक्षणधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी यांना दिले आहेत.

शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडून क्रीडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून दरवर्षी विभागीय मंडळाकडे ३० एप्रिलपर्यंत सादर केले जातात. परंतु, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ या वर्षात दहावी व बारावीच्या परीक्षा नेहमीपेक्षा १० दिवस आधी आयोजित केल्या आहेत. तसेच, परीक्षांचा निकाल १५ मे २०२५ पर्यंत जाहीर करण्याचा शिक्षण मंडळाचा मानस आहे. त्यामुळे फेब्रुवारी- मार्च २०२५ परीक्षेतील खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी १५ एप्रिल २०२५ पर्यंत संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाइन पद्धतीने पाठवावयाचे आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईडचे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळांकडे प्रचलित पद्धतीने १५ एप्रिल २०२५ पर्यंत पाठवावयाचे आहेत.

Pune Edition
Feb 08, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

लोकसत्ता

### चंद्रकांत पाटील यांच्या भूमिकेला 'अभाविप'चाच विरोध

'कॅरी ऑन योजना' गुणवत्तेसाठी मारक असल्याची भूमिका

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई** : राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांत विद्यार्थी हितासाठी 'कॅरी ऑन योजना' लागू करण्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घ्यावा आणि विद्यार्थ्यांना पुन्हा परीक्षेची संधी देण्यासाठी विद्यापीठाच्या पातळीवर एक समानता ठेवावी, अशी सूचना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकतीच कुलगुरूंना केली होती. मात्र गुणवत्तेसाठी मारक असणाऱ्या कॅरी ऑन योजनेसाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री अनुकूल असणे ही दुर्दैवी बाब असल्याचे अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने (अभाविप) प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट करीत विरोध केला आहे.

राज्यातील अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंची बैठक नुकतीच चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती. या वेळी कॅरी ऑन योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना या वर्षासाठी पुन्हा संधी उपलब्ध करून देण्यात यावी असे पाटील म्हणाले होते.

#### अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना मुभा

अभियांत्रिकी विद्याशाखेतील प्रथम वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना तृतीय वर्षाच्या पाचव्या सत्राकरिता किंवा द्वितीय वर्षामध्ये अनुत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांना चतुर्थ वर्षाच्या सातव्या सत्रासाठी 'कॅरी ऑन'अंतर्गत विशेष संधी नसल्यामुळे प्रवेश घेता येत नाही. गेल्या वर्षी अभियांत्रिकीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना 'कॅरी ऑन'ची मुभा देण्यात आली होती. मात्र निर्णयाची पुनरावृत्ती करण्यात आली नाही. त्यामुळे बहुसंख्य विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आहे.

08/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# NAAC shifts to e-inspections, to start new accreditation models

Hemali.Chhapia
@timesofindia.com

**Mumbai:** In a decisive move to eliminate corruption and streamline the accreditation process, the National Assessment and Accreditation Council (NAAC) has announced an immediate halt to physical inspections of colleges. Accreditation teams will now conduct evaluations entirely online, replacing on-campus visits with virtual assessments.

For universities, though, the transition will be hybrid—most inspections will take place remotely, but a select number of reviewers will still visit campuses to maintain some level of direct oversight. The decision follows the recent Central Bureau of Investigation (CBI) arrests in the case involving Andhra Pradesh-based Koneru Lakshmaiah Education Foundation (KLEF), where members of the institution's management allegedly bribed NAAC peer visit inspectors to secure favourable ratings.

"We decided to do all it takes to weed out elements of corruption. Cancelling physical visits will arrest the problem in a huge way," said NAAC executive committee chairman Prof Anil Sahasrabudhe. "So many inspection visits take place every week, and it was very tough to monitor what transpired during these visits. Now, all this will be recorded."

NAAC director Ganesan Kannabiran called the shift to online inspection a "surgical strike" against corruption. "NAAC's peer review system faced a challenging situation due to the recent CBI case. These are undesirable to the higher education system, and NAAC, being a quality assurance agency, is determined to eliminate such practices through definitive actions," he said.

The long-anticipated basic (binary) accreditation model, recommended by the K Radhakrishnan Committee, was set for launch in July 2024 but did not take off. It has now been pushed to April-May 2025. The new timeline will also see the introduction of maturity-based graded levels (MBGL), a system designed to encourage institutions to enhance their academic and research capabilities. Special committees are finalising its framework.

Around 650 institutions are in queue under the old grading system. Of these, nearly 50% are undergoing their second accreditation cycle and have been given the option to retain their current grade until the new system is in place. First-time applicants will have the choice to opt for the new basic accreditation model. "Implementing these new frameworks—basic accreditation and MBGL—along with advanced IT-based assessment features will not only enhance objectivity but eliminate unfair practices too," said Sahasrabudhe.

## 'SURGICAL STRIKE AGAINST GRAFT'

**The bribery case of Andhra Pradesh-based KLEF**

- KLEF heads allegedly tried to get favourable people on the inspection panel to get high grades
- Twice before, though, KLEF had been awarded an A++ grade, the highest that institutes like IISc hold
- CBI arrested 10 on bribery charges—the NAAC inspection committee chairman and 6 members, one of whom is a JNU professor



**NAAC executive committee action**

- Process of accreditation of the involved university in the CBI case cancelled; debarred for 5 years from applying for accreditation
- All 7 members of NAAC inspection team debarred for lifetime from NAAC activities
- Recent visits to higher education institutions by any of the 7 for which the results are not declared will be reviewed
- Results will be withheld; NAAC standing committee may critically review results
- Previous year's visits will be analysed and put up to committee for further action

CS Scanned with CamScanner

The Times of India Mumbai Edition 9.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकमत

मस्ट READ

# राज्यात प्राध्यापकांच्या तब्बल १२ हजार ५२७ जागा रिक्त

राम शिनगारे
लोकमत न्यूज नेटवर्क

**छत्रपती संभाजीनगर** : राज्यातील सार्वजनिक विद्यापीठे आणि अनुदानित महाविद्यालयांमध्ये तब्बल १२,५२७ प्राध्यापकांच्या जागा रिक्त आहे. यापैकी ४,३०० प्राध्यापकांची पदे भरण्यास मंजुरी देण्याचा प्रस्ताव उच्च शिक्षण विभागाने अर्थ विभागाकडे सादर केला आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांच्या विभागाच्या निर्णयाकडे राज्यभरातील पात्रताधारक बेरोजगारांचे लक्ष लागले आहे.

केंद्र शासनाने जाहीर केलेले नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) राज्यात लागू केले आहे. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्राध्यापकांसह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची आवश्यकता आहे. राज्यातील सार्वजनिक ११ विद्यापीठे आणि १ हजार १७२ अनुदानित महाविद्यालयांमध्ये ३३ हजार ७६३ प्राध्यापकांची पदे मंजूर आहेत. त्यातील २१ हजार २३६ पदांवर प्राध्यापक कार्यरत असून, तब्बल १२ हजार ५२७ जागा रिक्त आहेत.

एकुण मंजूर पदांच्या ३७.११ पदे रिक्त असल्यामुळे 'एनईपी'ची अंमलबजाणी करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचेही स्पष्ट झाले.

त्यामुळे उच्चशिक्षण विभागाने रिक्त पदांपैकी ४,३०० पदांच्या भरतीच्या मान्यतेसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केल्याचे समोर आली आहे.



### महाविद्यालये व विद्यापीठातील रिक्त पदे किती?




### ७५ टक्के जागा भरण्याचे आदेश

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी देशभरातील विद्यापीठे व महाविद्यालयातील ७५ टक्के जागा भरण्याचे आदेश राज्य शासनांना नुकतेच दिले आहेत.

त्यानुसार उच्चशिक्षण विभागाने ४,३०० प्राध्यापकांच्या पदभरतीसाठी वित्त विभागाकडे प्रस्ताव सादर केला. उच्चशिक्षण विभागाने मागील पाच वर्षांत २ हजार ८८ पदांची भरती केलेली आहे.

" सर्व विद्यापीठांमध्ये ७०० प्राध्यापकांच्या जागा मंजूर केल्या आहेत. मात्र, राज्यपालांनी भरतीस स्थगिती दिल्याने २१०० जागा महाविद्यालये व ७०० जागा विद्यापीठांत भरण्यासाठी २० वर्षांनी संधी मिळाली आहे. राज्यपालांकडे स्थगिती उठविण्याची मागणी केली आहे.

**चंद्रकांत पाटील,**
उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

" राज्यात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण लागू केल्यामुळे रिक्त पदे भरण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी भूमिका स्पष्ट केली आहे. त्यानुसार रिक्त जागा भरण्यासाठी सर्वच पातळ्यांवर पाठपुरावा करण्यात येत आहे.

**डॉ. शैलेंद्र देवळाणकर,**
संचालक,
उच्चशिक्षण विभाग

Pune Main
Page No. 5 Feb 09, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

NAAC BRIBERY CASE

# Varsity at centre of row barred from accreditation for 5 years

EXPRESS NEWS SERVICE
NEW DELHI, FEBRUARY 8

THE KONERU Lakshmaiah Education Foundation (KLEF) in Andhra Pradesh, in the spotlight after the Central Bureau of Investigation arrested its office-bearers for allegedly bribing members of a National Assessment and Accreditation Council (NAAC) inspection team for a favourable grade, has been debarred from accreditation for five years. The Council made the announcement Saturday.

A deemed-to-be university, KLEF had secured the highest grade of A++ during NAAC's last assessment in 2018. The grade was two notches above the A grade it was awarded in 2013. The university was now up for re-assessment for which the council's inspection was underway.

A public autonomous body of the University Grants Commission, NAAC assesses and accredits higher education institutions in India. It assesses higher education institutions based on parameters like infrastructure, teaching and evaluation, and research and innovation, and scores them in terms of a cumulative grade point average (CGPA).

NAAC grades are widely regarded as a marker of quality, with institutions prominently displaying them. According to UGC regulations, this is meant to "enable students and other stakeholders to make informed choices".

The CBI arrested 10 people, including KLEF's Vice-Chancellor G P Saradhi Varma, and two other office-bearers, along with six members and the chairperson of the NAAC inspection team earlier his month. The CBI's FIR in the case says that the institute was scheduled for an inspection from January 29 to 31 for its NAAC "re-accreditation" for the 2024-29 period.

Going by the FIR, Varma allegedly approached NAAC officials through L Manjunatha Rao, former deputy advisor, NAAC, and M Hanumanthappa, professor and director (IQAC-NAAC), Department of Computer Science and Applications, Bangalore University, "to explore ways and means for inclusion of known members in the formation of NAAC inspection team."

NAAC's Executive Committee headed by Anil Sahasrabuddhe held an emergency meeting two days ago in which it was decided to debar KLEF from accreditation for five years.

"Firstly (sic), the Executive Committee of NAAC has decided that the current process of accreditation of involved University in the CBI case is summarily cancelled, and the University will be debarred for 5 years from applying for accreditation," the Council said in a press statement.

The press statement adds, "It is also decided that all the seven members of the Peer Team are debarred for lifetime in assessment or any other activities of NAAC with immediate effect. In addition, it is decided to review the recent visits to HEIs by any of the seven members for which the results are not declared. The results of such HEIs will be withheld, and the Standing Committee of NAAC may critically review before declaring the results.

The Indian Express 9.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
City 10 Feb 2025_013
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
10 Feb 2025
www.dainikprabhat.com

### शिक्षण धोरण समितीत ४ नव्या सदस्यांचा समावेश

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ९** - केंद्रीय शिक्षण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० लागू करण्यात आले आहे. याची राज्यात टप्याटप्याने अंमलबजावणी सुरू झालेली आहे. याचाच एक महत्त्वाचा भाग म्हणजे राज्य अभ्यासक्रम आराखडा निर्मिती होय.

राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याचे निरीक्षण करून आवश्यक बदलांसह राज्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींचा समावेश, शिफारस व मार्गदर्शन तसेच शैक्षणिक कार्याचे सनियंत्रण आणि

**राज्यात टप्प्याटप्प्याने 'एनईपी'ची अंमलबजावणी**

सुसूत्रीकरण करण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे. या मध्ये नवीन चार सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये सेवानिवृत्त आयएएस अधिकारी नंद कुमार, ज्येष्ठ शिक्षण तज्ज्ञ रमेश पानसे, सामाजिक कार्यकर्ते शांतीलाल मुथा, शिक्षण अभ्यासक सचिन जोशी यांचा समावेश करण्यात आला आहे.

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### दहावी, बारावीच्या परीक्षा काळात शिक्षकांना प्रशिक्षण

**पुणे :** राज्य मंडळातर्फे घेतल्या जाणाऱ्या बारावी आणि दहावीच्या परीक्षा काळात शिक्षकांसाठी १० फेब्रुवारी ते ७ मार्च या कालावधीत क्षमतावृद्धी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. मात्र, परीक्षेचे कामकाज करताना प्रशिक्षणाला उपस्थित कसे राहायचे, असा प्रश्न शिक्षकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

राज्य मंडळातर्फे बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत, तर दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत होणार आहे. ही बाब लक्षात घेऊन प्रशिक्षण आयोजित करणे महत्त्वाचे होते. परीक्षेनंतरही प्रशिक्षण आयोजित करणे शक्य होते. शिक्षकांना परीक्षेसाठी शाळेतील तयारीसह परीक्षेचेही कामकाज करावे लागते. अशा परिस्थितीत प्रशिक्षणामध्ये सहभागी कसे व्हायचे, असा प्रश्न शिक्षकांकडून उपस्थित करण्यात आला आहे.

10/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

**संक्षिप्त**

### प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू निवड मसुद्यावर हरकती, सूचनांसाठी मुदतवाढ

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू निवडीच्या नियमावली मसुद्यावर हरकती- सूचना नोंदवण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार आता २८ फेब्रुवारीपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येणार आहेत. यूजीसीने प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू निवड प्रक्रिया, किमान पात्रता अशा निकषांमध्ये प्रस्तावित बदलांचा मसुदा ६ जानेवारी रोजी जाहीर केला. या बदलांची देशभरात चर्चा आहे. या मसुद्याला काही राज्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. यूजीसीने प्रस्तावित बदलांवर हरकती- सूचना सादर करण्यासाठी ५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत दिली होती. त्यानुसार शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक संघटना अशा विविध घटकांकडून हरकती- सूचना नोंदवण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर यूजीसीने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, हरकती- सूचना नोंदवण्यासाठी मुदत वाढवण्याची मागणी विविध भागधारकांकडून करण्यात आली होती. त्यावर २८ फेब्रुवारीपर्यंत मुदत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

Pudhari 10.2.2025

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### सहा हजार महाविद्यालयांमध्ये 'संविधान गौरव महोत्सव'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशात २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय राज्यघटना अमलात आली. या ऐतिहासिक घटनेला यंदा ७५ वर्षे पूर्ण झाले. त्यानुषंगाने राज्यघटनेने दिलेले मूलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती समाजातील सर्वसामान्यांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे ६ हजार महाविद्यालयांमध्ये फेब्रुवारी २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली आहे.

भारतीय राज्यघटनेने भारताला एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक म्हणून स्थापित केले. भारताच्या इतिहासातील या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी फेब्रुवारी २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. या महोत्सवाचा उद्देश राज्यघटनेतील मूलभूत मूल्यांचा पुनरुच्चार करणे आणि नागरिकांना त्यांच्या घटनात्मक अधिकार व कर्तव्यांचे पालन करण्यासाठी प्रेरित करणे, हा आहे. सर्वांसाठी व जगभरातील लोकशाहीप्रेमी नागरिकांसाठी हा अभिमानाचा क्षण आहे. लोकशाहीचा हा सण

■ **फेब्रुवारीचा पूर्ण महिना महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रम राबविणार**

मोठ्या अभिमानाने साजरा करण्याचा हा प्रसंग आहे. राज्यघटनेअंतर्गत ७५ वर्षांचा प्रवास उल्लेखनीय आहे आणि या प्रवासाच्या केंद्रस्थानी संविधान निर्मात्यांची व्यापक दृष्टी आहे, ज्यांचे योगदान देशाच्या भावी वाटचालीसाठी आपल्याला मार्गदर्शन करत राहील. राज्यघटनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये संविधान गौरव महोत्सव साजरा करणे, हा खरोखरच एक महत्त्वाचा प्रसंग असल्याचे पाटील यांनी नमूद केले आहे.

महाराष्ट्रातील सर्व महाविद्यालयांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक, शहरी, ग्रामीण, आदिवासी भागांतील सर्व सामान्य नागरिक किंवा इतर नागरिकांना भारतीय राज्यघटनेची ओळख होणे, नागरी कर्तव्ये व अधिकार याबाबत माहिती व्हावी तसेच राज्यघटनेने दिलेल्या मूलभूत अधिकार व कर्तव्यांची माहिती समाजातील सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणे या उद्देशाने ६ हजार महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रम होणार आहेत.

My Pune Edition
Feb 10, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# परदेशातील विद्यापीठे आता नवी मुंबईत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नवी मुंबई :** सिडको महामंडळाने स्वित्झर्लंडमधील दावोस येथे झालेल्या जागतिक आर्थिक परिषदेत ऐतिहासिक करार करत नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय शैक्षणिक हब उभारण्याचा मार्ग मोकळा केला आहे. यामुळे परदेशातील नामांकित विद्यापीठे नवी मुंबईत येणार असून भारतीय विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण नवी मुंबईतून घेता येणार आहे. हा प्रकल्प नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पाच किमीच्या परिसरात उभारण्यात येणार आहे.

उलवे आणि खारघर येथे 'एरुडिटस' आणि 'बुक माय शो' यांना जागा देण्यात येणार असून, पुढील दहा वर्षांत २०-२५ हजार कोटींची गुंतवणूक अपेक्षित आहे.

## लंडनच्या धर्तीवर संकुल

नवी मुंबईत अत्याधुनिक 'आउटडोअर एंटरटेनमेंट अरेना' उभारण्याचा मोठा प्रकल्प साकारला जात आहे. न्यूयॉर्कच्या मॅडिसन स्क्वेअर आणि लंडनच्या ०२ अरेनाच्या धर्तीवर हे संकुल उभारले जाईल. बुक माय शोच्या सहकार्याने हा प्रकल्प विकसित केला जात असून, १७ हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. या नाट्यगृहात २०-२५ हजार प्रेक्षक बसण्याची सोय असेल. येथे संगीत, क्रीडा, नाट्य व मनोरंजन कार्यक्रमांचे आयोजन होईल.

तसेच, या प्रकल्पांमुळे २० हजारांहून अधिक रोजगार संधी निर्माण होणार असल्याची माहिती सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.

10/02/2025 | Mumbai | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

मराठवाडा साथी

epaper.marathwadasathi.com
10 Feb 2025 - Page 2

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, नालंदा विद्यापीठाचा वारसा!

नालंदा विद्यापीठ हे भारतातील सर्वात जुने विद्यापीठ आहे. पाचव्या शतकापासून ते बाराव्या शतकापर्यंत हे शिक्षणाचे केंद्र होते. नालंदा विद्यापीठ हे जगातील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक. युनेस्कोने नालंदा महाविहाराचे अवशेष जागतिक वारसा स्थळ घोषित केले आहे. या विद्यापीठात बौद्ध धर्म, दर्शन, गणित, स्थापत्य, अतंराळ यासंबधी अभ्यासक्रम शिकवला जात होता. जगातील सर्वात जुने विद्यापीठ एकेकाळी भारतात होते मात्र, जगातील सर्वोत्तम विद्यापीठांत भारतीय विद्यापीठे कुठेच दिसत नाहीत. ही मोठी शोकांतिका आहे ,कारण, जगातील सर्वात जुने विद्यापीठ भारतात असुन आजच्या विद्यापीठांतील शिक्षणाच्या दर्जाबाबत आपण कुठे कमी पडतो? शोध घेणे आवश्यक आहे. आपल्याकडे अनेक विद्यापीठे चांगले आहेत परंतु, त्या विद्यापीठातील वैचारिकता, विद्यापीठ प्रशासनात घुसलेले राजकारण यामुळे शिक्षण क्षेत्रात राजकीय पक्षांनी सुद्धा उडी घेतलेली दिसते. त्यामुळे ही दयनीय अवस्था? भारतातील काही नामांकित विद्यापीठांपैकी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातील प्रमुख विद्यापीठांपैकी एक आहे. हे विद्यापीठ मराठी भाषेच्या आणि संस्कृतीच्या अभ्यासासाठी प्रसिद्ध आहे. या विद्यापीठाला 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणूनही ओळखले जाते. हे विद्यापीठ विज्ञान, वाणिज्य, कला, भाषा आणि व्यवस्थापन या विषयांमध्ये अभ्यास करण्यासाठी प्रसिद्ध आहे. विद्यापीठात सुमारे ३०७ मान्यताप्राप्त संशोधन संस्था आहेत. महाराष्ट्रातील इतर विद्यापीठांपैकी परदेशी विद्यार्थ्यांचा ओढा पुणे विद्यापीठाकडे दिसतो. हे या विद्यापीठाचा वेगळेपण आणि दर्जा म्हणता येईल. या विद्यापीठात उत्कृष्ट सुविधा असल्याने अनेक परदेशी विद्यार्थी येतात. या विद्यापीठाला नॅक दर्जा 'अ' श्रेणी देण्यात आली आहे. या विद्यापीठात संशोधनात गुणवत्तापूर्ण सुधारणा करण्याकडे विशेष लक्ष दिले जाते.

पुणे विद्यापीठाची स्थापना १० फेब्रुवारी १९४९ रोजी पुणे विद्यापीठाची स्थापना झाली. मुंबई विधिमंडळाने १९४८ मध्ये मंजूर केलेल्या पुणे विद्यापीठ कायद्याअंतर्गत करण्यात आली. एम.आर. जयकर विद्यापीठाचे पहिले कुलगुरू . 'ऑक्सफर्ड ऑफ द ईस्ट' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विद्यापीठाला शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवणाऱ्या पहिल्या शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे नाव देऊन एकप्रकारे विद्यापीठाचा गौरवच केला आहे. स्त्री शिक्षणासाठी आपले आयुष्य वेचलेल्या भारताच्या पहिल्या महिला शिक्षिका व मुख्याध्यापिका सावित्रीबाई फुले यांचे नाव जोडण्याचा निर्णय घेण्यात आला. ७ जून २०१४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत यावर शिक्कामोर्तब झालं.१९ व्या शतकातील भारतीय समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या सन्मानार्थ ९ ऑगस्ट २०१४ रोजी पुणे विद्यापीठाचे नाव बदलून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ असे ठेवण्यात आले.ब्रिटिश वसाहतवादी राजवटीत महाराष्ट्रातील महिला आणि दलित समुदायांचे जीवन सुधारण्यात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी १८४८ मध्ये भारतातील पहिली स्थानिक मुलींसाठी चालणारी शाळा पुण्यात स्थापन केली. हा विद्यापीठाचा गौरव आणि क्रांतीज्योतीचा सन्मान म्हटले तर यथोचित होईल.



सुरुवातीला विद्यापीठाचे कार्यक्षेत्र पश्चिम महाराष्ट्रातील १२ जिल्ह्यांमध्ये होते. १९६२ मध्ये कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाल्यानंतर , त्याचे कार्यक्षेत्र पाच जिल्ह्यांपुरते मर्यादित झाले: पुणे , अहमदनगर , नाशिक , धुळे आणि जळगाव . यापैकी धुळे आणि जळगाव हे दोन जिल्हे ऑगस्ट १९९० मध्ये स्थापन झालेल्या जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी जोडले गेले. या विद्यापीठातील अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात देदीप्यमान कामगिरी केली ,करिअर घडवले. विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये भारतातील प्रमुख राजकारणी आहेत ज्यात भारताचे ७ वे पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंह ; भारताचे १२ वे राष्ट्रपती प्रतिभा पाटील ; महाराष्ट्राचे १७ वे आणि १९ वे मुख्यमंत्री विलासराव देशमुख ; आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री शरद पवार यांचा समावेश आहे. भारताचे ९ वे पंतप्रधान पी.व्ही. नरसिंह राव यांनी फर्ग्युसन कॉलेजमधून पदवी प्राप्त केली , जेव्हा हे कॉलेज पुणे विद्यापीठाच्या अंतर्गत होते.येमेनचे दुसरे उपराष्ट्रपती आणि येमेनचे पंतप्रधान खालेद बहह यांनी विद्यापीठातून बीकॉम आणि एमकॉम पदवी प्राप्त केली. विज्ञान आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील, विद्यापीठाच्या उल्लेखनीय माजी विद्यार्थ्यांमध्ये पद्मनाभन बलराम , रसायनशास्त्रज्ञ आणि इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्सचे संचालक; कांतिलाल मार्डिया , सांख्यिकीशास्त्रज्ञ आणि गाय पदक विजेते ; थॉमस कैलाथ , विद्युत अभियंता आणि २०१४ च्या राष्ट्रीय विज्ञान पदकाचे प्राप्तकर्ता; विस्टास्प कारभारी , सिव्हिल इंजिनिअर आणि आर्लिंग्टन येथील टेक्सास विद्यापीठाचे आठवे अध्यक्ष ;सुहास पाटणकर , मिनेसोटा विद्यापीठातील प्राध्यापक आणि संगणकीय द्रव गतिमानता आणि मर्यादित खंड पद्धतीच्या क्षेत्रातील प्रणेते ; सी. कुमार एन. पटेल , कार्बन डायऑक्साइड लेसरचे शोधक , १९९६ च्या राष्ट्रीय विज्ञान पदकाचे प्राप्तकर्ता आणि कॅलिफोर्निया विद्यापीठ, लॉस एंजेलिस येथे संशोधनाचे कुलगुरू ; आणि विनोद स्कारिया , बायोइन्फॉर्मेटिशियन , जे पहिल्या भारतीय जीनोमचे अनुक्रमण करण्यासाठी ओळखले जातात, यांचा समावेश आहे . व्हीएस हुजुरबाजार यांनी सांख्यिकी विभागाचे पहिले प्रमुख म्हणून काम केले. एसएन सदाशिवन जे नागरी सेवा प्रशिक्षक, लेखक आणि इतिहासकार होते. माधव गाडगीळ , एक पर्यावरणशास्त्रज्ञ आणि सुलोचना गाडगीळ , हवामानशास्त्रज्ञ. राजकारण्यांमध्ये अगाथा संगमा , के.टी. रामाराव , प्रकाश जावडेकर , आणि नबील रजब यांचा समावेश आहे . शिक्षणतज्ज्ञ ज्योती गोगटे यांनी विद्यापीठातून बी.कॉम, एम. कॉम आणि पीएच.डी. पदवी प्राप्त केली आणि २००६ ते २०१३ पर्यंत त्या विद्यापीठासाठी पीएच.डी. मार्गदर्शक होत्या.कला संग्राहक आणि इतिहासकार दिनकर जी. केळकर यांनी १९७८ मध्ये विद्यापीठातून डी. लिट. पदवी प्राप्त केली.पत्रकार शेरीन भान यांनी विद्यापीठातून कम्युनिकेशन स्टडीजमध्ये पदव्युत्तर पदवी प्राप्त केली , चित्रपट आणि टेलिव्हिजन हे त्यांचे मोठे नाव आहे. अशा नामवंत व्यक्ती ज्यांनी आपापल्या क्षेत्रात भारताची मान उंचावण्यासाठी प्रयत्न केले त्यांचे शिक्षण या विद्यापीठात झाल्याने विद्यापीठाचे महत्व अधोरेखित होते.ही इमारत माणसं उभी करणारी संस्था (विद्यापीठ)आज ७६ व्या वर्षात पदार्पण करीत आहे.केवळ इमारती उभ्या करून, त्याआडून राजकारण करून विद्यापीठ नावारुपाला येत नाहीत.हे या विद्यापीठाच्या वेगळेपणातून लक्षात येते. नालंदा विद्यापीठ जगातील सर्वोत्तम विद्यापीठ होते. यात संदेह नाही, हा वारसा म्हणावा.

- पदमाकर उखळीकर ,
मो.९९७५१८८९१२ .

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# उत्तरपत्रिका तपासणी मानधनात नऊ वर्षांनंतर वाढ

## दहावी-बारावीसाठी राज्य शिक्षण मंडळाचा निर्णय

■ संतोष विंचू : सकाळ वृत्तसेवा

येवला, (जि. नाशिक) ता. ९ : दहावी-बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणाऱ्या शिक्षकांच्या मानधनात मागील अनेक वर्षांत एका रुपयाचीही वाढ झालेली नव्हती. या वर्षी मात्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. तब्बल नऊ वर्षांनंतर मंडळाने दहावी-बारावीसाठी प्रति उत्तरपत्रिका दीड रुपया, तर मुख्य नियामकांच्या मानधनात हजार रुपयांची वाढ केली.

बारावीसाठी वरिष्ठ परीक्षक व नियामक यांना तीन तासांच्या उत्तरपत्रिकेसाठी दोन रुपये ५० पैसे,



अडीच तासांसाठी दोन रुपये २५ पैसे, तर एक तासाच्या उत्तरपत्रिकेसाठी दोन रुपये मानधन मिळेल. मुख्य नियामकाला पूर्वी तीन हजार एकत्रित मानधन होते, ते आता चार हजार रुपये केले आहे. दहावीसाठी वरिष्ठ परीक्षक, नियामकाला तीन तासांच्या उत्तरपत्रिकेसाठी दोन रूपये २५ पैसे, अडीच तासांच्या उत्तरपत्रिकेसाठी दो रूपये तर एक तासाच्या उत्तरपत्रिकेसाठी एक रुपया ७५ पैसे मानधन मिळेल.

"मुख्याध्यापक महामंडळ नऊ वर्षांपासून उत्तरपत्रिका तपासणीचे मानधन वाढण्यासाठी प्रयत्नशील होते. अखेर त्याची दखल घेऊन शिक्षकांना न्याय मिळाला आहे. वास्तविक उत्तरपत्रिका तपासणीचे काम जबाबदारीचे असल्याने यात टप्प्याटप्प्याने वाढ करण्याची आमची मागणी आहे. मात्र मंडळाने आता घेतलेला निर्णय स्वागतार्ह आहे.

**-एस. बी. देशमुख,**
सचिव, मुख्याध्यापक महामंडळ, महाराष्ट्र राज्य

**असे वाढले मानधन** (प्रति उत्तरपत्रिका)

| इयत्ता बारावी | | |
|---|---|---|
| परीक्षेचा वेळ | पूर्वीचे मानधन | सुधारित मानधन |
| तीन तास | सहा रुपये | साडेसात रुपये |
| अडीच तास | पाच रुपये | सहा रुपये |
| एक तास | चार रुपये | पाच रुपये |

| इयत्ता दहावी | | |
|---|---|---|
| परीक्षेचा वेळ | पूर्वीचे मानधन | सुधारित मानधन |
| तीन तास | पाच रुपये | साडेसहा रुपये |
| अडीच तास | चार रुपये | पाच रुपये |
| एक तास | तीन रुपये | चार रुपये |

Sakal 10.2.2025

# नॅकची सुधारित मूल्यांकन प्रणाली लवकरच लागू; नवी पद्धती अमलात येणार

**पुणे** : नॅक मूल्यांकन समितीच्या प्रक्रियेतील लाचखोरीच्या प्रकरणानंतर राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद (नॅक) नवीन मूल्यांकन प्रणाली लागू करण्याच्या तयारीत आहे. डॉ. राधाकृष्ण समितीच्या शिफारशींनुसार दुहेरी (बायनरी) मूल्यांकन आणि मॅच्युरिटी आधारित श्रेणी स्तर मूल्यांकन सुरु करण्याचा आराखडा अंतिम टप्प्यात असून, ही नवी पद्धती एप्रिल किंवा मे महिन्यात तयार करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

नॅक मूल्यांकनासाठी आंध्र प्रदेशातील एका अभिमत विद्यापीठात गेलेल्या समितीचे लाचखोरीचे प्रकरण काही दिवसांपूर्वी उघडकीस आले. या प्रकरणात दहा जणांना सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणामुळे देशभरात खळबळ उडाली. त्यानंतर आता या प्रकरणाची गंभीर दखल घेत नॅकने या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार, संबंधित प्रकरणातील विद्यापीठाची मूल्यांकन प्रक्रिया रद्द करून पुढील पाच वर्षांसाठी विद्यापीठाला मूल्यांकनासाठी अर्ज करण्यापासून प्रतिरोधित करण्यात आले आहे. संबंधित समितीतील सर्व सात सदस्यांवर तत्काळ प्रभावाने मूल्यांकन किंवा नॅकच्या इतर कोणत्याही कार्यक्रमांसाठी तहहयात बंदी घालण्यात आली आहे. तसेच त्या सात सदस्यांनी या पूर्वी वर्षभरात केलेल्या भेटींची पुनर्तपासणी करण्यात येणार आहे. त्याबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी कार्यकारी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नॅकच्या मूल्यांकन प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित आहेत. या मूल्यांकनामध्ये एक ते पाच स्तर तयार करून उच्च शिक्षण संस्थांना त्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यावर भर आहे. ही पद्धत डिसेंबर २०२४ पासून लागू करण्यात येणार होती. आता नॅकने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, डॉ. राधाकृष्णन समितीच्या शिफारशींनुसार येत्या एप्रिल-मेमध्ये दुहेरी, मॅच्युरिटी आधारित मूल्यांकन प्रक्रिया, त्याचा आराखडा आणि कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी समिती नियुक्त केल्या आहेत, असे नमूद करण्यात आले आहे.

नॅक प्रक्रियेतील अनुसूचित घटनेला मिळणारा वाव दूर करून प्रक्रिया सुधारण्यासाठी अतिरिक्त उपाययोजना करण्यात येणार आहे. नवीन आराखड्याच्या अंमलबजावणीसह प्रगत माहिती तंत्रज्ञान आधारित सुविधांचा वापर करून मूल्यांकनात वस्तुनिष्ठता येण्यासह अनुचित पद्धती दूर केल्या जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

Kesari 11.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# State board replaces entire management at 818 centres

**125 out of the 818 centres where incidents of copying were reported are in the Pune division**

**Gayatri Vajpeyee**
puneletters@hindustantimes.com

**PUNE:** In a bold move, the entire management at 818 centres where class 12 board exams were held and incidents of copying were reported, including 125 centres in the Pune division where such incidents were reported, has been replaced by the Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE). Beginning this year, the MSBSHSE has also decided to cancel the permissions of centres where any such incidents are reported.

The information was shared by Sharad Gosavi, chairperson, MSBSHSE, on Monday, February 10, while speaking at a press conference organised to provide information about the preparation by the MSBSHSE for the higher secondary certificate (HSC) or class 12 exams beginning February 11.




**The MSBSHSE has also decided to cancel the permissions of centres where untoward incidents are reported.** HT FILE

Gosavi said that the state government is taking multiple efforts to streamline the examination process. "Several steps have been taken in line with the chief minister's 'copy-free exam movement' among which, 818 centres across nine divisions in Maharashtra have been identified where incidents of copying were reported previously. The board has changed the management completely at these centres including the centre director, superior and all other staff. From this year onwards, we will cancel the permission of centres where such incidents are reported," Gosavi said.

As per the data shared by the board, 125 out of the 818 centres where incidents of copying were reported are in the Pune division. The data also highlighted that this year, around 1,505,037 students will be appearing for the class 12 exam, which will be held at 3,373 centres in Maharashtra. Among the 1,505,037 students appearing for the exam, 8.10 lakh are boys; 6.94 lakh are girls; and at least 37 are transgender students.

**AMONG THE 1,505,037 STUDENTS APPEARING FOR THE EXAM, 8.10 LAKH ARE BOYS; 6.94 LAKH ARE GIRLS**

To avoid paper leaks or any other malpractices this year, instead of providing 10 minutes extra before the exam starts, the board has decided to give 10 minutes extra towards the end of every paper. Nearly 271 squads have been appointed to prevent any malpractices at the examination centres. The officials have also advised students to be present on time for the examination. Those who are late will not be allowed to appear for the exam.

Gosavi said, "We have directed colleges to take re-exams of students who missed the oral exams due to different reasons on March 12, 15 and 17. To streamline the exam process, the board is also coordinating with other government departments including the district administration, transport department, security agencies, and the Maharashtra State Electricity Supply Board."

Hindustan Times 11.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात City 11 Feb 2025_005 11 Feb 2025

### कंत्राटी तत्त्वावरील शिक्षक नियुक्तीचा निर्णय रद्द

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १० -** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० व १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळेत डी.एड., बी.एड. अर्हता धारक बेरोजगार उमेदवारांना कंत्राटी तत्त्वावरील शिक्षकपदी नियुक्त करण्याबाबतचा शासन निर्णय रद्द करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी कंत्राटी तत्वावर नियुक्त्या करण्यात आल्या होत्या. आता गुणांच्या आधारे करण्यात येणाऱ्या शिक्षक भरतीचा दुसरा टप्पा २० जानेवारी २०२५ रोजी प्रत्यक्षात सुरु झाला आहे. त्यामुळे आवश्यक अर्हताधारक व पात्र शिक्षक नियमित तत्वावर उपलब्ध होणार आहेत. ही वस्तुस्थिती विचारात घेऊन आधीचा निर्णय रद्द करण्यात आलेला आहे.

कंत्राटी तत्वावर तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे, त्यांच्या नियुक्तीचा कार्यकाल संपुष्टात येणे अथवा ते कार्यरत असलेल्या पदावर नियमित शिक्षकाची नियुक्ती होणे यापैकी जे अगोदर घडेल, तितक्या कालावधीपर्यंत अशी नियुक्ती सुरू राहील व त्यानंतर त्यांना पुनर्नियुक्ती देता येणार नाही, असे शालेय शिक्षण विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी स्पष्ट केले आहे.

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे www.dainikprabhat.com City 11 Feb 2025_005 11 Feb 2025

### ८१८ केंद्रांवर केंद्रसंचालक, पर्यवेक्षकांची अदलाबदल

**प्रभात वृत्तसेवा**

- यंदा विद्यार्थ्यांची संख्या ८ हजारांनी घटली
- राज्यात २७१ भरारी पथके नियुक्त
- संवेदनशील केंद्रावर ड्रोन कॅमेराद्वारे वॉच
- व्हिडीओ चित्रीकरणासाठी अतिरिक्त निधी
- कॉपी आढळल्यास परीक्षा केंद्र मान्यता होणार कायमची रद्द



परीक्षा केंद्रावर आपला बैठक क्रमांक पाहताना विद्यार्थी

**पुणे, दि. १० -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी राज्यातील एकुण ८१८ परीक्षा केंद्रांवर यापूर्वी कॉपीच्या गैरमार्गाची प्रकरणे आढळलेली आहेत. त्यामुळे आता या परीक्षा केंद्रावरील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तीची नियुक्ती करताना अदलाबदल करण्यात येणार आहे.

कोरोना काळातील सन २०२१ व सन २०२२ या दोन परीक्षा वगळून मागील ५ वर्षांच्या, म्हणजेच फेब्रुवारी-मार्च २०१८, २०१९, २०२०, २०२३ व २०२४ या परीक्षांमध्ये ज्या परीक्षा केंद्रांवर गैरमार्गाची प्रकरणे आढळून आलेली आहेत अशा परीक्षा केंद्रावर, केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित व्यक्तींची नियुक्ती सदर केंद्रावर समाविष्ट असणाऱ्या शाळेतील शिक्षक व अन्य कर्मचाऱ्यांना मिळणार नाही. येथे इतर अन्य शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक व कर्मचाऱ्यांमधून नियुक्ती करण्यात येणार आहे. पुणे - १२५, नागपूर - १०४, छत्रपती संभाजीनगर - २०५, मुंबई - ५७ , कोल्हापूर - ३९ , अमरावती - १२४ , नाशिक - ८८, लातूर - ७३, कोकण - ३ याप्रमाणे परीक्षा केंद्रावर केंद्रसंचालक, पर्यवेक्षकांची अदलाबदल करण्यात येणार आहे, अशी महिती राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी दिली आहे.

राज्य मंडळाने निर्धारित केलेल्या कालावधीत विद्यार्थ्याला वैद्यकीय किंवा काही अपरिहार्य कारणांमुळे प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा, प्रकल्प व तत्सम परीक्षा देता आली नसल्यास अशा विद्यार्थ्यांची परीक्षा लेखी परीक्षेनंतर १२, १५ व, १७ मार्च रोजी आयोजित करण्यात येणार आहे. प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी या परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने गुण भरून घेण्यात येणार आहेत, असेही ते म्हणाले.

मुंबईतील दोन विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी विशेष सुविधा पुरविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. यातील एका विद्यार्थ्याला दृष्टीदोषामुळे वाचण्यास अडचण आहे त्याला हेडटॉर्च वापरण्यास परवानगी देण्यात आली आहे. एका विद्यार्थ्याला उष्णतेचा त्रास होत असल्याने त्याची एसीची सोय असलेल्या केंद्रात व्यवस्था करण्यात येणार आहे.

#### परीक्षेचा निकाल १५ मेपूर्वी लागणार

यंदा इयत्ता बारावी, दहावीची परीक्षा १० दिवस आधी घेण्यात येत आहे. त्यामुळे या परीक्षांचे निकाल १५ मे पुर्वी लागणार आहेत. पुरवणी परीक्षाही लवकर घेऊन त्याचा निकालही तात्काळ लावण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या परीक्षांसाठी पुर्ण वेळ देता येणार आहे. इयत्ता अकरावीची प्रवेश प्रक्रियाही लवकर पुर्ण करुन १ जुलैपासून अकरावीचे वर्ग सुरु करण्याचे नियोजन करण्यात येणार आहे.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 11 Feb 2025_005
11 Feb 2025
www.dainikprabhat.com

# नॅकची नवी मूल्यांकन पद्धत होणार लागू

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १० -** राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेने (नॅक) नवीन मूल्यांकन पद्धत लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. नव्या मूल्यांकन ही बायनरी पद्धत असून, यात मूल्यांकन झाले की नाही एवढेच असेल. तसेच, नव्या मूल्यांकनात श्रेणीएवजी पाच स्तर असतील. नव्या मूल्यांकनची कार्यपद्धती आणि आराखडा तयार करण्यात येत असल्याचे नॅककडून स्पष्ट करण्यात आले. नॅक मूल्यांकनासाठी आंध्र प्रदेशातील एका अभिमत विद्यापीठात गेलेल्या समितीचे लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी दहा जणांना सीबीआयने अटक केली आहे. या घटनेमुळे देशभरात मोठी खळबळ उडाली. या प्रकरणाची गंभीर दखल घेत आता हा बदल करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

आंध्रप्रदेश येथील प्रकरणात संबंधित विद्यापीठाची मूल्यांकन प्रक्रिया रद्द करून पुढील पाच वर्षांसाठी विद्यापीठाला मूल्यांकनासाठी अर्ज करण्यापासून मनाई करण्यात आली आहे. संबंधित समितीतील सर्व सात सदस्यांवर तत्काळ मूल्यांकन किंवा नॅकच्या इतर कोणत्याही कार्यक्रमांमध्ये सहभाग घेण्यावर बंदी घालण्यात आली आहे. तसेच त्या सात सदस्यांनी या पूर्वी वर्षभरात केलेल्या भेटींची पुनर्तपासणी करण्यात येणार आहे, असे परिपत्रक नॅकने प्रसिद्ध केले आहे.

नॅकच्या बदलल्या जात असलेल्या मूल्यांकन प्रक्रियेत काही बदल प्रस्तावित आहेत. आता दुहेरी

### लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आल्याने निर्णय

(बायनर) मूल्यांकन आणि मॅच्युरिटी आधारित मूल्यांकन करण्यात येणार आहे. या मूल्यांकनामध्ये एक ते पाच स्तर तयार करून उच्च शिक्षण संस्थांना त्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यावर भर राहणार आहे. ही पद्धत डिसेंबर २०२४ पासून लागू करण्यात येणार होती. आता नॅकने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार डॉ. राधाकृष्णन समितीच्या शिफारशींनुसार एप्रिल-मेमध्ये दुहेरी, मॅच्युरिटी आधारित मूल्यांकन प्रक्रिया, त्याचा आराखडा आणि कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आल्या आहेत.

नवीन आराखड्याच्या अंमलबजावणीसह प्रगत माहिती तंत्रज्ञान आधारित सुविधांचा वापर करून मूल्यांकनात वस्तुनिष्ठता येण्यासह अनुचित पद्धती दूर केल्या जातील. नॅक मूल्यांकन प्रक्रियेच्या दुसऱ्या आणि पुढील टप्प्यात सहभागी होणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांची सध्याची श्रेणी कायम ठेवणे, पहिल्या टप्प्यातील उच्च शिक्षण संस्थांना मूलभूत श्रेणी स्वीकारण्याचा पर्याय देऊन त्यांचे मूल्यांकन शुल्क भविष्यात समायोजित करणे, पहिली आणि दुसऱ्या टप्प्यातील मूल्यांकनाच्या वरील श्रेणीतील विद्यापीठे आणि महाविद्यालयांचे मूल्यांकन मिश्र आणि ऑनलाइन पद्धतीने करण्यात येणार आहे, असेही परिपत्रकात नमूद केले आहे.

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

# आमच्या जडणघडणीत पुणे विद्यापीठाचा वाटा

## सावित्रीबाई फुले विद्यापीठाच्या जीवनसाधना गौरव पुरस्कारार्थींनी व्यक्त केली कृतज्ञता

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १० -** पुणे विद्यापीठामुळेच शिक्षण क्षेत्राच्या उभारणीत मोठे काम करता आले. आमच्या जडणघडणीत पुणे विद्यापीठाचा महत्त्वाचा वाटा आहे. आम्ही आज जे काही आहोत, ते केवळ पुणे विद्यापीठामुळेच आहोत, अशी भावना ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार व डॉ. शिवाजीराव कदम यांच्यासह अन्य जीवनसाधना गौरव पुरस्कारप्राप्त व्यक्तींनी व्यक्त केली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा वर्धापनदिन विद्यापीठाच्या इनडोअर हॉलमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ. एकनाथ चिटणीस, डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. गो. बं. देगलूरकर, डॉ. तारा भवाळकर, डॉ. विश्वास मंडलिक, हेमलता बीडकर, डॉ. शिवाजीराव कदम, डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. मुकुंद तापकीर आणि आर. एन. शिंदे या व्यक्तींना विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते जीवनसाधना गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, चारुशीला गायके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्या परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य उपस्थित होते.




**पुणे : विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांच्या हस्ते पुणे विद्यापीठ सावित्रीबाई फुले जीवनसाधना गौरव पुरस्कार स्वीकारताना डॉ. शिवाजीराव कदम. या वेळी प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर आणि कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आदी.**

अभ्यंकर म्हणाले, शिक्षणाने संपूर्ण जगाला आकार दिला पाहिजे, अशी अवस्था आज जगामध्ये निर्माण झाली आहे. जगातील समस्या विद्यार्थ्यांसह संशोधकांना सोडविता आल्या पाहिजेत. विद्यापीठ शिक्षणाचे सर्वोच्च ध्येय हेच असले पाहिजे. सूत्रसंचालन विद्यावाणीचे संचालक श्रीदत्त गायकवाड यांनी केले.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 11 Feb 2025_001
11 Feb 2025

### उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा निर्णय

# अभियांत्रिकीसाठीही 'कॅरी ऑन'

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १०** - अभियांत्रिकी अभ्यासक्रमाशी संबंधित विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा लागू करण्याचा निर्णय राज्याच्या उच्च शिक्षण विभागाने घेतला आहे. ही सुविधा केवळ शैक्षणिक वर्ष २०२४-२५ या वर्षासाठी लागू राहील. त्यामुळे राज्य शासनाकडून अभियांत्रिकीच्या अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा मिळाल्याने उत्तीर्ण होण्यासाठी आणखी एक संधी मिळाली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासह राज्यातील सर्व विद्यापीठातील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना याचा लाभ मिळणार आहे.

याबाबतचा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने आज प्रसिद्ध केला आहे. एक किंवा दोन विषयांत अनुत्तीर्ण राहिल्यास विद्यार्थ्यांचे पूर्ण एक वर्ष वाया जाते. शिक्षणात खंड पडतो. त्यामुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी विद्यार्थी, विद्यार्थी संघटना, **(पान २ पहा)**

### कॅरी ऑन म्हणजे काय

अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना पूर्ण पहिले वर्ष उत्तीर्ण झाल्याशिवाय तृतीय वर्षात प्रवेश मिळत नाही, तसेच द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना चौथ्या वर्षात प्रवेश दिला जात नाही. पदवीच्या अंतिम वर्षात एक विषय जरी राहिला, तर उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र दिले जात नाही. या सर्व विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधेचा लाभ दिल्यास त्यांना पुढील वर्षात प्रवेश मिळतो आणि पुन्हा परीक्षा देता येईल. त्यातील उत्तीर्ण विद्यार्थी पुढील वर्षात प्रवेशासाठी पात्र राहतील. काही कारणांमुळे परीक्षा देता न आलेल्या विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ होणार आहे.

# अभियांत्रिकीसाठीही 'कॅरी ऑन'

अधिसभा सदस्य व लोकप्रतिनिधी यांच्याकडून करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने सर्वच विद्यापीठांतील अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्यात काही विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना कॅरी ऑन सुविधा दिली आहे, तर काही विद्यापीठांनी कॅरी ऑन सुविधा उपलब्ध करून दिलेली नाही. यासंदर्भात राज्यातील विविध विद्यापीठांमध्ये एकसमानता आणण्यासाठी सर्व अकृषी विद्यापीठांना निर्देश देण्याची बाब राज्य शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार कॅरी ऑन सुविधा देण्याचा निर्णय घेतला आहे.

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता

विचार

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# शिक्षण क्षेत्रातील महासत्ता होण्यासाठी...

**एकविसाव्या शतकातील पहिल्या शिक्षण धोरणाच्या काटेकोर अंमलबजावणीत महाराष्ट्र अग्रस्थानी आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य देऊन, ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था घडविण्यासाठी शिक्षण व्यवस्थेच्या प्रत्येक स्तरावर नियोजनबद्ध प्रयत्न करण्यात येत आहेत.**



पहिली बाजू

चंद्रकांत पाटील
उच्च व तंत्रशिक्षणमंत्री

**जगात भारताची** अर्थव्यवस्था पाचव्या क्रमांकावर आहे. ही अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्याचे ध्येय असून ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेला अधिक महत्त्व आहे. माहिती तंत्रज्ञान हे ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे. भारताच्या प्रगतीला गती देताना शैक्षणिक आणि व्यावसायिक प्रगतीबरोबरच आपल्याला नैतिक मूल्ये, संस्कृती, ज्ञान याचा योग्य समन्वय साधून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला प्राधान्य दिले पाहिजे.

देशाच्या विकासात उच्च शिक्षणाचे सर्वाधिक महत्त्व आहे. यात महाराष्ट्राचा मोठा वाटा आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) २०२० तयार केले आहे. हे एकविसाव्या शतकातील पहिले शैक्षणिक धोरण आहे. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनविणे हे नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणानुसार बौद्धिक विकास व अध्ययनाच्या तत्त्वांवर आधारित अभ्यासक्रम व अध्ययन, शाखांची रचना, संधी, समानता, समावेशकता आणि दर्जा ही उद्दिष्टे ठेवून भारतीय शिक्षण पद्धतीत अनेक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात आले आहे.

राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात स्वायत्तता आणि उत्कृष्टता वाढविणे, शाळांपासून कौशल्य विकास तसेच उच्च आणि तांत्रिक शिक्षणापर्यंतच्या सर्व शैक्षणिक बाबींवर लक्ष केंद्रित करणे यासाठी कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. राज्य स्तरावर पूर्व-प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण संस्थांपर्यंत यशस्वी होण्यासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० मधील दृष्टिकोनानुसार, गुंतवणूक आणि संसाधने यांचा समन्वय साधणे हे यामागचे उद्दिष्ट आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची यशस्वी अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी हा कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. उच्च शिक्षणात करावयाचे बदल याविषयी धोरणात्मक निर्णय घेणे ही या कार्यगटाची कार्यकक्षा आहे. राज्यात नवीन शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू करण्यात आली असून त्याला अधिक गती देण्यासाठी सुकाणू समिती स्थापन करण्यात आली आहे.

**प्रश्न तुमचा, उत्तर आमचे**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने मुक्त व्यासपीठ उपक्रम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या उपसमितीने एक अहवाल सादर केला आहे. या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणींच्या निवारणासाठी उपाययोजना सुचविण्याच्या व मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने सुकाणू समिती पुनर्गठित करण्यात आली आहे.

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची सूत्रबद्ध पद्धतीने उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत अंमलबजावणी होत आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून सर्व अकृषी विद्यापीठांतील विभाग व स्वायत्त महाविद्यालयांत शासन निर्णयानुसार नवीन अभ्यासक्रम पद्धती व श्रेयांक पद्धती लागू करण्यात आली आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उर्वरित संलग्नित महाविद्यालयांत त्यांची अंमलबजावणी सुरू झाली आहे.

या संदर्भात सर्व विद्यापीठे व महाविद्यालयीन शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांचे प्रबोधन आणि मार्गदर्शन वेळोवेळी करण्यात येत आहे. तरीदेखील काही विषयांबाबत तज्ज्ञांमार्फत आणखी मार्गदर्शन व प्रबोधन व्हावे अशी मागणी होत आहे. या अनुषंगाने शासनाने दर शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३० दरम्यान ऑनलाइन प्रबोधनपर मुक्त व्यासपीठ सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

दर शनिवारी सकाळी ११.०० ते १२.३० या कालावधीत राज्यस्तरीय सुकाणू समितीतील तज्ज्ञ सदस्य ऑनलाइन उपलब्ध असतात. या चर्चासत्रादरम्यान प्राचार्य, संस्थाचालक, अध्यापक, विद्यार्थी, पालक व इतर संबंधित यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी संदर्भातील विचारलेल्या प्रश्नांची उकल त्वरित करण्यात येते.

**नॅक मूल्यांकनात प्रथमस्थानी**

राज्यात शासकीय महाविद्यालय, संस्था, अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित अशी एकूण तीन हजार ३४६ महाविद्यालये असून त्यांमध्ये ३० लाखांवर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उच्च शिक्षण गुणवत्तापूर्ण होण्यासाठी सर्वच स्तरांवर प्रयत्न सुरू आहेत. त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयांचे व विद्यापीठांचे मूल्यांकन व मानांकन हे राष्ट्रीय मानांकन व मूल्यांकन संस्था, बंगळुरू (नॅक)द्वारे केले जाते. यासाठी केंद्रीय मंत्र्यांशी सातत्याने पाठपुरावा करून नियमांत शिथिलता आणण्यात आली असून महाविद्यालय स्तरावर समन्वय साधून महाविद्यालयांच्या मूल्यांकन व मानांकनाच्या स्थितीत गेल्या वर्षभरात मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल झाले आहेत. देशातील ३६ राज्यांमधील ४४१ विद्यापीठे आणि नऊ हजार ४१३ महाविद्यालयांमध्ये महाराष्ट्रातील ३५ विद्यापीठे आणि एक हजार ९४९ महाविद्यालये अशा एकूण एक हजार ९८४ शैक्षणिक संस्था/महाविद्यालये यांचे नॅक मानांकन व मूल्यांकन पूर्ण झाले असून महाराष्ट्र प्रथमस्थानी आहे. यामध्ये एक हजार २२८ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांपैकी एक हजार १७८ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व मानांकन पूर्ण झाले आहे, तर दोन हजार ३६८ अशासकीय विना/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांपैकी ६०० महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व मानांकन पूर्ण झाले आहे. २८ शासकीय महाविद्यालये/संस्थांपैकी २७ महाविद्यालये/ संस्थांचे नॅक मूल्यांकन व मानांकन पूर्ण झाले आहे. तीन हजार ६२४ महाविद्यालयांपैकी एक हजार ८०५ महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन व मानांकन पूर्ण झाले आहे. ए (१८५), ए (५९), ए (१९) नॅक ग्रेड असलेली राज्यामध्ये एकूण २६३ महाविद्यालये आहेत.

**मुलींच्या शिक्षणाला आर्थिक पाठबळ**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे, मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी उपलब्ध व्हाव्यात आणि आर्थिक पाठबळाअभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून मुली वंचित राहू नयेत, यासाठी ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा कुटुंबांतील मुलींना पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवीचे शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या योजनेत अभ्यासक्रमांचे वार्षिक शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्काचा समावेश आहे. शासन मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांकरिता संबंधित विद्यापीठ, तंत्रशिक्षण मंडळ, उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ इत्यादींकडून आकारण्यात येणारे परीक्षा शुल्क व शासन मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमाचे १०० टक्के मर्यादेपर्यंत परीक्षा शुल्क शिष्यवृत्ती स्वरूपात पात्र विद्यार्थ्यांना मंजूर करण्यात येईल. संस्थात्मक व संस्थाबाह्य या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुलींनाही शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्कात १०० टक्के सवलत देण्यात येत आहे.

**परीसस्पर्श योजना**

महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन करून घेण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाच्या परामर्श योजनेच्या धर्तीवर महाविद्यालयांचे नॅक मूल्यांकन होण्याच्या दृष्टीने 'परीसस्पर्श योजना' सुरू करण्यात आली. राज्यातील विद्यापीठे व उच्च शिक्षण संस्थांमध्ये गुणात्मक बदल करण्यासाठी ही योजना राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतलेला आहे. यामध्ये विद्यार्थिहिताला अधिक प्राधान्य देऊन विद्यापीठे व महाविद्यालयांनी मेजर, मायनर व जेनेरिक विषयांच्या अनुषंगाने अभ्यासक्रम रचना, अॅकॅडेमिक बँक क्रेडिट्सची नोंदणी, प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप यांचे योग्य नियोजन करण्यात येत आहे. तसेच या योजनेअंतर्गत नॅक एनबीए मूल्यांकन आणि प्रमाणीकरण असलेल्या व अनुकरणीय वाटचाल असलेल्या १५० महाविद्यालयांना मार्गदर्शक महाविद्यालये म्हणून नियुक्त केले आहे. असे प्रत्येक मार्गदर्शक महाविद्यालय प्रतिवर्षी ५ ते ७ नॅक मूल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांना मार्गदर्शन करते.

**अटल ऑनलाइन नोंदणी प्रणाली**

राज्य सामाईक प्रवेश कक्षाकडून असेसमेन्ट, टेस्ट्स अँड लर्निंग म्हणजेच अटल प्रणाली विकसित करण्यात आली आहे. यामध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी परीक्षांचा सराव करता येतो. शिक्षणातील संधी आणि क्षमता ओळखण्याबरोबरच विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढविण्यास मदत होते. या प्रणालीच्या माध्यमातून मॉक टेस्ट्स आणि सायकोमेट्रिक टेस्टच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतांचा शोध घेता येतो. त्या त्या विषयातील शैक्षणिक संधी आणि प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरे जाताना येणारा ताण कमी होण्यास मदत होते. या परीक्षांमुळे विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास वाढण्यास मदत होऊन शैक्षणिक आयुष्यात पुढे जाण्यास प्रोत्साहन मिळते.

शिक्षण राष्ट्राच्या प्रगतीचा कणा असतो. ज्ञान, संशोधन आणि नावीन्याच्या माध्यमातून भारताला विकसित राष्ट्र म्हणून घडवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तयार केले आहे. भारताला जागतिक ज्ञानक्षेत्रातील महासत्ता बनवणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रात या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी सुरू असून शिक्षण व्यवस्थेत मूलभूत बदल घडवण्याचा दृढसंकल्प करण्यात आला आहे.

11/02/2025 | Pune | Page : 06
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### यूजीसीच्या मसुद्यावरील सूचनांसाठी मुदतवाढ

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू निवडीच्या नियमावलीच्या मसुद्यावर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यानुसार, आता २८ फेब्रुवारीपर्यंत हरकती-सूचना नोंदवता येणार आहेत.

यूजीसीने प्राध्यापक, प्राचार्य, कुलगुरू निवड प्रक्रिया, किमान पात्रता, पदोन्नती अशा निकषांमध्ये प्रस्तावित बदलांचा मसुदा ६ जानेवारी रोजी जाहीर केला. या बदलांची देशभरात चर्चा आहे. या मसुद्याला हिमाचल प्रदेश, तमिळनाडू, केरळ, कर्नाटक अशा काही राज्यांनी तीव्र आक्षेप नोंदवला आहे. प्रस्तावित बदलांवर हरकती-सूचना सादर करण्यासाठी ५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत दिली होती. त्यानुसार शिक्षणतज्ज्ञ, प्राध्यापक संघटना, संस्थाचालक अशा घटकांकडून हरकती-सूचना नोंदवण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर हरकती-सूचना नोंदविण्यासाठी मुदत वाढवण्याची मागणी करण्यात आली होती.

11/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

राज्यात 'महाज्योती'च्या ९०० विद्यार्थ्यांना फटका

### 'पीएच.डी'चे विद्यार्थी अधिछात्रवृत्तीपासून वंचित

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** महात्मा ज्योतिबा फुले शैक्षणिक व संशोधन परिषदेच्या (महाज्योती) वतीने पीएच.डी करणाऱ्या संशोधकांना नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती देण्यात यावी, असा शासन निर्णय राज्य सरकारने काढला होता. त्यानुसार बार्टी आणि सारथीने अधिछात्रवृत्ती दिली. परंतु, महाज्योतीचे ९०० संशोधक या शिष्यवृत्तीपासून अद्यापही वंचित आहेत. शासनाकडून निधीची मागणी केली असून ती आल्यावर या संशोधकांना अधिछात्रवृत्ती दिली जाईल, अशी माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांनी दिली.

राज्यातील सर्व संशोधक विद्यार्थ्यांनी नोंदणी दिनांकापासून सर्व पात्र विद्यार्थ्यांना अधिछात्रवृत्ती मिळावी, यासाठी कोल्हापूर, पुणे, आझाद मैदान मुंबई, नागपूर,

> शासनाकडे नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती देण्यासाठी आवश्यक निधीची मागणी करण्यात आली आहे. शासनाकडून निधी मिळाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.
> **-राजेश खवले**, व्यवस्थापकीय संचालक, महाज्योती.

पुण्यातील फुलेवाडा ते विधानभवन पायी लाँगमार्च, साखळी उपोषण, अशी आंदोलने करण्यात आली. त्याची दखल घेऊन शासनाने २५ जुलै २०२४ ला सर्व संशोधक विद्यार्थ्यांना ५० टक्के दराने अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेतला. मात्र, बार्टी संस्थेच्या विद्यार्थ्यांनी तीव्र आंदोलन केल्यामुळे २५ ऑगस्टला झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत बार्टीला शंभर टक्के फेलोशिप देण्याचा निर्णय झाला.

त्यानंतर पुणे येथे 'सारथी'च्या संशोधक विद्यार्थ्यांनी, तर नागपूर येथे महाज्योतीच्या विद्यार्थ्यांनी उपोषण केले. त्यावर सारथी, बार्टी आणि महाज्योती या तिन्ही संस्थांतील विद्यार्थ्यांना समान धोरणानुसार शंभर टक्के फेलोशिप नोंदणी दिनांकापासून देण्यास २३ सप्टेंबरच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता मिळाली. त्याबाबतचा शासन आदेशही काढण्यात आला. यानुसार बार्टी आणि सारथीच्या संशोधकांना नोंदणी दिनांकापासून अधिछात्रवृत्ती देण्यात आली.

परंतु, महाज्योतीचे संशोधक अद्यापही अधिछात्रवृत्तीपासून वंचित आहेत. त्यामुळे महाज्योतीच्या ९०० विद्यार्थ्यांवर शासनाने अन्याय केला अशी भावना आहे. महाज्योती आणि राज्य शासनाने यामध्ये लक्ष घालून सर्व विद्यार्थ्यांना बार्टी आणि सारथीच्या विद्यार्थ्यांप्रमाणे अधिछात्रवृत्ती द्यावी, अशी मागणी केली जात आहे.

11/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# प्राध्यापक भरतीचा प्रस्ताव अर्थखात्याकडे

## राज्यात १२ हजार ५२७ जागा रिक्त

**प्रशांत देशमुख, लोकसत्ता**

**वर्धा :** महाराष्ट्रातील सार्वजनिक विद्यापीठे व अनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या रिक्त जागा भरण्याचा प्रस्ताव अर्थखात्याकडे पाठवण्यात आला आहे. दरम्यान, प्राध्यापकांची पदनिर्मिती व भरती नव्या शैक्षणिक धोरणानुसार करण्याची भूमिका प्राचार्य फोरमने घेतली असून या भरतीवर नाराजी नोंदवली आहे.

लोकसेवा आयोगामार्फत भरती होणार असल्याचे आधी जाहीर झाले होते. मात्र, नंतर उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी या जागा विद्यापीठामार्फत भरण्याचे घोषित केले. सध्या प्राध्यापकांच्या १२ हजार ५२७ जागा रिक्त आहेत. त्यापैकी ४ हजार ३०० जागांना मंजुरी द्यावी, असा प्रस्ताव अर्थ खात्याकडे पाठवला आहे. राज्यात ११ विद्यापीठे व १ हजार १७२ अनुदानित महाविद्यालयांत ३३ हजार ७६३ प्राध्यापक कार्यरत आहेत. एकूण मंजूर पदाच्या ३७ टक्के पदे रिक्त आहेत. परिणामी, नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यास अडचण येणार असल्याने ४ हजार ३०० पदे मंजूर झाली. तसा प्रस्तावही अर्थ खात्याकडे पाठवण्यात आला.

11/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे (राज्य मंडळ) बारावीची परीक्षा आज मंगळवारपासून (दि. ११) सुरू होत आहे. यंदा १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा नोंदणी झालेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या ८ हजारांनी घटल्याचे स्पष्ट झाले आहे.

राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी परीक्षेबाबतची माहिती सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. राज्य मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी सावरकर या वेळी उपस्थित



होत्या. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले, ६ लाख ९४ हजार ६५२ मुली, ३७ तृतीयपंथी आहेत. यंदा विज्ञान शाखेतून ७ लाख ६८ हजार ९६७, कला शाखेतून ३ लाख ८० हजार ४१०, वाणिज्य शाखेतून ३ लाख १९ हजार ४३९, व्यावसायिक अभ्यासक्रमातून ३१ हजार ७३५, आयटीआयमधून ४ हजार ४८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्यभरातील ३ हजार ३७३ मुख्य केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार आहे.

गोसावी म्हणाले, विद्यार्थ्यांनी परीक्षेच्या वेळेपूर्वी किमान अर्धा तास आधी परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. सकाळच्या सत्रात १०.३० वाजता, तर दुपारच्या सत्रात २.३० वाजता परीक्षा कक्षात उपस्थित असले

पाहिजे. गेल्या वर्षाप्रमाणेच परीक्षेच्या वेळेनंतर वाढीव दहा मिनिटे दिली जाणार आहेत. परीक्षेच्या कालावधीमध्ये पान ४ वर ▸

Pune Edition
Feb 11, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

# बारावीच्या परीक्षेला आजपासून सुरुवात

**पान १ वरून...**

ताणतणाव मार्गदर्शनासाठी समुपदेशक नियुक्ती, हेल्पलाइन सुरू करण्यात आली आहे. काही अपरिहार्य कारणास्तव विद्यार्थी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी, प्रकल्प परीक्षा देऊ न शकल्यास संबंधित विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेनंतर १२, १५ आणि १७ मार्च रोजी परीक्षेची संधी दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्यासाठी परीक्षेदरम्यान महत्त्वाच्या विषयांच्या परीक्षेत खंड ठेवण्यात आला आहे. मंडळाने प्रसिद्ध केलेले आणि छपाई केलेले वेळापत्रकच ग्राह्य धरण्यात यावे. अन्य संकेतस्थळ किंवा यंत्रणेने छपाई केलेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Feb 11, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# राज्यातील ८१८ केंद्रांवर कर्मचाऱ्यांची अदलाबदल

## बारावीच्या परीक्षेत गैरप्रकार रोखण्यासाठी राज्य मंडळाचा निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** बारावीच्या परीक्षेच्या काळात गैरप्रकार रोखण्यासाठी गेल्या पाच वर्षांत गैरमार्ग प्रकरण आढळलेल्या ८१८ परीक्षा केंद्रांवर केंद्र संचालक, पर्यवेक्षक अशा परीक्षा संबंधित कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात आली आहे. त्यात सर्वाधिक केंद्रे छत्रपती संभाजीनगर विभागीय मंडळातील असून, तसेच संवेदनशील परीक्षांच्या केंद्रांवर ड्रोनद्वारे देखरेख करण्यात येणार आहे.

तसेच, यंदाच्या परीक्षेत गैरप्रकार घडणाऱ्या केंद्रांची परीक्षा केंद्र मान्यता पुढील वर्षापासून कायमस्वरूपी रद्द करण्यात येणार असल्याचाही इशारा देण्यात आला. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी ही माहिती दिली.

राज्यात आजपासून बारावीची परीक्षा सुरू होत आहे. त्या अनुषगाने मुख्य सचिवांनीही बैठक घेऊन उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यात जिल्हा प्रशासनाकडून परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेल्या केंद्र संचालक, पर्यवेक्षक आणि परीक्षा संबंधित घटकांची फेस रेकग्निशन प्रणालीद्वारे तपासणी, विभागीय मंडळातर्फे अधिकृत ओळखपत्र देणे, परीक्षा केंद्रावर गैरप्रकार घडल्यास गैरप्रकारांना उद्युक्त करणारे, मदत करणारे आणि प्रत्यक्ष गैरप्रकार करणाऱ्यावर दखलपात्र, अजामीनपात्र गुन्हा दाखल करणे, परीक्षा केंद्राच्या ५०० मीटर परिसरात फोटोकॉपी केंद्र बंद ठेवणे, कलम १४४ लागू करणे, परीक्षा केंद्राबाहेर जिल्हा प्रशासनातर्फे चित्रीकरण करणे, परीक्षा केंद्रांवर भरारी पथके आणि बैठी पथके उपलब्ध करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### २७१ भरारी पथके

राज्य मंडळाकडून २७१ भरारी पथके नेमण्यात आली आहेत. प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समिती कार्यरत आहे.

### बारावीच्या विद्यार्थीसंख्येत घट



**पुणे :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेसाठी यंदा १५ लाख ५ हजार ३७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत विद्यार्थ्यांच्या नोंदणीमध्ये घट झाल्याचे दिसून येत आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी परीक्षेबाबतची माहिती सोमवारी झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. राज्य मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी सावरकर या वेळी उपस्थित होत्या. परीक्षेसाठी नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांमध्ये ८ लाख १० हजार ३४८ मुले, ६ लाख ९४ हजार ६५२ मुली, ३७ तृतीयपंथी आहेत. यंदा विज्ञान शाखेतून ७ लाख ६८ हजार ९६७, कला शाखेतून ३ लाख ८० हजार ४१०, वाणिज्य शाखेतून ३ लाख १९ हजार ४३९, व्यावसायिक अभ्यासक्रमातून ३१ हजार ७३५, आयटीआयमधून ४ हजार ४८६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. राज्यभरातील ३ हजार ३७३ मुख्य केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा नोंदणी झालेल्या एकूण विद्यार्थ्यांची संख्या ८ हजारांनी घटली आहे.

11/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# 'नॅक'ची नवी पद्धत पुढील तीन महिन्यांत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) नवी मूल्यांकन पद्धती पुढील तीन महिन्यांत म्हणजेच एप्रिल किंवा मे महिन्यात आणण्यात येणार आहे. नॅक मूल्यांकनासाठी आंध्र प्रदेश राज्यातील एका अभिमत विद्यापीठात गेलेल्या नॅक मूल्यांकन समितीने लाच मागितल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) १० जणांना अटकही केली आहे. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. डॉ. राधाकृष्ण समितीच्या शिफारशींनुसार दुहेरी (बायनरी) मूल्यांकन आणि मॅच्युरिटी आधारित श्रेणी स्तर मूल्यांकन सुरू करण्यासाठीची कार्यपद्धती आणि आराखडा तयार करण्यात येत असल्याचेही 'नॅक'कडून जाहीर करण्यात आले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार नॅकच्या मूल्यांकन प्रक्रियेत काही महत्त्वपूर्ण बदल प्रस्तावित आहेत. यापूर्वी 'नॅक'ने मूल्यांकन प्रक्रियेतील प्रस्तावित बदलांबाबत दिलेल्या माहितीनुसार, आता बायनरी मूल्यांकन आणि मॅच्युरिटी आधारित मूल्यांकन करण्यात येणार आहे. या मूल्यांकनात एक ते पाच स्तर तयार करून उच्च शिक्षण संस्थांना त्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रोत्साहन देण्यावर भर आहे. ही पद्धत डिसेंबर २०२४पासून लागू करण्यात येणार होती. मात्र, डॉ. राधाकृष्णन समितीच्या शिफारशींनुसार, एप्रिल-मे महिन्यांत बायनरी, मॅच्युरिटी आधारित मूल्यांकन प्रक्रिया, त्याचा आराखडा आणि कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी समिती नियुक्त केल्या आहेत, असे नॅकने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

नॅक प्रक्रियेतील अनुसूचित प्रथांना मिळणारा वाव दूर करून प्रक्रिया सुधारण्यासाठी अतिरिक्त उपाययोजना करण्यात येणार असून, नवीन आराखड्याच्या अंमलबजावणीसह प्रगत माहिती तंत्रज्ञान आधारित सुविधांचा वापर करून मूल्यांकनात वस्तुनिष्ठता येण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

आंध्र प्रदेशातील एका अभिमत विद्यापीठात गेलेल्या समितीने लाच मागितल्याचे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणात १० जणांना सीबीआयकडून अटक करण्यात आली. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन 'नॅक'ने परिपत्रक प्रसृत केले आहे. त्यानुसार संबंधित प्रकरणातील विद्यापीठाची मूल्यांकन प्रक्रिया रद्द करून पुढील पाच वर्षांसाठी विद्यापीठाला मूल्यांकनासाठी अर्ज करण्यापासून प्रतिबंध करण्यात आला आहे. संबंधित समितीतील सर्व सात सदस्यांवर तत्काळ प्रभावाने मूल्यांकन किंवा 'नॅक'च्या इतर कोणत्याही कार्यक्रमांसाठी कायमची बंदी घालण्यात आली आहे. त्या सात सदस्यांनी यापूर्वी वर्षभरात केलेल्या भेटींची पुनर्तपासणी करण्यात येणार आहे. त्याबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी कार्यकारी समितीकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**काही महत्त्वाच्या उपाययोजना**

- मूल्यांकन प्रक्रियेच्या दुसऱ्या आणि पुढील टप्प्यात सहभागी होणाऱ्या उच्च शिक्षण संस्थांची सध्याची श्रेणी कायम ठेवणे.
- पहिल्या टप्प्यातील उच्च शिक्षण संस्थांना मूलभूत श्रेणी स्वीकारण्याचा पर्याय देऊन त्यांचे मूल्यांकन शुल्क भविष्यात समायोजित करणे.
- पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील मूल्यांकनाच्या वरील श्रेणीतील विद्यापीठे आणि महाविद्यालयांचे मूल्यांकन मिश्र आणि ऑनलाइन पद्धतीने करण्यात येईल.
- नवी पद्धत अस्तित्वात येईपर्यंत मूल्यांकनासाठी अर्ज केलेल्या, मूल्यांकन प्रलंबित असलेल्या उच्च शिक्षण संस्थांबाबत 'नॅक'ने या उपाययोजना केल्या आहेत.



Maharashtra Times 11.2.2025

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस सीईटीसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**णे : पुढारी वृत्तसेवा**

बीबीए, बीसीए, बीबीएम, ीएमएस, एमबीए (इंटिग्रेटेड), एमसीए इंटिग्रेटेड) या अभ्यासक्रमांसाठी राज्य ामाईक प्रवेश परीक्षा अर्थात सीईटी ेलमार्फत राबविण्यात येणाऱ्या रीक्षेच्या नोंदणी अर्जासाठी मुदतवाढ ण्यात आली आहे. यापूर्वी देण्यात ालेली मुदत १० फेब्रुवारीला संपुष्टात ाल्याने सीईटी सेलकडून आता नव्याने ० मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. यामुळे अद्याप अर्ज नोंदणी करू न ाकलेल्या विद्यार्थ्यांसाठी अर्ज रण्याची संधी मिळणार आहे.

ज्या विद्यार्थ्यांना बीबीए, बीसीए, ीबीएम, बीएमएस, एमबीए (इंटिग्रेटेड), एमसीए (इंटिग्रेटेड) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घ्यायचा आहे, यांना सीईटी प्रवेश परीक्षा देणे ंधनकारक करण्यात आले आहे. यासाठी २५ डिसेंबरपासून अर्ज प्रक्रिया ुरू करण्यात आली आहे. विविध यावसायिक, तंत्रज्ञान आणि उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमांच्या वेशासाठी आवश्यक असलेल्या सामाईक प्रवेश परीक्षांसाठीच्या अर्ज नोंदणीला सुरुवात झाली आहे. यात एमबीए-एमएमएस, एमसीए, बी-एचएमसीटी, एचएमसीटी इंटिग्रेटेड, एम-एचएमसीटी आणि बी-डिझाइन या विषयांच्या सीईटींचा समावेश आहे. या सीईटींसाठी विद्यार्थ्यांना नव्या मुदतीनुसार २० मार्चपर्यंत अर्जनोंदणी करता येणार आहे.

बीबीए, बीसीए, बीबीएम, बीएमएस, एमबीए (इंटिग्रेटेड), एमसीए (इंटिग्रेटेड) या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यासाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांनी दिलेल्या मुदतीत https:/// cetcell. mahacet. org/ या कार्यालयीन संकेतस्थळावर भेट देऊन अर्ज भरून निश्चित करणे आवश्यक आहे. याची सर्व संबंधित उमेदवार व पालकांनी नोंद घ्यावी, असे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे.

- **विद्यार्थ्यांना २० मार्चपर्यंत भरता येणार अर्ज**

Pune Edition
Feb 12, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# कनिष्ठ महाविद्यालयांत ‘बायोमेट्रिक’ उपस्थिती?

## खासगी शिकवण्यांच्या नावाखाली गैरहजर राहण्याला वेसण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : खासगी शिकवणी वर्गांना उपस्थित राहून कनिष्ठ महाविद्यालयांतील नियमित वर्गांकडे पाठ फिरवण्याच्या, तसेच कमी विद्यार्थीसंख्येच्या कनिष्ठ महाविद्यालयांशी साटेलोटे करून शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची ‘परस्पर सोय’ लावण्याच्या प्रकारांना लगाम लावण्यासाठी राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक करण्याची चाचपणी शिक्षण विभाग करत आहे.

### ‘७५ टक्के उपस्थितीचे बंधन’



बायोमेट्रिक प्रणालीद्वारे उपस्थिती नोंदविण्यासाठी फेस रेकग्निशन, बोटांचे ठसे असे पर्याय आहेत. त्यामुळे विद्यार्थी स्वतः वर्गात उपस्थित नसल्यास त्यांची उपस्थिती नोंदवली जाणार नाही. ७५ टक्के उपस्थिती असलेले विद्यार्थीच राज्य मंडळाची परीक्षा देण्यास पात्र ठरतील. या बाबतचा धोरणात्मक निर्णय झाल्यास शिकवणी वर्गांवर नियंत्रण येईल, असे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

मुंबई-पुण्यासह छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, अमरावती, लातूर अशा शहरांमध्ये नीट, जेईई, एमएचटी-सीईटी अशा प्रवेश परीक्षांची तयारी विद्यार्थी अकरावीपासूनच सुरू करतात. त्यासाठी विद्यार्थी खासगी शिकवणी वर्गांमध्ये प्रवेश ***(पान ४ वर)***

12/02/2025 | Pune | Page : 01
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

कनिष्ठ महाविद्यालयांत ‘बायोमेट्रिक’ उपस्थिती?

***(पान १ वरून)*** घेतात. काही शिकवणी वर्गांचे कनिष्ठ महाविद्यालयांशी ‘सामंजस्य’ असल्याने विद्यार्थ्यांची कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थिती परस्पर नोंदवली जाते. विद्यार्थी केवळ प्रात्यक्षिकांसाठी महाविद्यालयात जातात. त्यामुळे महाविद्यालयातील वर्गांकडे पाठ फिरवली जात असल्याचे प्रकार समोर आले आहेत. राज्यातील शाळांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती नोंदवण्याच्या सूचना या पूर्वीच देण्यात आल्या आहेत. त्यानंतर आता कनिष्ठ महाविद्यालयात बायोमेट्रिक उपस्थितीची पद्धत अवलंबण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर, राज्यातील कनिष्ठ महाविद्यालयांत विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद बायोमेट्रिक प्रणालीद्वारे नोंदवण्याचे विचाराधीन आहे.

12/02/2025 | Pune | Page : 04
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द

**दहावी, बारावी परीक्षेसंबंधी फडणवीसांचे आदेश; शिक्षक, कर्मचाऱ्यांवरही होणार बडतर्फीची कारवाई**



**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

दहावी, बारावीच्या परीक्षेत आढळणाऱ्या सामूहिक कॉपी प्रकरणांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गंभीर दखल घेतली आहे. परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडणे ही जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची संयुक्त जबाबदारी राहील, असे सांगतानाच ज्या केंद्रावर कॉपीचे प्रकार उघडकीस येतील त्या केंद्राची मान्यता रद्द करा. तसेच जे शिक्षक आणि कर्मचारी कॉपीसाठी मदत करतील त्यांना थेट बडतर्फ करा, असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडणवीस यांनी मंगळवारी दिले.

पान ८ वर ▸

### संवेदनशील केंद्रांवर ड्रोन भिरभिरणार!

संवेदनशील परीक्षा केंद्रांवर ड्रोन कॅमेऱ्याद्वारे आणि व्हिडीओ कॅमेऱ्यांद्वारे पूर्णवेळ निगराणी करावी, सर्व परीक्षा केंद्रांवर पुरेसा बंदोबस्त, बैठी पथके, ड्रोन आणि व्हिडीओ कॅमेरे कार्यरत असावेत. यावर नजर ठेवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्येक तालुक्याकरिता एक विभाग-प्रमुख, उपजिल्हाधिकारी यांची नियुक्ती करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या.

Pune Edition
Feb 12, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

# सामूहिक कॉपी आढळल्यास केंद्राची मान्यता रद्द

(पान १ वरून... ) दहावी आणि बारावीच्या परीक्षेत चालणाऱ्या सामूहिक कॉपीच्या घटनांबद्दल मंत्रिमंडळ बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. परीक्षा सुरळीत पार पाडण्याबाबत राज्यातील सर्व जिल्हाधिकारी, पोलिस अधिकारी यांच्याशी मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला. कॉपीमुक्त परीक्षेची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर मंत्री उपस्थित होते.

परीक्षा केंद्र परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम १६३ ची कडक अंमलबजावणी करण्यात यावी, परीक्षा केंद्राच्या १०० मीटर परिसरात अनधिकृत व्यक्तींना पूर्णत: प्रतिबंध करण्यात यावा, परीक्षा केंद्रात प्रवेश देताना विद्यार्थी कोणत्याही प्रकारचे कॉपी करण्याचे साहित्य (पुस्तके, नोटस्, मोबाईल इ.) जवळ बाळगण्यास मनाई करावी. भरारी पथकाद्वारे कडक निरीक्षण करण्यात यावे, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या. इंग्रजी, भाषा, गणित व विज्ञान विषयांच्या परीक्षेच्या दिवशी जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी संवेदनशील केंद्रांना स्वत: भेटी द्याव्यात, असे निर्देशही फडणवीस यांनी दिले.

Pune Edition
eb 12, 2025 Page No. 0
owered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# शिक्षण समस्यापूर्तीसाठी हवे

## विद्यावाचस्पती शंकर अभ्यंकर यांचे मत

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

'शिक्षणाने संपूर्ण जगाला आकार दिला पाहिजे, अशी अवस्था आज जगामध्ये निर्माण झालेली आहे. विद्यापीठीय शिक्षणाचा उपयोग काय, त्याचा हेतू काय, त्याचे उद्दिष्ट काय? जगामधल्या ज्या समस्या आहेत त्या विद्यार्थी, संशोधकांना सोडवता आल्या पाहिजेत,' असे मत विद्यावाचस्पती श्री शंकर अभ्यंकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७६व्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात अभ्यंकर बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी, प्र-कुलगुरू पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, सीएमए चारुशीला



गायके, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, विद्या परिषदेचे सदस्य, अधिसभा सदस्य या वेळी उपस्थित होते. अभ्यंकर यांच्या हस्ते जीवनसाधना गौरव, युवा गौरव पुरस्कार, उत्कृष्ट संस्था, उत्कृष्ट प्राचार्य, उत्कृष्ट शिक्षक, उत्कृष्ट ग्रंथपाल, उत्कृष्ट शिक्षकेतर सेवक आदी पुरस्कार प्रदान करण्यात आले.

अभ्यंकर म्हणाले, 'विद्यापीठ शिक्षणाचे सर्वोच्च ध्येय हेच असले पाहिजे. मानवाच्या ठायी अगोदरच जे पूर्णत्व विद्यमान आहे, त्याचे संपूर्ण आविष्करण त्याची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण आहे, असे स्वामी विवेकानंद यांनी सांगितले आहे. त्यामुळे शिक्षणातून मनुष्य घडवणे हेच शिक्षणाचे सर्वोच्च ध्येय असले पाहिजे.'

विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त दर वर्षी विविध क्षेत्रांत समग्र कार्यकाळात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या व्यक्तींना जीवनसाधना गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यंदा ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एकनाथ चिटणीस, शिक्षणतज्ज्ञ डॉ. शां. ब. मुजुमदार, पुरातत्त्व व मूर्तिस्थापत्य संशोधक डॉ. गो. बं. देगलूरकर, ज्येष्ठ साहित्यिक आणि समीक्षक डॉ. तारा भवाळकर, योगाचार्य डॉ. विश्वास मंडलिक, सामाजिक कार्यकर्त्या हेमलता बीडकर, शिक्षणतज्ज्ञ डॉ. शिवाजीराव कदम, शल्यविशारद डॉ. संजय कुलकर्णी, सहकारतज्ज्ञ डॉ. मुकुंद तापकीर आणि उद्योजक आर. एन. शिंदे यांना जीवनसाधना गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

विद्यावाणीचे संचालक श्रीदत्त गायकवाड, श्रीयोगी मांगले यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे यांनी आभार मानले.

Maharashtra Times 12.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# 'यूजीसी केअर' आता होणार बंद

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'यूजीसी केअर' बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. 'यूजीसी केअर'ची सुरुवात २०१८मध्ये झाली होती. संशोधनपत्रिकांची गुणवत्ता राखणे हा प्रमुख उद्देश होता. मात्र, काळाच्या ओघात यामधील त्रुटी उघडकीस आल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. संशोधन प्रसिद्ध करण्यासाठी 'पिअर रिव्ह्यूड' संशोधनपत्रिका निवडण्याचे नवे निकष प्रस्तावित करण्यात आले असून, त्यावर हरकती-सूचना २५ फेब्रुवारीपर्यंत मुदत देण्यात आली आहे.

ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीत तज्ज्ञ समितीच्या शिफारशींबाबत चर्चा करून 'यूजीसी केअर' यादी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी 'पिअर रिव्ह्यूड' संशोधनपत्रिका निवडण्यासाठीचे निकष तज्ज्ञ समितीने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार आता 'पिअर रिव्ह्यूड' संशोधनपत्रिका निवडण्यासाठीचे प्रस्तावित निकष जाहीर केले आहेत.

त्यात संशोधनपत्रिकेचे प्राथमिक निकष, संपादकीय मंडळ, संशोधनपत्रिकेचे संपादकीय धोरण, संशोधनपत्रिकेचा आशय-गुणवत्ता, संशोधनाची तत्त्वे, संशोधनपत्रिकेची परिणामकारकता आदींचा समावेश आहे. याचा वापर करून प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विद्याशाखेनुसार 'पिअर रिव्ह्यूड' संशोधनपत्रिकेची निवड करून संशोधन प्रसिद्ध करावे, उच्च शिक्षणसंस्था त्यांच्या संशोधन आणि शैक्षणिक उद्दिष्टांनुसार प्रस्तावित निकष अधिक नेमके करण्यासाठी संस्थास्तरावर अंतर्गत आढावा समिती स्थापन करू शकतात, असे नमूद करण्यात आले आहे.

Maharashtra Times 12.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# यूजीसीकडून 'यूजीसी केअर' यादी रद्द

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**बोगस संशोधनपत्रिकांना चाप लावण्यासाठी तयार केलेली यूजीसी केअर ही मान्यताप्राप्त संशोधन पत्रिकांची यादी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. संशोधन प्रसिद्ध करण्यासाठी पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिका निवडण्याचे नवे निकष प्रस्तावित करण्यात आले असून त्यावर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी २५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. यूजीसीने याबाबतची नोटीस संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे.**

## 'पिअर रिव्ह्यूड' संशोधनपत्रिका निवडण्याचे नवे निकष प्रस्तावित

## हरकती-सूचना नोंदवण्यासाठी २५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत

ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीत तज्ज्ञ समितीच्या शिफारशींबाबत चर्चा करून यूजीसी केअर यादी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिका निवडण्यासाठीचे निकष तज्ज्ञ समितीने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार आता पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिका निवडण्यासाठीचे प्रस्तावित निकष जाहीर केले आहेत. त्यात संशोधनपत्रिकेचे प्राथमिक निकष, संपादकीय मंडळ, संशोधनपत्रिकेचे संपादकीय धोरण, संशोधनपत्रिकेचा आशय-गुणवत्ता, संशोधनाची तत्त्वे, संशोधनपत्रिकेची परिणामकारकता आदींचा समावेश आहे. या निकषांचा वापर करून प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विद्याशाखेनुसार पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिकेची निवड करून संशोधन प्रसिद्ध करावे, उच्च शिक्षण संस्था त्यांच्या संशोधन आणि शैक्षणिक उद्दिष्टांनुसार प्रस्तावित निकष अधिक नेमके करण्यासाठी संस्थास्तरावर अंतर्गत आढावा समिती स्थापन करू शकतात, असे नमूद केले आहे.

संशोधन प्रकाशनांची गुणवत्ता राखण्यासाठी २०१८ मध्ये यूजीसी केअर यादी सुरू करण्यात आली. परंतु कालांतराने, या यादीत अनेक त्रुटी आढळल्या. यादीत जर्नल्स जोडण्यात आणि यादीतून काढून टाकण्यात विलंब, पारदर्शकतेचा अभाव, निकृष्ट दर्जाच्या जर्नल्सचा समावेश, भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या संशोधनपत्रांवर नकारात्मक परिणाम या समस्यांमुळे आता संशोधन प्रकाशनांचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी संस्थांवर सोपवण्याची तयारी सुरू झाली आहे.

यासंदर्भात यूजीसीचे अध्यक्ष जगदीश कुमार म्हणाले, केअर यादी रद्द करण्याचा उद्देश शैक्षणिक स्वातंत्र्याला प्रोत्साहन देणे आहे. आता संशोधकांना त्यांच्या विषयाच्या जर्नल्समध्ये कोणत्याही केंद्रीय यादीच्या निर्बंधांशिवाय संशोधन प्रकाशित करण्याचे स्वातंत्र्य असेल. आता उच्च शिक्षण संस्थांना स्वतः उच्च संशोधन मानके सुनिश्चित करावी लागतील आणि निकृष्ट दर्जाच्या जर्नल्सचा प्रसार रोखण्याची जबाबदारी घ्यावी लागणार आहे.

Pune Edition
Feb 13, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक सिस्टीम बसवण्याची पडताळणी सुरू

## माध्यमिक संचालनालयाने शिक्षण विभागाला पाठवला अहवाल

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात जेईई, नीट यांसारख्या प्रवेश परीक्षांच्या क्लासेसचे पेव कमी करण्यासोबत एकात्मिक कनिष्ठ महाविद्यालयांची पद्धत बंद व्हावी, यासाठी शालेय शिक्षण विभागाने कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक सिस्टीम बसवण्याची पडताळणी सुरू केली आहे. याबाबत माध्यमिक शिक्षण संचालनालयाने शिक्षण विभागाकडे अहवाल पाठविला असून, त्यावर आता शिक्षण विभागाकडून निर्णय घेण्यात येणार आहे.

राज्यात पुणे, मुंबई (महानगर क्षेत्र), छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, अमरावती अशा महानगरांमध्ये गेल्या दहा वर्षांत नीट, जेईई, एमएचटी सीईटी अशा प्रवेश परीक्षांच्या क्लासेसमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. विद्यार्थी त्यांचे संपूर्ण शिक्षण क्लासेसमध्ये घेत असून, केवळ नावापुरते



महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेत आहेत. यासाठी कोचिंग क्लासेस आणि महाविद्यालयांमध्ये आर्थिकदृष्ट्या समन्वय असतो. अकरावीला प्रवेश घेतानाच विद्यार्थी किंवा संबंधित क्लासेसच्या प्रशासनाकडून महाविद्यालयांसोबत तशी बोलणी केली जाते. त्यानुसार अकरावीला प्रवेश घेणारे विद्यार्थी केवळ प्रात्यक्षिकांसाठी महाविद्यालयांमध्ये येतील आणि त्यांची संपूर्ण दिवसांची हजेरी लावण्यात येईल, असे ठरविण्यात येते. त्यामुळे विद्यार्थी अकरावी आणि बारावी अशा दोन्ही शैक्षणिक वर्षांत क्लासेसमध्ये शिक्षण घेतात.

या धोकादायक प्रकारामुळे महाविद्यालये ओस पडत आहेत. राज्यातील अनेक महाविद्यालये केवळ नावापुरते सुरू असून, त्यामध्ये अध्यापनाची प्रक्रिया होत नसल्याचे चित्र आहे. यावर उपाय म्हणून बायोमेट्रिक हजेरी अनिवार्य करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये आल्यावर आणि महाविद्यालये संपल्यानंतर बायोमेट्रिक हजेरी लावावी लागेल. या हजेरीनुसार ७५ टक्के उपस्थिती पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच बारावीची परीक्षा देता येणार आहे. या माध्यमातून विद्यार्थी महाविद्यालयांमध्ये येतील आणि अध्यापनाची प्रक्रिया पूर्ण होऊन, कोचिंग क्लासेसवर नियंत्रण येईल, असे शालेय शिक्षण विभागाचे म्हणणे आहे. याबाबतचा अहवाल माध्यमिक शिक्षण संचालनालयाकडून तयार करण्यात आला असून, तो पुढील कार्यवाहीसाठी शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आला आहे.

Pune Edition
Feb 13, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# परीक्षा मंडळाच्या प्रभारी संचालकपदी देसाई

- **डॉ. महेश काकडे यांचा कार्यकाळ संपल्याने नियुक्ती**
- **पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंनी सोपवली जबाबदारी**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांचा कार्यकाल संपुष्टात आल्यानंतर परीक्षा विभागाच्या प्रभारी पदाची जबाबदारी कोणाकडे देणार, याबाबत तर्क-वितर्क लढविले जात होते. अखेर बुधवारी (दि.१२) दुपारी परीक्षा व मूल्यमापन विभागाची धुरा अंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता व मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रभाकर देसाई यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी डॉ. देसाई यांच्याकडे परीक्षा विभागाच्या प्रभारी संचालकपदाची जबाबदारी सोपवली आहे. डॉ. देसाई यांनी पदभार स्वीकारला. या वेळी विद्यापीठाच्या प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. नितीन घोरपडे, आयक्यूएसी सेंटरचे संचालक डॉ. विनायक जोशी यांच्यासह परीक्षा विभागाचे सर्व उपकुलसचिव व इतर अधिकारी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांमध्ये सुमारे साडेसात लाख विद्यार्थी शिक्षण घेतात. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा आयोजित करणे, उत्तरपत्रिका तपासणी व वेळेत निकाल जाहीर करणे, ही तारेवरची कसरत आहे. त्यातच गुरुवारी परीक्षा विभागातील प्रलंबित प्रश्नांसह इतर काही प्रश्नांसाठी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेने महाआक्रोश मोर्चाचे आयोजन केले आहे. या मोर्चाला दुसऱ्या दिवशीच डॉ. देसाई यांना सामोरे जावे लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.



**परीक्षा व मूल्यमापन मंडळाचा पदभार स्वीकारताना आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता व मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रभाकर देसाई. या वेळी उपस्थित अन्य मान्यवर.**

Pune Edition
Feb 13, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
City 13 Feb 2025_005
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे 13 Feb 2025
www.dainikprabhat.com

# विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक हजेरी होणार बंधनकारक

## कनिष्ठ महाविद्यालयांसाठी निर्णय

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२ -** राज्यातील कनिष्ठ महाविद्यालये ओस पडत असून, खासगी क्लास मात्र विद्यार्थ्यांच्या गर्दीने फुल्ल भरलेले असतात. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये वाढ व्हावी यासाठी विद्यार्थ्यांची बायोमेट्रिक उपस्थिती बंधनकारक करण्यात येणार आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाकडून हालचालीही सुरु झाल्या आहेत.

राज्यात पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, अमरावती, लातूर अशा शहरांमध्ये जेईई, नीट, एमएचटी-सीईटी अशा प्रवेश परीक्षांची तयारी विद्यार्थी अकरावीपासूनच सुरू करतात. त्यासाठी विद्यार्थी खासगी क्लासमध्ये प्रवेश घेतात. विद्यार्थी पारपांरिक अभ्यासक्रमाएवजी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अधिक प्रयत्नात असतात. त्यासाठी त्यांना विविध प्रवेश परीक्षाही द्याव्या लागतात. त्यासाठी विद्यार्थ्यांचा खासगी क्लासकडे ओढा अधिक असल्याचे आढळुन येते.

खासगी क्लासचे कनिष्ठ महाविद्यालयांशी टायअप असल्याने विद्यार्थ्यांची कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थिती परस्पर नोंदवली जाते. विद्यार्थी केवळ प्रात्यक्षिकांसाठी महाविद्यालयात जातात. महाविद्यालयातील वर्गांकडे विद्यार्थी सतत गैरहजर राहतात. आता कनिष्ठ महाविद्यालयांत बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थितीची पद्धत अवलंबण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. राज्यातील शाळांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती नोंदवण्याच्या सूचना या पूर्वीच देण्यात आल्या आहेत. मात्र कोठेही त्याची काटोकोर अंमलबजावणी फारशी होताना आढळत नाही. आता पुन्हा बायोमेट्रिक हजेरीचा विषय चर्चेत आला आहे.

बायोमेट्रिक प्रणालीत फेस रेकग्निशन, बोटांचे ठसे आवश्यक असल्याने विद्यार्थी स्वतः वर्गात उपस्थित नसल्यास त्यांची उपस्थिती नोंदवली जाणार नाही. विद्यार्थ्यांची ७५ टक्के उपस्थिती नोंदविली गेल्यासच तो राज्य मंडळाची परीक्षा देण्यास पात्र ठरेल. याबाबतचा धोरणात्मक निर्णय झाल्यास खासगी क्लासवर आपोआप नियंत्रण येणार आहे.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 13 Feb 2025_005
13 Feb 2025

### युजीसी केअर जर्नल्स बंद | अनेक त्रुटी अढळल्याने युजीसीचा निर्णय

**▪ नवीन निकषासाठी सूचना मागविल्या ▪ सूचना दाखल करण्यासाठी २५ फेब्रुवारीपर्यंत मुदत**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १२** - विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) बोगस संशोधनपत्रिकांना लगाम लावण्यासाठी तयार केलेली १यूजीसी केअर ही मान्यताप्राप्त संशोधनपत्रिकांची यादी रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. संशोधन प्रसिद्ध करण्यासाठी पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिका निवडण्याचे नवे निकष प्रस्तावित करण्यात आले असून, त्यावर हरकती-सूचना दाखल करण्यासाठी २५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे.

संशोधन प्रकाशनांची गुणवत्ता राखण्यासाठी यूजीसीने २०१८ मध्ये यूजीसी कन्सॉर्टियम फॉर केडमिक अँड रीसर्च एथिक्सची अर्थात यूजीसी केअरची स्थापना केली. यात मान्यताप्राप्त संशोधनपत्रिकांचा समावेश करण्यात आला होता. या यादीतील संशोधनपत्रिकेत प्रसिद्ध झालेले संशोधन मान्यताप्राप्त धरले जाईल, असे जाहीर केले होते. यूजीसी केअर यादीमुळे बोगस संशोधनपत्रिकांना चाप बसला होता. या यादीत अनेक त्रुटी आढळल्या. यादीत जर्नल्स जोडण्यात आणि यादीतून काढून टाकण्यात विलंब, पारदर्शकतेचा अभाव, निकृष्ट दर्जाच्या जर्नल्सचा समावेश, भारतीय भाषांमध्ये प्रकाशित होणाऱ्या संशोधन पत्रांवर नकारात्मक परिणाम या समस्यांमुळे आता संशोधन प्रकाशनांचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी संस्थांवर सोपवण्याची तयारी सुरू झाली आहे.

ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीत तज्ज्ञ समितीच्या शिफारशींबाबत चर्चा करून यूजीसी केअर यादी रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिका निवडण्यासाठीचे निकष तज्ज्ञ समितीने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार आता पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिका निवडण्यासाठीचे प्रस्तावित निकष जाहीर केले आहेत. त्यात संशोधनपत्रिकेचे प्राथमिक निकष, संपादकीय मंडळ, संशोधनपत्रिकेचे संपादकीय धोरण, संशोधनपत्रिकेचा आशय-गुणवत्ता, संशोधनाची तत्त्वे, संशोधनपत्रिकेची परिणामकारकता आदींचा समावेश आहे. या निकषांचा वापर करून प्राध्यापक, विद्यार्थ्यांनी त्यांच्या विद्याशाखेनुसार पिअर रिव्ह्यूड संशोधनपत्रिकेची निवड करून संशोधन प्रसिद्ध करावे, असे अपेक्षित आहे. उच्च शिक्षण संस्था त्यांच्या संशोधन आणि शैक्षणिक उद्दिष्टांनुसार प्रस्तावित निकष अधिक नेमके करण्यासाठी संस्थास्तरावर अंतर्गत आढावा समिती स्थापन करू शकणार आहेत.

---

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### नवे 'नॅक' मूल्यांकन एप्रिल-मेमध्ये?

**डॉ. राधाकृष्ण समितीच्या शिफारशींनुसार आराखडा**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) नवी मूल्यांकन पद्धती एप्रिल-मेमध्ये अस्तित्वात येण्याची शक्यता आहे. डॉ. राधाकृष्ण समितीच्या शिफारशींनुसार दुहेरी (बायनरी) मूल्यांकन आणि मॅच्युरिटी आधारित श्रेणी स्तर मूल्यांकन सुरू करण्यासाठीची कार्यपद्धती व आराखडा तयार करण्यात येत असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.

काही दिवसांपूर्वी नॅक मूल्यांकनासाठी आंध्र प्रदेशातील एका अभिमत विद्यापीठात गेलेल्या समितीचे लाचखोरीचे प्रकरण उघडकीस आले. या प्रकरणात दहा जणांना सीबीआयकडून अटक करण्यात आली आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत नॅकने या बाबतचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार, संबंधित प्रकरणातील विद्यापीठाची मूल्यांकन प्रक्रिया रद्द करून पुढील पाच वर्षांसाठी मूल्यांकनासाठी अर्ज करण्यापासून प्रतिरोध करण्यात आले आहे. संबंधित समितीतील सर्व सात सदस्यांवर तत्काळ प्रभावाने मूल्यांकन किंवा नॅकच्या इतर कोणत्याही कार्यक्रमांसाठी तहहयात बंदी घालण्यात आली आहे. तसेच त्या सात सदस्यांनी या पूर्वी वर्षभरात केलेल्या भेटींची पुनर्तपासणी करण्यात येणार आहे. त्याबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी कार्यकारी समितीकडे प्रस्ताव सादर करणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

**गुणवत्ता वाढीसाठी प्रोत्साहन**

नव्या मूल्यांकन प्रक्रियेमध्ये एक ते पाच स्तर तयार करून उच्च शिक्षण संस्थांना त्यांची गुणवत्ता वाढवण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येणार आहे. ही पद्धत डिसेंबर २०२४ पासून लागू करण्यात येणार होती. आता नॅकने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार, डॉ. राधाकृष्णन समितीच्या शिफारशींनुसार, एप्रिल-मेमध्ये दुहेरी, मॅच्युरिटी आधारित मूल्यांकन प्रक्रिया, त्याचा आराखडा आणि कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी समिती नियुक्त केल्या आहेत, असे नमूद करण्यात आले आहे.

**६५० संस्था प्रतीक्षेत**

नागपूर : सध्या ६५० शैक्षणिक संस्थांनी मूल्यांकनासाठी 'नॅक'कडे अर्ज केले आहेत. त्यामुळे तूर्तास आभासी पद्धतीने मूल्यांकन करण्यात येणार आहे. सध्या मूल्यांकनासाठी ६५० महाविद्यालयांनी अर्ज केले आहेत. यातील ५० टक्के महाविद्यालये ही दुसऱ्यांदा मूल्यांकनासाठी सामोरे जात आहेत. लाचखोर प्रकरणामुळे महाविद्यालयांचे मूल्यांकन रोखणे संयुक्तिक नसल्याने तूर्तास अशा महाविद्यालयांचे आभासी पद्धतीने मूल्यांकन केले जाणार आहे.

13/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### संशोधनपत्रिकांच्या छाननीत अडथळा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** बोगस संशोधनपत्रिकांना चाप लावण्यासाठी तयार केलेली 'यूजीसी केअर' ही मान्यताप्राप्त संशोधनपत्रिकांची यादी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. संशोधन प्रसिद्ध करण्यासाठी 'पिअर रिव्ह्यूड' संशोधनपत्रिका निवडण्याचे नवे निकष प्रस्तावित करण्यात आले असून, त्यावर हरकती-सूचना नोंदवण्यासाठी २५ फेब्रुवारीपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. मात्र, या निर्णयामुळे देशभरात पुन्हा बोगस संशोधनपत्रिकांचे पेव फुटण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

यूजीसीने या बाबतची नोटीस संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. देशातील संशोधनपत्रिकांबाबत डॉ. भूषण पटवर्धन यांच्या नेतृत्वाखालील संशोधकांच्या चमूने पाहणी केली होती. त्यातून बोगस संशोधनपत्रिकांची पोलखोल करण्यात आली होती. त्यामुळे बोगस संशोधनपत्रिकांचा मुद्दा देशभर गाजला होता. याची दखल घेऊन यूजीसीने २०१८ मध्ये यूजीसी कन्सॉर्टियम फॉर अॅकेडमिक अँड रीसर्च एथिक्सची अर्थात यूजीसी केअरची स्थापना केली. आता यूजीसी केअर रद्द केल्यामुळे बोगस संशोधनपत्रिकांचे पेव पुन्हा फुटू शकते. त्यामुळे यूजीसीचा निर्णय देशातील उच्च शिक्षण आणि संशोधनाला मागे नेणारा आहे, अशी टीका यूजीसीचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी केली.

#### 'यूजीसी केअर' यादी रद्द

#### संशोधनपत्रिकांचे नवे निकष प्रस्तावित

'पिअर रिव्ह्यूड' संशोधनपत्रिका निवडण्यासाठीचे प्रस्तावित निकष जाहीर केले आहेत. त्यात संशोधनपत्रिकेचे प्राथमिक निकष, संपादकीय मंडळ, संपादकीय धोरण, आशय-गुणवत्ता, संशोधनाची तत्त्वे आदींचा समावेश आहे. या निकषांचा वापर करून विद्याशाखेनुसार संशोधनपत्रिकेची निवड करून संशोधन प्रसिद्ध करावे, उच्च शिक्षण संस्था त्यांच्या संशोधन आणि शैक्षणिक उद्दिष्टांनुसार प्रस्तावित निकष नेमके करण्यासाठी संस्थास्तरावर अंतर्गत आढावा समिती स्थापन करू शकतात, असे नमूद केले आहे.

13/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### 'जीवनसाधना गौरव'ऐवजी विद्यापीठाने डी. लिट. देण्याची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे जीवनसाधना गौरव पुरस्कार घाऊक प्रमाणात दिले जात आहेत. त्यामुळे हे पुरस्कार बंद करून पूर्वीची डी.लिट. पदवी देण्याची पद्धत पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रांत योगदान दिलेल्या व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यात येतात. त्यानुसार यंदा दहा मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. गेल्या वर्षीही दहा मान्यवरांना गौरवण्यात आले होते. या पार्श्वभूमीवर माजी अधिसभा सदस्य प्रा. धनंजय कुलकर्णी यांनी घाऊक प्रमाणात दिले जाणारे जीवनसाधना गौरव पुरस्कार देणे थांबवून डी.लिट. पदवी देण्याची पद्धत पुन्हा सुरू करण्याची मागणी विद्यापीठाच्या कुलगुरूंकडे केली आहे.

विद्यापीठाकडून डी.लिट. पदवी देण्याची पद्धती १९९९ पर्यंत अस्तित्वात होती. मात्र, काही वादविवाद झाल्यामुळे ही पदवी देण्याची पद्धत बंद करून जीवनसाधना गौरव पुरस्कार सुरू करण्यात आले. त्यानुसार गेली २५ वर्षे हे पुरस्कार देण्यात येतात. विद्यापीठ कायद्यानुसार व्यवस्थापन परिषद, अधिसभा, कुलपतींची मान्यता घेऊनच डी.लिट. पदवी दिली जात होती.

जीवनसाधना गौरव पुरस्कार देण्यासाठी व्यवस्थापन परिषदेत निश्चित पद्धतीपेक्षा विविध नावांचा आग्रह धरला जातो. ही बाब योग्य नाही. त्यामुळे समाजातील कर्तृत्ववान व्यक्तीच्या कार्याचा गौरव करण्यासाठी डी.लिट. पदवी देण्याची कायदामान्य पद्धत पुन्हा सुरू करावी. त्यामुळे पुरस्कारांची गुणवत्ता टिकून वाढलेली संख्या कमी होईल, असे प्रा. कुलकर्णी यांनी सांगितले. या बाबतची मागणी विचारात घेतली जाईल, असे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी स्पष्ट केले.

> समाजातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी डी.लिट. पदवी दिली जाते. त्यासाठी काहीएक शैक्षणिक पात्रता असण्याचे बंधन नाही. ज्या व्यक्तींचे कार्य मोठे आहे आणि उच्च शिक्षणाची संधी मिळाली नाही, त्यांच्या कार्याच्या सन्मानार्थ हा बहुमान देणे योग्य ठरते. त्यातून विद्यापीठाचा समाजाशी असलेला संबंध अधिक दृढ होतो. विद्यापीठाने डी.लिट. देण्याची पद्धत बंद केलेली असली, तरी ती पुन्हा सुरू करता येऊ शकते. - **डॉ. भूषण पटवर्धन, ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ**

13/02/2025 | Pune | Page : 03
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'जेएनयू'त कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्र

## १० कोटींचा निधी, मंत्री उदय सामंत यांची घोषणा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**नवी दिल्ली :** जवाहरलाल नेहरू विद्यापीठात (जेएनयू) ज्येष्ठ कवी-साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या नावाने मराठी अध्यासन केंद्र सुरू केले जाणार असून त्यासाठी १० कोटींचा निधी दिला जाईल, अशी घोषणा मराठी भाषा व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत केली.

'जेएनयू'मधील छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्राची प्रक्रियाही मराठी भाषा गौरव दिनी म्हणजेच २७ फेब्रुवारी रोजी सुरू करण्यात येईल, अशी माहितीही सामंत यांनी दिली. 'जेएनयू'मध्ये मराठी अध्यासन केंद्र सुरू करण्याचा निर्णय २००५ मध्ये राज्य सरकारने घेतला होता. जेएनयूच्या विनंतीनुसार १० कोटी निधी उपलब्ध करून दिला जाणार असल्याचे सामंत यांनी सांगितले.

राज्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी वा संशोधनासाठी दिल्लीत वास्तव्य करतात. त्यांच्यासाठी हॉस्टेलची सुविधा उपलब्ध करून देण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असेल. दिल्लीतील मराठी शाळांना निधी पुरवण्याचा निर्णयही घेतला आहे, असे सामंत म्हणाले. 'जेएनयू'ने विद्यापाठाच्या आवारात जागा दिली तर छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा उभा केला जाईल. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेच्या विकास व संवर्धनासाठी केंद्र सरकारकडून निधी पुरवला जातो. त्यातील काही निधी 'जेएनयू'मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने भवन उभारण्यासाठी वापरला जाईल. दोन्ही अध्यासन केंद्रांसाठी आवश्यक ग्रंथालय इथे सुरू होऊ शकते, असे सामंत म्हणाले. साहित्य संमेलनासाठी देण्यात येणाऱ्या निधीमध्ये वाढ करण्याचाही विचार असल्याचे सामंत यांनी सांगितले.

तालकटोरा स्टेडियमला भेट देऊन सामंत यांनी तयारीची पाहणी केली. संमेलनाच्या मुख्य प्रवेशद्वाराला लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे नाव दिले जाईल. अतिविशिष्टप्रवेशद्वार थोरले बाजीराव पेशवे नावाने ओळखले जाईल, अशी माहिती सरहद संस्थेचे अध्यक्ष संजय नहार यांनी दिली.

## साहित्य संमेलनात वाढीव निधीच्या घोषणेची शक्यता

'जेएनयू'तील मराठी अध्यासनाला मोदींची उपस्थिती पावणार!

कुसुमाग्रजांचे नाव प्रस्तावित

**जेएनयूमध्ये मराठी भाषेच्या अध्यासन केंद्राचा विषय निधीअभावी १८ वर्षांपासून प्रलंबित असल्याचे वृत्त लोकसत्ताने ४ फेब्रुवारीच्या अंकात प्रसिद्ध केले होते.**

13/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# केंद्र सरकारच्या 'स्वयम' पोर्टलकडे विद्यार्थ्यांची पाठ

## नोंदणीपैकी चार टक्के विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण

**वृत्तसंस्था, नवी दिल्ली**

केंद्र सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाने २०१७पासून सुरू केलेल्या स्वयम पोर्टलवर नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी केवळ चार टक्क्यांपेक्षा कमी विद्यार्थी हा अभ्यासक्रम पूर्ण करत असल्याची माहिती संसदीय समितीने दिली आहे. या पोर्टलबाबत कालबाह्य अभ्यासक्रम, अध्यापनात लवचिकतेचा अभाव आणि निकृष्ट पायाभूत सुविधा या तक्रारी असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

राज्यसभा खासदार दिग्विजय सिंह यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने ही निरीक्षणे नोंदविली आहेत. समितीने म्हटले आहे, की जोपर्यंत केंद्रीय शिक्षण मंत्रालय नोकरी मिळवून देण्याबाबत (प्लेसमेंट) तरुणांना सक्रियपणे मदत करत नाही किंवा भरती करणाऱ्यांना विद्यार्थ्यांशी जोडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करत नाही, तोपर्यंत शिक्षणातील डिजिटल उपक्रमांना मिळणारा प्रतिसाद अल्प असेल.

शिक्षण, महिला, मुले, तरुणाई आणि क्रीडा या विषयांवरील या समितीने राज्यसभेत मंगळवारी आपला अहवाल सादर केला. शैक्षणिक दर्जाचा आढावा, ॲक्रेडिटेशन प्रक्रिया, संशोधन, परीक्षेतील सुधारणा; तसेच खासगी, अभिमत आणि उच्च शिक्षण संस्थांमधील शैक्षणिक वातावरण या विषयाबाबत हा अहवाल आहे.

### समितीच्या शिफारशी

'स्वयम'वर नोंदणी केलेले विद्यार्थी अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत की नाही, याकडे संबंधित खात्याने लक्ष देण्याची गरज आहे. समाजातील वंचित वर्गातील अधिकाधिक विद्यार्थ्यांची नोंदणी करून त्यांचा सहभाग वाढवावा आणि त्यांच्या प्रगतीकडे लक्ष दिले जावे, असेही समितीने म्हटले आहे.

(चित्र : एआय)



### 'स्वयम' पोर्टल काय आहे?

स्वयम पोर्टलवर इयत्ता नववीच्या वर्गापासून ते पदवीपर्यंतचे विविध अभ्यासक्रम ऑनलाइन माध्यमातून कोणीही कुठेही विनामूल्य शिकू शकते. या माध्यमातून तब्बल दोन हजार १०० हून अधिक अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. काही कारणांमुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्यांना उत्कृष्ट शिक्षणाची संधी देणे, समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षण पोहोचवणे हा या पोर्टलमागचा उद्देश आहे.

'राष्ट्रीय डिजिटल युनिव्हर्सिटी (एनडीयू) सर्वसमावेशक, लवचिक, परवडणारे; तसेच राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असे शिक्षण देण्याचे उद्दिष्ट ठेवते. मात्र, 'स्वयम'च्या समोर मोठी आव्हाने आहेत. २०१७पासून स्वयमवर नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ चार टक्के विद्यार्थ्यांनीच अभ्यासक्रम पूर्ण केले आहेत,' असे समितीच्या अहवालात म्हटले आहे.

'या पोर्टलबाबत ज्या तक्रारी आहेत, त्यामध्ये कालबाह्य आशय, अध्यापनातील लवचिकतेचा अभाव आणि निकृष्ट पायाभूत सुविधा हे मुद्दे आहेत. शिक्षकांनीही अपुरे प्रशिक्षण, कमी मोबदला आणि तांत्रिक अडचणी सांगितल्या आहेत. शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे १:१५ हे प्रमाण ऑनलाइन मॉडेलसाठी उपयुक्त नसून, त्यामुळे व्हर्च्युअस क्लासरूममध्ये गर्दी होते,' असे समितीने म्हटले आहे.

'ऑक्सफाम इंडिया २०२२च्या अहवालानुसार, अनुसूचित जाती-जमाती प्रवर्गातील केवळ चार टक्के विद्यार्थ्यांकडे आणि इतर मागास प्रवर्गातील केवळ सात टक्के विद्यार्थ्यांकडे इंटरनेट सुविधा असलेले संगणक आहेत. त्यामुळे 'एनडीयू'च्या समानतेच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उभे राहते,' असेही संसदीय समितीने म्हटले आहे.

Maharashtra Times 13.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

### डॉ. देसाई यांनी कार्यभार स्वीकारला

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या प्रभारी संचालकपदी आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता व मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. प्रभाकर देसाई यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. महेश काकडे यांचा कार्यकाळ सोमवारी पूर्ण झाला. त्यानंतर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी प्रभारी संचालकपदाची धुरा डॉ. देसाई यांच्याकडे सोपवली. डॉ. देसाई यांनी बुधवारी पदाचा पदभार स्वीकारला आहे. या वेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकारे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, 'आयक्यूएसी सेंटर'चे संचालक डॉ. विनायक जोशी यांच्यासह परीक्षा विभागाचे उपकुलसचिव व इतर अधिकारी उपस्थित होते.

Maharashtra Times 13.2.2025

### विद्यापीठात आणखी एका पदाचा भार 'प्रभारी'वर

#### परीक्षा विभागाची जबाबदारी डॉ. प्रभाकर देसाई यांच्याकडे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अतिरिक्त कार्यभाराने चालवल्या जाणाऱ्या पदांमध्ये आणखी एका पदाची भर पडली आहे. परीक्षा व मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे यांचा कार्यकाळ संपल्याने या पदाची जबाबदारी आता डॉ. प्रभाकर देसाई यांच्याकडे देण्यात आली आहे. राज्यपालांनी विद्यापीठांतील पदभरतीला दिलेली स्थगिती उठल्यानंतरच आता विद्यापीठातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया पुन्हा सुरू होणार आहे.

विद्यापीठातील प्राध्यापकांच्या पदांसह महत्त्वाची पदे रिक्त आहेत. त्यात चार विद्याशाखांचे अधिष्ठाता, कुलसचिव यांचा समावेश आहे. या पदांचे कामकाज अतिरिक्त कार्यभाराने चालवण्यात येत आहे. डॉ. महेश काकडे यांचा परीक्षा संचालक पदाचा कार्यकाळ १० फेब्रुवारी रोजी संपुष्टात आला. राज्यपालांनी विद्यापीठांतील रिक्त पदांवर भरती प्रक्रिया राबवण्यास स्थगिती दिली असल्याने या पदांसाठीची भरती प्रक्रिया ठप्प आहे. त्यात आता परीक्षा विभागाचेही पद रिक्त झाले आहे. परीक्षा विभाग संचालक पदाचा अतिरिक्त कार्यभार मराठी विभागातील प्राध्यापक डॉ. प्रभाकर देसाई यांच्याकडे सोपवण्यात आला आहे.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार परीक्षा पद्धतींमध्ये सुधारणांचे काम सुरू करण्यात आले होते. हे काम या कार्यकाळात पूर्ण करण्यावर भर देण्यात येईल,' असे डॉ. देसाई यांनी सांगितले. आता राज्यपालांनी पदभरतीला दिलेली स्थगिती कधी उठणार, विद्यापीठातील प्राध्यापक भरतीसह अन्य पदांची ठप्प असलेली प्रक्रिया कधी सुरू होणार, याकडे लक्ष लागले आहे.

Loksatta 13.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# प्राचार्यांना ई-ऑफिसचा लॉगिन आयडी

## गैरव्यवहार, दफ्तर दिरंगाई टाळण्याकरिता निर्णय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** उच्च व तंत्रशिक्षण विभागातील गैरव्यवहार, दफ्तर दिरंगाई थांबविण्यासाठी थेट प्राचार्यांनाच ई-ऑफिसचा लॉगिन आयडी देण्यात येणार आहे. त्यामुळे विभागाची मंत्रालयापासून महाविद्यालयांपर्यंतची सर्व कामे, योजना, शिष्यवृत्तींच्या प्रस्तावांसह विविध कागदपत्रांची नोंद आणि कार्यवाही ई-ऑफिसच्या माध्यमातूनच होणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागातून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सरकार स्थापन होण्यापूर्वी निवृत्तिवेतनाचे सुमारे ६,५०० प्रस्ताव पडून होते. ते सर्व प्रस्ताव मार्गी लावण्यात आले आहेत. पण, हे प्रस्ताव मार्गी लावताना काही प्रस्तावांमधील कागदपत्रे गहाळ करणे, तसेच प्रस्ताव अडकवून ठेवल्याचे दिसून आले.काही प्रस्तावांची नोंद न केल्यामुळे प्रस्ताव कोणत्या टप्प्यावर अडकून पडला आहे, हेच समजत नव्हते. त्यामुळे गैरव्यवहाराला आळा घालणे, दफ्तर दिरंगाई टाळणे आणि कामांचा निश्चित वेळेत निपटारा करण्यासाठी विभागाचे कामकाज ई-ऑफिसच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्याची अंमलबजावणी लवकरच सुरू होणार आहे.

### महाविद्यालये, प्राध्यापक, विद्यार्थ्यांच्या माहितीचे संकलन

राज्यातील सरकारी, खासगी महाविद्यालयातील प्राध्यापकांची माहिती, विद्यार्थ्यांची माहिती, विद्यार्थ्याने प्रवेश कधी घेतला, त्याची शैक्षणिक स्थिती काय आहे. तो विद्यार्थी शिक्षण घेऊन पुढे कुठे गेला, याची माहितीही शंभर दिवसांच्या कार्यक्रमाअंतर्गत संकलित केली जाणार आहे.

### प्रत्येक जिल्ह्यात अभियांत्रिकी महाविद्यालय

ज्या जिल्ह्यांत अभियांत्रिकी महाविद्यालय नाही. त्या ठिकाणी असलेल्या असे महाविद्यालय सुरू करण्याबाबत सरकार विचार करीत आहे. त्यामुळे पुणे, मुंबईत येणारा विद्यार्थ्यांचा लोंढा स्थानिक पातळीवर थांबेल. अतिरिक्त खर्चाचा भारही पडणार नाही, असा विचारही सुरू आहे.

14/02/2025 | Mumbai(Pune) | Page : 2
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# प्राचार्यांना ई-ऑफिसचा लॉगिन आयडी

## गैरव्यवहार, दफ्तर दिरंगाई टाळण्याकरिता निर्णय

**मुंबई :** उच्च व तंत्रशिक्षण विभागातील गैरव्यवहार, दफ्तर दिरंगाई थांबविण्यासाठी थेट प्राचार्यांनाच ई-ऑफिसचा लॉगिन आयडी देण्यात येणार आहे. त्यामुळे विभागाची मंत्रालयापासून महाविद्यालयांपर्यंतची सर्व कामे, योजना, शिष्यवृत्तींच्या प्रस्तावांसह विविध कागदपत्रांची नोंद आणि कार्यवाही ई-ऑफिसच्या माध्यमातूनच होणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभागातून देण्यात आलेल्या माहितीनुसार, सरकार स्थापन होण्यापूर्वी निवृत्तिवेतनाचे सुमारे ६,५०० प्रस्ताव पडून होते. ते सर्व प्रस्ताव मार्गी लावण्यात आले आहेत. पण, हे प्रस्ताव मार्गी लावताना काही प्रस्तावांमधील कागदपत्रे गहाळ करणे, तसेच प्रस्ताव अडकवून ठेवल्याचे दिसून आले.काही प्रस्तावांची नोंद न केल्यामुळे प्रस्ताव कोणत्या टप्प्यावर अडकून पडला आहे, हेच समजत नव्हते. त्यामुळे गैरव्यवहाराला आळा घालणे, दफ्तर दिरंगाई टाळणे आणि कामांचा निश्चित वेळेत निपटारा करण्यासाठी विभागाचे कामकाज ई-ऑफिसच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्याची अंमलबजावणी लवकरच सुरू होणार आहे.

14/02/2025 | Mumbai | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com



जर्मनीच्या उच्च शिक्षण मंत्रालयाच्या २५ सदस्यीय शिष्टमंडळाने विद्यापीठाला भेट दिली. या वेळी उपस्थित विद्यापीठाचे पदाधिकारी तसेच जर्मनीचे शिष्टमंडळ.

# जर्मनीच्या शिष्टमंडळाची विद्यापीठाला भेट

## दुहेरी पदवी आणि संयुक्त पदवी कार्यक्रमासह अनेक उपक्रम राबवणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

विज्ञान, माहिती तंत्रज्ञान, अभियांत्रिकी, नैसर्गिक विज्ञान आणि सामाजिक विकास या क्षेत्रांतील सामंजस्य करार, दुहेरी पदवी आणि संयुक्त पदवी कार्यक्रम, शैक्षणिक देवाणघेवाण कार्यक्रम, संयुक्त संशोधन प्रकल्प आणि नवोपक्रमावर आधारित उपक्रम राबवणे, या उद्देशाने जर्मनीच्या उच्च शिक्षण मंत्रालयाच्या २५ सदस्यीय शिष्टमंडळाने मंगळवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला भेट दिली.

बाडेन-वुर्टेमबर्ग राज्याच्या विज्ञान, संशोधन आणि कलामंत्री पेट्रा ओल्शोव्स्की एमडीएल यांच्या नेतृत्वाखाली या भेटीचे आयोजन करण्यात आले होते. त्यांच्यासोबत जर्मनीचे इतर मंत्री, खासदार यांच्यासह शिष्टमंडळ उपस्थित होते. ही भेट उच्च शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहे.

या वेळी संवादासाठी केंद्र आणि मानव विज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता त्याचबरोबर रसायनशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्रा. डॉ. अविनाश कुंभार, तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. आदित्य अभ्यंकर, इनोव्हेशन इन्क्युबेशन लिंकेजेसचे संचालक प्रा. डॉ. देविदास गोल्हर, पर्यावरण विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रेमंड दुरैस्वामी, व्यवस्थापनशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुप्रिया पाटील, महिला आणि लिंग अभ्यास विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. अनघा तांबे, आंतरविद्याशाखीय अभ्यासाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, परदेशी भाषा विभागाच्या डॉ. स्वाती आचार्य, आरोग्य विज्ञान विभागाचे प्रा. डॉ. गिरीश टिल्लू, जैवतंत्रज्ञान विभागाचे प्रा. डॉ. राजू गच्चे आणि कौशल्य विकास विभागाचे प्रा. डॉ. आर. एस. पंडित आदी उपस्थित होते.

Pune Edition
Feb 14, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

लेख

डॉ. श्रीराम गीत
drsvgeet@yahoo.co.in

# विद्यार्थीच नसतील, तर प्राध्यापक भरती कशाला?

'यूजीसी'ची अधिसूचना प्राध्यापक निवड-पदोन्नतीच्या आणि कुलगुरू निवडीच्या निकषांबाबत बोलते. पण, पुरेसे विद्यार्थीच नसतील, तर विभागात प्राध्यापकांची भरती कशाकरिता करायची, हा प्रश्न कोणीही उपस्थित करत नाही, हा एक विनोदच नव्हे काय?

**राष्ट्रीय शिक्षण** धोरणामध्ये शिक्षणाची दिशा कशी असावी, यावर विविध अंगांनी भरपूर चर्चा झाली व त्याची अंमलबजावणी कशी होणार यातील संदिग्धता २०२४ मध्ये संपली. पण, सरकारने म्हणजे विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसी या सरकारी संस्थेने गेल्या महिन्यात एक अधिसूचना काढून नवीनच गोंधळ निर्माण केला आहे. ही अधिसूचना प्राध्यापक निवड-पदोन्नतीच्या आणि कुलगुरू निवडीच्या निकषांबाबत बोलते. त्यावर हरकती-सूचना मागविण्यात आल्या असून, आता त्या पाठविण्याची अंतिम तारीख २८ फेब्रुवारी करण्यात आली आहे. 'लोकसत्ता'ने विस्तृत मांडणी करून प्राध्यापक निवडीचे निकष, संख्या व प्राध्यापकांच्या पात्रतेतील विविध बदल या प्रश्नांना उत्तर कसे शोधायचे, याची माहिती दिली आहे. या संदर्भात हे सारे ज्यांच्याकरता करायचे, त्या विद्यार्थ्यांची गरज काय आणि गेल्या ६० वर्षांत प्राध्यापक भरतीबद्दल चाललेला सावळागोंधळ या दोन गोष्टींकडे कायम दुर्लक्ष झाले आहे. या दोन्हींना अनुलक्षून कोणताही विचार आजवर केला गेलेला नाही. विद्यार्थ्यांची विषयनिवडीची गरज आणि विद्यार्थी संख्या या दोन्हींचा कोणताही विचार न करता प्रत्येक विभागात प्राध्यापक किती असावेत अशी संख्या ठरवली जाते. मोजके, ठरावीक, मोठी मागणी असलेले विषय सोडता पदवीला अनेक विषय घेण्याची सोय व व्यवस्था आहे. त्यासाठी विद्यार्थी संख्येच्या क्षमतेवर सहसा किमान ४० ते १०० दरम्यान मर्यादा असते. अनेक विषयांना इतके विद्यार्थी कधीही मिळालेले नाहीत, ही गेल्या साठ वर्षांतील आकडेवारी कोणीही तपासून पाहू शकतो. यात नवीन काही घडलेले नाही. पुरेसे विद्यार्थीच नसतील, तर विभागात प्राध्यापकांची भरती कशाकरिता करायची, हा प्रश्न कोणीही उपस्थित करत नाही, हा एक विनोदच नव्हे काय?

### विषयानुरूप कमतरता

विज्ञान शाखेतील फिजिक्स, स्टॅटिस्टिक्स, बॉटनी, झूलॉजी, गणित, भूगर्भशास्त्र विषयांना पदवीसाठी सर्व जागा भरल्या आहेत, अशी स्थिती कोणत्याही शहरातील नामवंत महाविद्यालयांतही सापडत नाही. तसेच, महाराष्ट्रातील अभियांत्रिकी महाविद्यालयांपैकी किमान दीडशे महाविद्यालयांतही अशीच स्थिती अनेक शाखांमध्ये आहे. काही शाखांना नामवंत महाविद्यालयांतपण विद्यार्थी नसल्यामुळे त्या बंद करण्याची वेळ गेल्या दहा वर्षांत आली आहे. कला किंवा मानव्यविद्या शाखेत तत्त्वज्ञान, संस्कृत, पाली, अर्धमागधी, हिंदी, इंग्रजी, जर्मन, राज्यशास्त्र, काही प्रमाणात इतिहास आणि मराठीसाठी पुरेसे विद्यार्थी मिळत नाहीत. मानसशास्त्रासाठी मोजक्या महाविद्यालयांत मागणी असते, तर अन्य ठिकाणी आनंदीआनंदच असतो. ही परिस्थिती १९६० पासूनची आहे, हे मुद्दाम नमूद करतो. वाणिज्य शाखेची कथा वेगळीच. कोणत्याही कॉलेजात जा, १९९० पासून पदवी वर्गाला उपस्थिती जेमतेम असते. काही उत्साही विद्यार्थी वर्गात गेले, तर आज कमी विद्यार्थी आहेत म्हणून तासिका न होण्याचे प्रमाणही मोठे आहे.

सन १९९५ पासून २०२५ पर्यंत विविध महाविद्यालयांत अनेक कारणांनी जाण्याचा योग आला. करिअरविषयक कार्यक्रमांच्या निमित्ताने अनेक प्राध्यापक व प्राचार्य यांच्याशी चर्चा झाली. २००६ मध्ये महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांच्या कुलगुरूंसमवेत कार्यक्रमांची संधी मिळाली. वर उल्लेख केलेली निरीक्षणे यावर आधारित आहेत.

### यात नवे काही नाही

१९६३ ते १९८३ च्या दरम्यान जेव्हा खासगी विद्यापीठे व खासगी व्यावसायिक अभ्यासक्रम नव्हते, तेव्हापासून ही स्थिती आजतागायत बदललेली नाही. मोठा फरक खासगी विद्यापीठे आल्यानंतर घडू लागला. त्यांच्याकडे जाणारी उच्च मध्यमवर्गीयांची मुले सोडली, तर अन्य ठिकाणांची परिस्थिती अधिकच वाईट झाली आहे. उदाहरणच द्यायचे, तर मोजक्या खासगी विद्यापीठांत बीएस्सी इकॉनॉमिक्स, सायकॉलॉजी, लिबरल आर्ट्स अशा अभ्यासक्रमांना पूर्ण विद्यार्थीसंख्या असते, तर अन्य अनुदानित महाविद्यालयांत केविलवाणी परिस्थिती असते. सन २००० पासून बीबीए नावाने विविध अभ्यासक्रमांना परवानगी मिळाली आणि सर्व प्रकारच्या पदवी अभ्यासक्रमांची रयाच गेली. बीए, बीकॉम, बीएस्सी हे 'फालतू' असल्याने तिकडे जाऊ नये, अशी सर्व विद्यार्थ्यांची चुकीची समजूत वाढीस लागली. त्यामुळे बारावीपर्यंत भरगच्च असलेल्या कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी संख्या या अभ्यासक्रमांकडे वळली. या प्रकारामुळे सर्व प्रकारचे व्याख्याते घड्याळी तासावर नेमण्याची पद्धत गेली २५ वर्षे रूढ होताना दिसते. संस्थाचालकांनी पैसे कसे वाचवावेत, याचा हा राजमार्ग निवडला तो आता इतका स्थिरावला आहे, की नेट, सेट काय, पण पीएचडी झालेले असंख्य चांगले पदवीधर आज घड्याळी तासावर काम करण्यासाठी राबवले जातात. महाराष्ट्रातील एकही संस्था आज राजकीय नेत्यांच्या प्रभावाखाली नाही, असे राहिलेले नाही. हे दुसरे वास्तव लक्षात घेतले, तर यावर उपाय निघणे अशक्य का आहे, हे लक्षात येईल. नेट किंवा सेटची काठिण्यपातळी आजही अनेकांना छळते. त्यावर मार्ग काढायचा म्हणून अनेक जण मध्यम वयात चाळिशीनंतर पीएचडीचा रस्ता पकडतात. ते सहजसाध्य आहे. पदोन्नतीकरता पीएचडी आवश्यक असल्याने तो रस्ता धरणाऱ्यांची संख्या कमी नाही.

### मूळ दुखणे जुनेच

आता प्राध्यापकांच्या पात्रतेसंदर्भात काही नोंदी करणे गरजेचे आहे. पदव्युत्तर पदवीसाठी किमान ५५ टक्के पात्रता नवीन अधिसूचनेत आहे. दहावी व बारावीला सामान्य गुण असलेले अनेक विद्यार्थी पदवीला व पदव्युत्तर पदवीला सहज ६५ ते ७५ टक्के गुण मिळवताना सापडतात. सीजीपीए या गोंडस नावाखाली साडेसात ते साडेआठ सीजीपीए मिळवणाऱ्यांना कामाचा किंवा कौशल्याचा अनुभव नसेल, तर औद्योगिक क्षेत्रात किंवा अन्य व्यावसायिक क्षेत्रात कोणतीही नोकरी मिळत नाही. मग हे शैक्षणिक बाजारात उतरतात. दहा-बारा वर्षे घड्याळी तासावर काम करणाऱ्या व्याख्यात्यांची संख्या महाराष्ट्रात लाखभर तरी भरेल.

एका उल्लेखाशिवाय लेखाचा शेवट करणे योग्य होणार नाही. मराठी भाषावैभवात भर घालणारे बहुसंख्य विचारवंत, समीक्षक, नामवंत लेखक व कवी हे आयुष्यातील बहुतेक काळ प्राध्यापक होते. इंग्रजी व मराठी विषयाच्या प्राध्यापकांचा यात भरणा मोठा असला, तरी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांतील नामवंत लेखकांची अनेक नावे सहज कोणाही जाणकाराला आठवतील. गंमत म्हणजे त्यांची कारकीर्दीची सुरुवात अशा नोकरीत होणारी ओढाताण, फरपट अशाने झाली. या परंपरेत कोणताही बदल झालेला नाही किंवा घडण्याची शक्यता नाही.

शिक्षण, संस्कार, सुशिक्षितपणा व नैतिकता या साऱ्याची रेवडी उडवणारे असंख्य किस्से शिक्षण क्षेत्रात जाहीर आहेत. प्रत्येक विद्यापीठातील निवडणुकांत यश मिळवणारे आणि एकगठ्ठा सर्व समित्यांवर पकड बसवणारे विविध गट आणि तट महाविद्यालयांतून प्राध्यापक, प्राचार्य व संस्थाचालक या वर्गांतून तेथे निवडून जातात. त्यांच्यावर नियंत्रण राखणे कोणत्याही कुलगुरूंना आजवर शक्य झालेले नाही, हे वास्तव आहे.

प्राध्यापक काळातील पहिल्या १५ वर्षांतील फरपट 'कोसला'त मांडणारे कादंबरीकार आणि ज्ञानपीठ विजेते भालचंद्र नेमाडे यांनी पुढचे तीन कादंबरी खंड लिहिले. 'बिढार', 'झूल', 'जरीला' यात केलेले वर्णन आज कोणत्याही प्राध्यापकाच्या कारकीर्दीला साजेसे ठरेल असेच आहे. सांगितलेला पगार एक, तर हातात पडणारी रक्कम दुसरी, हा अभियांत्रिकीमधील गेली ३० वर्षे चालू असलेला खेळ तर सर्वांना पाठ आहे. बारा महिने काम, ११ महिन्यांचा पगार ही दुसरी पद्धत. घड्याळी तासानुसार पगार देऊन राबवणे आणि दिवसभर संस्थेत बसवून ठेवणे, ही अजून एक. एकरकमी दोन वर्षांचा पगार आधीच घेऊन नेमणूकपत्र हाती ठेवणे हीसुद्धा अनुदानित संस्थांत रुळलेली पद्धत. यावर आवाज उठवणारा बाहेर तरी फेकला जातो किंवा संस्थेच्या आडगावी बदलीला पात्र ठरतो. नवीन अधिसूचना योग्य वा अयोग्य याची चर्चा करणाऱ्या सूचना सरकारदरबारी जातील. पण, विविध विषय घेणारे अपुरे विद्यार्थी, विभाग चालवण्यासाठी कागदोपत्री आवश्यक दाखवले जाणारे प्राध्यापक यांचा खरा ताळमेळ कधी लागणार हा खरा प्रश्न आहे.

14/02/2025 | Mumbai(Pune) | Page : 7
Source : https://epaper.loksatta.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# You can't manipulate attendance

## Biometric methods for class XI and XII students to be implemented

| Yashpal Sonkamble
yashpal@punemirror.com
TWEET @YashPune_Mirror


PIC FOR REPRESENTATIONAL PURPOSE ONLY

The number of integrated private coaching classes is increasing day by day in secret alliances with colleges across the state. There has been a trend of students only attending the practicals in colleges and attending full-time NEET, JEE and MHT CET classes.

Taking a serious note of this, the state government is going to implement biometric attendance for class XI and XII students in state secondary and higher secondary HSC boards' schools from the next academic year. The initiative will require students to mark their attendance using facial recognition or fingerprint-based biometrics. The state government has taken this important and strategic decision with an aim to increase the attendance of students in the classes. With this decision, it will now be mandatory for students to register at least 75 percent attendance throughout the year.

Many students take regular admission in junior colleges of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (MSBSHSE). However, instead of actually attending the classes, they attend private coaching classes. All this is done with the mutual consent of the school and the integrated private coaching class centres and the parents. Therefore, the main objective behind this decision is to break this unauthorised collusion and bring the students back to their classes.

Sharad Gosavi, Chairman of MSBSHSE confirmed the state government's decision while speaking to the media and said, "The government and the education department are thinking of ways to prevent students from being absent during the day and to stop them from going to private coaching classes during this time. It has come to our notice that many coaching centres collaborate with junior colleges to manipulate attendance records to ensure that students attend private classes. Therefore, making biometric attendance mandatory will help in stopping this practice." The decision on biometric attendance will particularly affect students in Mumbai, Pune, Chhatrapati Sambhajinagar, Nagpur, Kolhapur, Amravati and Latur, where students often start preparing for the Class XI entrance exam and instead go to coaching centres.

The MSBSHSE had earlier floated the scheme two years ago, but it was shelved due to opposition. However, education experts and school administrators now believe that biometric attendance is necessary to maintain classroom discipline. Meanwhile, former vice-president of state principals' association, Mahendra Ganpule, highlighted the need for strict implementation. He says, "There are many colleges where attendance is almost zero. This is a waste of resources. If the government is serious about implementing biometric attendance, it should ensure that the system is implemented properly."

Pune Mirror 14.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

### State Board Raises Compensation For HSC, SSC Evaluators After 9 Years

# Uptick in honorarium for paper correction

SwatiShindeGole
@timesofindia.com

**Pune:** The honorarium for teachers evaluating the Higher Secondary Certificate (HSC, Std XII) and Secondary School Certificate (SSC, Std X) examination papers has increased marginally after nine years.

As per the improved rates, examiners and moderators will receive Rs 1.50 more for a three-hour paper and Re 1 more for a two-and-a-half-hour and one-hour paper.

Maharashtra State Secondary and Higher Secondary Education has also hiked the remuneration for the main examiners from the previous consolidated honorarium of Rs 3,000 to Rs 4,000.

As many as 1,10,000 teachers are involved in the paper checking process for both exams and assess 2.25 crore papers in this season.

State board chairman Sharad Gosavi said, "The exam fees were increased up to 20% in the last two years, based on which we have been able to increase the honorarium." He added that a total of Rs 5 crore is spent on paper checking and there are other examination expenses.

Maharashtra Mukhyadhyapak Mahamandal, an association of principals in the state, has been pursuing the increase in honorarium for several years now.

Tanaji Mane, president of the association, said, "The association of principals was striving for nine years to increase the honorarium for paper evaluation. Their efforts have been recognised, and justice has been made to the teachers. Since the task of evaluating papers is a responsible one, we have been demanding a gradual increase. The board's current decision is commendable."

Papers should be corrected in a confidential and secure setting and care taken to ensure that the answer sheets are in good condition and corrected within the timeline.

**NEW REMUNERATION**

OLD / NEW (FIGURES IN RUPEES)

| | OLD | NEW |
|---|---|---|
| **FOR MODERATORS** | | |
| 3 hours | 5 | 6.50 |
| 2½ hours | 4 | 5 |
| 1 hour | 3 | 4 |
| **EXAMINERS** | | |
| 3 hours | 6 | 7.50 |
| 2½ hours | 5 | 6 |
| 1 hour | 4 | 5 |



Pic: Sadanand Godse

"The exam fees were increased up to 20% in the last two years, based on which we have been able to increase the honorarium. A total of Rs 5 crore is spent on paper checking and there are other examination expenses — **Sharad Gosavi** | STATE BOARD CHAIRMAN

# Exam centre heads, supervisors issued notices over laxity

SwatiShindeGole
@timesofindia.com

**Pune:** Nanded collector Rahul Kardile has issued show-cause notices to centre heads and supervisors who showed negligence during the conduct of Higher Secondary Certificate (HSC, Std XII) board examination. Besides, he ordered legal proceedings against three unauthorised individuals found present at the exam centres to avert any malpractices.

"No leniency should be shown to those indulging in malpractices at any exam centre in Nanded district. Police should take strict action against such individuals. The education department should ensure that necessary facilities are in place for hiccup-free conduct of the exams," Kardile said during his surprise visit to exam centres in Nanded's Kandhar taluka on Tuesday.

During the visit, Kardile found necessary facilities lacking at exam centres in Shiradhon, Chikhali and Panbhosi (Kandhar taluka) and issued show-cause notices be issued to the education officers concerned.

The collector also directed issuance of show-cause notices to eight supervisors from various exam centres for not using ID cards, neglecting seating arrangements and failing to conduct necessary checks in the classrooms. "Centre heads are well aware of these guidelines. CCTV cameras at exam centres should be operational and flying squads, as well as stationary teams, should be more active," the collector said.

He said students should not face any inconvenience with regards to seating arrangement, availability of desks and benches, water and restroom facilities.

The district administration will also take action against flying squads for negligence in duty. "They should report actions taken against people indulging in malpractices at the centres" he said.

The Times of India 14.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक

**पुढारी**

स्थापना १९३९

www.pudhari.com

# मुलींच्या फी माफीसाठी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री 'ॲक्शन मोड'वर

- १०० महाविद्यालयांना देणार अचानक भेट
- पुण्यातील गरवारे महाविद्यालयास भेट आणि आढावा

### राज्यभरातील शंभर महाविद्यालयांना देणार भेट

राज्यातील शंभर महाविद्यालयांना अशा प्रकारे अचानक भेट देऊन मुलींच्या फीमाफीचा आढावा घेणार असून, मुंबईतील वांद्रे येथील थडोमल शहानी महाविद्यालयातून सुरुवात केली आहे. पुण्यातील गरवारे दुसरे महाविद्यालय असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले. कमवा आणि शिका' तत्त्वावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा भत्ता वाढविण्याची मागणी काही विद्यार्थ्यांनी या वेळी केली असता त्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही देखील या वेळी त्यांनी दिली. या वेळी उच्च शिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्चाव हे देखील उपस्थित होते.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महायुती सरकारने घेतलेल्या मुलींच्या फीमाफीसाठी राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील ॲक्शन मोडवर आले असून, त्यांनी गरवारे महाविद्यालयास अचानक भेट देऊन मुलींच्या फीमाफी निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला तसेच राज्यातील १०० महाविद्यालयांना अचानक भेट देणार असल्याचा मानसही त्यांनी या वेळी व्यक्त केला.

उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे, यासाठी राज्य सरकारने व्यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षणाचे शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी एकूण ८४२ कोर्सेससाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटींची तरतूद केली आहे. संबंधित निर्णयाच्या अंमलबजावणीतील शैक्षणिक संस्थांसमोरील अडचणी दूर करण्यासाठी शासनाने दिशानिर्देश देखील जारी केले होते. तसेच, उच्च व तंत्र शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून भरारी पथक नेमून विद्यार्थिनींच्या तक्रारींची दखल घेतली जात होती.

या निर्णयाचा आत्तापर्यंत किती विद्यार्थिनींना लाभ झाला, याचा प्रत्यक्ष आढावा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी घेण्यास सुरुवात केली असून, त्यांनी गरवारे महाविद्यालयामधील विद्यार्थिनींशी संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या.

या वेळी पाटील म्हणाले की, उच्च शिक्षणाचा खर्च परवडत नसल्याने अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. मुलींनी देखील ३१ मार्चपर्यंत महाविद्यालयात शासनाने नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून फीमाफीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी; जेणेकरून मुलींना या निर्णयाचा लाभ घेता येईल. तसेच, विद्यार्थिनींच्या अडचणी समजून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी आणि महाविद्यालय प्रशासन यांची संयुक्त समिती स्थापन करावी, अशी सूचना या वेळी केली.

Pune Edition
Feb 15, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

**लोकमत**

# फी माफीसह मुलींच्या समस्यांवर समिती स्थापावी

### चंद्रकांत पाटील यांची महाविद्यालयांना सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** महायुती सरकारने घेतलेल्या मुलींच्या फी माफीसाठी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील 'ॲक्शन मोड'वर आले आहेत. पाटील यांनी शुक्रवारी (दि. १४) पुण्यातील गरवारे महाविद्यालयास अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफी निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. फी माफीसह मुलींच्या समस्यांसाठी समिती स्थापन करा, या सूचनेसह राज्यातील १०० महाविद्यालयांना अचानक भेट देणार असल्याचा मानसही पाटील यांनी व्यक्त केला.



**चंद्रकांत पाटील**
राज्याचे मंत्री

यावेळी उच्चशिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्छाव हे देखील उपस्थित होते. उच्चशिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे; यासाठी राज्य सरकारने व्यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षणाचे शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी एकूण ८४२ कोर्सेसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटींची तरतूद देखील करण्यात आली होती. उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून भरारी पथक नेमून विद्यार्थिनींच्या तक्रारींची दखल घेतली जात होती. या निर्णयाचा आतापर्यंत किती विद्यार्थिनींना लाभ झाला, याचा प्रत्यक्ष आढावा राज्याचे चंद्रकांत पाटील घेण्यास सुरुवात केली आहे. चंद्रकांत पाटील म्हणाले उच्चशिक्षणाचा खर्च परवडत नसल्याने अनेक मुलींना शिक्षणापासून वंचित राहावे लागते. त्यामुळे मुलींचे उच्चशिक्षणातील प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने मुलींचे व्यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षण पूर्णपणे माफ करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाची राज्यात अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे, याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. मुलींनी देखील ३१ मार्चपर्यंत महाविद्यालयात शासनाने नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून फी माफीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी. जेणेकरून मुलींना या निर्णयाचा लाभ घेता येईल. विद्यार्थिनींच्या अडचणी समजून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी आणि महाविद्यालय प्रशासन यांची संयुक्त समिती स्थापन करावी, अशी सूचना पाटील यांनी केली.

### १०० महाविद्यालयांना अचानक भेट देणार

राज्यभरातील शंभर महाविद्यालयांना अशा प्रकारे अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफीचा आढावा घेणार आहे. 'कमवा आणि शिका' तत्त्वावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा भत्ता वाढविण्याची मागणी काही विद्यार्थ्यांनी यावेळी केली असता, त्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी यावेळी त्यांनी दिली.

Pune Main
Page No. 7 Feb 15, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 15 Feb 2025_005
15 Feb 2025

# शिक्षणमंत्र्यांची महाविद्यालयांना सरप्राइज व्हिजिट

## मुलींना मोफत शिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत खातरजमा

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४** - राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयानुसार मुलींना मोफत शिक्षणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होते की नाही, याचा आढावा घेण्यासाठी खुद्द उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील आता प्रत्यक्षात महाविद्यालयात जाऊन खातरजमा करीत आहेत.

व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुलींना मोफत प्रवेश आहे. मात्र, अव्यावसायिक अभ्यासक्रम म्हणजेच बीए, बीकॉम, बीएसस्सी यासह अन्य पारंपरिक अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुलींना शुल्क भरावे लागते. विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या अनेक शिष्यवृत्ती योजना कार्यरत आहे. त्याची माहिती नसल्याने विद्यार्थ्यांना शुल्क भरावे लागत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. त्या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी फीमाफीसह मुलींच्या समस्यांसाठी समिती स्थापन करण्याच्या सूचना महाविद्यालयांना दिल्या आहेत.

शहरातील गरवारे महाविद्यालयास चंद्रकांत पाटील यांनी अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफी निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. उच्च शिक्षणातील मुलींचे प्रमाण वाढावे, यासाठी राज्य सरकारने व यावसायिक आणि वैद्यकीय शिक्षणाचे शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी एकूण ८४२ कोर्सेसाठी राज्य सरकारने अर्थसंकल्पात दोन हजार कोटींची तरतूदही केली होती. या निर्णयाचा आतापर्यंत किती विद्यार्थिनींना लाभ झाला, याचा प्रत्यक्ष आढावा चंद्रकांत पाटील घेण्यास सुरुवात केली असून, आज (दि. १४) त्यांनी थेट महाविद्यालयामधील विद्यार्थिनींशी संवाद साधत अडचणी जाणून घेतल्या.

या वेळी पाटील म्हणाले, की मोफत शिक्षणाची राज्यात अंमलबजावणी कशा प्रकारे होत आहे, याचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. मुलींनी देखील ३१ मार्चपर्यंत महाविद्यालयात शासनाने नेमलेल्या नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून फी माफीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी. जेणेकरून मुलींना या निर्णयाचा लाभ घेता येईल, तसेच विद्यार्थिनींच्या अडचणी समजून घेण्यासाठी प्रत्येक महाविद्यालयाने विद्यार्थी आणि महाविद्यालय प्रशासन यांची संयुक्त समिती स्थापन करावी, अशी सूचनाही या वेळी पाटील यांनी केली.

### १०० महाविद्यालयांत आढावा

राज्यभरातील शंभर महाविद्यालयांना अशा प्रकारे अचानक भेट देऊन मुलींच्या फी माफीचा आढावा घेण्यात येत आहे. त्याची सुरुवात मुंबईतील वांद्रे येथील थडोमल शहानी महाविद्यालयातून झाली. आता गरवारे दुसरे महाविद्यालय असल्याचेही त्यांनी सांगितले. कमवा आणि शिका तत्त्वावर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा भत्ता वाढविण्याची मागणी काही विद्यार्थ्यांनी केली असता, त्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. या वेळी उच्च शिक्षण विभागाचे संचालक शैलेंद्र देवळाणकर, सहसंचालक प्रकाश बच्चाव, गरवारे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास उगळे हे देखील उपस्थित होते.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 15 Feb 2025_013
15 Feb 2025

# पुणे विद्यापीठातील पदवी, पदव्युत्तर प्रवेशप्रक्रिया जाहीर

**पुणे, दि. १४** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची प्रवेश प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार संकुलात असणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या प्रवेश परीक्षा अर्थात 'सीईटी'साठी अर्ज करण्यास सुरुवात झाली आहे. यासाठी दि. ३ मार्च मुदत देण्यात आली आहे.

विद्यापीठात ५२ शैक्षणिक विभागांसह नगर आणि नाशिक उपकेंद्रे आहेत. राज्यभरातील विद्यार्थ्यांसह परराज्यांतील, परदेशांतील विद्यार्थी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. प्रवेश परीक्षेद्वारे प्रक्रिया राबवण्यात येते. दोन तासांच्या ऑनलाइन परीक्षेत शंभर गुणांची प्रश्नपत्रिका असते. दि. १८ ते २० मार्चदरम्यान पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी, तर ४ एप्रिल रोजी पदवी प्रवेशासाठीची सीईटी घेण्यात येणार आहे. उपकुलसचिव डॉ. एम. व्ही. रासवे यांनी याबाबत माहिती दिली.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# डी. लिट. पदवी पुन्हा सुरू करावी

## माजी अधिसभा सदस्यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे मागणी

**पुणे, ता. १५ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त विविध क्षेत्रांतील मान्यवरांना सन्मानपूर्वक डी. लिट. ही पदवी देण्याचा मानद साधारणतः २६ वर्षांपूर्वी अस्तित्वात होता. परंतु सध्या डी. लिट. पदवी देण्याऐवजी विद्यापीठातर्फे ‘जीवन साधना पुरस्कार’ दिला जात आहे. या पुरस्काराऐवजी विद्यापीठाने पुन्हा डी. लिट. पदवी देण्यास सुरवात करावी अशी मागणी होत आहे.

विद्यापीठात १९९८ पर्यंत डी. लिट. पदवी देण्याची पद्धती होती. १९९९ मध्ये तत्कालीन कुलगुरू डॉ. अरुण निगवेकर यांनी विद्यापीठाद्वारे ‘जीवन साधना गौरव’ पुरस्कार देण्याची पद्धत सुरू केली. तेव्हापासून विद्यापीठाच्या वर्धापनदिनानिमित्त विविध क्षेत्रांतील व्यक्तींना हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. यंदा दहा मान्यवरांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. परंतु, जीवन साधना गौरव पुरस्कार देण्याची पद्धती थांबवून डी. लिट. पदवी देण्याची पद्धत पुन्हा सुरू करावी, अशी मागणी माजी अधिसभा सदस्य प्रा. धनंजय कुलकर्णी यांनी केली आहे.

प्रा. कुलकर्णी म्हणाले,“डी. लिट. पदवी प्रदान करण्याची एक मान्य पद्धती आहे. जीवन साधना पुरस्कारासाठी अशी कोणतीही विहित पद्धती नाही. अर्थात डी. लिट. पदवी व जीवन साधना पुरस्कार यात गुणात्मक फरक आहे. त्यामुळे विद्यापीठाने पुन्हा डी. लिट. पदवी देण्याचा विचार करावा.’’

> डी. लिट. पदवी देणे पुन्हा सुरू करण्याच्या सूचनेचा विद्यापीठाकडून सकारात्मक विचार करण्यात येईल. त्यापूर्वी विद्यापीठाने डी. लिट पदवी देणे का बंद केले, हे पाहिले जाईल. नव्याने डी. लिट. पदवी देण्यासंदर्भातील निकष आणि प्रक्रिया याबाबत निश्चित विचार केला जाईल.
> **- डॉ. सुरेश गोसावी,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

> राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर डी. लिट. पदवी देण्याचे काही निकष आहेत. या निकषांनुसार ‘डी. लिट.’ पदवी देण्यासाठी त्या प्रतिभेचा व्यक्ती असणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यापीठाने पुन्हा डी. लिट. पदवी देण्याचा निश्चितच विचार करायला हरकत नाही.
> **- डॉ. वासुदेव गाडे,** माजी कुलगुरू

Sakal 16.2.2025

# मुलींच्या मोफत शिक्षणासाठी झाडाझडती

## मंत्री चंद्रकांत पाटील शंभर महाविद्यालयांना भेट देणार

**मुंबई, ता. १५ : व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांचे मुलींना मोफत शिक्षण मिळावे, यासाठी राज्य सरकार कोट्यवधींचा भार उचलते. मात्र अनेक महाविद्यालयांमध्ये योजनेची अंमलबजावणी होत नसल्याने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील १००हून अधिक महाविद्यालयांना भेट देणार आहेत.**



राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबवली जाते. यासाठी महाविद्यालय स्तरावर स्वतंत्र नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. या योजनेसाठी प्रत्येक महाविद्यालयाने सूचना फलकांवर दर्शनी भागात योजनेच्या प्रचार-प्रसारासाठी माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे; मात्र त्याची अंमलबजावणी आजही अनेक महाविद्यालयांमध्ये होत नाही. सध्या राज्यातील मुलींचे पदवी स्तरावरील व्यावसायिक शिक्षणामध्ये प्रमाण फक्त ३६ टक्के आहे. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीसाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी महाविद्यालयांना भेटी देण्यास सुरुवात केली आहे. मुंबईतील थडोमल शहाणी अभियांत्रिकी महाविद्यालयाला त्यांनी नुकतीच भेट दिली होती. त्यानंतर पुण्यात महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी पुणे संचालित आबासाहेब गरवारे महाविद्यालयास आकस्मिक भेट दिली. येत्या काळात राज्यातील १०० वरिष्ठ महाविद्यालयांना अचानक भेटी दिल्या जाणार आहेत.

### शिक्षणातील टक्का वाढवण्याचे उद्दिष्ट

■ नवीन शैक्षणिक धोरणानुसार व्यावसायिक शिक्षणामध्ये मुलींचे प्रमाण वाढविणे, मुलींना समप्रमाणात शिक्षणाच्या व्यापक संधी प्राप्त होणे तसेच महिला सक्षमीकरणाअंतर्गत आर्थिक पाठबळाअभावी मुली उच्च शिक्षणापासून वंचित राहू नयेत, याकरिता राज्य शासनाने उच्च शिक्षणातील मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्क माफीच्या लाभाची योजना सुरू केली आहे.

### अर्ज करण्यासाठी ३१ मार्चपर्यंत मुदत

■ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी विद्यार्थ्यांना ३१ मार्चपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत देण्यात आली आहे. यासाठी महाविद्यालय स्तरावर स्वतंत्र शिबिर घेण्याचे आदेश संबंधित महाविद्यालयांना देण्यात आले आहेत. शिक्षण शुल्काच्या योजनेची मिशन मोडवर पात्र विद्यार्थिनींपर्यंत माहिती पोहोचवून महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करणे, यासाठी सर्व महाविद्यालयांनी पुढाकार घेण्याचे आदेश दिले आहेत.

Sakal 16.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रवेश प्रक्रियेस सुरुवात

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीची प्रवेश प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. येत्या १८ ते २० मार्चदरम्यान पदव्युत्तर पदवी प्रवेशासाठी, तर ४ एप्रिल रोजी पदवी प्रवेशासाठीची समाइक प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. अर्ज करण्यासाठी ३ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे, असे विद्यापीठाचे उपकुलसचिव डॉ. एम. व्ही. रासवे यांनी परिपत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

विद्यापीठात ५२ शैक्षणिक



विभागांसह नगर आणि नाशिक उपकेंद्रे आहेत. राज्यभरातील विद्यार्थ्यांसह परराज्यांतील, परदेशांतील विद्यार्थी या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतात. समाइक प्रवेश परीक्षेद्वारे प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येते. पदवी अभ्यासक्रमांसाठी विद्यार्थी बारावी उत्तीर्ण, तर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी पदवी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. दोन तासांच्या प्रवेश परीक्षेत शंभर गुणांची प्रश्नपत्रिका असते. ऑनलाइन पद्धतीने ही परीक्षा घेतली जाते.

पदवी आणि पदव्युत्तर पदवी स्तरावरील अभ्यासक्रमांमध्ये पारंपरिक अभ्यासक्रमांसह व्यावसायिक, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, ललित कला, उपयोजित विज्ञानातील अनेक अभ्यासक्रमांचा यात समावेश आहे. प्रवेशप्रक्रिया आणि प्रवेश परीक्षेबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे.

Kesari 16.2.2025

लोकमत

# 'विद्यापीठांनो, परीक्षांचे निकाल ३० दिवसांत लावा'

## राज्यपाल राधाकृष्णन यांचे आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर :** राज्यातील सर्व विद्यापीठांनी शैक्षणिक वेळापत्रक तयार करून ते पुरेसे अगोदर प्रसिद्ध करावे. परीक्षांच्या सत्रनिहाय तारखा जाहीर कराव्यात तसेच निकाल ३० दिवसांमध्ये लावावे. यासोबतच दीक्षान्त समारंभाची तारीखही अगोदरच जाहीर करावी, असे निर्देश राज्यपाल तथा कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी दिले.

राधाकृष्णन यांनी गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाचा तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कामकाजाचा आढावा घेतला. त्यांनी गोंडवाना विद्यापीठाच्या महत्त्वाच्या योजनांची अंमलबजावणी, आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना, कमवा आणि शिका योजना, आदिवासींच्या ज्ञानाचे दस्तावेजीकरण करणे आदी विषयांवर सूचना केल्या.

Pune Main
Page No. 5 Feb 16, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# विद्यार्थ्यांना मिळेना 'स्वाधार'चा आधार

## सहा महिन्यांपासून शिक्षणासाठी 'परीक्षा'

**पुणे, ता. १५ : ''मी जळगाव येथील रहिवासी आहे. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने वडील मजुरी करतात. मी शिक्षण पूर्ण करून वकील होईन, हे स्वप्न उराशी बाळगून पालकांनी मला पुण्यामध्ये शिक्षणासाठी पाठवले. आर्थिक परिस्थिती जेमतेम असलेल्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळतो. त्यामुळे मी नोव्हेंबर २०२४ मध्ये अर्ज केला. माझे शैक्षणिक वर्ष मार्चमध्ये संपणार आहे. मात्र अद्याप 'स्वाधार'चा लाभ मिळाला नाही. घरी पैसे मागू शकत नाही. त्यामुळे नाइलाजास्तव शिक्षण सांभाळून 'डिलिव्हरी बॉय'चे काम करून शिक्षणाचा खर्च भागवावा लागत आहे...'' अशी व्यथा कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याने मांडली.**



अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नयेत, यासाठी समाज कल्याण विभागाच्या वतीने 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना' राबविली जाते. या योजनेची जाहिरात प्रसिद्ध होऊन सहा महिन्यांचा कालावधी उलटून गेला आहे. मात्र अद्याप या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना मिळाला नाही. त्यामुळे पुण्यासारख्या महागड्या शहरामध्ये अनेक विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच काम करून राहण्या-खाण्याचा खर्च भागवावा लागत आहे. या खर्चाचा भार कुटुंबीयांना परवडत नसल्याने राज्यातून पुण्यात शिक्षणासाठी आलेले काही जण आपल्या घरी परतले असल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले.

यासंदर्भात विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता नाव प्रसिद्ध न करण्याच्या अटीवर त्यांनी सांगितले की, ''जुलै महिन्यामध्ये स्वाधार योजनेसाठी अर्ज केला होता. मात्र तांत्रिक बाबींमुळे अर्ज करण्याच्या शेवटच्या तारखेमध्ये अनेक वेळेस वाढ करण्यात आली. सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी उलटून गेला तरीही या योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे पुण्यासारख्या शहरामध्ये राहणे कठीण होत आहे.''

### अनेक समस्यांचा सामना

■ समाज कल्याण विभागाने ३१ जुलै २०२४ रोजी संकेतस्थळावर जाहिरात प्रसिद्ध केली. त्यानंतर ३० नोव्हेंबर २०२४ पर्यंत अर्ज करण्याच्या मुदतीत वाढ केली. त्यानंतर २६ डिसेंबर २०२४ मध्ये सुधारित शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला. त्यामुळे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदतवाढ मिळाली. त्यानंतर परत १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ दिली. मात्र अद्याप विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळालेला नाही. या सर्व प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला आहे.

“ ज्या विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज केलेला नाही आणि थेट स्वाधार योजनेसाठी अर्ज केला आहे, अशा विद्यार्थ्यांच्या अर्जांना विशेष बाब म्हणून मान्यता देण्यात यावी. यासंदर्भात राज्य शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. शासनाकडून निर्णय आल्यानंतर विद्यार्थ्यांना त्वरित योजनेचा लाभ देण्यात येईल.

- **भरत केंद्रे**, उपायुक्त, समाज कल्याण विभाग

“ स्वाधार योजनेचा लाभ मिळाला नाही. त्यामुळे अर्धवेळ काम करून खोलीभाडे आणि खानावळीचे पैसे भरावे लागत आहेत. त्यामुळे माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. स्वाधार योजनेची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा.

- **एक विद्यार्थी**

विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ न मिळाल्याने अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासनाच्या उदासीनतेमुळे विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत. याबाबत तुमचे मत नावासह क्यूआर कोड स्कॅन करून किंवा editor.pune@esakal.com या मेलवर, तसेच ८४८४९७३६०२ या व्हॉट्सॲप क्रमांकावर कळवा.

Sakal 16.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# 'यूजीसी'कडून चार खासगी विद्यापीठांवर प्रतिबंध

## पीएच.डी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह; नियमावली न पाळल्याने कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

> पूर्वी पीएच.डी घाऊक प्रमाणात केली जात नव्हती. मात्र, सक्तीमुळे पीएच.डी करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. परिणामी, गेल्या काही वर्षांत पीएच.डीचा बाजार झाला आहे. काहीही करून पीएच.डी पूर्ण करण्यावर भर दिला जातो. त्यातून पीएच.डीचा दर्जा, मार्गदर्शकांची गुणवत्ता, यूजीसीच्या नियमांचे पालन करणे याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यातच आता यूजीसीने 'यूजीसी केअर' यादी बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे बोगस संशोधनाची शक्यता निर्माण झाली आहे. एकूणच हा विषय गुंतागुंतीचा आहे. **-डॉ. नितीन करमळकर, माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पीएच.डी नियमावलीचे पालन न केल्याप्रकरणी चार विद्यापीठांना पाच वर्षांसाठी पीएच.डी अभ्यासक्रम राबवण्यास प्रतिबंधित केले आहे. विशेष म्हणजे, प्रतिबंधित करण्यात आलेली संबंधित चारही विद्यापीठे राजस्थानातील खासगी विद्यापीठे असून, या कारवाईमुळे एकूणच पीएच.डी प्रक्रियेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

पीएच.डी अभ्यासक्रम राबवण्यासाठी यूजीसीची नियमावली आहे. या नियमावलीचे पालन करूनच विद्यापीठांनी पीएच.डी अभ्यासक्रम राबवणे बंधनकारक आहे. मात्र, राजस्थानातील चार विद्यापीठांनी या नियमावलीतील तरतुदींचे उल्लंघन करून पीएच.डी अभ्यासक्रम राबवल्याचे निदर्शनास आले. याबाबत यूजीसीने समिती नियुक्त करून तपासणी केली. त्यानंतर समितीने केलेल्या शिफारसीनुसार संबंधित विद्यापीठांना पाच वर्षे पीएच.डी अभ्यासक्रम राबवण्यास प्रतिबंधित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या चार विद्यापीठांमध्ये ओपीजेएस युनिव्हर्सिटी, सनराइज युनिव्हर्सिटी, सिंघानिया युनिव्हर्सिटी, तसेच श्री जगदीशप्रसाद झाबरमल तिब्रेवाला युनिव्हर्सिटी यांचा समावेश आहे.

या विद्यापीठांना २०२५-२६ ते २०२९-३० या वर्षांत विद्यार्थ्यांना पीएच.डी अभ्यासक्रमाला प्रवेश देता येणार नाही. विद्यार्थ्यांनी संबंधित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेऊ नये, संबंधित विद्यापीठातील पीएच.डी उच्च शिक्षण आणि रोजगारासाठी वैध ठरणार नसल्याचे परिपत्रक यूजीसीने प्रसिद्ध केले आहे.

17/02/2025 | Mumbai(Pune) | Page : 10
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

**मटा अँकर** एफआरएच्या निर्णयामुळे कॉलेजांनच्या डिपॉझिट फी वसुलीस चाप

# विद्यार्थ्यांना अनामत रक्कमेचा दिलासा

हर्ष दुधे
harsh.dudhe@timesofindia.com


(चित्र : एआय)

### अभ्यासक्रम आणि अनामत रक्कम

- इंजिनीअरिंग, व्यवस्थापन, एमसीए, फार्मसी, आर्किटेक्चर, डिझाइन, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, अप्लाइड आर्टस् ( सर्व पदव्युत्तर , पदवी अभ्यासक्रम ) : **२५ हजार रुपये**
- विधी अभ्यासक्रम ( ३ आणि ५ वर्षे ) : **५ हजार रुपये**
- ॲग्रिकल्चर बिझनेस मॅनेजमेंट, बीटेक बायोटेक्नॉलॉजी, बीएस्सी ॲग्रिकल्चर, बीएस्सी हॉर्टिकल्चर, बीटेक ॲग्रिकल्चर, बीटेक फूड टेक्नॉलॉजी : **१० हजार रुपये.**

**पुणे :** प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून मनमानी पद्धतीने अनामत रक्कम (डिपॉझिट फिस) वसूल करून, ती विद्यार्थ्यांना परत करण्यास टाळाटाळ करणाऱ्या कॉलेजांना शुल्क नियामक प्राधिकरणाने (एफआरए) चाप लावला असून, येत्या शैक्षणिक वर्षापासून अभ्यासक्रमनिहाय अनामत रक्कम आकारावी लागणार आहे. त्यानुसार कॉलेजांना तंत्रशिक्षण संचालनालयाच्या; तसेच कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेच्या अभ्यासक्रमांना पाच हजार ते २५ हजारांच्या दरम्यानच अनामत रक्कम आकारावी लागेल. त्यामुळे अनामत रक्कमेच्या नावाखाली लाखांच्या घरात पैसे वसूल करणाऱ्या कॉलेजांच्या नफेखोरीवर मर्यादा येणार आहेत.

एमबीबीएस, बीडीएस, एमडी, एमएस अशा वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काच्या व्यतिरिक्त तीन ते पाच लाखांच्या घरात अनामत रकमेसह विविध प्रकारचे शुल्क आकारण्यात येत होते. त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक फटका बसत होता. ही गंभीर बाब लक्षात आल्यानंतर, एफआरएने ऑगस्ट २०२४मध्ये वैद्यकीय अभ्यासक्रमांना ठरवून दिलेली अनामत रक्कम घेण्याचा नियम लागू केला होता. त्यानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमांसाठी अभ्यासक्रमनिहाय १० हजार ते ५० हजार आकारण्याचा निर्णय झाला. आता हाच निर्णय तंत्रशिक्षण संचालनालय; तसेच कृषी अभ्यासक्रमांना लागू करण्यात आला आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमांना प्रवेश घेतांना विद्यार्थ्यांना एफआरएने ठरवून दिलेली अनामत रक्कमच आकारता येणार आहे.

राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सुमारे तीन हजार कॉलेजांना हा निर्णय लागू होणार आहे. राज्यातील साधारण पाच लाख विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे. याबाबतचे परिपत्रक एफआरएचे उपसचिव बी. टी. जगाडे यांनी प्रसिद्ध केले आहे.

### अनामत रक्कमेचा झोल

विद्यार्थ्यांकडून अनामत रक्कम घेतल्यानंतर, त्या रक्कमेची प्रामुख्याने त्याचे रूपांतर मुदत ठेवीत करून व्याज कमविण्यात येते. याचा उल्लेख कोणत्याच कागदपत्रांमध्ये नसतो. विद्यार्थ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर, ही रक्कम स्वतःहून परत देण्यासाठी कोणतेच कॉलेज पुढाकार घेत नाही.

Maharashtra Times 17.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### संशोधनाबाबत यूजीसी आक्रमक

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दर्जेदार संशोधनासाठी आग्रही असलेल्या विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने पीएच.डी. नियमावलीचे पालन न केल्याप्रकरणी चार विद्यापीठांना पाच वर्षांसाठी पीएच.डी. अभ्यासक्रम राबवण्यास प्रतिबंधित केले आहे. विशेष म्हणजे चारही विद्यापीठे खासगी असून, या कारवाईमुळे एकूणच खासगी विद्यापीठांमधील पीएच.डी संशोधनाबाबात प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

पीएच.डी. अभ्यासक्रम राबवण्यासाठी यूजीसीची नियमावली आहे. या नियमावलीचे पालन करूनच विद्यापीठांनी पीएच.डी. अभ्यासक्रम राबवणे बंधनकारक आहे. परंतु, राजस्थानातील चार विद्यापीठांनी या नियमावलीतील तरतुदींचे उल्लंघन करून पीएच.डी. अभ्यासक्रम राबवल्याचे निदर्शनास आले. याबाबत यूजीसीने समिती नियुक्त करून तपासणी केली. त्यानंतर समितीने केलेल्या शिफारसीनुसार संबंधित विद्यापीठांना पाच वर्षे पीएच.डी अभ्यासक्रम राबवण्यास प्रतिबंधित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

या चार विद्यापीठांमध्ये ओपीजेएस युनिव्हर्सिटी, सनराइज युनिव्हर्सिटी, सिंघानिया युनिव्हर्सिटी, तसेच श्री. जगदीशप्रसाद झाबरमल तिब्रेवाला युनिव्हर्सिटी यांचा समावेश आहे. या विद्यापीठांना २०२५-२६ ते २०२९-३० या पाच वर्षांच्या काळात विद्यार्थ्यांना पीएच.डी. अभ्यासक्रमाला प्रवेश देता येणार नाही. विद्यार्थ्यांनी संबंधित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेऊ नये, संबंधित विद्यापीठातील पीएच.डी. उच्च शिक्षण आणि रोजगारासाठी वैध ठरणार नसल्याचे परिपत्रक यूजीसीने प्रसिद्ध केले आहे.

**पीएच.डी. नियमावलीचे पालन न केल्याप्रकरणी चार विद्यापीठांवर कारवाईचा बडगा**

> संशोधनात गुणवत्ता हा सर्वोच्च निकष आहे. त्यामुळे संशोधक विद्यार्थी, संशोधन मार्गदर्शक आणि विद्यापीठे यांनी यूजीसीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तंतोतंत पालन करणे गरजेचे आहे. तरच जगभरात भारताचे नाव संशोधनाच्या बाबतीत गौरवास्पद ठरणार आहे.
>
> **- प्रा. डॉ. गणेश काकांडीकर,**
> सहयोगी अधिष्ठाता, अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संकुल, एमआयटी, पुणे

विशेष म्हणजे, पीएच.डी. अभ्यासक्रम राबवण्यास प्रतिबंधित करण्यात आलेली चारही विद्यापीठे राजस्थान या एकाच राज्यातील आणि खासगी विद्यापीठे असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे एकीकडे देशात खासगी विद्यापीठांची संख्या वाढत असताना या यूजीसीने केलेल्या कारवाईमुळे खासगी विद्यापीठांमध्ये राबवली जाणारी पीएच.डी. प्रक्रिया पारदर्शक होते का तसेच खासगी विद्यापीठांमध्ये संशोधनाचा दर्जा चांगला ठेवला जातो का, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

Pune Edition
Feb 17, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

---

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### विद्यापीठाच्या 'पोस्ट डॉक फेलोशिप'ची रखडपट्टी

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे देण्यात येणाऱ्या 'पोस्ट डॉक फेलोशिप'ची रखडपट्टी झाली आहे. सप्टेंबरमध्ये अर्ज प्रक्रिया सुरू केल्यानंतर फेब्रुवारीमध्येही फेलोशिपधारकांची नावे जाहीर करण्यात आलेली नाहीत.

सर्वसाधारणपणे पीएच.डी. पूर्ण केल्यानंतर विद्यार्थी पुढील संशोधनासाठी परदेशातील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतात. ही बाब लक्षात घेऊन पीएच.डी.नंतरच्या संशोधनाला चालना देण्यासाठी डॉ. नितीन करमळकर यांनी त्यांच्या कुलगुरू पदाच्या काळात पुढाकार घेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात पोस्ट डॉक फेलोशिप सुरू करण्याचा निर्णय घेतला.

पोस्ट डॉक फेलोशिप सुरू करणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बहुधा राज्यातील एकमेव विद्यापीठ आहे, असा दावा केला जात आहे. त्यानुसार २०१९मध्ये पहिल्यांदा फेलोशिपची प्रक्रिया राबवून पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली.

फेलोशिप सुरू केल्यानंतर दर वर्षी प्रक्रिया राबवणे आवश्यक होते. मात्र, २०२०मध्ये करोना प्रादुर्भाव सुरू झाल्याने चार वर्षे ही फेलोशिप प्रक्रिया राबवण्यातच आली नाही. यंदा सप्टेंबरमध्ये पुन्हा फेलोशिपची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

> 'पोस्ट डॉक्टरल फेलोशिप'ची उर्वरित प्रक्रिया येत्या काही दिवसांत पूर्ण करण्यात येईल. तसेच पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्यात येईल.
>
> **- डॉ. पराग काळकर,**
> प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

'सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी - पोस्ट डॉक्टरल फेलोशिप' विज्ञान, तंत्रज्ञान, वाणिज्य, मानव्यविज्ञान, भाषा अशा विद्याशाखांसाठी दिली जाते. त्यात पीएच.डी. प्राप्त असलेल्या एकूण वीस उमेदवारांची निवड करण्यात येते.

यंदा पोस्ट डॉक फेलोशिपसाठी ७९ उमेदवारांनी अर्ज केला आहे. मात्र, सप्टेंबरमध्ये अर्ज प्रक्रिया सुरू केल्यानंतर सावित्रीबाई फुले विद्यापीठाकडून पुढील प्रक्रियाच राबवण्यात आलेली नाही. त्यामुळे अर्ज केलेले उमेदवार फेलोशिपच्या प्रतीक्षेत आहेत. तसेच विद्यापीठाने फेलोशिपची प्रक्रिया का राबवली नाही, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे.

18/02/2025 | Pune | Page : 22
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

### केजी टू कॉलेज

# समाजकल्याण विभागाचे संकेतस्थळ बंद

## शिष्यवृत्तीचे ऑनलाइन अर्ज भरण्यास अडचण; मुदत वाढवण्याची मागणी

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शिष्यवृत्ती अर्ज भरण्याचे संकेतस्थळ काही दिवसांपासून अचानक बंद पडले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज भरताना अडचणी निर्माण झाल्या आहे. ही समस्या लक्षात घेऊन शिष्यवृत्तीसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची मुदत वाढवून द्यावी, अशी मागणी शिक्षणसंस्था व विद्यार्थ्यांमधून होत आहे.

सामाजिक न्याय विभागाच्या संकेतस्थळाची ही दरवर्षीची अडचण आहे. शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज दाखल करण्यासाठी संकेतस्थळ सुरू केले जाते. परंतु, अनेकदा संकेतस्थळावर अर्ज करताना विद्यार्थ्यांना अडचणी येतात. करोनानंतर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे प्रवेश उशिरा होतात. त्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती अर्जासाठीही विलंब होतो. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने शिष्यवृत्ती अर्ज करण्यासाठी अनेकदा मुदतवाढ देण्यात आली. परंतु, त्यानंतरही अनेक विद्यार्थी अर्ज करू शकलेले नाही. सध्या मागील काही दिवसांपासून संकेतस्थळ पूर्णपणे बंद आहे. यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीचे अर्जाचे संकेतस्थळ तत्काळ सुरू करावे व अर्जास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी शिक्षणसंस्था व विद्यार्थ्यांमधून होत आहे.



शिष्यवृत्ती संकेतस्थळाच्या देखभाल दुरुस्तीचे काम सुरू आहे. त्यामुळे सध्या संकेतस्थळ बंद आहे. सुरू होताच अर्ज करण्याची संधी दिली जाईल.
**-बाबासाहेब देशमुख,** प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग.

### वेळेत अर्ज करणे आवश्यक

विद्यार्थ्यांना केंद्र सरकारकडून ६० टक्के तर राज्य सरकारकडून ४० टक्के शिष्यवृत्ती दिली जाते. ही शिष्यवृत्ती कधीच वेळेत मिळत नाही अशी ओरड असते. परंतु, विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक सत्र सुरू झाल्यावरही वेळेत अर्ज केले जात नसल्याने शिष्यवृत्ती मिळण्यास विलंब होतो. त्यामुळे अनेकदा विद्यार्थ्यांना त्यांचे कागदपत्र मिळण्यास अडचणी येतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वेळेत शिष्यवृत्तीसाठी अर्ज करणे आवश्यक असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

18/02/2025 | Pune | Page : 02
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# 'वैकुंठ मेहता' सहकार विद्यापीठाशी जोडू

### केंद्रीय सहकार राज्यमंत्री मोहोळ यांचे प्रतिपादन

म. टा. प्रतिनिधी, पुणे


मुरलीधर मोहोळ

'सहकार विद्यापीठ स्थापन करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. 'वॅमनिकॉम' संस्थेला या विद्यापीठाशी जोडण्यात येईल. महिला चांगल्या पद्धतीने सहकारी संस्था उभारू आणि चालवू शकतात. सहकार चळवळीत महिलांचे नेतृत्व उभे करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे,' असे प्रतिपादन केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

कृषी बँकिंग प्रशिक्षण व आंतरराष्ट्रीय सहकार केंद्रातर्फे (सीआयसीटीएबी) वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी व्यवस्थापन संस्था ('वॅमनिकॉम') येथे आयोजित सिकटॅब आंतरराष्ट्रीय परिषदेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. ग्रामीण विकास, कृषी आणि वनीकरण मंत्रालय लाओ पीडीआरचे उपमहासंचालक अनोसॅक फेंगथिमावोंग, गांबिया सहकाराचे रजिस्टार अॅबा जिब्रिल संकरेह, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ बँक मॅनेजमेंट संस्थेचे संचालक प्रा. पार्थ रे, इन्स्टिट्यूट ऑफ रुरल मॅनेजमेंट गुजरातचे उमाकांत दास, वॅमनिकॉमच्या संचालिका डॉ. हेमा यादव उपस्थित होते.

'सहकारी बँका आणि सोसायटी सक्षम होण्यासाठी केंद्र सरकार विशेष प्रयत्न करीत आहे. सहकार क्षेत्रामुळे ग्रामीण भागाचा शाश्वत विकास होत आहे. खेडी, शेती आणि शेतकरी समृद्ध करण्यासाठी देशी वाण संवर्धन, जैविक उत्पादनांना प्रोत्साहन आणि निर्यात या तीन घटकांना प्राधान्य दिले जात आहे. शेतकऱ्यांशी संलग्न असलेल्या विकास सोसायटीच्या बळकटीकरणासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. त्यासाठी पेट्रोल पंप, कृषिसेवा केंद्रांना परवानगी देण्यात आली आहे. या माध्यमातून ग्रामीण व्यापाराला चालना मिळाली आहे. शेतमालाला रास्त दर मिळण्यासाठी विकास सोसायट्यांच्या माध्यमातून गोदामे उभारणीला प्रोत्साहन दिले जात आहे,' असे मोहोळ यांनी सांगितले.

### 'पुण्यात मास्क वापरावा लागला'

'मी श्रीलंकेतून आठवड्यापूर्वी भारतात आले. येथे आल्यानंतर मला मास्क वापरावा लागला. मेक इन इंडियाच्या माध्यमातून विकास होत आहे. मात्र, शाश्वत विकास झाला पाहिजे. तुम्ही मंत्री आहात. धोरणकर्ते आहात. माझा हा संदेश पोहचवा,' अशा शब्दांत श्रीलंकेतील सनासा इंटरनॅशनल संस्थेच्या संचालिका समाधिनी किरीवंदेनिया यांनी पुण्यासह भारतातील प्रदूषणावरून सुनावले.

Maharashtra Times 18.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# विधिमंडळाचे कामकाज होणार 'पेपरलेस'

## सर्व माहिती, संदर्भ मिळणार एका क्लिकवर

■ **पांडुरंग म्हस्के**; सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई,ता. १७ : राज्याच्या विधिमंडळाचे कामकाज कागद विरहित करण्यासाठी विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी पावले उचलली असून विधिमंडळाच्या सदस्यांना आता सभागृहात भाषण करताना आपले मुद्दे मांडण्यासाठी कागद घेऊन उभे राहण्याची गरज राहणार नाही. सभागृहात प्रत्येक सदस्यांच्या समोर असलेल्या संगणकावर त्याला पाहिजे असलेले सर्व संदर्भ उपलब्ध होणार आहेत.

नागालँड या ईशान्येकडील राज्याने विधिमंडळ कामकाज पूर्णपणे कागदविरहितपणे करण्याचा पहिला मान मिळवला आहे. राज्याने २०२२ मध्येच आपली विधानसभा 'पेपरलेस' केली आहे. नागालँड विधानसभा सचिवालयाने ६० सदस्यांच्या विधानसभेतील प्रत्येक टेबलावर एक टॅबलेट किंवा ई-बुक जोडला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र विधिमंडळातही हा प्रयोग राबविण्यात येणार आहे. यासाठी नॅशनल ई विधान ॲप्लिकेशन (नेवा) हे युनिकोड सॉफ्टवेअर नागालँडने वापरले आहे. त्यात प्रश्नांची यादी, व्यवसायाची यादी, अहवाल इत्यादी द्विभाषिक म्हणजेच इंग्रजी आणि कोणत्याही प्रादेशिक भाषेतील विविध कागदपत्रे सहज उपलब्ध होतात.

राज्य विधिमंडळाच्या कामकाजात सुसूत्रता येण्यासाठी तसेच कामकाज सुरळीत होण्यासाठी हा प्रयोग राबविण्यात येणार असल्याचे सभापती राम शिंदे यांनी 'सकाळ' श बोलताना सांगितले. सदस्यांच्या टेबलावर असलेल्या प्रत्येक संगणकाला विधिमंडळ ग्रंथालय जोडले जाणार असून. सदस्याला आवश्यक असणारे संदर्भ त्याला ग्रंथालयात न जाता सभागृहात बसल्या जागेवरच उपलब्ध होणार आहेत.

सध्या विधिमंडळाच्या ग्रंथालयाच्या डिजिटायझेशनचे काम सध्या सुरु आहे. ग्रंथालय संपूर्णपणे डिजिटाइझ्ड झाल्यानंतर हा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यरत होणार आहे. त्यासाठी आणखी सहा महिने लागण्याची शक्यता आहे. मात्र त्यापूर्वी आगामी अर्थसंकल्पी अधिवेशनात सर्व सदस्यांना दिवसाची कार्यक्रम पत्रिका, तसेच सभागृहात एखाद्या विषयावर बोलण्यासाठी त्यांना किती वेळ दिला गेला आहे, याबाबतची माहिती त्यांच्या संगणकावर तत्काळ दिली जाणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.



### 'नॅशनल ई-विधान ॲप्लिकेशन'ची मदत

देशातील सर्व विधिमंडळाचे कामकाज कागदविरहित करण्यासाठी डिजिटल विधिमंडळांसाठी एक मिशन मोड प्रकल्प 'नॅशनल ई-विधान ॲप्लिकेशन' हा 'एक राष्ट्र-एक प्रणाली' या संकल्पनेवर विकसित करण्यात आला आहे. संपूर्ण सरकारी कामकाज डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणण्यात येणार आहे. यात राज्य सरकारचे सर्व विभाग डिजिटल पद्धतीने एकमेकांशी जोडून माहितींची देवाणघेवाण करण्यात येणार आहे.

"एखादा सदस्य ज्या विषयावर बोलणार आहे, त्या विषयाची माहिती संबंधित सदस्याने संगणकावर शोधल्यास, त्याला ग्रंथालयात उपलब्ध असलेले सर्व संदर्भ, त्यासंबंधी यापूर्वी सभागृहात झालेल्या चर्चा, राज्य शासनाचे आदेश, केंद्र सरकारची संबंधित विषयावरील धोरणे यांची माहिती तत्काळ उपलब्ध होणार आहे.

**- प्रा. राम शिंदे**, सभापती, विधान परिषद

Sakal 18.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकमत



प्रा. डॉ. संजय तांबट यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचा अधिष्ठाता म्हणून पदभार स्वीकारला.

### प्रा. डॉ. संजय तांबट यांची अधिष्ठातापदी नियुक्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** संज्ञापन व वृत्तपत्रविद्या विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय तांबट यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास शाखेचा अधिष्ठाता म्हणून पदभार स्वीकारला.

यावेळी कुलगुरु प्रा. डॉ. सुरेश गोसावी यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी कुलगुरु प्रा. डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव प्रा. डॉ. ज्योती भाकरे, व्यवस्थापन परिषद सदस्य बागेश्री मंठाळकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा. डॉ. प्रभाकर देसाई, प्रा. विनायक जोशी, प्रा. संदीप नरडेले, प्रा. योगेश बोराटे तसेच प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

या शाखेचे अधिष्ठाता डॉ. प्रभाकर देसाई यांची प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांनी नियुक्ती केल्यामुळे सदर पद रिक्त झाले होते. त्यामुळे सदर शाखेच्या अधिष्ठाता पदावर डॉ. तांबट यांची नियुक्ती करण्यात आली.

> "कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी यांनी माझ्यावर आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेच्या अधिष्ठाता पदाचा अतिरिक्त कार्यभार सोपवला. संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग म्हणजेच रानडेच्या शिक्षकांना प्रथमच अशी संधी मिळत आहे. कुलगुरुंनी माझ्यावर दाखविलेला हा विश्वास सार्थ ठरविण्याचा मी प्रयत्न करीन.
>
> **प्रा. डॉ. संजय तांबट,** अधिष्ठाता, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Pune Main
Page No. 2 Feb 18, 2025
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### पदवी अभ्यासक्रमांमध्ये पर्यावरण विषय अनिवार्यच

- यूजीसीची विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्र लिहून पर्यावरण विषयाचा समावेश करण्याबाबत माहिती

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पर्यावरण विषयाचा पदवी अभ्यासक्रमांमध्ये समावेश करण्याचा निर्णय विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने घेतला आहे. या संदर्भात यूजीसीने सर्व राज्यांच्या शिक्षण सचिवांना आणि विद्यापीठांच्या कुलगुरूंना पत्र लिहून पर्यावरण विषयाचा समावेश करण्याबाबत माहिती दिली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार पर्यावरण विषयाचा पदवी अभ्यासक्रमांमध्ये समावेश करण्यात आला आहे, असे पत्रात नमूद केले आहे. या आदेशानंतर उच्च शिक्षण संस्थांना पदवी अभ्यासक्रमात पर्यावरण विषय समाविष्ट करणे बंधनकारक झाले आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२० च्या शिफारशींनुसार पर्यावरणीय शिक्षणावर आधारित अभ्यासक्रम तयार केला आहे. यामध्ये, अभ्यासाव्यतिरिक्त, विद्यार्थ्यांना शेतात जाऊन केस स्टडीदेखील करावी लागेल. यूजीसीचे सचिव प्राध्यापक मनीष जोशी यांनी यासंदर्भात एक पत्र लिहिले आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० मध्ये पर्यावरणीय शिक्षणालादेखील सर्वात महत्त्वाचे मानले गेले आहे. सर्वोच्च न्यायालयानेही पर्यावरण अभ्यास अनिवार्य मानला आहे. याअंतर्गत, यूजीसीने तज्ज्ञांच्या मदतीने पर्यावरण शिक्षणाचा अभ्यासक्रम तयार केला आहे. पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाबद्दल विद्यार्थ्यांना जागरूक करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. हे समुदाय सहभाग आणि मूल्य-आधारित शिक्षणाच्या आधारावर डिझाइन केले आहे, असे पत्रात नमूद केले आहे.

#### प्रत्येक सेमिस्टरला एक क्रेडिट मिळवणे आवश्यक

पर्यावरण विषयात प्रत्येक सेमिस्टरमध्ये एक क्रेडिट आवश्यक आहे. पर्यावरणीय शिक्षणाच्या अभ्यासक्रमात हवामान बदल, प्रदूषण, कचरा व्यवस्थापन, स्वच्छता, जैवविविधतेचे संवर्धन, जैविक संसाधने आणि जैवविविधतेचे व्यवस्थापन, वन आणि वन्यजीव संरक्षण आणि शाश्वत विकास यासारख्या क्षेत्रांचा समावेश आहे. प्रत्येक सेमिस्टरला एक क्रेडिट मिळवणे आवश्यक असेल. एका क्रेडिटसाठी ३० तासांचा वर्ग अभ्यास आणि फील्ड वर्क आवश्यक असेल.

Pune Edition
Feb 18, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# Edu department begins verifying installation of biometric in jr colleges

**Dheeraj Bengrut**

dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** In a bid to curb the rise of coaching classes' influence on entrance exams such as JEE and NEET and to phase out the integrated junior college system, the Maharashtra school education department has started verifying the installation of biometric systems in junior colleges. A report regarding this has been submitted to the education department, and a decision is expected to be taken soon. In the integrated junior college system, junior colleges are integrally connected with coaching classes and only enrol students for the purpose of appearing for the class 12 board exams. The students are marked present in such colleges even though they attend college only for practicals.

Professor Shantanu Kamthe, a senior education expert from Pune, said, "When students take admission in class 11, either the coaching administration or the students negotiate with the junior colleges. Accordingly, students attend college only for practicals and they are marked present even though they continue their entire education in coaching classes. This results in students attending only coaching classes for both classes 11 and 12."

A senior education official on condition of anonymity said, "Many junior colleges in the state are merely operating on paper, with no actual teaching taking place. To address this, biometric attendance will be made mandatory in junior colleges and students will have to register their biometric attendance when arriving at the college and while leaving it. Based on this attendance, students who complete 75% attendance will be allowed to appear for the class 12 exams. The school education department believes that this system will ensure that students actually attend junior colleges for the educational process apart from exerting control over coaching classes."

Professional degree courses, such as medicine and engineering, offer admission based on entrance exams. As a result, in cities like Pune, Mumbai, Chhatrapati Sambhaji Nagar, Nagpur, Kolhapur, and Amravati, there has been a significant rise in coaching classes for entrance exams like NEET, JEE, and MHT-CET over the last decade. Students are receiving most of their education in coaching classes, attending junior colleges only for formalities and bogus attendance. These junior colleges are in cahoots with the coaching classes.

State school education minister Dada Bhuse said, "Our education department officials are taking a review of junior colleges as it is found that a large number of students are attending coaching classes and not attending the college lectures. Once the final report is submitted, we will take a call on the installation of biometric systems in junior colleges."

Hindustan Times 18.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# UGC's flawed proposals for teacher hiring, promotions



Sukhadeo Thorat

To translate the provisions of National Education Policy (NEP) 2020 into action, the University Grants Commission (UGC) began framing regulations at an unprecedented speed. It discovered an innovative method for fast execution — seeking feedback online even on complex issues that required in-person consultation.

The latest in the series of these quickly produced regulations is the Draft Regulation 2025 on minimum qualifications and eligibility conditions for appointing and promoting teachers in universities/colleges. Some provisions are considered by state governments to have far-fetching consequences, including the appointment of a vice chancellor. However, one controversial issue is the move to junk the 15-year score-based Academic Performance Indicator system (API) used in the promotion of faculty members without first pointing out the limitations of its performance through a study. The move to junk API shifts the promotion and direct recruitment processes away from objectivity to subjectivity in the assessment and evaluation of teachers.

What does the API method connote? The API method quantifies the required qualification, teaching experience, research work, and other academic contributions for the Quality Assessment Committee. This was conceived in 2010 during my tenure as chairman of the UGC, although the Indian Council of Agricultural Research adopted it a long time ago for the agriculture faculty. Why was it introduced? The UGC had pursued the institution of a pay scale for university/college teachers with the ministry of education, on a par with what exists for the Indian Administrative Service. After a lot of persuasion, the ministry agreed under the condition that, like the IAS officers, teachers should be regularly assessed. The UGC agreed to this and developed the API system.

Under the system, for an upward jump in the pay scale for an assistant professor and promotion to associate professor and, further, to professor, a faculty member was required to achieve a minimum API score based on teaching, research, and other academic achievements. The interview would only judge domain knowledge. The second reason was that quantifying academic performance would eliminate subjectivity and bring about objectivity and transparency. It would reduce or eliminate the likelihood of bias, discrimination, nepotism, prejudice, and even corruption. The API system was further improved upon during the 7th Pay Commission's term, and, accordingly, regulations were amended in 2018. The experience of the past 15 years shows that the system has proved fair, non-discriminatory, and transparent. It has also incentivised the teaching community to meet conditions for promotion by undertaking research, improving teaching, and other academic activities, including refresh and orientation courses. It indeed boosted quality and standards and brought in fair inclusion.

IT IS OBVIOUS THAT IN THE ABSENCE OF NUMERICAL MARKING THROUGH THE API SCORE, THE SCOPE FOR PREJUDICE AND DISCRIMINATION IS HIGH

After 15 years of such a positive experience, the UGC, without studying and pointing out the API system's limitations, has proposed to replace it. It is nothing short of a catastrophe and a worrisome shift from a regime of objective promotions to discretionary promotions. By removing quantifiable and independently verifiable parameters, the draft regulation has made the quality of the faculty solely dependent on the selection committee, assuming members possess academic excellence, high moral character, and integrity.

Sadly, this system has seriously compromised merit-based selection in the past. Discretion has rarely been used to ensure quality and promote excellence. It is a euphemism for favouritism and discrimination, not least because of ideological differences. The new regulations' complete reliance on the selection committee's discretion has raised alarm among the faculty. The absence of clear shortlisting criteria and complete control given to the selection committee make the process completely opaque.

Surprisingly, the regulation has introduced nine new qualifications. These are: Innovative Teaching Contributions, Research or Teaching Lab Development, Consultancy/Sponsored Research Funding, Teaching Contributions in Indian Languages, Teaching-Learning and Research in Indian Knowledge Systems, Student Internship/Project Supervision, Digital Content Creation for MOOCs, Community Engagement and Service, and Start-up. None of these categories have been clearly defined. Therefore, the assessment metrics, if any, are left entirely to the selection committee's discretion. These qualifications, with limited bearing on teaching or research, potentially divert attention from the fundamental duties of teaching and research. What we know from experience — for instance, the introduction of experience in Indian Knowledge System as a criterion — is that it is biased towards Brahmanical knowledge systems, with other knowledge systems like Charvaka, Jainism, Buddhism, Sikhism, and other religious sects bypassed. In fact, the regulation makes such a contribution, along with three others from the nine listed, compulsory for appointment under direct recruitment and promotion at all stages.

The selection committee is all-in-all. It has been left to the selection committee's discretion to decide whether the research publications are in peer-reviewed journals, whether the book chapters are in books published by reputed publishers, and whether a candidate's contributions in the nine areas are notable. It is obvious that in the absence of numerical marking through the API score, the scope for prejudice and discrimination is high. The sooner the UGC opens discussions with stakeholders and brings changes in a manner that ensures objectivity, promotes quality, inclusiveness, transparency, and, above all, confidence in the selection process, the better.

*Sukhadeo Thorat is former chairman, University Grants Commission (UGC). The views expressed are personal*

Hindustan Times 18.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

विश्लेषण

# विद्यार्थी उपस्थितीसाठी बायोमेट्रिक प्रणाली का?

चिन्मय पाटणकर
chinmay.patankar
@expressindia.com

**स्पर्धा परीक्षांच्या मार्गदर्शनासाठी 'इंटिग्रेटेड कोचिंग'ला विद्यार्थी पसंती देत आहेत. त्यामुळे ते कनिष्ठ महाविद्यालयात अनुपस्थित राहतात. याला चाप लावण्यासाठी आता महाविद्यालयांत बायोमेट्रिक उपस्थिती नोंदवण्याचा विचार शिक्षण विभागात सुरू आहे...**

**'इंटिग्रेटेड कोचिंग' काय आहे?**

राज्यात मुंबई-पुण्यासह छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर, अमरावती, लातूर अशा शहरांमध्ये नीट, जेईई, एमएचटी-सीईटी अशा प्रवेश परीक्षांची तयारी विद्यार्थी अकरावीपासूनच सुरू करतात. त्यासाठी विद्यार्थी खासगी शिकवणी वर्गांना प्रवेश घेतात. काही शिकवणी वर्गांचे कनिष्ठ महाविद्यालयांशी 'सामंजस्य' असल्याने विद्यार्थ्यांची कनिष्ठ महाविद्यालयातील उपस्थिती परस्पर नोंदवली जाते. विद्यार्थी पूर्ण वेळ शिकवणी वर्गात उपस्थित राहून केवळ विज्ञान प्रात्यक्षिकांसाठी महाविद्यालयात जातात. अशा शिकवणी वर्गांना 'इंटिग्रेटेड कोचिंग क्लास' असे म्हटले जाते. त्यामुळे महाविद्यालयातील अध्यापनाकडे विद्यार्थी पाठ फिरवतात. त्यामुळे कनिष्ठ महाविद्यालयांतील विद्यार्थी उपस्थिती कमी होत आहे. शहरांतील हे लोण आता ग्रामीण भागांतही पसरू लागले आहे.

**बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंद का?**

राज्य मंडळाच्या नियमानुसार कनिष्ठ महाविद्यालयात ७५ टक्के उपस्थिती बंधनकारक आहे. असे असतानाही, विद्यार्थी महाविद्यालयाकडे पाठ फिरवून परस्पर शिकवणी वर्गात जातात. मात्र, शिकवणी वर्ग आणि महाविद्यालय यांच्यातील साट्यालोट्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती नोंदवली जाते. अशा प्रकारांना चाप लावण्यासाठी आता कनिष्ठ महाविद्यालयांत बायोमेट्रिक उपस्थिती नोंदवण्याची चाचपणी शिक्षण विभागाकडून करण्यात येत आहे. बायोमेट्रिक प्रणालीत उपस्थिती नोंदवली जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे फेस रेकग्निशन किंवा बोटांचे ठसे आवश्यक असतात. त्यामुळे विद्यार्थी स्वतः वर्गात उपस्थित असल्याशिवाय बायोमेट्रिक प्रणालीद्वारे त्याची उपस्थिती नोंदवणे शक्य होणार नाही. त्यामुळे उपस्थिती नोंदवली जाण्यासाठी विद्यार्थ्याला स्वतः वर्गात उपस्थित राहावेच लागेल. ही बाब विचारात घेऊन कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना बायोमेट्रिक प्रणालीने उपस्थिती नोंदवणे बंधनकारक करण्याचा विचार शिक्षण विभागाच्या स्तरावर सुरू आहे.

**या पूर्वीही बायोमेट्रिक हजेरी?**

राज्यातील अनुदानित प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांमध्ये बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवण्याचे निर्देश यापूर्वीच देण्यात आले आहेत. मात्र, या निर्णयाची अद्याप तितकीशी अंमलबजावणी झालेली नाही. अलीकडेच राज्यातील शाळांमध्ये बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवली जात असल्याबाबतचा अहवाल सादर करण्याचे निर्देश शालेय शिक्षण विभागाने शिक्षण आयुक्तांना दिले होते. तसेच विनोद तावडे शिक्षणमंत्री असतानाच्या काळात कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवण्याबाबत चर्चा झाली होती.

**'इंटिग्रेटेड कोचिंग'ची देशभरातच समस्या?**

इंटिग्रेटेड कोचिंगसंदर्भातील एक प्रकरण नुकतेच समोर आले. जेईई मेन्स परीक्षेत दिल्लीतील एक विद्यार्थी गुणवंत ठरल्याचे वृत्त माध्यमांत प्रसिद्ध झाले. त्यानंतर सीबीएसईने त्या संदर्भात स्पष्टीकरण देणारे परिपत्रक प्रसिद्ध केले. संबंधित विद्यार्थी शिकत असलेल्या शाळेची मान्यता सीबीएसईने रद्द केलेली आहे. सीबीएसईच्या दोन सदस्यीय समितीने संबंधित शाळेची तपासणी केली असता शाळेतील अन्य अनियमिततांसह विद्यार्थी अनुपस्थित असल्याचे आढळून आले होते. शाळेच्या शैक्षणिक कार्यपद्धतीबाबत चिंता निर्माण झाल्याने संबंधित शाळेची मान्यता रद्द करण्यात आली. शाळेत अनुपस्थित राहणे हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील तरतुदींनुसार अपेक्षित नाही. शाळेत अनुपस्थित राहण्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर परिणाम होत असल्याचे सीबीएसईने परिपत्रकात नमूद केले आहे.

**तज्ज्ञांचे म्हणणे काय?**

मूल मागे पडू नये म्हणून स्पर्धा परीक्षांसाठी शिकवणी वर्ग लावण्यास महत्त्व निर्माण झाले. कनिष्ठ महाविद्यालय आणि शिकवणी वर्ग दोन्ही करताना विद्यार्थ्याला वेळ उरत नाही. त्यातून इंटिग्रेटेड कोचिंग सुरू झाले. मात्र, आता कनिष्ठ महाविद्यालयांतील उपस्थिती नोंदवण्यासाठी बायोमेट्रिक पद्धत वापरण्याचा धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. तसेच केंद्र सरकारने १६ वर्षांपर्यंत कोणतीही शिकवणी न लावण्याबाबत घेतलेल्या निर्णयाची कठोर अंमलबजावणी देशभरात करावी लागेल. तरच देशभरात समानता येईल, असे माजी शिक्षण संचालक दिनकर टेमकर यांनी सांगितले. बायोमेट्रिक पद्धतीने उपस्थिती नोंदवण्याची कल्पना स्वागतार्ह आहे. विद्यार्थ्यांनी शिकवणीसाठी महाविद्यालयाकडे पाठ फिरवणे योग्य नाही. मुळात शिकवणी वर्ग बंधनकारक नाही. शिकवणी आवश्यक वाटत असल्यास ती महाविद्यालयाच्या वेळेव्यतिरिक्तच्या वेळेत असावी, असे स्पष्ट मत कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाचे समन्वयक प्रा. मुकुंद आंधळकर यांनी मांडले.

18/02/2025 | Mumbai(Pune) | Page : 7
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकमत



## मातृभाषा दिन साजरा करा : यूजीसी

**मुंबई :** देशभरातील उच्च शिक्षण संस्थांमध्ये २१ फेब्रुवारी हा मातृभाषा दिवस उत्साहात साजरा करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत. देशभरातील विविध मातृभाषांचे जतन करण्यासह त्यांचा प्रचार आणि प्रसार यातून वाढीस लागेल, असे आयोगाने म्हटले आहे. मातृभाषेच्या अनुषंगाने चर्चासत्रे, विविध स्पर्धा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्याच्या सूचना उच्च शिक्षण संस्थांना दिल्या आहेत.

Pune Main
Page No. 3 Feb 19, 2025
Powered by: erelego.com

आणि दैनंदिन जीवनात कला स्पष्टपणे दिसत; त्यामुळे भारतीय संस्कृतीत कलेला एक विशेष स्थान आहे. परंपरेने दिलेल्या या स्थानाला हळूहळू व्यावसायिकतेची जोड

भारतातील चित्रकलेचा इतिहास हजारो वर्ष जुना आहे मधुबनी, वारली, कलमकारी, तंजावर अशा चित्रशैली आजही घरांच्या भिंतींवर आणि दैनंदिन वस्तूंवर दिसतात. प्राचीन काळी आदिवासी लोकांचे दैनंदिन जीवन. त्यानंतरच्या काळात रामायण, महाभारत, जैन बौद्ध आदी धार्मिक कथा. पुढे राजेरजवाड्यांचे पराक्रम, युद्ध अशा

# विद्यापीठाचे खास पोर्टल

### इंटर्नशिपसाठी नोंदणी करा; स्टायपेंडही मिळणार

हर्ष दुधे

'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा'ने निर्मिलेल्या इंटर्नशिप पोर्टलवर विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याला सुरुवात केली आहे. या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणे इंटर्नशिपची संधी आणि स्टायपेंडही मिळणार आहे. अशा पद्धतीने विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप पोर्टल सुरू करणारे 'पुणे विद्यापीठ' हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे.

'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'मध्ये (एनईपी) इंटर्नशिपला महत्त्व देण्यात आले आहे. त्यानुसार पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना इंटर्नशिप अनिवार्य करण्यात आली आहे. या इंटर्नशिपमुळे विद्यार्थ्यांना रोजगार आणि चांगल्या नोकऱ्या मिळण्यासाठी मदत होते. त्याचप्रमाणे इंटर्नशिप करतांना स्टायपेंडही मिळतो. या संपूर्ण प्रक्रियेत उद्योगांना आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची निर्मितीही होते. मात्र, विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी मिळवण्यात अडचणी येतात.



यावर उपाय म्हणून पुणे विद्यापीठाने काही महिन्यांपूर्वी स्वतःचे इंटर्नशिप पोर्टल विकसित केले आहे.

या पोर्टलवर आतापर्यंत पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील साधारण ५०० औद्योगिक आस्थापनांनी नोंदणी केली असून त्यापैकी २२५ हून अधिक आस्थापनांनी इंटर्नशिपची माहिती द्यायला सुरुवातही केली आहे. विद्यार्थ्यांनी या पोर्टलवर विनामूल्य नोंदणी करून, आपला आयडी आणि पासवर्ड तयार करायचा आहे. त्यानंतर अभ्यासक्रमनिहाय दिसणाऱ्या आस्थापनांमध्ये

**"राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्वतंत्रपणे इंटर्नशिप पोर्टलची निर्मिती केली आहे. विद्यार्थ्यांना इंटर्नशिपची संधी मिळण्याच्या दृष्टिकोनातून हा प्रयत्न आहे. या पोर्टलवर औद्योगिक आस्थापनांची संख्या २०००पर्यंत नेण्याचे पुणे विद्यापीठाचे ध्येय आहे. या पोर्टलवर विद्यार्थ्यांची नोंदणी सुरू असून अधिकाधिक विद्यार्थ्यांनी पोर्टलर नोंदणी करावी. त्यासाठी कॉलेजांमधील नोडल अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मदत करावी.**

**- डॉ. पराग काळकर,**
प्र- कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

कॉलेजमार्फत इंटर्नशिपसाठी नोंदणी करायची आहे. या इंटर्नशिपसाठी निवड झालेल्या काही विद्यार्थ्यांना स्टायपेंडही मिळण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे इंटर्नशिप यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या; तसेच आस्थापनांची मनुष्यबळाची गरज पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरी मिळण्याचीही शक्यता असल्यामुळे विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलात आणि संलग्न महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी https://sppuinternship.unipune.ac.in/ या इंटर्नशिप पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

**Harsh.Dudhe**@timesofindia.com

Maharashtra Times 19.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# शिवरायांवर एमए अभ्यासक्रम

### पुणे विद्यापीठात येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरुवात

म. टा. प्रतिनिधी, पुणे

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचे 'व्हिजन अँड नेशन बिल्डिंग'वर पूर्ण वेळ एमए अभ्यासक्रम येत्या शैक्षणिक वर्षापासून सुरू केला जात आहे. या निमित्ताने शिवरायांच्या थोर कार्याचा सविस्तर अभ्यास आणि संशोधन करण्याची संधी आहे.

पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागात सध्या शिवरायांचे 'व्हिजन अँड नेशन बिल्डिंग' असा पीजी डिप्लोमा कोर्स सुरू आहे. त्यामुळे विद्यापीठाने पूर्ण वेळ एमए अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती विभागप्रमुख डॉ. विजय खरे यांनी दिली.

> छत्रपती शिवाजी महाराजांचे 'व्हिजन अँड नेशन बिल्डिंग' हा पीजी डिप्लोमा अभ्यासक्रम गेल्या चार वर्षांपासून यशस्वी सुरू आहे. त्यामुळे यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून आम्ही दोन वर्षांचा एमए अभ्यासक्रम सुरू होत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांवर भारतात सुरू होणारा हा पहिला पूर्ण वेळ पदव्युत्तर अभ्यासक्रम राहणार आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या माहितीबाबत विभागाशी संपर्क साधता येईल.
>
> – डॉ. विजय खरे, प्रमुख, संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### 'सीईटी'द्वारे प्रवेश होणार

पुणे विद्यापीठात येत्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून सुरू होणाऱ्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश हे विद्यापीठाच्या 'सीईटी'द्वारे होणार आहेत. याचे अर्ज भरण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी एकूण २० जागा आहेत, अशी माहिती विद्यापीठाच्या प्रशासनाने दिली आहे.

भारतीय राष्ट्रउभारणीची प्रक्रिया आणि त्याला आकार देण्यात छत्रपती शिवरायांच्या भूमिकेचा सर्वकष आढावा घेण्यासाठी हा अभ्यासक्रम तयार केला आहे. यात छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, युद्ध, रणनीती आणि प्रशासन याविषयीचे त्यांचे विचार, राष्ट्रीय सुरक्षा आणि सामरिक विचारसरणीच्या त्यांच्या दृष्टिकोनाची प्रासंगिकता अशा मुद्द्यांचा समावेश आहे. शिवरायांचा भारतीय राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेवर प्रभाव, सतराव्या शतकातील दख्खनच्या भौगोलिक, सामाजिक आणि राजकीय वातावरणाबद्दलही अभ्यास करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे थोर पुरुषाच्या दृष्टिकोनाचा शोध घेण्यात सहभागी होण्याचे आवाहन डॉ. खरे यांनी केले आहे.

Maharashtra Times 20.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# भारतीय ज्ञानप्रणालीवर संशोधनास फेलोशिप

## नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांना निधी देण्यात येणार

**पुणे, ता. १९ : केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या भारतीय ज्ञानप्रणाली विभागाने 'पोस्टडॉक्टरल फेलोशिप' कार्यक्रम हाती घेतला आहे. या अंतर्गत भारतीय ज्ञानप्रणालीत विद्वत्तापूर्ण संशोधन आणि संशोधन पुनरुज्जीवन करू इच्छिणाऱ्या संशोधकांनाही फेलोशिप दिली जाणार आहे.**

भारतीय ज्ञानप्रणाली विभागातर्फे नावीन्यपूर्ण संशोधन प्रकल्पांना निधी देण्यात येणार आहे. त्या अंतर्गत शिक्षण मंत्रालयातर्फे तीन फेब्रुवारीला फेलोशिपची घोषणा झाली. देशाचा समृद्ध बौद्धिक वारसा जाणून घेत त्यावर संशोधन करण्याची अनोखी संधी यानिमित्ताने नवसंशोधकांना मिळणार आहे.

वैदिक तत्त्वज्ञान व ज्ञानाने आकलनीय विज्ञान, इतिहास व सभ्यता, सांस्कृतिक, गणित, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्रीय, राज्यशास्त्र, वैद्यकीय व आरोग्य, अर्थशास्त्र, कृषी, पशुवैद्यकीय, वास्तुशास्त्र, शिल्प, शिक्षणशास्त्र अशा विविध भारतीय ज्ञानप्रणालीवर आधारित संशोधनासाठी फेलोशिप दिली जाणार आहे.

### निकष काय?

- भारतीय नागरिक किंवा परदेशस्थ भारतीय नागरिक पात्र
- मान्यताप्राप्त विद्यापीठातून पीएच.डी. पदवी प्राप्त केलेली असावी
- पीएच.डी.चा प्रबंध सादर केलेला असून पदवीच्या प्रतीक्षेत असणारे
- अर्ज करताना अर्जदाराचे वय कमाल ३५ वर्ष असावे
- कोणत्याही अधिकृत संस्थेशिवाय स्वतंत्रपणे संशोधन करणारे, पदवी-पदव्युत्तर शिक्षण घेणारे विद्यार्थी अपात्र

एक लाख रुपये प्रतिमहिना, काही परिस्थितीत वार्षिक दोन लाख रुपये दोन वर्षांसाठी, असे फेलोशिपचे स्वरूप असणार आहे. अधिकृत भारतीय शिक्षण संस्थेतील पीएच.डी. पूर्ण केलेली असणारे संशोधक, प्राध्यापक फेलोशिपसाठी 'मेंटॉर' असणे आवश्यक आहे.

अधिक माहितीसाठी क्यूआर कोड स्कॅन करावा.

Sakal 20.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनाही अपार आयडी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र शासनाचा अपार आयडी हा महत्त्वाकांक्षी उपक्रम असून, शालेय विद्यार्थ्यांबरोबर आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्याच्या सूचना सर्व विद्यापीठांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे फेब्रुवारी महिनाअखेरपर्यंत राज्यातील सर्व विद्यापीठांशी संलग्न महाविद्यालयांमधील विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्याचे काम करावे लागणार आहे. परिणामी, सर्व विद्यापीठ व महाविद्यालयांचे काम चांगलेच वाढणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा भाग म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांचा वन नेशन वन स्टुडन्ट आयडी असणे गरजेचे आहे. या उद्देशाने केंद्र शासनाने सर्व राज्यांना शालेय विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्याबाबत २०२३ मध्येच सूचना दिल्या आहेत. पुढील काळात प्रत्येक विद्यार्थ्याकडे जागतिक नागरिक म्हणून पाहिले जाणार आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांचा एक स्वतंत्र युनिक आयडी असावा. या युनिक आयडीमध्ये विद्यार्थ्यांच्या परीक्षेचा निकाल, समग्र अहवाल कार्ड, विद्यार्थ्यांनी इतर उपक्रमात केलेली कामगिरी, क्रीडा, कौशल्य प्रशिक्षण अधिक क्षेत्रात विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश आदींची माहिती विद्यार्थ्यांच्या अपार आयडीमध्ये दिली जाणार आहे.

अपार आयडीला विद्यार्थ्यांचा आधार क्रमांक जोडला जाणार आहे. परंतु त्यासाठी पालकांची संमती घेणे गरजेचे आहे. केंद्रीय शिक्षण विभागाने शालेय शिक्षण विभागाला पाठविलेल्या परिपत्रकात असे स्पष्ट केले आहे. परंतु, राज्याच्या उच्च शिक्षण विभागातर्फे अद्याप अपार आयडी काढण्यासंदर्भात कोणतेही पत्रक प्राप्त झाले नसल्याचे बोलले जात आहे. असे असले तरी जानेवारी महिनाअखेरीस मुंबई येथे झालेल्या विद्यापीठांच्या सर्व कुलगुरूंच्या बैठकीत उच्च शिक्षण विभागाने या संदर्भातील सूचना दिल्या असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे राज्यातील सर्व विद्यापीठे अपार आयडी काढण्याच्या मागे लागले आहेत. राज्यातील काही विद्यापीठांनी विद्यार्थ्यांचे अपार आयडी काढण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. येत्या २८ फेब्रुवारीपर्यंत विद्यार्थ्यांचे अपार आयडी तयार करण्याचे काम पूर्ण करावे लागणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवसांत विद्यापीठ व महाविद्यालयांना अपार आयडी काढण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मागे पाठपुरावा करावा लागेल अशी स्थिती निर्माण झाली आहे. परंतु अद्याप अनेक विद्यापीठांनी संलग्न महाविद्यालयांना अपार आयडी काढण्यासंदर्भात कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत. त्यामुळे इतक्या कमी कालावधीत हे काम कसे पूर्ण होणार ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. हे अपार आयडी कसे काढावेत आणि त्यासाठी विद्यार्थी व पालकांची संमती घ्यावी किंवा नाही, याबाबत शासनाकडून अद्याप कोणतेही स्पष्टीकरण प्राप्त झालेले नाही. त्यामुळे पुढील काळात याबाबत गोंधळ निर्माण होण्याची शक्यता आहे.

Pune Edition
Feb 20, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
CITY_20FEB_2025_005
20 Feb 2025

# अनुदानाचा तिढा सुटता सुटेना

- ७८ महाविद्यालयांचा प्रश्न
- चोवीस वर्षात अनुदानाचा एक रुपयाही मिळाला नाही
- सहायक प्राध्यापकांच्या संतप्त भावना

(डॉ. राजू गुरव)

**पुणे, दि. १९** - राज्यातील कायम विनाअनुदानित धोरण लागू होण्यापूर्वी अस्तित्वात आलेल्या ७८ कायम विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांना अनुदान देण्याबाबतचा विषय गेल्या २४ वर्षांपासून प्रलंबितच पडला आहे. अनुदान द्यायचे की नाही याबाबत उच्च व तंत्र शिक्षण आणि वित्त विभागाने एकदाचा काय तो सोक्षमोक्ष लावण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. विनाकारण अनुदानाची आस दाखवित सहायक प्राध्यापकांना खेळवत ठेवण्याचे राजकारण आता थांबले पाहिजे.

राज्य शासनाने २४ नोव्हेंबर २००१ रोजी कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारल्यानंतर मान्यता देण्यात आलेल्या एकाही महाविद्यालयाला अनुदान दिलेले नाही. कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारण्यापूर्वी विनाअनुदानित महाविद्यालय म्हणून मान्यता असलेल्या महाविद्यालयांना अनुदान द्यावे, अशी मागणी शासनाकडे अनेकदा करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य कृती समितीच्यावतीने महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापकांनी अनेकदा तीव्र आंदोलने केली. मात्र शासनाने ठोस निर्णय काही घेतलाच नाही. देवेंद्र फडणवीस, अजित पवार, चंद्रकात पाटील या दिग्गज मंत्र्यांनी केवळ आश्वासने देत गाजर दाखविले आहे. वित्त विभागाने अनुदानाची फाईल फेटाळल्याची माहिती मिळाल्याने सहायक प्राध्यापकांकडून संतप्त भावना व्यक्त करण्यात येत आहेत.

वित्त विभागाच्या दुर्लक्षामुळे महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक व कर्मचाऱ्यांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागत असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह करणेही मुश्किल बनले आहे.

> राज्य शासनाने ७८ महाविद्यालयांना तात्काळ १०० टक्के अनुदान लागू करण्याची गरज आहे. आता पुन्हा एकदा सहायक प्राध्यापक मुख्यमंत्र्यांची भेट घेणार असून, त्यांच्याकडे पुन्हा एकदा व्यथा मांडणार आहेत. महिनाभरात अनुदानाचा तिढा न मिटल्यास थेट उच्च न्यायालयातच दाद मागण्यात येणार आहे.
>
> – **डॉ. भाऊसाहेब झिरपे,** अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कृती समिती

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 21 Feb 2025_013
21 Feb 2025

# अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांना चाप

## डिजिटल स्वाक्षरीचे प्रमाणपत्र काढावे लागणार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २०** - राज्यातील अल्पसंख्याक संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक, भाषिक अल्पसंख्याक दर्जाचे प्रमाणपत्र देण्यात येते. शासनाचे विशेष लाभ घेण्यासाठी या प्रमाणपत्राचा संबंधित संस्था गैरवापर करीत असल्याच्या तक्रारी शासनाकडे आल्याने याला चाप बसविण्यासाठी अशा संस्थांनी ऑनलाइन डिजीटल स्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याचे बंधन शासनाकडून घालण्यात आले आहे.

शैक्षणिक संस्थांना अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्यासाठी यापूर्वीचे सर्व शासन निर्णय रद्द करून ऑनलाइन अर्जाबाबतची कार्यपद्धती ठरविण्यात आली आहे. अल्पसंख्याक दर्जा प्रदान करण्याबाबतची सेवा ही लोकसेवा हमी कायद्याअंतर्गत समाविष्ट आहे. ही सेवा जुलै, २०१७ पासून आपले सरकार या पोर्टलवर ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे. ऑफलाइन अल्पसंख्याक दर्जा प्राप्त शाळा, महाविद्यालये यांचा तपशिल अल्पसंख्याक विकास विभागाकडे उपलब्ध होत नाही. त्यामुळे गैरवापरास प्रतिबंध घालण्याची गरज निर्माण झाली आहे.

**सहा महिन्यांची मुदत...**

ज्या शैक्षणिक संस्थांनी धार्मिक, भाषिक अल्पसंख्याक दर्जा प्राप्त करून घेतला आहे, अशा सर्व शैक्षणिक संस्थांना आपले सरकार या संकेतस्थळाच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने अर्ज करून डिजिटल स्वाक्षरी असलेले अल्पसंख्याक दर्जा प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे लागणार आहे. याबाबतचे आदेश सचिव रुचेश जयवंशी यांनी काढले आहेत.

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 21Feb 2025_004
21 Feb 2025

# मातृभाषेचा जागर

**विशेष**

- राजीव पाटसकर

**२१ फेब्रुवारी हा दिवस जागतिक मातृभाषादिन म्हणून साजरा केला जातो. आपली मातृभषा मराठी आहे. मराठी भाषेचा वापर दैनंदिन जीवनात केला गेला पाहिजे, त्याचबरोबर योग्य प्रकारेही केला गेला पाहिजे.**




मराठी म्हटलं की अत्रे, गदिमा, पुलं, शांता शेळके अशा असंख्य मातब्बर, प्रतिभावंत साहित्यिक, लेखक, कवी, कवयित्रींची नावं स्मृती पटलावर रेंगाळतात; कारण पुढील कित्येक शतकांनंतरही त्यांच्या अजरामर कलाकृती अमिट राहणार आहेत! पुलंना बंगाली, कानडी भाषा उत्तम अवगत होती. असो, समाज माध्यमासाठी बोलीभाषा अत्यावश्यकच असून, शब्दच्छल होऊ नये, नियमांचा भंग होऊ नये यासाठी प्रमाणभाषेची अत्यावश्यकता आहे.

महाराष्ट्रात प्रामुख्याने अहिराणी, वैदर्भीय, वराडी, कोकणी, मालवणी अशा अनेकविध बोलीभाषा बोलल्या जातात. या बोलीभाषा ऐकताना मजा येते, त्या-त्या भाषेचा बाज -लहेजा-उच्चारण पद्धत मजेशीर वाटते. आपल्या देशात एक हजाराहून अधिक भाषा बोलल्या जातात. दर १२ कोसानंतर बोलीभाषा बदलत जाते. तिचा पोत, लहेजा बदलत जातो हे सर्वज्ञात आहे. परंतु मनातील विचार, भावना व्यक्त करण्यासाठी मातृभाषेतूनच दर्जेदार आणि परिणामकारक शिक्षण मिळणं आणि घेणं क्रमप्राप्त ठरतं. त्यासाठीच थोर शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी बालगंधर्व रंगमंदिरात एका कार्यक्रमात आवर्जून सांगितले होतं की, मी नगरपालिकेच्या मराठी माध्यमाच्या शाळेत शिकलो. अर्थात, अशी असंख्य उदाहरणे आपल्या आसपास आहेत. लोकसभेच्या माजी अध्यक्षा सुमित्रा महाजन यांनी मागील वर्षी फर्गसन महाविद्यालयात एका कार्यक्रमात मिश्किलपणे सांगितलं होतं की, मराठी माणसाने मराठीत बोलावे! ही पाटी पुण्यात लावण्याची वेळ येणं म्हणजे परिस्थिती बरीच बदललेली आहे; त्यामुळे मी आता अधूनमधून हिंदीतही बोलेन! मराठी माणसानं मराठी माणसाशी मराठीतच बोलायला हवं. तिकडं इंदूरमध्ये आम्ही ही प्रथा आजही जोपासली आहे.पुणेकरांनी ही प्रथा जोपासावी! असं सुमित्राताईंना सांगावंस वाटलं, यातच सर्व काही आलं.

आपण मातृभाषेतील शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यायला हवं. त्यासाठी पालकांनी मानसिकता बदलायला हवी. केंद्र शासनाच्या त्रिभाषा सूत्रानुसार शासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषा अनिवार्य करण्यात आली आहे. अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल, असे शासकीय आदेश आहेत; अशा बातम्या झळकताहेत. संगणकाच्या सार्वत्रिक सर्रास वापरानं, हस्ताक्षरात लिहिणं दुरापास्त होत चाललंय; पण सुवाच्य सुरेख हस्ताक्षर मनाच्या एकाग्रतेसाठी, चित्तशुद्धीसाठी, नीटनेटकेपणासाठी सुलेखन आत्मसात करायला हवं. समर्थ रामदासस्वामी म्हणतात, शुद्ध नेटके ल्याहावे, लेहोन शुद्ध शोधावे, शोधून शुद्ध वाचावे, चुको नये! यमक-अनुप्रासयुक्त नादानुकूल शब्दरचना हे समर्थांच्या साहित्याचं बलस्थान आहे.

रत्नागिरीत स्थानबद्ध असताना स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिपी शुद्धीचं कार्य नेटानं चालवलं होतं; परिणामी देवनागरी लिपी मुद्रण सुलभ, शिक्षण सुलभ नि स्वस्तही आहे हे त्यांनी सप्रमाण सिद्ध केलं! संत ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकोबाराय, रामदास स्वामी अशा अनेकविध संतांनी मराठी भाषा समृद्ध केली. संत नामदेवांच्या तर शिखांच्या गुरू ग्रंथ साहिबमध्ये ओव्याही सन्मानित झालेल्या आहेत. छत्रपती शिवरायांनी राज्यकारभारासाठी अधिकृत भाषा म्हणून मराठी भाषेचा गौरव करून, राज्यभाषा कोश सिद्ध करून घेतला.

अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर इथं मराठी भाषा विद्यापीठाचं शैक्षणिक वर्ष आणि नवे अभ्यासक्रम जून २०२४ पासून सुरू झाले आहेत. ही त्यातल्या त्यात कृतीशील अशी अभिमानास्पद बाब आहे. वस्तुत: आज मितीला सर्वत्र मराठी भाषा पर्यायी म्हणून वापरली जाते.

भाषा टिकली तर संस्कृती टिकेल, हे प्रथम लक्षात यायला हवं; त्यासाठीच मराठी माणसांची सांस्कृतिक अस्मिता जागृत झाली पाहिजे. कौशल्यविकास आणि उद्योजकता मंत्रालय तसेच एनएसडीसी यांनी स्थानिक भाषेत कौशल्य विकास अभ्यासक्रम उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत; त्याचाही लाभ मिळू शकेल! मातृभाषेचा आग्रह म्हणजे अन्य भाषेचा किंवा अन्य भाषिकांचा आपण दुस्वास करतोय असं नाही; मूलतः भाषिक भेदभाव, प्रांतभेद, राज्य भेदभाव हे महत्त्वाचे नसून, बौद्धिक-मानसिक-शैक्षणिक-सामाजिक-सांस्कृतिक-साहित्यिक-सार्वजनिक दृष्टीने स्वभाषा हेच शिक्षणाचं नैसर्गिक माध्यम असून, अन्य भाषा शिकण्यासाठीही स्वभाषेवरील प्रभूत्व पायाभूत आणि पूरक ठरेल. घरात बोलली जाणारी भाषा आणि शालेय शिक्षणाची भाषा एकच असल्यास आकलनशक्ती वाढण्यास आणि भावनिक बुद्धिमत्ता वाढण्यास मदत होईल. भाषेची अत्युत्तम पायाभरणी होईल. मुख्यत: मातृभाषेतील शिक्षण शिक्षकांना शिकवण्यास सोपं आणि शिकणाऱ्यांनाही सुलभ आहे. एकमेकांबरोबर सुसंवाद साधण्यासाठी स्वभाषाच सहज-समर्पक-सुकर-सुसंगत-सुसंवादी ठरते! स्वभाषेतच सर्जनशीलता, संवेदनशीलता, कलात्मकता, विश्लेषण क्षमता, रसग्रहण करणं सुलभ जातं; परंतु दुकानांच्या पाट्या फोडून किंवा अन्य भाषिकांचा दुस्वास करून, परभाषिकांना मारपीट करून मराठी भाषा समृद्ध होणार नाही! भाषा शिकताना श्रवण, वाचन, लेखन, संभाषण आदी अंगांनी आपण विचार करतो; परिणामी चिंतन-मनन-अवलोकनाची सवय लागते. तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता साहित्य वाचनातून वृद्धिंगत होत राहते.आमच्या पिढीने मोबाइल नसल्याने म्हणा हवं तर... सातत्यानं भरपूर कीर्तनं, भाषणं, व्याख्यानं, चर्चासत्रं, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा, प्रवचनं, भारुडं, लोककला इत्यादी सगळ्यांचा मनसोक्त आस्वाद घेतला आहे. बरंच ऐकलं-पाहिलं-अनुभवलं असल्यानंच शब्दसंग्रह वाढत जातो.

मातृभाषेचा आग्रह धरताना विविधतेतून एकता, सामाजिक समरसता, राष्ट्रीय एकात्मतेला कुठेही बाधा येता कामा नये. प्रांत वा भाषा असा भेद करून, कुणीही या विषयावर राजकारण मात्र करू नये. एखादे वाचनीय वृत्तपत्र घरी असावे किंवा जवळच्या ग्रंथालयाचं सदस्यत्व घेतल्यास घरातील दैनिक-ग्रंथ- पुस्तकांमुळे मुलंही वाचण्यात रमतील; यात शंकाच नाही; परिणामी वाचनसंस्कृतीही जोपासली जाईल.

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 21 Feb 2025_015
21 Feb 2025

# नवीन शैक्षणिक धोरणाला रिक्त पदांचा अडसर

## सहायक प्राध्यापकांच्या ११,९१८ जागा वित्त विभागाच्या मान्यतेअभावी रिकाम्या

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २०** - राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांतील सहायक प्राध्यापकांच्या तब्बल ११ हजार ९१८ जागा अद्यापही रिक्तच आहेत. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीत हा मोठा अडसर निर्माण झाला असून, रिक्त जागा भरण्याबाबतच्या प्रस्तावाला मान्यतेसाठी वित्त विभागाला मुहूर्त कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने शिक्षण व्यवस्थेत टप्प्याटप्प्याने आमूलाग्र बदल करावे लागणार आहेत. त्यासाठी महाविद्यालये, विद्यापीठांमध्ये आवश्यक तेवढे सहायक प्राध्यापक उपलब्ध असले पाहिजेत. विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) रिक्त जागा भरण्याबाबतच्या सूचना राज्य शासनाला दिल्या आहेत.

राज्यातील अनुदानित महाविद्यालयांसाठी सहायक प्राध्यापकांच्या ३१ हजार १८५ जागा मंजूर आहेत. त्यातील १९ हजार २६७ जागा भरलेल्या आहेत. उर्वरित सर्व जागा अद्यापही भरलेल्या नाहीत. यात मुंबई - १२४३, पनवेल - ८८४, पुणे - २१६७, कोल्हापूर- १५८३, सोलापूर- ३८४, जळगाव - ११४७, छत्रपती संभाजीनगर- ९६२, नांदेड- ८२७, अमरावती- १२९३, नागपूर- १४२८ याप्रमाणे जागा रिक्त आहेत. सेट, नेट, पीएच. डी. झालेले उमेदवार मोठ्या संख्येने उपलब्ध असले, तरी नोकरी नसल्याने त्यांना बेरोजगारीच्या संकटाचा सामना करावा लागत आहे.

बहुसंख्य महाविद्यालयांत सहायक प्राध्यापकांना तासिका तत्त्वावर काम करावे लागत आहे. काहींना पूर्ण वेळ हंगामी तत्त्वावर काम करावे लागते. मानधनाच्या तुलनेत संबंधित सहायक प्राध्यापकांकडून भरमसाट कामे करून घेतली जातात. संस्थाअंतर्गत वाद, न्यायालयीन प्रकरणे यामुळे काही संस्थांच्या महाविद्यालयातील सहायक प्राध्यापकांची पदे भरण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. काही महाविद्यालयांनी अद्यापही रोस्टर तपासणीची प्रक्रिया पूर्ण करून घेतलेली नाही.

### प्रस्तावावर अद्याप निर्णय नाही

राज्यातील उच्च शिक्षण विभागाने सहायक प्राध्यापकांच्या ४ हजार ३०० एवढ्या रिक्त जागा भरण्यास मंजुरी मिळावी, यासाठीचा प्रस्ताव गेल्या महिन्यात वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठविला आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून रिक्त पदे भरण्याबाबत सकारात्मकता दाखविण्यात आली आहे. मात्र, उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री अजित पवार यांच्याकडून अद्यापही संबंधित प्रस्तावाला मान्यता मिळालेली नाही. या मान्यतेकडे बेरोजगार उमेदवारांचे लक्ष लागलेले आहे.

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
City 21 Feb 2025_013
21 Feb 2025

# सहायक प्राध्यापक पदासाठी सेट परीक्षा दि.१५ जूनला

**पुणे, दि. २०** - सहायक प्राध्यापक पदासाठी राज्यस्तरीय पात्रता अर्थात सेट परीक्षा दि. १५ जूनला घेण्यात येणार आहे. या सेट परीक्षेसाठी दि. २४ फेब्रुवारीपासून अर्ज करता येणार आहे. अर्ज ऑनलाइन पद्धतीने अचूक भरावा, असे आवाहन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ सेट विभागाने केले आहे.

विद्यापीठाच्या सेट विभागातर्फे ४०वी सेट परीक्षा राज्यभरात घेण्यात येणार आहे. ही परीक्षा महाराष्ट्र व गोवा या राज्यांतील विविध केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन विद्यार्थ्यांना अर्ज करण्यासाठी १३ मार्चपर्यंत मुदत देण्यात आली आहे. तसेच, विलंब शुल्कासह अर्ज भरण्याचा कालावधी दि. १४ मार्च ते २१ मार्च असा आहे. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्याची एक प्रत स्वत:कडे ठेवावी. ही प्रत कोणत्याही परीक्षा केंद्रावर अथवा सेट विभागाकडे पाठवू नये.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# Release edu scheme dues without NEP rider, Stalin urges PM

**HT Correspondent**
letters@hindustantimes.com



MK Stalin

**CHENNAI:** Tamil Nadu chief minister MK Stalin urged Prime Minister Narendra Modi to release ₹2,152 crore of Samagra Shiksha Abhiyan (SSA) funds for 2024-25 for the sake of "cooperative federalism" and "welfare" of lakhs of students, adding that their stand on two language formula is "non-negotiable."

In a letter to Modi, Stalin said the release of the funds should not be linked with the National Education Policy (NEP) 2020 which makes implementation of three language formula mandatory. Tamil Nadu has a two-language one.

The Tamil Nadu government and the Centre have been engaged in a war of words over NEP with union education minister Dharmendra Pradhan terming the state government's opposition as "political."

"We all accept NEP, but they are not accepting the idea because of their political interest. This NEP, envisioned by Prime Minister Narendra Modi, is giving emphasis to the mother tongue," Pradhan said while speaking on sidelines of 126th founder's day of Delhi University's Hindu College on Monday.

His comments were seen as a response to a post on X by Stalin on Sunday, in which the Tamil Nadu CM accused the Union minister of "blackmailing" the state by refusing to release funds unless it accepted NEP and the three-language policy.

In his letter, Stalin added: "This has created unrest among students, political parties and the public in our state. For many decades, Tamil Nadu has always been steadfast in its two-language policy. Hence, the state has been exempted from implementing 'The Official Languages Act, 1963', as mentioned in The Official Languages Rules, 1976."

"The tremendous strides made by the state in the last half century can be traced back to our progressive policy making, built on this two-language policy and social justice," he added, reiterating any change in the two-language policy is "non-negotiable" for the state.

In the letter, Stalin also pointed out that the state had already raised its strong concerns on other specific provisions of NEP through letter and a memorandum in 2024 and that despite the multiple representations, the SSA funds for 2024-25 remain unreleased.

"... the Union Government's usage of such fund releases as a pressure tactic to coerce a state into adopting centrally mandated programs is a violation of cooperative federalism," Stalin said.

He argued that such a move would undermine the states' rights to shape their own education policies.

"To dissipate the unrest caused due to this issue, ₹2,152 crores of Samagra Shiksha funds for Tamil Nadu for 2024-25 may be released immediately, without linking it to implementation of NEP 2020," he wrote.

Hindustan Times 21.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकसत्ता

# शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून?

### पहिलीला 'सीबीएसई' अभ्यासक्रमानुसार पाठ्यपुस्तके, शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांची माहिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** 'राज्यातील शाळांचे शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी यंदापासूनच (२०२५-२६) करण्यासाठी शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे. या निर्णयाबाबत शाळांमध्ये कुठलाही संभ्रम नाही. यासाठी सर्व अधिकाऱ्यांनी जिल्हा, तालुकास्तरावर योग्य समन्वय ठेवून काम सुरू केले आहे,' अशी माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पुण्यात दिली. तसेच, यंदा पहिलीची पुस्तके 'सीबीएसई'च्या अभ्यासक्रमानुसार उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) येथे आढावा बैठकीवेळी राज्यमंत्री भोयर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. 'शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याकरिता शिक्षण विभागाने सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रमात बदल केले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या सुकाणू समितीने 'सीबीएसई'चा अभ्यासक्रम स्वीकारण्याची सूचना केली होती. यंदा पहिलीची पुस्तके 'सीबीएसई'च्या अभ्यासक्रमानुसार उपलब्ध करून दिली जाणार आहे. टप्पाटप्याने पुढील बदल केले जातील,' असे त्यांनी सांगितले.

'शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून शाळा भेट उपक्रम राबविला जात आहे. पीएमश्री शाळांच्या धर्तीवर राज्यात सीएमश्री शाळा सुरू केल्या जाणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी या शाळा सुरू करण्याबाबत अनुकुलता दर्शविली आहे. त्यात प्रामुख्याने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांचा समावेश असेल,' असेही भोयर यांनी नमूद केले. 'विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच त्यांच्या आवडीच्या क्षेत्राचे प्रशिक्षण मिळण्यासाठी विद्यानिकेतन शाळांमध्ये आनंद निवासी गुरूकुल ही संकल्पना राबवली जाणार आहे,' अशीही माहिती त्यांनी दिली.

**'पूर्वप्राथमिक'वर अंकुश ठेवण्यासाठी कायदा**

'आरटीईमुळे गोरगरीब विद्यार्थ्यांना लाभ होतो. शाळांना शुल्क परतावा वेळेत मिळत नसल्याने त्यांचे नुकसान होते. या संदर्भात सरकारकडून कायमस्वरूपी तोडगा काढण्यात येईल. पूर्वप्राथमिक शिक्षणावर सरकारचा अंकुश ठेवण्यासाठीचा कायदा तयार करण्याचे काम सुरू आहे,' असेही पंकज भोयर यांनी स्पष्ट केले.

22/02/2025 | Pune | Page : 01
Source : https://epaper.loksatta.com

सामना

# यंदा १ एप्रिलपासून शैक्षणिक वर्ष

पुणे, दि. २१ (प्रतिनिधी) – शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी यंदापासूनच (२०२५-२६) करण्यासाठी शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे. याकरिता सर्व शिक्षणाधिकारी, उपसंचालक यांनी जिल्हा, तालुकास्तरावर योग्य समन्वय ठेवून काम सुरू केले आहे, अशी माहिती शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पुण्यात दिली.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती) येथे आयोजित आढावा बैठकीवेळा भोयर यांनी पत्रकारांशी संवाद साधला.

भोयर म्हणाले, शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याकरिता शिक्षण विभागाने सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रमात बदल केले आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने गठीत करण्यात आलेल्या सुकाणू समितीने केंद्रीय शिक्षण मंडळाचा अर्थात सीबीएसईचा अभ्यासक्रम स्वीकारण्याची सूचना केली होती. त्यानुसार सीबीएसई बोर्ड न घेता फक्त थोड्याफार प्रमाणात अभ्यासक्रम स्वीकारण्यात आला आहे.

**आनंद निवासी गुरुकुल सुरू करणार**

विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच त्यांच्या आवडीच्या क्षेत्राचे प्रशिक्षण घेता यावे, यासाठी विद्यानिकेतन शाळांमध्ये आनंद निवासी गुरुकुल या संकल्पनेनुसार शाळा सुरू केल्या जाणार आहेत, असे भोयर यांनी सांगितले.

**'पीएमश्री'च्या धर्तीवर 'सीएमश्री'**

शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांकडून शाळा भेट उपक्रम राबविला जात आहे. पीएमश्री शाळांच्या धर्तीवर राज्यात सीएमश्री शाळा सुरू केल्या जाणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी या शाळा सुरू करण्याबाबत अनुकूलता दर्शविली आहे, असे भोयर यांनी सांगितले.

Pune Edition
Feb 22, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

### परीक्षा प्रक्रियेवर बहिष्कार टाकण्याचा इशारा

**पुणे, दि.२१-** विविध महाविद्यालयात तासिका तत्वावर काम करणारे प्राध्यापक राज्यातील विद्यापीठातील मार्च एप्रिलमध्ये होणाऱ्या सर्व परीक्षांवर बहिष्कार टाकणार असल्याचा इशारा नेट-सेट, पीएच.डी धारक संघर्ष समितीने दिला आहे. समितीच्या वतीने प्राध्यापक भरतीसाठी पुण्यातील उच्च शिक्षण संचालक कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येत आहे. राज्यात प्राध्यापकांच्या हजारो जागा रिक्त असताना बहुतांश ठिकाणी पात्र उमेदवारांना तासिका तत्वावर सहा महिन्यांसाठी कंत्राटी पद्धतीने भरती केले जात आहे. त्यामुळे नेट सेट धारक व पीएचडीधारकांवर अन्याय होत आहे. वारंवार मागणी करूनही शासन त्याकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. त्यामुळे शासनाने पुढील तीन महिन्यांत प्राध्यापक भरतीचा अध्यादेश काढला नाही; तर बहिष्कार टाकणारे प्राध्यापक परीक्षेचे मूल्यमापन, पर्यवेक्षण किंवा इतर कोणत्याही कामकाजात सहभाग घेणार नाहीत असा दावा समितीचे राज्य समन्वयक प्रा.यशवंत खेमनार यांनी केला आहे.

Prabhat 22.2.2025

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City 22 feb 2025_015
22 Feb 2025

# उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक महोत्सव

## उद्यापासून आयोजन; १६ विद्यापीठांतील विद्यार्थ्यांचा सहभाग

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २१ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये दि. २३ ते २५ फेब्रुवारी रोजी तीन दिवसांच्या राज्यस्तरीय उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील १६ विद्यापीठांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे संघ या स्पर्धेत आपल्या विविध कलागुणांचा आविष्कार सादर करणार आहेत.

राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या माध्यमातून दरवर्षी या स्पर्धेचे आयोजन केले जाते. यंदा



या स्पर्धेचे १५ वे वर्ष असून, त्याच्या आयोजनाचा बहुमान पुणे विद्यापीठाला मिळाला आहे. या स्पर्धेचे उद्घाटन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. नीलेश पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार असल्याची माहिती प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी दिली.

उत्कर्ष उपक्रमांतर्गत नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य आणि ललित कला यांसह पथसंचलन आणि कार्यप्रसिद्धी अहवाल या विभागांमधून एकूण १३ कला प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांच्या सादरीकरणाची संधी मिळणार आहे. विद्यापीठामध्ये संत ज्ञानेश्वर सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, संत नामदेव सभागृह, इरावती कर्वे सामाजिक शास्त्र संकुल सभागृह आणि पोतदार संकुल या ठिकाणी विविध कला प्रकारांच्या सादरीकरणासाठीच्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ दि. २५ फेब्रुवारीला होणार आहे.

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# Edu minister, Stalin spar amid NEP language row

Sanjay Maurya
letters@hindustantimes.com

**NEW DELHI:** Union education minister Dharmendra Pradhan on Friday reiterated the government's stance that the National Education Policy 2020 "upholds the principle of linguistic freedom" and appealed to Tamil Nadu chief minister MK Stalin to not "politicise the issue", prompting the DMK leader to accuse the central government of blackmailing his government in the state.

A day after Stalin wrote to Prime Minister Narendra Modi seeking release of funds for the sake of "cooperative federalism" and "welfare" of hundreds of thousands of students, Pradhan on Friday said that NEP "does not advocate the imposition of any language" on states.

"NEP 2020 upholds the principle of linguistic freedom and ensures that students continue to learn in the language of their choice. In fact, one of the core objectives of the policy is to revive and strengthen the teaching of Indian languages," he said.

"Let me unequivocally state that there is no question of imposing any language on any state or community," he said in a post on X in a 10-point response to Stalin's letter to PM Modi.

Stalin in his letter urged the central government to release ₹2,152 crore of Samagra Shiksha Abhiyan funds for 2024-25 for the sake of "cooperative federalism" and "welfare" of hundreds of thousands of students, adding that their stand on two language formula is "non-negotiable".

Pradhan termed Stalin's letter "a complete negation of the spirit of cooperative federalism", and





Dharmendra Pradhan and MK Stalin

appealed to him not "politicise education" and "rise above political differences" to empower students. Later in the day, Stalin responded by accusing the Modi government of halting the state's funds until the state implemented the "triple language" formula.

"Yesterday, as CM of Tamil Nadu, I wrote a letter to PM Narendra Modi to release funds which are for our students and teachers. Today, Union Minister Dharmendra Pradhan has written a reply letter in which he advises not to do politics in education. I ask, who is doing politics in education? Is it not politics when you blackmail by saying that if only triple language is implemented in a state, the fund will be released? You (Dharmendra Pradhan) should think whether it's you doing politics or us," he said in a post on X.

The Tamil Nadu government and the Centre have been engaged in a war of words over NEP Policy (NEP) 2020 which makes implementation of three language formula mandatory. Tamil Nadu, which has a two-language one, has been opposing NEP with concerns over possible imposition of Hindi or Sanskrit under the three-language policy.

Pradhan said the three-language formula is "the backbone of India's education framework since 1968".

He criticized previous education policies for neglecting the systematic teaching of Indian languages, leading to "over-reliance on foreign languages", while NEP 2020 aims to restore languages to their "rightful place in education".

Pradhan said that the central government is promoting Tamil language and culture globally through various initiatives including Kashi Tamil Sangamam and Saurashtra Tamil Sangamam. Pradhan said SSA a shared scheme between the Centre and states supporting public schools with a funding ratio of 60:40, and PM SHRI (Pradhan Mantri Schools for Rising India) scheme are aligned with NEP.

"Hence, it is inappropriate for the state to view NEP 2020 with a myopic vision and spin progressive educational reforms into threats to sustain their political narratives," he said.

Hitting back at Pradhan, Tamil Nadu deputy chief minister Udhayanidhi Stalin asserted the state will only follow the two-language policy. "Education is Tamils' right, please understand who is doing politics," Udhayanidhi said.

*(With inputs from Chennai)*

Hindustan Times 22.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# भाषेचे जतन करणारी संस्कृती...

**संस्कृतीचा प्रवाह वाहता ठेवणारी भाषा किती महत्त्वाची असते हे यंदाच्या ९८ व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. तारा भवाळकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून अधोरेखित केले. त्यांच्या भाषणातील हा संपादित सारांश.**



भाषा ही एक मानीव संकल्पना आहे आणि बोली हे वास्तव आहे. प्रत्यक्षामध्ये माणसं बोलतात आणि ते जे बोलणं आहे ते प्रत्येकाचं स्वतंत्र असतं. ज्याला आपण लोकसंस्कृती म्हणतो. तिची ती लोकभाषा जास्त लवचीक असते. ती बदलती असते आणि त्यामुळे समग्र लोकसंस्कृती ही लवचीक असते, स्वाभाविक असते आणि प्रवाही असते म्हणजे ती बदलती असते, गरजेनुसार ती बदलत असते आणि अभिजनांची जी भाषा, प्रमाणभाषा ती लिपीबद्ध झाली की तिला एकप्रकारची बंदिस्ती येते. द. ग. गोडसे हे लोकसंस्कृतीचे मोठे अभ्यासक. त्यांनी दोन फार चांगले शब्द वापरलेले आहेत की, 'लोकभाषा आणि लोकसंस्कृती ही 'गतिमानी' असते आणि ती ज्यावेळेला अभिजनतेकडे जाते, नागरीकरणाकडे जाते त्यावेळेस ती 'गणितमानी' होते. म्हणजे बंदिस्त होते आणि मग ती सगळ्या पातळ्यांवर गणितमानी होते.

## प्रमाणभाषा बंदिस्तच

बहुजन समाजातली माणसं निरनिराळ्या क्षेत्रात यायला लागली. विशेषतः शिक्षणाच्या क्षेत्रात, राजकारणाच्या क्षेत्रात यायला लागली, त्यावेळेला मध्यवर्ती पुणेरी बोलीवाल्या मंडळींना अस्वस्थता वाटायला लागली की, त्यामुळे मराठी भाषा भ्रष्ट होते आहे! कारण आता ही बहुजन समाजातली माणसं ही शिक्षणाच्या क्षेत्रात येत आहेत, त्यामुळे शिक्षणाचा दर्जा खालावतो आहे. आजही ती तक्रार आहे बऱ्याच लोकांची, किंवा ही निरनिराळी मंडळी डॉक्टर होत आहेत, वकील होत आहेत त्यामुळे त्याचा दर्जा खालवतो आहे. जणू काही जोपर्यंत उच्चवर्णीयांमधलीच माणसं शिकत होती तोपर्यंत दर्जा हा फार उच्च होता, असं लोक समजत होते की काय? ज्यावेळेला जुनं साहित्य आपण बारकाईने वाचू त्यावेळेस असे लक्षात येते की, शिक्षणाच्या क्षेत्रात काय किंवा इतर क्षेत्रात काय, आज जसे 'पाट्या टाकणारे' लोक आहेत, तसेच त्या काळातही उच्चवर्णीय होते. नुसते पाट्या टाकणारे नाही, ते स्वतः विद्वान असतील, परंतु विद्यार्थ्यांना त्यांचे बोलणे कळत असेलच, त्यांचं शिकवणं कळत असेलच असं नाही.

## संस्कृतीचा आंतरज्ञानशाखीय अभ्यास

संस्कृतीचा अभ्यास करीत असताना भले ती अभिजन संस्कृती असू देत की लोकसंस्कृती असू देत तिचा सगळा प्रवास कसा कसा झालेला आहे. मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि बाकीची शास्त्रे या सगळ्यांचा समन्वय केल्याशिवाय खऱ्या अर्थाने संस्कृतीचा अभ्यास करता येत नाही. विशिष्ट मंत्र तंत्र आणि देवदेवता म्हणजे संस्कृती असत नाही. माणसाची जगण्याची जी रीत आहे आणि जगण्यासाठी आवश्यक असलेली जी सर्व साधने आहेत ती मिळून संस्कृती होते. लोकसाहित्याची व्याख्या आपण पाहिली तर 'साहित्य' - साहित्य म्हणजे साधनं! तेव्हा लोकजीवनाच्या जडण-घडणीच्यासाठी असलेली जी सगळी साधने भले ती आदिम अवस्थेतील असू देत, अनक्षर असू देत, ग्रामीण असू देत, शहरी असू देत, जुनी असू देत, नवीन असू देत ही सगळी कायम आहेत आणि या सगळ्याचा विचार केल्याशिवाय आपल्याला त्या संस्कृतीचा, त्या समाजाचा, त्या व्यक्तीचा विचार करता येत नाही. म्हणून हा सगळा विचार करत असताना अनेक संदर्भ लक्षात घ्यावे लागतात किंवा अनेक ज्ञानशाखांचा आपल्याला विचार करावा लागतो. म्हणजे त्याला अभिजात मराठीत अंतरज्ञानशाखीय दृष्टिकोन (Interdisciplinary Study Approach) म्हणतात, तो घेतल्याशिवाय कुठल्याही संस्कृतीचा पूर्णपणे विचार करता येत नाही.

## शिक्षण, संशोधन आणि संग्रहालयातून संघर्षाऐवजी संवाद!

मराठी भाषेला जो अभिजात दर्जा मिळालेला आहे त्याच्यामुळे काही कोटी रुपये वगैरे मिळणार आहेत त्याच्यातून काय व्हायला पाहिजे? तर ज्या एका प्रदेशामध्ये ज्या निरनिराळ्या भाषा चाललेल्या आहेत म्हणजे महाराष्ट्र घेतला तर नुसती मराठी तिथे नाही, तर अनेक बोलीदेखील आहेत. त्या अनेक बोलींचा अभ्यास करणारी अशी एक संस्था पाहिजे. इथे सीमाप्रदेश आहेत, ते द्वैभाषिक आहेत. त्या सीमाप्रदेशामध्ये दोन्ही भाषांची शाळा, महाविद्यालये आणि शिक्षणसंस्था पाहिजेत. म्हणजे कन्नड-मराठी हा जो सीमाप्रदेश आहे तर मराठी प्रदेशामध्ये कन्नड बोलणारे बरेच लोक असतील, पण तिथे मराठी बोलणारी जी मुले असतील त्या मुलांची शिक्षणाची सोय व्हायला पाहिजे म्हणून त्या सीमाप्रदेशांच्यामध्ये उभय भाषांची शिक्षण व्यवस्था शालेय स्तरावर, महाविद्यालयीन स्तरावर आणि संशोधनाच्या स्तरावरही व्हायला पाहिजे. त्यांच्या सोयी व्हायला पाहिजेत आणि त्यांच्यासाठी शासनाने व्यवस्था कारायला पाहिजे. म्हणजे हा लोकसांस्कृतिक अनुबंध सीमाप्रदेशातला आहे तो भांडणापेक्षा, संघर्षापेक्षा तो संवादातून मिटायला पाहिजे आणि अभ्यासातून तो संवाद शक्य होईल. हे होऊ शकते. असे झाले तर वर्षानुवर्षे भिजत पडलेले भाषावार सीमांचे प्रश्न सुटणे सुलभ होईल. म्हणजे भारतात राजस्थानमध्येच हा छोटासा प्रयोग झालेला आहे, दक्षिणेकडे मद्रासला तमिळनाडूलगतच्या द्वैभाषिक प्रदेशासाठी म्हैसूर विद्यापीठाचीच 'मानस गंगोत्री' नावाची एक शाखा आहे. तिथे लोकसंस्कृतिक विभाग हा स्वतंत्र आहे आणि त्या ठिकाणी लोकसंस्कृती हा विषय घेऊन पदव्युत्तर शिक्षण घेता येते. म्हणजे एम.ए., पीएच.डी या पदवी लोकसंस्कृतिक विषयांत घेता येतात. तिथे त्याला 'लोकवेद' विभाग असेच म्हटलेले आहे. तिथे म्यूझियम (वस्तुसंग्रहालय) आहे. अतिशय सुंदर अशा प्रकारचे हे वस्तुसंग्रहालय दोनही प्रकारच्या संस्कृतींचे दर्शन घडवणारे आहे. केरळमध्ये त्रिवेंद्रमला अशा प्रकारचे एक वस्तुसंग्रहालय आहे. दोन किंवा अधिक प्रदेशांचा सांस्कृतिक अनुबंध सांगणारी अशा प्रकारची ही वस्तुसंग्रहालये आहेत. तेव्हा भाषावार प्रांतरचना झालेली असली तरी सीमाप्रदेशामध्ये उभय भाषामध्ये शाळांची सोय पाहिजे, महाविद्यालयांची सोय पाहिजे, संशोधनाची सोय पाहिजे आणि मुख्य म्हणजे वस्तुसंग्रहालयही पाहिजे. यातून तो अभ्यास पुढे चालत राहावा.

## 'लोकसाहित्य समिती'तून ग्रंथनिर्मिती

'ग्रंथ प्रकाशन' हा मोठ्या प्रमाणावरचा संशोधन प्रकल्प उभय भाषिक प्रदेशांमध्ये असावा; कारण 'आपला देश हा विविधतेने नटलेला आहे' वगैरे असे आपण भाषणामध्ये म्हणतो... तर ही जी विविधता आहे ती विविधता अभ्यासपूर्ण रीतीने जास्त विकसित करणे - म्हणजे संघर्षापेक्षा संवादातून ते करणे- हे ध्येय असायला हवे. अशा प्रकारचे संशोधनात्मक ग्रंथ त्या ठिकाणी निर्माण झालेले असतील ते ग्रंथ प्रकाशित व्हावेत, नवीन प्रकाशनाला प्रेरणा मिळावी, त्यासाठी 'अभ्यासवृत्ती' ज्याला म्हणता येईल ती देता यावी. जे जुने विलुप्त झालेले जे ग्रंथ आहेत त्यांच्या आवृत्ती काढणेही महत्त्वाचे आहे. जसे महाराष्ट्रामध्ये 'लोकसाहित्य समिती' होती. त्यांनी प्रकाशित केलेले ग्रंथ आहेत. पुढे ते सगळे बंद झाले आणि ते आता ग्रंथच मिळेनासे झालेले आहेत. आम्ही साहित्य संस्कृती मंडळाकडे मागणी केली तेव्हा त्यांनी सांगितले असे काही ग्रंथ असतील तर आम्हाला सांगा, आम्ही प्रकाशित करू. साहित्य संस्कृती मंडळ चार ग्रंथ प्रकाशित करेल कदाचित. परंतु कायमसाठी ती लोकसाहित्य संशोधन समिती होती तशाप्रकारची एखादी संस्थाच राज्याच्या प्रत्येक प्रदेशामध्ये निर्माण व्हायला पाहिजे.

## काही अपेक्षा...

विद्यापीठांवर दिवसेंदिवस शासकीय बंधने जास्त येत आहेत. म्हणजे कुलगुरूंच्या नेमणुका, कुलगुरूंनी नेमकं काय करायचे याचे आदेश शासन स्तरावरून येत आहेत. मी ज्यावेळेला विद्यापीठाशी संबंधित अशा व्यक्तींशी बोलते त्यावेळेस त्यांचे म्हणणे असे आहे की, विद्यापीठांवर शासनाने काय करावे आणि काय नाही याची बंधने घालू नयेत. एखादा शासकीय आदेश पटकन येतो आणि अमुक दिवशी, अमुक दिवस साजरा करा हे शासनाने सांगण्याची गरज नाही. त्या विद्यापीठांना ठरवू देत. ती विद्यापीठे ज्या प्रदेशात आहेत त्या विद्यापीठांचे अग्रक्रम ज्याच्यासाठी आहेत, त्या क्षेत्रामधली जी मंडळी असतील त्यांना महत्त्व कशाला द्यायचे आणि कशाला नाही ते त्या विद्यापीठांना, कुलगुरूंना, तिथल्या विभाग प्रमुखांना ठरवू देत आणि त्यांच्यावर शासकीय बंधने, विशेषतः मध्यवर्ती शासकीय बंधने नसावीत! किमान बंधने असावीत. अशाप्रकारची मागणी विद्यापीठांकडून होते आहे. आणि म्हणून ज्ञानक्षेत्रातले जर निरनिराळे प्रयोग निरनिराळ्या ठिकाणी व्हावेत आणि ज्ञान जास्त मोकळे व्हावे असे वाटत असेल तर शासकीय बंधने ही किमान असावीत.

आंतरज्ञानशाखीय संशोधनासाठी प्रत्येक विद्यापीठामध्ये एक विभाग असावा की जो कुठेही नाही. किंबहुना ज्याला आपण मानव्यशाखा आपण म्हणतो. त्या मानव्यशाखांचे विभाग दिवसेंदिवस संकुचित होत आहेत सगळ्याच विद्यापीठात. मानवी जीवन हे जास्त निरामय राहायचे असेल तर मानव्य विद्यापीठामधले अभ्यास हे जास्त बारकाईने आणि जास्त संवेदनशील व्हायला पाहिजेत. ते विभाग बंद न होता ते जास्त विकसित कसे होतील याच्यासाठी त्यांना मोकळीक देणे हे महत्त्वाचे आहे असे वाटते. तेव्हा अशा काही महत्त्वाच्या सूचना या संमेलनाच्या निमित्ताने, अनेकांशी पूर्व संवाद साधल्यानंतर एक निवृत्त शिक्षक म्हणून, एक समाज घटक म्हणून, एक मराठी भाषक म्हणून मला आवर्जून कराव्याशा वाटतात.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*



नाशिकमधील 'एआय ऑन व्हील' या बसच्या आतील दृश्य

# 'एआय'च्या शिखरावर आणि तळाशी!

संदीप वासलेकर

editor@esakal.com

ए-आय च्या विश्वात

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भविष्याबद्दल सध्या तुफान वेगाने वादविवाद वाढत आहेत. दर आठवड्याला काही मोठ्या, तर काही छोट्या परिषदांचे आयोजन केले जात आहे. सोशल मीडिया अमेरिकेत ओपन एआय कंपनी आणि चीनमध्ये डीपसीक कंपनी यांच्यातील स्पर्धेने भरून गेली आहे. विकासशील देश त्या अत्याधुनिक तंत्रज्ञानापर्यंत पोहोचण्यासाठी कंबर कसत आहेत. मात्र, या सगळ्या वादात एआय क्षेत्राच्या शिखरावर आणि तळाशी असलेल्या समस्या दुर्लक्षिल्या जात आहेत. शिखरावर सर्वात मोठी भीती अशी आहे की, एआय कदाचित मानवापेक्षा अधिक शक्तिशाली होईल. हे २०३० किंवा २०३५ पर्यंत घडू शकते. आर्टिफिशियल जनरल इंटेलिजन्स (एजीआय) तयार झाला, तर तो आपल्याला गुलाम बनवू शकतो. त्याच्यापासून पृथ्वीवरील सर्व जीवन संकटात पडू शकते. त्याला अण्वस्त्र नियंत्रित करण्याची क्षमता मिळाल्यास तो कोणत्याही सरकारच्या परवानगीशिवाय महायुद्ध सुरू करू शकतो आणि आणि संपूर्ण जगाचा नाश करू शकतो.

### तळाशीही आहे धोका...

तळाशीही एक गंभीर धोका उभा आहे. तो असा की, लाखो लोकांना प्राथमिक तंत्रज्ञान शिकता येणार नाही. दोन अब्जाहून अधिक लोक तांत्रिकदृष्ट्या मागासलेले आहेत. यामुळे एक जागतिक जातिव्यवस्था निर्माण होईल. ज्यात संगणक, इंटरनेट आणि स्मार्टफोन नसलेले लोक संपूर्णपणे वगळले जातील. आज जगातील एक तृतीयांश लोकांकडे इंटरनेट नाही. युनायटेड नेशन्सच्या म्हणण्यानुसार, शालेय मुलांपैकी अध्यपिक्षा जास्त मुले इंटरनेटपासून वंचित आहेत. देशो-देशीचे नेते मोठ्या बैठकीत एकत्र येतात. ते 'एआयचा नैतिक वापर' किंवा 'सर्वसमावेशक स्वरूप' यावर घोषणा करतात. पण या घोषणांमध्ये केवळ शब्दांची गुळगुळीत जुळवाजुळव असते. हे नेते मानवता संपूर्णपणे संकटात येऊ शकते असे अस्तित्ववादी धोके ओळखत नाहीत. त्यांना ज्यात संगणक आणि इंटरनेट नेवापरणारे लोक तंत्रज्ञानापासून वंचित ठेवले जातील, अशा नव्या जातिव्यवस्थेचा धोका समजत नाही.

डेमिस हस्साबिस नोबेल पारितोषिक विजेते शास्त्रज्ञ आहेत. यांनी आपल्या शरीरातील प्रथिनांचे अचूक स्वरूप समजून त्यावर आधारित औषधांचा शोध घेण्यासाठी 'एआय'चा विकास केला आहे. त्यांनी 'एआय'च्या जागतिक प्रशासनासाठी प्रस्ताव तयार केला आहे. याचा उद्देश संपूर्ण 'एआय'च्या प्रभावावर देखील नियंत्रण ठेवणे आहे.

> आज जगातील एक तृतीयांश लोकांकडे इंटरनेट नाही. युनायटेड नेशन्सच्या म्हणण्यानुसार, शालेय मुलांपैकी अध्यपिक्षा जास्त मुले इंटरनेटपासून वंचित आहेत. देशो-देशीचे नेते मोठ्या बैठकीत एकत्र येतात. ते 'एआयचा नैतिक वापर' किंवा 'सर्वसमावेशक स्वरूप' यावर घोषणा करतात. पण या घोषणांमध्ये केवळ शब्दांची गुळगुळीत जुळवाजुळव असते...

गेल्या दोन वर्षांत मी अण्वस्त्रांमध्ये 'एआय'च्या वापराचे नियमन करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोगामध्ये (आयएईए) एक विभाग तयार करू शकतो का, असे अनेक महासत्तांच्या तज्ज्ञांना विचारले. सर्वांचा ठाम उत्तर असे होते की, हे अशक्य आहे. मात्र, डिसेंबरमध्ये, मला मोहम्मद एल. बारदाई, नोबेल पारितोषिक विजेते आणि 'आयएईए'चे माजी प्रमुख, यांच्याशी संवाद साधता आला. त्यांनी सांगितले की, हे पूर्णपणे शक्य आहे. मी दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रिया सरकारच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याला हेच विचारले. त्यांना अनेक दशके आयएईएशी व्यवहार करण्याचा अनुभव होता. ते म्हणाले की, ते शक्य आहे आणि इष्ट आहे. एक ठराविक विभाग बनवून, एआय आणि अण्वस्त्रे यांच्यातील इंटरफेसचे नियमन करून सुरुवात करू शकतो. त्याच वेळी आपण एआयच्या जागतिक नियंत्रणाविषयी डेमिस हसाबिसच्या प्रस्तावाबद्दल वाटाघाटी सुरू केल्या पाहिजेत.

### प्रयोग नाशिकच्या सचिन जोशींचा

शिखरावर असे प्रयत्न करत असताना तळाशी असलेल्या मुद्द्यांबद्दल देखील आपण विचार केला पाहिजे. मागील आठवड्यात तळाशी असलेल्या समस्येसाठी एक प्रेरणादायक उपाय सापडला. सचिन जोशी हा नाशिक येथील एक तरुण शिक्षणतज्ज्ञ. त्याने एक अभिनव उपाय राबवला आहे. महाराष्ट्रातील इतर शहरांप्रमाणेच नाशिकमध्येही हजारो मुले संगणक आणि इंटरनेटच्या सुविधांपासून वंचित आहेत. ही मुले महापालिका आणि जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकतात. या शाळांमध्ये मूलभूत सुविधा नाहीत. पाचव्या इयत्तेतील मुलांकडे जी दुसरी इयत्तेत असायला हवीत अशी वाचन आणि गणित यातील कौशल्ये नसतात. अशा मुलांना एआय साधनांचे प्रशिक्षण देता येईल का? किंवा त्यांना जगातील अत्याधुनिक तंत्रज्ञानापासून कायमच दूर ठेवाय

सचिन जोशींनी एक अत्याधुनिक Wheels' नावाची बस तयार केली बसमध्ये संगणक, रोबोटिक्स प्रयोगशाळ लॅपटॉप, उच्च गतीचे इंटरनेट, सौर उ इतर अनेक सुविधा आहेत. ही बस झोपडपट्टीमध्ये जाते, जिथे ती मुलांना वा आणि गणित शिकवते. बसमधील शिक्ष 'एआय'च्या साधनांचा वापर करून त्य सर्जनशील क्रियाकलाप शिकवतात. घेतल्यास, ही बस नाशिकमधील डिजिटल करू शकते आणि येत्या एक-दोन वर्षांत गरीब मुलांमध्ये परिवर्तन घडवून आणेल, विश्वास आहे.

अशा संकल्पनेला लाखो मुलां बदलण्याची क्षमता असली, तरी एकटा स त्यापेक्षा अधिक काही करू शकणार नाह आपल्याला भारतात अशा शेकडो मोबाइ आवश्यकता आहे. गरीब लोकांनाही सर्वोत्तम तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याचा ह तसेच, शिखरावर घडणाऱ्या घटना आ उभ्या असलेल्या समस्यांमध्ये संतुलन रा महत्त्वाचे आहे. डेमिस हस्साबिस यांच्या योग्य मार्गाने लागू करण्याची वेळ आली अ हसाबिस आणि सचिन जोशी एकाच नाण्य टोके आहेत. आपल्याला 'एआय'ने आप सकारात्मक रीतीने घडवायचे असल्यास दोन्ही बाजूंची काळजी घेणे आवश्यक आ

*(लेखक स्ट्रॅटेजिक फोरसाइट ग्रुप आहेत आणि A World Withou पुस्तकाचे लेखक*

Sakal 23.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# मराठी विद्यापीठासाठी निधीची मागणी

## • अधिवेशनात आज ठराव; ग्रंथालयांच्या दुरवस्थेकडे लक्ष वेधणार

**विद्याधर कुलकर्णी,**
**लोकसत्ता**

**छत्रपती शिवाजी महाराज साहित्यनगरी (दिल्ली) :** 'मराठी भाषा विद्यापीठ स्थापनेचे केवळ सोपस्कार नकोत. तर, या विद्यापीठाला पुरेसा निधी आणि आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून द्यावे,' अशी मागणी करणारा ठराव ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या रविवारी होणाऱ्या खुल्या अधिवेशनात येणार आहे.

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या शनिवारी झालेल्या बैठकीत साहित्य संमेलनाच्या खुल्या अधिवेशनात मांडण्यात येणाऱ्या ठरावांबाबत चर्चा करण्यात आली. राज्य शासनाकडून पुस्तकांचे गाव विकसित करण्यात येत आहे, ही आनंदाची बाब आहे. पण, हे करताना ग्रंथालयांना अल्प अनुदान आणि ग्रंथपालांना तुटपुंजे वेतन यामुळे झालेल्या ग्रंथालयांच्या दुरवस्थेकडे शासनाचे लक्ष वेधणारा ठरावही मांडण्यात येणार आहे.

मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र सरकारच्या अभिनंदनाचा ठराव मांडण्याबरोबरच भाषेसाठी प्रस्तावित निधी त्वरित मिळावा, अशीही मागणी करण्यात येणार आहे.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठामध्ये कुसुमाग्रजांच्या नावाने सुरू होत असलेल्या मराठी अध्यासनाला केंद्र सरकारने पुरेसा निधी द्यावा, अशी मागणी ठरावाद्वारे करण्यात आली आहे.

राष्ट्रसंत गाडगेबाबा यांच्या जयंतीचे औचित्य साधून २३ फेब्रुवारी हा बोली भाषा दिन म्हणून साजरा करण्यात यावा, या मागणीसह राज्यात बोली भाषा विकास अकादमी सुरू करण्याची मागणी करणारा ठरावही मांडण्यात येणार आहे.

प्रतिकूल परिस्थितीत मराठीचे जतन करणाऱ्या बृहन्महाराष्ट्रातील संस्थांना अतिरिक्त निधी द्यावा, अशी मागणी करण्याबरोबरच न्यायप्रविष्ट गोष्टींमध्ये हस्तक्षेप करून केंद्र सरकारने सीमा भागातील मराठी बांधवांना महाराष्ट्रात सहभागी करून घ्यावे, असे साकडे सरकारला घालण्यात आले आहे.

### आगामी संमेलनासाठी चार निमंत्रणे

दिल्ली येथील ९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे रविवारी सूप वाजत असताना आगामी संमेलनासाठी सातारा, चिपळूण, इचलकरंजी आणि औदुंबर अशा चार ठिकाणची निमंत्रणे आली आहेत. संमेलनासाठी निमंत्रण स्वीकारण्याची ३१ मार्च ही अंतिम मुदत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे कार्यालय १ एप्रिलपासून पुण्यात स्थलांतरित होत असून, नवे पदाधिकारी आगामी संमेलनाचे स्थळ निश्चित करणार आहेत.

### ग्रंथनगरीत वाचकांची गर्दी

येथील तालकटोरा स्टेडियममधील छत्रपती शिवाजी महाराज साहित्य नगरीत होत असलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनानिमित्त उभारण्यात आलेल्या तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी ग्रंथनगरीतील नामांकित प्रकाशन संस्थांच्या दालनांना साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने भेट दिली. संमेलनादरम्यान देशभरातील विविध नामांकित प्रकाशनाच्या दालनांना साहित्य रसिक भेट देत आहेत. महाराष्ट्रसह देशातील विविध राज्यातून आलेल्या साहित्यप्रेमींनी अनेक पुस्तके विकत घेतली. बार्टी, बालभारती, लोकराज्य यासह शासनाच्या विविध दालनांवरही साहित्य रसिकांची गर्दी होती. या नगरीत शंभरहून अधिक दालने आहेत.

### तमाशा आणि वारीचा दस्तऐवज

यंदाच्या संमेलनात संदेश भंडारे यांच्या छायाचित्रांनी साकारलेल्या 'तमाशा आणि वारी' या विशेष स्टॉलने रसिकांचे लक्ष वेधून घेतले. महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेतील दोन महत्त्वाचे सांस्कृतिक प्रवाह झ्पंढरीची वारी आणि तमाशा यांचे अप्रतिम छायाचित्र संकलन येथे प्रदर्शित करण्यात आले आहे.

Loksatta 23.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# विद्यापीठात 'उत्कर्ष' महोत्सवाचे आयोजन

## सोळा विद्यापीठांतील संघांचे सादरीकरण

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आज, रविवारपासून (२३ फेब्रुवारी) तीन दिवसीय राज्यस्तरीय 'उत्कर्ष' सामाजिक सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. राज्यभरातील १६ विद्यापीठांमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांचे संघ या स्पर्धेत विविध कलागुण सादर करतील.

राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या राष्ट्रीय सेवा योजना कक्षाच्या माध्यमातून होणाऱ्या या स्पर्धेचे यंदा १५वे वर्ष असून, त्याच्या आयोजनाचा मान पुणे विद्यापीठाला मिळाला आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील या स्पर्धेदरम्यान विशेष उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. नीलेश पाठक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती 'उत्कर्ष' आयोजन सुकाणू समितीचे अध्यक्ष प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी दिली.

'उत्कर्ष' उपक्रमांतर्गत नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य आणि ललित कला यांसह पथसंचलन आणि कार्यप्रसिद्धी अहवाल या विभागांमधून एकूण १३ कलाप्रकारांत विद्यार्थ्यांना त्यांच्या कलागुणांच्या सादरीकरणाची संधी मिळणार आहे. विद्यापीठात संत ज्ञानेश्वर सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, संत नामदेव सभागृह, इरावती कर्वे सामाजिक शास्त्र संकुल सभागृह आणि पोतदार संकुल या ठिकाणी विविध कलाप्रकारांच्या सादरीकरणासाठीच्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ मंगळवारी (२५ फेब्रुवारी) होणार असल्याचेही काळकर यांनी सांगितले.

Maharashtra Times 23.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

लोकमत

# पूर्व प्राथमिक शिक्षण धोरण आणले जाईल

### शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी चर्चासत्रात दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : महाराष्ट्रात लाखो पूर्व प्राथमिक शाळा सुरू असून, या शाळा सुरू करण्यासाठी कुणाच्याच परवानगीची गरज लागत नाही. पालक लाखो रुपये भरून या शाळांमध्ये प्रवेश घेत आहेत.

लाखो रुपये भरल्यावर एखादी शाळा बंद पडली की पालक शासनाकडे धाव घेतात. अशा शाळांवर कारवाईची वेळ येते तेव्हा ही शाळा कुठल्या भागात आहे, याची माहिती देखील शिक्षण अधिकाऱ्यांकडे नसते. त्यामुळे आगामी शैक्षणिक वर्षापासून शासन पूर्व प्राथमिक शिक्षण धोरण आणले जाईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितले.

विद्या भारती अखिल भारतीय शिक्षण संस्था आणि डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या वतीने राष्ट्रीय शिक्षण धोरण अनुसार राज्य अभ्यासक्रम आराखडा या विषयावर आयोजित राज्यस्तरीय चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी विद्या भारती संस्थेचे महाराष्ट्र प्रांत संचालक अरुण कुलकर्णी, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रमोद रावत, सचिव डॉ. आनंद काटीकर तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम प्रांत संघचालक नानासाहेब जाधव व विद्या भारती पुणे शाखेचे अध्यक्ष रघुनाथ देविकर उपस्थित होते.

विनापरवानगी सुरू असलेल्या पूर्व प्राथमिक शाळांचा आढावा घेत भोयर यांनी पूर्व प्राथमिक शाळांसाठी धोरण आणण्याचे सूतोवाच केले. तसेच पूर्व प्राथमिक शाळांमध्ये कशाप्रकारचे शिक्षण दिले गेले पाहिजे याचा अभ्यास देखील तज्ज्ञांच्या माध्यमातून केला जात आहे, असे स्पष्ट केले.



### राज्य सरकारकडून आठ भागात निवासी गुरुकुल

१ विद्यार्थ्यांना पारंपरिक शिक्षणाबरोबरच त्यांच्या आवडीच्या क्षेत्राचे प्रशिक्षण घेता यावे यासाठी इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आनंद निवासी गुरूकुल या संकल्पनेनुसार शाळा सुरू केल्या जाणार आहेत. यात कला, क्रीडा, शारीरिक शिक्षण, संगीत अशा क्षेत्रांचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाणार आहे.

२ राज्यातील आठ विभागात प्रत्येकी एक याप्रमाणे ही शाळा सुरू करण्यात येणार आहे. राज्यात पाच ठिकाणी विद्यानिकेतन शाळा असून त्याचे रूपांतर निवासी गुरूकुलमध्ये करण्यात येईल, तर उर्वरित तीन ठिकाणी नव्याने गुरूकुल सुरू करण्यात येतील.

३ यासाठी सरकारकडून शिक्षक पुरविले जाणार आहेत. ज्यांची इच्छा आहे, त्यांच्याकडून अर्ज मागविण्यात येईल.

### शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून

शैक्षणिक वर्ष १ एप्रिलपासून सुरू करण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी यंदापासूनच करण्यासाठी शिक्षण विभाग प्रयत्नशील आहे. याबाबत शाळांमध्ये कुठलाही संभ्रम नाही.

**याकरिता सर्व शिक्षणाधिकारी, उपसंचालक यांनी जिल्हा, तालुकास्तरावर योग्य समन्वय ठेवून काम सुरू केले आहे. शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्यासाठी शिक्षण विभागाने सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रमात बदल केले आहेत.**

सुकाणू समितीने सीबीएसईचा अभ्यासक्रम स्वीकारण्याची सूचना केली होती. त्यानुसार सीबीएसई बोर्ड न घेता फक्त थोड्याफार प्रमाणात अभ्यासक्रम स्वीकारण्यात आला आहे. यावर्षी पहिलीची पुस्तके सीबीएसईच्या अभ्यासक्रमानुसार उपलब्ध करून दिली जाणार असून टप्प्याटप्प्याने बदल केले जाणार असल्याचे भोयर यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 2 Feb 23, 2025
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# Won't sign NEP even if Centre offers ₹10k cr: Stalin

## 'Policy Will Push Tamil Society Back By 2k Yrs'

**Bosco.Dominique**
@timesofindia.com

File photo



Stalin said Rs 2,152cr that Centre is withholding is meant for 43 lakh schoolkids

**Cuddalore**: Tamil Nadu CM M K Stalin on Saturday said he will never sign National Education Policy, not even if Union govt offers Rs 2,000 crore or Rs 10,000 crore. At at event in Cuddalore district, Stalin said if, for Rs 2,000 crore, the state signed away its rights by signing NEP, "Tamil society will be set back by 2,000 years".

"NEP is a policy that undermines social justice, attacks the Tamil language, and is against the interests of Tamil people and Tamil Nadu." "NEP is a direct threat to future of our children. We don't oppose NEP just because it promotes Hindi. We oppose it because it's a policy that pushes students out of schools." He said govt considered education and healthcare as its two eyes.

"This year alone, Rs 44,000 crore was allocated to school education department, and Rs 8,200 crore to higher education department. From this, you can clearly understand how much importance we give to education. That is why Tamil Nadu ranks second in India in providing quality education. The reason for this achievement is the various schemes implemented by school education department," he said.

"Centre has withheld Rs 2,152 crore that should have been given to Tamil Nadu. This amount is meant for welfare of 43 lakh schoolchildren," he said.

Detailing the impact of NEP, he said the policy weakened social justice policies. "It denies scholarships that are currently being provided to Scheduled Castes, Scheduled Tribes, and other backward classes. It introduces public exams in Classes 3, 5, and 8 to filter out students. It proposes semester exams from Class 9 to 12, making it similar to a national-level entrance exam. Students will no longer be able to directly join the college of their choice after Class 12. Just like NEET for medical admissions, entrance exams will be introduced for engineering and arts colleges, conducted by a national-level agency, not college-level," he said.

"The policy allows students who don't want to continue studies after Class 10 to drop out. Isn't this the same as forcing them out of education?" he asked. He said it introduced a caste-based vocational education system from Class 6. Instead of allowing students to study and progress, they were being pushed back into hereditary professions, as per unfair Manusmriti principles, he charged.

# Won't give in to 'blackmail', Centre makes it clear to TN

**Manash.Gohain**
@timesofindia.com

**New Delhi**: In the midst of its escalating political standoff with Tamil Nadu govt over National Education Policy (NEP) 2020, Centre has made it clear that it is firmly committed to implementing the three-language policy at school level. Centre is steadfast in its stance and will not succumb to TN's "blackmailing" tactics, govt sources said.

Union education minister Dharmendra Pradhan, in a letter to Tamil Nadu chief minister M K Stalin on Friday, criticised the state's opposition to NEP 2020, calling it "highly inappropriate" and a "narrow-minded approach". Pradhan sought to allay concerns raised by the Tamil Nadu govt, saying, "Let me unequivocally state that there is no question of imposing any language on any state or community."

NEP 2020 advocates a flexible three-language formula, emphasising multilingual education, while allowing states to choose their own languages within the framework.



Pradhan criticises TN's opposition to NEP 2020 & calls it 'inappropriate and a narrow-minded approach'

However, Tamil Nadu govt has consistently opposed the policy, arguing that NEP 2020 undermines the state's long-standing two-language formula and poses a potential threat to its linguistic identity.

Despite the state's reservations, the Union govt remains firm on implementing NEP 2020 nationwide. The Centre maintains that the policy is designed to enhance educational outcomes and foster multilingual proficiency without infringing upon regional linguistic preferences.

Pradhan underscored this in his letter, stating, "NEP 2020 upholds the principle of linguistic freedom and ensures that students continue to learn in the language of their choice."

"Apart from BJP-governed states there are multiple non-BJP ruled states which are implementing this language policy," said a senior govt official.

The three-language policy, which has been a part of India's education framework since 1968, has been a major point of contention for long.

Pradhan cautioned that Tamil Nadu govt's continued opposition to NEP 2020 could deprive the students, teachers, and educational institutions of the immense opportunities the policy offers.

Times of India 23.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे. www.dainikprabhat.com
City 24 Feb 2025_003
24 Feb 2025

### नवे शैक्षणिक धोरण लागू करणार नाही

#### तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांचा निश्चय

**चेन्नई, दि. २३** - केंद्र सरकारने तमिळनाडू राज्याला १०,००० कोटी रुपये दिले तरीही नवे शैक्षणिक धोरण आम्ही आमच्याकडे लागू करणार नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरणाला होणारा विरोध केवळ हिंदी लादण्याच्या प्रयत्नामुळे नाही तर विद्यार्थ्यांच्या भविष्यावर आणि सामाजिक न्यायव्यवस्थेवर गंभीर परिणाम करणाऱ्या इतर अनेक घटकांमुळे आहे. विद्यार्थ्यांना शिक्षण सोडून देण्यास परवानगी देणे म्हणजे त्यांना अभ्यास करू नका असे सांगण्यासारखे आहे, अशा शब्दांत तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी नव्या शैक्षणिक धोरणाला आपला विरोध कायम ठेवला.

पालक-शिक्षक संघटनेने येथे आयोजिलेल्या कार्यक्रमाला संबोधित करताना स्टॅलिन यांनी नव्या शैक्षणिक धोरणातील अनेक त्रुटींवर बोट ठेवले.

स्टॅलिन म्हणाले, आम्ही कोणत्याही भाषेच्याविरोधात नाही. परंतु ती लादण्याच्या आमच्या विरोधात ठाम राहू. आम्ही केवळ हिंदी लादण्याच्या प्रयत्नासाठी राष्ट्रीय शिक्षण परिषदेला विरोध करीत नाही आहोत, तर इतर अनेक कारणांसाठीदेखील विरोध करत आहोत.



राष्ट्रीय शिक्षण धोरण विद्यार्थ्यांना शाळांपासून दूर नेईल. सध्या अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि ओबीसी विद्यार्थ्यांना जी शैक्षणिक मदत आता दिली जात आहे, ती मदत नाकारण्याव्यतिरिक्त, राष्ट्रीय शिक्षण धोरणात इयत्ता ३ वी, ५ वी आणि ८ वीसाठी सार्वजनिक परीक्षांचा प्रस्ताव आहे. याअंतर्गत कला आणि विज्ञान महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी एक सामायिक प्रवेश परीक्षा सुरू करण्यात आली आहे.

**द्रमुकचा जुना इतिहास**

द्रमुकचे अध्यक्ष स्टॅलिन म्हणाले की, केंद्रीय निधीतील त्यांच्या वाट्याच्या बदल्यात तमिळनाडूला त्रिभाषा धोरण आणि हिंदीसह एनईपी लागू करण्यास सांगितले जात आहे.जोपर्यंत ते आणि त्यांचा पक्ष अस्तित्वात आहे, तोपर्यंत ते तमिळ भाषा, राज्य आणि तिथल्या लोकांविरुद्ध कोणत्याही प्रकारची कृती होऊ देणार नाहीत. तमिळनाडूमध्ये हिंदीची लादणी हा एक संवेदनशील मुद्दा आहे आणि द्रमुकने १९६५ मध्ये मोठ्या प्रमाणात हिंदीविरोधी आंदोलन यशस्वीरित्या केले होते. या चळवळीदरम्यान अनेक तमिळसमर्थक कार्यकर्त्यांनी भाषा लादण्याविरुद्ध आपले प्राण दिले आणि त्यापैकी बहुतेकांनी आत्मदहन केले. मुख्य विरोधी पक्ष अण्णाद्रमुकनेही राष्ट्रीय आर्थिक धोरणावरून केंद्रावर निशाणा साधला आहे.

प्रभात प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे. www.dainikprabhat.com
City 24 Feb 2025_005
24 Feb 2025

### महाविद्यालयांच्या कारभाराची धुरा प्रभारी प्राचार्यांच्याच माथी!

#### राज्यातील ४३७ वरिष्ठ महाविद्यालयांतील प्राचार्यांची पदे रिक्तच

**पुणे, दि.२३** - राज्यातील अशासकीय अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या १ हजार १६६ जागा मंजूर आहेत. त्यातील ७२९ प्राचार्यांच्या जागा भरण्यात आल्या आहेत, तर तब्बल ४३७ जागा अद्यापही रिक्तच पडलेल्या आहेत. प्राचार्यांच्या जागाच रिक्त असल्यामुळे बहुसंख्य महाविद्यालयाच्या कामकाजाचा भार प्रभारी प्राचार्यांच्या माथी सोपविण्यात आलेला आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य हे एक महत्त्वाचे व मानाचे पद मानले जाते. महाविद्यालयाचा सर्वच कामकाजाचे नियोजन करुन त्याची अंमलबजावणी करुन घेण्याची जबाबदारी ही प्राचार्यांचीच असते. गेल्या काही वर्षांमध्ये मात्र प्राचार्य पदाबाबतच्या महत्वात काहीसा बदल झालेला दिसतो. संस्था सांगेल त्या प्रमाणेच प्राचार्यांना काम करावे लागत आहे. प्राचार्यांना स्वत:च्या मनाप्रमाणे इच्छा असतानाही काही कामकाज करण्याची मुभा दिला जात नाही. ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. प्राचार्य पद हे काटेरी मुकट आणि नामधारीच राहिल्याची परिस्थिती अनेक महाविद्यालयात आढळून येते.

प्रभात वॉच

राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) महाविद्यालयांना मूल्यांकन करुन घेण्याचे बंधन घालण्यात येते. नॅक मुल्यांकनाची प्रक्रिया पूर्ण करुन घेण्यासाठी पुर्णवेळ प्राचार्य कार्यरत असणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र महाविद्यालयांकडून त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. नियत वयोमानानुसार प्राचार्य सेवा निवृत्त झाल्यानंतर रिक्त होणारे ते पद तात्काळ भरण्यासाठी महाविद्यालयाने जलद गतीने हालचाली केल्या पाहिजेत. शासनाकडून प्राचार्यांची रिक्त पदे भरण्यासाठी महाविद्यालयांना एनओसी देण्याची प्रक्रियाही लवकर पूर्ण झाली पाहिजे. महाविद्यालयांनीही रोस्टर तपासणी पुर्ण करणे, शासनाकडून एनओसी मिळविणे, उमेदवारांकडून अर्ज मागविणे, मुलाखती घेऊन नियुक्ती देणे ही प्रक्रिया राबविण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

प्राचार्यांची पुर्णवेळ पदे भरण्याएवजी महाविद्यालयांकडून प्राध्यापकांच्या सेवाज्येष्ठतेनुसार प्रभारी प्राचार्य नियुक्त करुन महाविद्यालयाच्या कामकाजाची ढकलगाडी सुरु ठेवण्याचाच प्राधान्य दिले जात आहे. प्रभारी प्राचार्य पदाचा अतिरिक्त मोबदलाही संबंधितानाही दिला जात नाही. उलट डोकेदुखीच वाढवून घ्यावी लागते. त्यामुळे प्रभारी प्राचार्यांकडूनही नाराजीचाच सूर आळवला जात आहे.

**वरिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्य भरतीचा तपशील**

| विभाग | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|
| मुंबई | ९९ | ५७ | ४२ |
| पनवेल | ९४ | ५८ | ३६ |
| पुणे | १६७ | १०१ | ६६ |
| कोल्हापुर | १३३ | ७७ | ५६ |
| सोलापूर | ४० | २२ | १८ |
| जळगाव | ८३ | ६० | २३ |
| छत्रपती संभाजीनगर | ११५ | ७१ | ४४ |
| नांदेड | ९७ | ६६ | ३१ |
| अमरावती | १४९ | ९८ | ५१ |
| नागपूर | १८९ | ११९ | ७० |
| एकुण | ११६६ | ७२९ | ४३७ |

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# आता शिक्षक होण्यासाठीच्या अभ्यासक्रमात होणार बदल

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**केंद्र सरकारने राष्ट्रीय शिक्षक शिक्षण परिषद अर्थात एनसीटीई नियमन २०२५ ला मान्यता दिली आहे. एनसीटीई नियमन २०२५ चा मसुदा राज्ये आणि विद्यापीठांना पाठविला आहे. या नियमांतर्गत जवळजवळ ११ वर्षांनंतर शाळेतील शिक्षक होण्यासाठीच्या अभ्यासक्रमात बदल होणार आहे. यामध्ये पीजीनंतर एक वर्ष बीएड, पदवीनंतर दोन वर्षे बीएड, बारावीनंतर चार वर्षे बीएड आणि एमएड पदवी अभ्यासांनाही मान्यता देण्यात आली आहे. विशेष म्हणजे, दहा वर्षांनंतर पुढील वर्षापासून पुन्हा एक वर्षाचा बीएड पदवी कार्यक्रम सुरू होत आहे.**

- **पीजीनंतर एक वर्ष बीएड, पदवीनंतर दोन वर्षे बीएड, बारावीनंतर चार वर्षे बीएड आणि एमएड पदवी अभ्यासक्रमांना मान्यता**
- **एनसीटीई नियमन २०२५ चा मसुदा राज्ये आणि विद्यापीठांना पाठविला**

'एनसीटीई'ने शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा एनईपी २०२० आणि २०४७ विकसित भारत ध्येयअंतर्गत हे एनसीटीई नियमन-२०२५ तयार केले आहे. एनईपी २०२० अंतर्गत शालेय शिक्षण पायाभूत टप्पे, पूर्वतयारी टप्पे, मध्यम आणि माध्यमिक टप्पे, अशा चार भागांमध्ये विभागले गेले आहे. शिक्षकांना या चार वेगवेगळ्या स्तरांवर तयार केले जाईल. याशिवाय पदव्युत्तर पदवी कार्यक्रमांच्या रचनेत बदल झाल्यामुळे शिक्षक होण्यासाठी स्वतंत्र बीएड कार्यक्रम सुरू केले जात आहेत.

याशिवाय एनईपीअंतर्गत सर्व कार्यक्रम, क्रेडिट फ्रेमवर्क आणि अभ्यासक्रम तयार केले आहेत; ज्यामध्ये एआय, व्यावसायिक अभ्यासक्रमांसह उदयोन्मुख क्षेत्रे जोडली आहेत. तसेच एमएड पूर्णवेळ आणि एमएड अर्धवेळ अभ्यासक्रमात देखील बदल केला आहे.



एनईपी-२०२० लागू होण्यापूर्वी ७५० महाविद्यालयांमध्ये दोन वर्षांचा बीएड अभ्यासक्रम सुरू होता. नवीन नियम लागू झाल्यानंतर हा दोन वर्षांचा बीएड कार्यक्रम विस्तारित केला जाईल.

### बीएडमध्ये आगामी सत्रापासून चार नवीन स्पेशलायझेशन

चार वर्षांचा पदवीधर पदवी कार्यक्रम आणि पदव्युत्तर पदवी पूर्ण केलेले विद्यार्थी एक वर्षाच्या बीएड कार्यक्रमामध्ये प्रवेश घेऊ शकतील. नियमांनुसार हा पदवी कार्यक्रम २०१४ मध्ये बंद करण्यात आला. परंतु, आता एनईपी २०२० च्या शिफारशींनुसार, १० वर्षांनी पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. तीन वर्षांचा बॅचलर डिग्री प्रोग्राम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना दोन वर्षांच्या बीएड अभ्यासक्रमात प्रवेशाची संधी मिळेल. चार वर्षांचा एकात्मिक बीएड या पदवी कार्यक्रमाचा विस्तार केला आहे. बीए-बीएड, बीएस्सी-बीएड आणि बीकॉम-बीएडची पहिली बॅच २०२३ मध्ये सुरू झाली. यामध्ये आगामी सत्रापासून म्हणजेच २०२५ पासून शारीरिक शिक्षण, कला शिक्षण, योग शिक्षण आणि संस्कृत शिक्षण हे चार नवीन स्पेशलायझेशन अभ्यासक्रम जोडले जाणार आहेत. शिक्षक होण्यासाठी हा एक प्रीमियम कार्यक्रम असेल. बारावीनंतर शिक्षक म्हणून करिअर करू इच्छिणारे विद्यार्थी या चार वर्षांच्या बीएड एकात्मिक अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतात.

या महाविद्यालयांना बहुविद्याशाखीय कार्यक्रम सुरू करणे बंधनकारक आहे. नियमांची पूर्तता न करणाऱ्या महाविद्यालयांमध्ये हा अभ्यासक्रम बंद केला जाईल. यासाठी चार वर्षांचा कालावधी दिला आहे.

Pune Edition
Feb 24, 2025 Page No. 07
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# विद्यार्थ्यांनो, समाज वाचायला शिका

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांचे आवाहन

- विद्यापीठात साधला राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांशी संवाद



'उत्कर्ष २०२५' या तीन दिवसांच्या सांस्कृतिक सामाजिक स्पर्धेनिमित्त विद्यार्थ्यांशी संवाद साधाताना मंत्री चंद्रकांत पाटील. यावेळी व्यासपीठावर कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्यासह इतर मान्यवर.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या विविध उपक्रमांद्वारे स्वयंसेवकांना जीवनदृष्टी मिळावी, अशी अपेक्षा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी व्यक्त केली. या योजनेच्या माध्यमातून मिळणाऱ्या समाजोपयोगी संधींद्वारे विद्यार्थ्यांनी समाज वाचायला शिकावे, असे आवाहनही त्यांनी केले.

राज्याचा उच्च व तंत्र शिक्षण विभाग, राष्ट्रीय सेवा योजना आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माध्यमातून आयोजित 'उत्कर्ष २०२५' या तीन दिवसांच्या सांस्कृतिक सामाजिक स्पर्धेनिमित्त पाटील यांनी रविवारी राज्यभरातून पुण्यात या स्पर्धेसाठी आलेल्या स्वयंसेवक विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यापीठाच्या इरावती कर्वे सामाजिकशास्त्र संकुलामध्ये झालेल्या या कार्यक्रमावेळी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ. नीलेश पाठक, विद्यापीठाच्या कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस, परीक्षा विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. सदानंद भोसले, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. अभिजित कुलकर्णी आदी उपस्थित होते.

पाटील यांनी या प्रसंगी सर्व औपचारिकता बाजूला ठेवत विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. आपल्या आयुष्यातील महाविद्यालयीन जीवन तसेच अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेद्वारे सेवाकार्याचे दाखले देत, त्यांनी विद्यार्थ्यांना सामाजिक क्षेत्रांमधील त्यांच्या योगदानाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले.

पाटील म्हणाले, महाविद्यालयीन जीवनातून मिळणारा आयुष्याकडे बघण्याचा दृष्टिकोन पुढील आयुष्यासाठी नवी दृष्टी देतो. विद्यार्थ्यांनी यादरम्यानच्या काळात आपल्याला इतरांसाठी काही करता येईल का, याचा विचार करायला हवा. विद्यार्थ्यांनी केवळ भौतिक सुविधांमध्ये केले जाणारे बदलच नव्हे, तर मानसिकतेमध्ये बदल घडविण्यासाठी काय करता येईल, याचाही विचार करायला हवा. त्यासाठी विद्यार्थ्यांनी सामाजिक प्रश्नांवर काम करावे.

### एनएसएस, एनसीसीसाठीच्या तरतुदी वाढवणार

राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) या विभागांसाठी विविध तरतुदी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती पाटील यांनी दिली. 'एनएसएस'साठीच्या तरतुदी वाढविण्याबाबत यापूर्वीच पावले उचलली आहेत. मात्र, 'एनसीसी' थेटपणे आपल्या खात्याशी संबंधित नसल्याने संबंधित खात्यासोबत निधी आणि विद्यार्थिसंख्या वाढविण्यासाठी बोलणी करणार असल्याचे पाटील यांनी सांगितले.

### नवे वसतिगृह व प्राणिगृह इमारतीचे भूमिपूजन

गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राज्यातील आणि देशातील विविध भागांतून पुण्यात येणाऱ्या मुलांची संख्या मोठी आहे. त्यांच्या निवासाची व्यवस्था व्हावी म्हणून सर्व आधुनिक सोयींनी सुसज्ज वसतिगृह विद्यापीठात उभारण्यात येणार असून, नवीन वसतिगृहाच्या इमारतीचे व प्राण्यांसाठी उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक मध्यवर्ती प्राणिगृह इमारतीचे भूमिपूजन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

My Pune Edition
Feb 24, 2025 Page No. 03
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# शैक्षणिक वर्ष सुरू होणार जूनपासूनच

**सीबीएसईच्या धर्तीवर यंदापासून पहिलीचा अभ्यासक्रम**

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

यंदाचे शैक्षणिक वर्ष एप्रिलपासून नव्हे, तर जूनपासूनच सुरू होणार आहे. सोबतच सीबीएसईच्या धर्तीवर यंदापासून पहिलीचा अभ्यासक्रम तयार केला जात असून त्यासंदर्भातील अंमलबजावणी होणार असल्याची महिती शालेय शिक्षण विभाकडून देण्यात आली आहे.

नव्या शैक्षणिक वर्षात राज्य शिक्षण मंडळाच्या शाळाही सीबीएसईच्या धर्तीवर एक एप्रिलपासून सुरू होणार असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्यानंतर शिक्षक, शाळा व्यवस्थापन आणि विद्यार्थी यांच्यात संभ्रम निर्माण झाला. याला राज्यातील शिक्षकांनी आता तातडीने हे कसे शक्य आहे, असे सांगत नाराजी व्यक्त केली.

यावर शालेय शिक्षण विभागाने केलेल्या खुलाशानुसार शैक्षणिक वर्ष जूनपासूनच सुरू होणार असून केवळ नव्या शैक्षणिक वर्षात पहिलीच्या विद्यार्थ्यांना राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार नवा अभ्यासक्रम लागू होणार आहे. या अभ्यासक्रमाची आखणी सीबीएसईच्या धर्तीवर केली असून हा बदल वगळता शाळांच्या वेळापत्रकात काहीही बदल झालेला नाही.

याबाबत राज्याचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी शाळांच्या वेळापत्रकात यंदा तरी असा कोणताही बदल होणार नसल्याचे स्पष्ट केले. शिक्षण विभागाच्या पान ६ वर ▶

Pune Edition

Feb 24, 2025 Page No. 03

Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# शैक्षणिक वर्ष सुरू होणार जूनपासूनच

**(पान १ वरुन)** राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे पहिली आणि शक्य झाल्यास इयत्ता दुसरीसाठी एनईपी लागू करणे म्हणजेच राज्य अभ्यासक्रम आराखड्यानुसार नवी पुस्तके आणि बदललेल्या पद्धतीने शिक्षण देणे हा बदल होणार आहे. तथापि, शाळा नेहमीप्रमाणे जून महिन्यातच सुरू होतील, असे सिंह यांनी स्पष्ट केले.

**समग्र चर्चेनंतरच निर्णय**

सीबीएसईच्या शैक्षणिक वर्षाप्रमाणे राज्यातील शाळाही एप्रिल महिन्यापासूनच सुरू करण्याबाबत शाळा, विद्यार्थी, पालक, शिक्षक यांच्या संघटनांशी चर्चा केल्याशिवाय घेतला जाणार नाही. महाराष्ट्रातील भौगोलिक, हवामानाची स्थिती लक्षात घेऊनच तसा निर्णय घेता जाईल. यंदापासून असा बदल होणार नाही. त्यासाठी विविध पातळीवर तयारी करावी लागणार असल्याचे ते म्हणाले.

Pune Edition

Feb 24, 2025 Page No. 08

Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
स्थापना १९३९
पुढारी
www.pudhari.com

# शिक्षकांना आता स्कॉफ मूल्यांकन

## परीक्षा काळातील कामाने शिक्षक हैराण, ३ ते २८ फेब्रुवारीची मुदत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेने (एससीईआरटी) राज्यातील राज्य मंडळाच्या सर्व शाळांना शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा २८ फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. १२८ मानके असलेल्या या आराखड्याची पूर्तता करण्यासाठी किमान दोन महिन्यांचा वेळ लागणार आहे. यामुळे परीक्षा घ्यायची की हे काम करायचे असा सवाल शिक्षकांनी उपस्थित केला आहे.

राज्यात सध्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. या दोन्ही परीक्षांसाठी मिळून २७ हजार ८९४ पर्यवेक्षक तैनात आहेत. त्याशिवाय परीक्षेच्या इतर नियोजनातही राज्यातील विविध शिक्षकांचा सहभाग आहे. त्याचबरोबर एससीईआरटीने शालेय शिक्षकांसाठी नियोजित केलेले क्षमतावृद्धी प्रशिक्षण सुरू असल्याने अनेक शिक्षक या कामात व्यस्त आहेत.

### शिक्षकांवर कामाचे तिहेरी ओझे

सध्या शिक्षकांवर बोर्डाच्या परीक्षा, क्षमतावृद्धी प्रशिक्षण आणि विद्यार्थ्यांना शिकवणे, असे तिहेरी ओझे आहे. त्यात या मूल्यांकनामुळे भर पडत असल्याचे शिक्षकांनी म्हटले आहे.

याच दरम्यान एससीईआरटीने स्थापन केलेल्या राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षातर्फे राज्यातील सर्व माध्यमांच्या आणि व्यवस्थापनांच्या शाळांसाठी शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा तयार केला आहे. या आराखड्यात शाळांनी स्वयंमूल्यमापन करणे अपेक्षित आहे. त्यासाठी एससीईआरटीने ०३ फेब्रुवारी रोजी काढलेल्या पत्रकात हे मूल्यमापन पूर्ण करण्यासाठी २८ फेब्रुवारीपर्यंतची मुदत दिली आहे. तसेच एससीईआरटीने त्यासाठीचे मार्गदर्शनपर व्हिडीओची मागणी केली आहे. यामुळे शिक्षक हैराण आहेत. मानके भरण्याची प्रक्रिया खूप किचकट आणि वेळखाऊ आहे. प्रत्येक मानकात काही उपमानके आहेत. प्रत्येक प्रश्नाचे समाधान करणाऱ्या कागदपत्रांची पीडीएफ, फोटो, व्हिडीओ एका गुगल ड्राईव्हवर घ्यायचे आणि त्या गुगल ड्राईव्हची लिंक त्या मानकाखाली किंवा उपमानकाखाली जोडायची, अशी ही प्रक्रिया आहे.

Pune Edition
Feb 24, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# Why has the UGC-CARE list of journals been discontinued?

What are the suggestive parameters introduced by the University Grants Commission with respect to academic journals? Will it lead to a proliferation of low quality journals?

A. M. Jigeesh

**The story so far:**

The University Grants Commission (UGC) decided to discontinue the UGC Consortium for Academic and Research Ethics (UGC-CARE) list, which is a list of quality academic journals, first introduced in 2018. The UGC-CARE list will now be replaced by a set of suggestive parameters for choosing journals based on eight criteria. Stakeholders can submit suggestions by February 25.

**What do the new parameters say?**

There are about 36 suggestive parameters under eight criteria in the draft notification titled "Suggestive Parameters for Peer-Reviewed Journals." Under the journal preliminary criteria, the UGC has asked teachers to note the journal title, the international standard serial number, periodicity and continuity and transparency review policy etc before sending an article for publication. Under the editorial board criteria, the UGC wants authors to ensure that the journal's editorial board details and editorial board composition are made available. Similarly other criteria under suggestive parameters include journal editorial policy, journal standards, journal visibility and research ethics.

**Why did the UGC withdraw it?**

The aim of the UGC-CARE listing was to ensure that only "reputable" journals are recognised for faculty selections, promotions, and research funding applications. According to UGC Chairman M Jagadesh Kumar, the UGC-CARE list faced several criticisms, including over-centralisation in deciding what constitutes high-quality research and journals, and unnecessary delays in including or excluding journals from the list. Academics had also raised concerns that in certain fields, such as Tamil, the availability of research journals were limited as per the UGC CARE list. Mr. Kumar said there was lack of transparency in the decision-making process and highly respected journals published in Indian languages were excluded from the list.

Furthermore, the UGC claims that the new approach will help in combating predatory journals and decentralise the mechanism of choosing academic journals. Higher education institutions will "now be responsible for establishing credible mechanisms to evaluate journals and ensure they meet high ethical and scholarly standards." They can develop their own institutional mechanisms for evaluating the quality of publications and journals. "These mechanisms should align with established academic norms and indicative parameters suggested by the UGC. This decentralised approach allows HEIs to tailor their evaluation processes to suit their specific needs," Mr. Kumar said in a statement. Institutions can now create evaluation models that consider the unique characteristics of different disciplines, and accommodate newer, evolving fields.

**What has been the response?**

Students and academics have voiced their concerns on the latest move. Their main worry is that the decision will result in the mushrooming of low-quality journals. The Central Executive Committee of the Students' Federation of India (SFI) condemned the UGC's move, which they said was taken without adequate consultation with student and research communities. The SFI termed the decision as a serious setback to academic integrity and quality research in India. The SFI added that the UGC's decision is part of a broader pattern of deregulation in higher education under the National Education Policy (NEP) 2020. "While decentralisation is essential for academic freedom, the lack of a central oversight mechanism could lead to arbitrary and inconsistent journal evaluation processes across institutions," it said.

**THE GIST**

The aim of the UGC-CARE listing was to ensure that only "reputable" journals are recognised for faculty selections, promotions, and research funding applications.

According to UGC Chairman M Jagadesh Kumar, the UGC-CARE list faced several criticisms, including over-centralisation in deciding what constitutes high-quality research and journals, and unnecessary delays in including or excluding journals from the list.

Students and academics have voiced their concerns on the latest move.

The Hindu 24.2.2025

# Surprise visits planned to check girl student facilities in colleges

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com



According to new educational policy, efforts are being made to increase the representation of girls in vocational education. HT FILE

**PUNE:** While the state government has introduced a scheme to waive tuition fees and examination fees for girls in higher education, many complaints are being received from girl students that they are still being charged fees by colleges/educational institutions. To remedy this situation and ensure implementation of the free education scheme at the college level, higher and technical education minister Chandrakant Patil has planned surprise visits to over 100 colleges across Maharashtra. As part of this initiative, Patil made a surprise visit to Aba Saheb Garware College, managed by Maharashtra Education Society, Pune, last week. During his visit, Patil assessed the extensive promotion, publicity, and practical implementation of the free education scheme while identifying the challenges faced in the process.

Aba Saheb Garware College, a senior institution, currently has approximately 6,700 students enrolled in the arts, science and commerce streams for the ongoing academic year with 3,550 students out of these being girl students. "It was observed that a significant number of eligible female students have benefitted from this scheme. For permanently unaided courses, faculty salaries are covered by collecting additional fees from students. To reduce the financial burden on students, directives were given to explore possible measures," said Patil.

To ensure the effective implementation of the Rajarshi Chhatrapati Shahu Maharaj Tuition Fee Scholarship Scheme, a dedicated nodal officer has been appointed at the college level. Information about the scheme has been prominently displayed at the entrance and on notice boards to promote awareness. The application process for this scheme is currently underway, with March 31, 2025 being the deadline for submission.

"To facilitate this, special camps will be organised at the college level to reach eligible students and assist them in applying through the MahaDBT portal," Patil said.

The percentage of girls in vocational education is just 36%. According to the new educational policy, efforts are being made to: increase the representation of girls in vocational education, ensure that girls have equal opportunities for education, and prevent girls from being deprived of higher education due to lack of financial support under women's empowerment. The higher education department has instructed institutions to actively work towards spreading awareness and ensuring maximum participation in the scheme.

Hindustan Times 24.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### सावित्रीबाई फुले विद्यापीठात शिवरायांवर पदव्युत्तर अभ्यासक्रम!

**छत्रपती शिवाजी महाराजांचे 'व्हिजन अँड नेशन बिल्डिंग' यावर पूर्ण वेळ अभ्यासक्रम सुरू**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

ज्या पुण्यातून छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यनिर्मितीची मुहूर्तमेढ रोवली, त्याच पुण्यातील सावित्रीबाई फुले विद्यापीठात छत्रपती शिवरायांवर पदव्युत्तर (एमए) अभ्यासक्रम सुरू होणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षात म्हणजेच २०२५-२६ मध्ये शिवजयंतीनिमित्त विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचे 'व्हिजन अँड नेशन बिल्डिंग' यावर पूर्ण वेळ अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ही घोषणा करण्यात आली आहे. पुणे विद्यापीठाने सुरू केलेल्या नव्या अभ्यासक्रमामुळे शिवप्रेमींना महाराजांच्या कारकिर्दीची इत्थंभूत माहिती मिळणे सोपे होणार आहे. या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शिवरायांनी केलेली युद्धे, त्यासाठीची रणनीती आणि प्रशासनावरील त्यांचे विचार या अभ्यासक्रमाचा समावेश असणार आहे.



राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक विचारसरणीसाठी त्यांचा दृष्टिकोन, भारतीय राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेवर त्यांचा प्रभाव, १७ व्या शतकातील दख्खनच्या भौगोलिक, सामाजिक आणि राजकीय वातावरणाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती मिळणार आहे.

या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट भारतीय राष्ट्रउभारणीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श विचार आणि सध्याच्या काळात त्याची प्रासंगिकता पसरवणे, असा आहे. गुलामगिरीची मानसिकता संपवून राष्ट्रउभारणीसाठी लोकांना प्रेरित करणाऱ्या नेत्याच्या दृष्टिकोनाचा शोध घेण्यासाठी या अभ्यासक्रमाची सुरुवात करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाकडून सांगण्यात आले आहे.

भारतीय राष्ट्रउभारणीची प्रक्रिया आणि त्यावर शिवरायांची भूमिका, यावर आढावा घेण्यासाठी हा अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

Pune Edition
Feb 25, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### 'नेट'चा निकाल जाहीर

**पाच हजार १५८ उमेदवार सहायक प्राध्यापकासाठी पात्र**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

नॅशनल टेस्टिंग एजन्सी अर्थात एनटीएकडून यूजीसी नेटचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. निकाल एनटीएची अधिकृत वेबसाईट ugcnet.nta.ac.in वर ऑनलाइन प्रसिद्ध करण्यात आला आहे. उमेदवार यूजीसी नेट स्कोअर कार्ड देखील डाऊनलोड करू शकतात. यूजीसी नेट परीक्षेअंतर्गत उमेदवारांना तीन श्रेणींमध्ये पात्रता मिळाली आहे.

डिसेंबर सत्रात ५ हजार १५८ उमेदवार सहायक प्राध्यापकासाठी, ४८ हजार १६१ सहायक प्राध्यापक आणि पीएच.डी. प्रवेशासाठी आणि १ लाख १४ हजार ४४५ उमेदवार केवळ पीएच.डी. प्रवेशासाठी पात्र ठरले आहेत. नेट परीक्षेसाठी यंदा नोंदणीकृत उमेदवारांची संख्या ८ लाख ४९ हजार १६६ होती. यापैकी ६ लाख ४९ हजार ४९० उमेदवारांनी संबंधित परीक्षा दिली असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार महाविद्यालय आणि विद्यापीठांसह उच्च शिक्षण संस्थांमध्ये सहायक प्राध्यापकपदी नोकरी मिळविण्यासाठी तसेच पीएच.डी. प्रवेशासाठी यूजीसी नेट परीक्षेतील गुण ग्राह्य धरले जातात. त्यामुळे देशभरातील पात्र उमेदवार संबंधित परीक्षा देत असतात.

Pune Edition
Feb 25, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# NAAC purges 900 assessors after corruption allegations

## Before Sacking 20% Of Inspectors, It Had Stopped Physical Inspections

**Hemali.Chhapia**
@timesofindia.com




At a moment when NAAC was already reassessing its accreditation framework, mass removal of reviewers signalled a deeper shift

**Mumbai:** The National Assessment and Accreditation Council took a dramatic step, cutting nearly a fifth of its peer reviewers — almost 900 of them — after allegations of corruption surfaced in the grading process. The purge followed a tip-off to CBI that assessors visiting Koneru Lakshmaiah Education Foundation (KLEF), a deemed university in Andhra Pradesh, solicited a bribe in exchange for the highest accreditation grade.

At a moment when NAAC was already reassessing its accreditation framework, mass removal of reviewers signalled a deeper shift. Letters from NAAC director to remaining reviewers made clear that their work was more than procedural; it was a "nationally important assignment".

"We were reviewing our processes for over a year. We were also looking at assessors on board and while we removed many, we were also looking at onboarding some senior academicians, vice-chancellors, deans, and directors of reputed institutes," said professor Anil Sahasrabudhe, the chairman of NAAC executive committee.

In a move aimed at eradicating corruption and streamlining accreditation, after the KLEF case, NAAC abruptly halted physical inspections of colleges. Evaluations, it said, would now be conducted online, eliminating campus visits for colleges. Universities, though, would see a hybrid approach — most assessments would be remote, but select reviewers would still conduct onsite visits to ensure oversight.

"Integrity is not a line item — it is the very foundation of trust. We dropped over 900 assessors. In some cases, data about assessors was insufficient; in others, we reviewed their assessments and found them lacking. Some were removed based on feedback we received, and in others, we analysed how they wrote their reports," NAAC director Ganesan Kannabiran told **TOI**. The scrutiny extended beyond individual assessors. NAAC also examined assessment reports from institutions that requested a re-evaluation of their grades. "In some cases, we compared the two assessment reports and felt that certain assessors' performance did not meet NAAC's requirements," Kannabiran added. Those names, too, were struck off the list.

The crackdown went beyond internal reform. Each peer team member now receives a letter from the NAAC director, reminding them of the expectations placed upon them. "In recent times, we received complaints that a few higher education institutions were offering above-normal hospitality, organising elaborate cultural activities, arranging sightseeing, and most importantly, offering gifts. Please discourage these aspects and report to us if you notice any such acts or intentions of the HEIs." A similar message is sent to the institutes too, asking them not to indulge in "elaborate" hospitality.

The letter is unequivocal. "We are in the process of identifying such practices of the HEIs and taking punitive action. Keeping the long-term requirements of our nation in mind, I sincerely request you to ensure that a critical and transparent approach is adopted during the entire period of assignment. I strongly believe your invaluable commitment with honesty and integrity in this regard shall positively impact the credibility of NAAC and eventually enhance quality of education."

Times of India 25.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उभारणार 'मध्यवर्ती प्राणिगृह'

**पुणे, ता. २५ :** प्राण्यांवर संशोधन करण्याच्या उद्देशाने 'मध्यवर्ती प्राणिगृह' उभारण्याचा प्रकल्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने हाती घेतला आहे. विविध प्राण्यांवरील संशोधनाला चालना देण्याच्या उद्देशाने हे प्राणिगृह उभारले जात आहे. याद्वारे जीवशास्त्र, जैववैद्यकीय विज्ञान आणि औषधनिर्माण क्षेत्रातील विद्यापीठीय संशोधनाचा प्रभाव वाढविण्याच्या हेतूने विद्यापीठ स्तरावरून प्रयत्न सुरू झाले आहेत.

पुणे विद्यापीठाच्या मुलांच्या नवीन वसतिगृहाच्या इमारतीचे आणि प्राण्यांसाठी उभारण्यात येणाऱ्या अत्याधुनिक मध्यवर्ती प्राणिगृह इमारतीचे भूमिपूजन उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते नुकतेच झाले. विद्यापीठाचे मध्यवर्ती प्राणिगृह हे उद्योगांसह सरकारी आणि खासगी संस्थांना संशोधन आणि सहकार्यासाठी खुली करण्यात येणार आहे. आंतरविद्याशाखीय सहकाऱ्यांसह संशोधनाच्या गुणवत्तेला राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांकडून निधी मिळविण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत.

केवळ पुणे विद्यापीठातीलाच नव्हे, तर राज्यातील सर्व विद्यापीठांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांना संशोधन प्रकल्पांसाठी या प्राणिगृहाचा उपयोग करता येणार आहे, अशी माहिती स्कूल ऑफ लाइफ सायन्सेसच्या संचालक डॉ. स्मिता झिंझार्डे, प्राणिशास्त्र विभागाप्रमुख डॉ. नरहरी ग्रामपुरोहित यांनी दिली. या सोहळ्यात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, प्रभारी कुलसचिव डॉ. ज्योती भाकरे, डॉ. देविदास वायदंडे, डॉ. धोंडिराम पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे डॉ. प्रभाकर देसाई, अधिसभा सदस्य प्रसेनजित फडणवीस, राहुल पाखरे, डॉ. वर्षा वानखेडे आदी उपस्थित होते.

Sakal 26.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# नवीन विद्यापीठांच्या स्थापनेसाठी...

**उच्च शिक्षणाचा धोरणात्मक विस्तार करण्याच्या हेतूने देशभरात नवीन विद्यापीठांच्या स्थापनेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी धोरणात्मक चौकट प्रस्तावित करण्यात आली आहे. त्याविषयी...**

**देवदत्त तारे**
mtedit@timesofindia.com



नीती आयोगाच्या कार्यपत्रिकेत देशविकासाच्या अजेंड्याच्या एका महत्त्वपूर्ण पैलूवर लक्ष केंद्रित केले आहे. उच्च शिक्षणाचा धोरणात्मक विस्तार, आर्थिक विकास, सामाजिक प्रगती आणि मानवी भांडवल विकासाला चालना देण्यासाठी विद्यापीठांची महत्त्वाची भूमिका ओळखून देशभरात नवीन विद्यापीठांच्या स्थापनेबाबत मार्गदर्शन करण्यासाठी एक मजबूत, पुरावा-आधारित धोरणात्मक चौकट प्रस्तावित करण्यात आली आहे. नवीन विद्यापीठांसाठी योग्य ठिकाणे निश्चित करण्यासाठी, उच्च शिक्षणाच्या संधींचे अधिक समन्यायी वितरण सुनिश्चित करण्यासाठी आणि या संस्थांचा प्रभाव अधिकाधिक वाढविण्यासाठी एक प्रणाली तयार करणे हे त्याचे मध्यवर्ती उद्दिष्ट आहे.

कार्यपत्रिकेमध्ये केलेल्या डेटा आणि स्थानिक विश्लेषणातून भारतातील विद्यापीठ वितरणाच्या सद्यस्थितीबद्दल अनेक महत्त्वपूर्ण निष्कर्ष निघतात, ज्यामुळे कार्यपत्रिकेच्या प्रमुख शिफारशींची माहिती मिळते. त्या शिफारसी पुढीलप्रमाणे आहेत...

भारतातील विद्यापीठांच्या भौगोलिक वितरणातील स्पष्ट विषमता हा एक प्राथमिक निष्कर्ष आहे. विद्यापीठे प्रमुख महानगरे आणि काही ऐतिहासिकदृष्ट्या विकसित प्रदेशांमध्ये असमान प्रमाणात केंद्रित होतात, याची पुष्टी या विश्लेषणातून झाली आहे. ही भौगोलिक विषमता वंचित भागातील विद्यार्थ्यांसाठी अडथळे निर्माण करते.

भारतातील अनेक जिल्ह्यांमध्ये आजही एकही विद्यापीठ नाही, ही चिंताजनक बाब या शोधनिबंधात अधोरेखित करण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना विद्यापीठ शिक्षणासाठी दूरच्या शहरांमध्ये स्थलांतर करावे लागते. ते अनेकदा आर्थिकदृष्ट्या प्रतिबंधात्मक किंवा सामाजिकदृष्ट्या आव्हानात्मक असते. ही तफावत भरून काढणे हे महत्त्वाचे प्राधान्य मानले जाते.

दुर्गम भाग, आदिवासी भाग, डोंगराळ प्रदेश आणि 'आकांक्षी जिल्हे' या भागांत उच्च शिक्षणाची उपलब्धता सुधारण्याची तीव्र गरज या कार्यपत्रिकेने अधोरेखित केली आहे. सामाजिक-आर्थिक आव्हाने आणि भौगोलिक अलिप्तता असलेल्या या प्रदेशांना त्यांच्या लोकसंख्येला दर्जेदार उच्च शिक्षण प्रदान करण्यात मोठे अडथळे येतात.

एकूणच शिक्षणात स्त्री-पुरुष समानता सुधारण्यात भारताने प्रगती केली असली, तरी उच्च शिक्षणप्रवेश आणि प्रवेशातील लैंगिक विषमता काही विशिष्ट क्षेत्रांमध्ये आणि शाखांमध्ये कायम असल्याचे या अहवालात मान्य करण्यात आले आहे. ही उणीव भरून काढणे हे उच्च शिक्षणाच्या विस्ताराचे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले जाते.

या निष्कर्षांच्या आधारे, नीती आयोगाच्या कार्यपत्रिकेत भारतात नवीन विद्यापीठांच्या स्थापनेसाठी मार्गदर्शन करण्यासाठी धोरणात्मक शिफारशींचा संच प्रस्तावित करण्यात आला आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये आधीपासूनच संलग्नित महाविद्यालयांचा भक्कम आधार आहे, ते जिल्हे नवीन विद्यापीठांसाठी आदर्श ठिकाणे म्हणून ओळखली जातात. सध्याच्या विद्यार्थ्यांची संख्या आणि शैक्षणिक पायाभूत सुविधांचा फायदा घेण्यासाठी विद्यमान चांगली कामगिरी करणाऱ्या महाविद्यालयांना विद्यापीठाचा दर्जा देण्याचा विचार करावा किंवा या जिल्ह्यांमध्ये नवीन विद्यापीठे स्थापन करावीत, अशी शिफारस या कार्यपत्रिकेमध्ये करण्यात आली आहे. प्रादेशिक गरजांनुसार विशेष विद्यापीठे विकसित करणे, आदिवासी, वन आणि डोंगराळ जिल्ह्यांसाठी वनीकरण, पर्यावरण विज्ञान, आदिवासी अभ्यास, स्वदेशी ज्ञान प्रणाली, शाश्वत विकास आणि संबंधित क्षेत्रांसारख्या संबंधित विषयांवर लक्ष केंद्रित करणारी विद्यापीठे स्थापन करण्याची शिफारस या कार्यपत्रिकेमध्ये करण्यात आली आहे.

मजबूत औद्योगिक पाया असलेल्या किंवा औद्योगिक विकासाची उच्च क्षमता असलेल्या जिल्ह्यांमध्ये तांत्रिक विद्यापीठे आणि प्रगत व्यावसायिक प्रशिक्षण संस्था स्थापन करण्याची शिफारस आहे. स्थानिक उद्योगांच्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळ तयार करणे, आर्थिक विकासाला चालना देणे आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे यासाठी या संस्थांची रचना करण्यात येणार आहे. उच्च शिक्षणात स्त्री-पुरुष समानतेला सक्रियपणे प्रोत्साहन देण्यासाठी विशिष्ट उपाय आणि उपक्रमांचा समावेश करण्याच्या महत्त्वावर या कार्यपत्रिके मध्ये भर देण्यात आला आहे. नव्या विद्यापीठांच्या नियोजनात आणि स्थापनेत याचा मुख्य विचार व्हायला हवा.

महाराष्ट्राच्या दृष्टीने...

नीती आयोगाच्या कार्यपत्रिकेने दिलेल्या चौकटीतून महाराष्ट्राच्या उच्च शिक्षणाच्या परिदृश्याचा आढावा घेताना राष्ट्रीय निष्कर्षांशी सुसंगत असे नमुने आपल्याला दिसून येतात. उच्च शिक्षणात महाराष्ट्र अग्रेसर राज्य असले तरी भौगोलिक हद्दीतील विद्यापीठांचे असमान वितरणही येथे दिसून येते.

महाराष्ट्रातील प्रमुख महानगरे, विशेषतः मुंबई, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर ही उच्च शिक्षणाची प्रमुख केंद्रे म्हणून उभी आहेत. या शहरांमध्ये राज्य विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, खासगी विद्यापीठे आणि विशेष संस्थांचा समावेश असलेली विद्यापीठे मोठ्या प्रमाणात आहेत. हे क्लस्टरिंग ऐतिहासिक विकास, पायाभूत सुविधांची उपलब्धता, औद्योगिक प्रगती आणि उच्च लोकसंख्येची घनता यासारख्या घटकांमुळे चालते. मात्र, या समग्रतेमुळे महाराष्ट्राच्या इतर भागांतील, विशेषतः ग्रामीण किंवा अल्पविकसित जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळ दर्जेदार विद्यापीठीय शिक्षण मिळण्यात आव्हानांचा सामना करावा लागू शकतो.

महाराष्ट्रातील अनेक प्रादेशिक केंद्रे ही उच्च शिक्षणासाठी महत्त्वाची केंद्रे म्हणून काम करतात. कोल्हापूर, सोलापूर, नाशिक, जळगाव, अमरावती, सांगली आणि नांदेड या शहरांमध्ये राज्य विद्यापीठे आणि इतर उच्च शिक्षण संस्था आहेत, ज्या प्राथमिक नागरी केंद्रांच्या पलीकडे विस्तारलेल्या आहेत. ही प्रादेशिक विद्यापीठे आपापल्या भागातील उच्च शिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात.

नीती आयोगाच्या कार्यपत्रिकेचा चष्मा वापरून महाराष्ट्रातील असे जिल्हे ओळखणे महत्त्वाचे ठरते, जे विद्यापीठ प्रवेशाच्या बाबतीत तुलनेने वंचित असू शकतात. विद्यापीठांच्या जाहीर उपलब्ध याद्या आणि प्राथमिक विश्लेषणाच्या आधारे, ज्या जिल्ह्यांमध्ये राज्य किंवा अभिमत विद्यापीठांची घनता कमी दिसते त्यामध्ये भंडारा, बीड, बुलढाणा, धुळे, गोंदिया, हिंगोली, जालना, लातूर, नंदुरबार, उस्मानाबाद, सिंधुदुर्ग, ठाणे (मुंबई महानगर प्रदेश वगळून) आणि वाशीम यांचा समावेश आहे. उपलब्ध याद्यांवर आधारित हे प्राथमिक निरीक्षण आहे आणि निश्चितपणे पुष्टी करण्यासाठी अधिक सखोल, जिल्हास्तरीय तपासणी आवश्यक आहे. या जिल्ह्यांमध्ये खासगी विद्यापीठे किंवा महाविद्यालयांचे जाळे असू शकते, परंतु प्रमुख राज्य किंवा अभिमत विद्यापीठांची तुलनेने अनुपस्थिती व्यापक उच्च शिक्षणाच्या संधींमध्ये संभाव्य तफावत दर्शवू शकते. विशेषतः कमी सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीच्या विद्यार्थ्यांसाठी जे परवडणाऱ्या सार्वजनिक विद्यापीठांवर अधिक अवलंबून असू शकतात.

गडचिरोलीत २०११मध्ये स्थापन झालेले गोंडवाना विद्यापीठ हे आदिवासीबहुल आणि भौगोलिकदृष्ट्या दुर्गम जिल्ह्यातील उच्च शिक्षणाच्या गरजा पूर्ण करण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वाचे पाऊल होते. तथापि, नीती आयोगाच्या कार्यपत्रिकेने विशिष्ट प्रदेशांरूप, विशेषतः आदिवासी, जंगल आणि डोंगराळ भागात विशेष विद्यापीठांसाठी केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने, महाराष्ट्रातील गडचिरोली आणि तत्सम जिल्ह्यांमध्ये विशेष उच्च शिक्षण क्षमता अधिक विकसित करण्याचे सबळ कारण असू शकते. गडचिरोलीचा अद्वितीय पर्यावरणीय संदर्भ (जंगले, नैसर्गिक संसाधने) आणि सामाजिक-सांस्कृतिक प्रोफाइल (आदिवासी समुदाय) लक्षात घेता, वनीकरण, पर्यावरण व्यवस्थापन, आदिवासी संस्कृती आणि भाषा, शाश्वत ग्रामीण विकास आणि संबंधित विषयांवर लक्ष केंद्रित करणारी विशेष विद्यापीठे अत्यंत समर्पक आणि प्रभावी ठरू शकतात. या विशेष संस्था स्थानिक विकासात योगदान देऊ शकतात, आदिवासी समुदायांना सक्षम बनवू शकतात आणि या प्रदेशाच्या विशिष्ट गरजा आणि संधीनुसार संशोधन आणि नाविन्यपूर्णतेस प्रोत्साहन देऊ शकतात.

महाराष्ट्रात विद्यापीठांचे भक्कम जाळे असले, तरी असमान वितरण आणि वंचित क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याची अनिवार्यता याविषयावर कार्यपत्रिकेचे निष्कर्ष थेट राज्यांतर्गत लागू आहेत. नीती आयोगाच्या स्थानिक निर्णय समर्थन प्रणालीच्या (एसडीएसएस) कार्यपद्धतीचा अवलंब करून आणि महाराष्ट्रातील जिल्ह्यांच्या विशिष्ट सामाजिक-आर्थिक आणि भौगोलिक संदर्भांचा काळजीपूर्वक विचार करून धोरणकर्ते नवीन विद्यापीठांच्या स्थानाविषयी अधिक माहितीपूर्ण आणि न्याय्य निर्णय घेऊ शकतात.

नीती आयोगाच्या अहवालातील शिफारशींची अंमलबजावणी आणि जिल्हास्तरावर पुढील सूक्ष्म स्तरावरील अभ्यास यामुळे येथे सादर केलेल्या प्राथमिक निरीक्षणांची पडताळणी करणे आणि महाराष्ट्रातील विद्यापीठ शिक्षणाचा विस्तार आणि बळकटीकरण करण्यासाठी ठोस, कृतीक्षम योजना विकसित करणे, उच्च शिक्षणाचे फायदे राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचणे आणि सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासास हातभार लावणे उपयुक्त ठरेल.

**(लेखक गडचिरोलीच्या गोंडवाना विद्यापीठात सहाय्यक प्राध्यापक आहेत.)**

Maharashtra Times 27.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
CITY_27FEB_2025_013
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
27 Feb 2025
www.dainikprabhat.com

### आता दहावीची परीक्षा वर्षातून दोन वेळा होणार

**सीबीएसई बोर्डाचा निर्णय जाहीर**

**नवीन नियमांचा मसुदा तयार**

**सूचना सादर करण्यासाठी ९ मार्चपर्यंत मुदत**

पुणे, दि. २६ - नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) इयत्ता दहावीची परीक्षा वर्षातून दोन वेळा घेण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी सन २०२५-२०२६ या शैक्षणिक वर्षापासून करण्यात येणार आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या अध्यक्षतेखाली नुकत्याच झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत या निर्णयावर चर्चा झाली. दोनदा परीक्षा घेण्याबाबत नवीन नियमांचा मसूदा तयार करण्यात आला आहे. तो सीबीएसईच्या वेबसाइटवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. त्यावर सूचना, प्रतिक्रिया सादर करण्यासाठी येत्या ९ मार्च पर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. प्रतिक्रियांची पडताळणी करुन अंतिम मसूदा तयार करुन तो जाहीर करण्यात येणार आहे, असे बोर्डाचे परीक्षा नियंत्रक डॉ. संयम भारद्वाज यांनी म्हटले आहे.

सीबीएसई बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेचा पहिला टप्पा १७ फेब्रुवारी ते ६ मार्च २०२६ दरम्यान होणार आहे, तर दुसरा टप्पा ५ ते २० मे २०२६ दरम्यान होणार आहे. दोन्ही टप्प्यांमध्ये उमेदवारांना समान परीक्षा केंद्रे दिली जातील. परीक्षा शुल्कातही वाढ करण्यात येणार असून, अर्ज दाखल करताना दोन्ही परीक्षांसाठी शुल्क आकारले जाणार आहे. देशातील २६ लाख ६० हजार विद्यार्थी दहावीच्या परीक्षेला बसतील. एकूण ८४ विषयांची परीक्षा घेण्यात येणार आहे. पहिली परीक्षा १८ दिवस चालणार असून, याचा निकाल २० एप्रिल पर्यंत लागणार आहे. दुसरी परीक्षा १६ दिवस चालणार आहे. त्याचा निकाल ३० जून पर्यंत लागणार आहे. एकुण १ कोटी ७२ लाख ९० हजार उत्तरपत्रिकांची तपासणी करावी लागणार आहे.

### NAACremoves 900 assessors, many dismissed after CBI arrests in bribery case

**Review of evaluations in April-May 2023 began after too many A++ grades**

**EXPRESS NEWS SERVICE**
NEW DELHI, FEBRUARY 26

THE NATIONAL Assessment and Accreditation Council (NAAC) recently removed around 900 of the 5,000 assessors who visit and evaluate higher education institutions before a NAAC grade is issued.

The assessors have been removed over a period of six months to a year, a source said. But the bulk of this action has been taken more recently — around 400 assessors have been removed and more assessors are being reviewed since the CBI arrested 10 people on February 1 in Andhra Pradesh in a case of bribery to obtain a favourable NAAC grade. Those arrested include six members of a NAAC inspection committee and office-bearers of the Koneru Lakshmaiah Education Foundation.

NAAC assessors are academics who constitute a 'peer team' that visits an institution and prepares a report that will determine its NAAC grade. To constitute these peer teams, NAAC invites registrations from professors across different domains of expertise.

Close to 900 such assessors have been removed for a range of reasons, sources said. Some were not found to be active or were not "accepting visits", and some were found to not have prepared reports properly, which means that in some cases, top scores were given on certain parameters without clearly justifying the reasons for assigning a high score, the source said, adding that some assessors only had partial data available.

"NAAC began to review certain evaluations in April-May 2023 when feedback was coming in about too many A++ grades being given. We began to look at the qualitative and quantitative aspects of grading, and decided to check if there was a noticeable difference between the two in some cases," the source said.

"We decided to evaluate cases in which an institution that received a certain grade in the first cycle saw a jump of two grades or more in the second cycle. We also reviewed cases in which an institution received an A++ in the very first cycle," the source said, adding that during this process, around 400 assessments were reviewed, and around half of these institutions saw a downgrade.

> **"...We are aiming to ensure that only on the day of the assessment should the institution know who is assessing, and the assessor will know which institution they are assessing"**
>
> **— GANESAN KANNABIRAN**
> NAAC DIRECTOR

Instead of physical visits by the peer team, NAAC will switch to virtual visits for colleges and a hybrid system for universities in March, the source said.

NAAC Director Ganesan Kannabiran said, "We are looking at continuous improvement. We are aiming to ensure that only on the day of the assessment should the institution know who is assessing, and the assessor will know which institution they are assessing."

In 2024, NAAC announced reforms in accreditation process – binary accreditation instead of grades, which means that the institution will be identified as 'accredited', 'awaiting accreditation', or 'not accredited.' The source said the binary accreditation system is likely to be in place in May.

Indian Express Mumbai 27.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण स्वीकारणार नाही : स्टॅलिन

**चेन्नई** : केंद्र सरकारच्या नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी तीव्र विरोध केला अहे. केंद्र सरकारने राज्याला दहा हजार कोटी दिले तरी ते स्वीकारणार नाही, असे त्यांनी सांगितले आहे.



नवीन शैक्षणिक धोरण हिंदी भाषेचे संवर्धन करण्यासाठी आणल्याचा आरोप त्यांनी केला. ते म्हणाले, केंद्राने राज्याला दहा हजार कोटी रुपयांचा निधी देण्याची ऑफर दिली तरीही, राज्यात राष्ट्रीय शिक्षण धोरण लागू केले जाणार नाही. स्टॅलिन म्हणाले, आम्ही कोणत्याही भाषेला विरोध करत नाही. पण ती लादली तर विरोध करणार आहोत. आम्ही केवळ हिंदी लादत असल्याच्या प्रयत्नासाठी राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा विरोध करत नाही तर इतर अनेक कारणांसाठी विरोध करत आहोत. राष्ट्रीय शिक्षण धोरण प्रतिगामी आहे. ते विद्यार्थ्यांना शाळांपासून दूर नेईल, अशी भीती वाटते.

Kesari 27.2.2024

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
CITY_27FEB_2025_007
27 Feb 2025

# 'सीबीएसई'वरून पंजाबमध्ये वातावरण तापले

**चंदीगड, दि. २६** - केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने (सीबीएसई) आपल्या नव्या मसुद्यात पंजाबी भाषेला दुसरी भाषा म्हणून वगळले असल्यामुळे पंजाबमध्येही वातावरण तापले आहे. येथील राजकीय पक्षांनी प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली आहे. सीबीएसईने वर्षातून दोनदा बोर्ड परीक्षा घेण्यासाठी तयार केलेल्या मसुद्यातून पंजाबी भाषा काढून टाकली जाईल असे वृत्त आहे.

पुढील वर्षी योजनेच्या नवीन मसुद्यात पंजाबी भाषा जोडली जाईल. याचा उद्देश वर्षातून दोनदा बोर्ड परीक्षा घेणे आहे आणि यात एक प्रादेशिक आणि एक परदेशी भाषा मुख्य विषय म्हणून समाविष्ट आहे असे आता सीबीएसईकडून सांगण्यात आले आहे. विविध

### मसुद्यातून पंजाबी भाषा काढल्यामुळे संताप

विषयांमध्ये कोणताही बदल झालेला नाही. ही यादी सांकेतिक आहे. पुढच्या वर्षी पंजाबी भाषेची परीक्षा असेल. आज सादर केलेले सर्व विषय पुढील वर्षी होणाऱ्या दोन्ही बोर्ड परीक्षांमध्ये सुरू राहतील असे सीबीएसईच्या अधिकाऱ्यांनी म्हटले आहे. दरम्यान, नवीन शिक्षण धोरणानुसार वर्षातून दोनदा बोर्ड परीक्षेच्या स्वरूपाच्या

### रोमाना यांनी भाजप नेत्यांना प्रश्न विचारला

मी भाजप नेत्यांना विचारू इच्छितो की तुम्ही या कटात सहभागी आहात का? तुम्ही तुमच्या मातृभाषेसाठी लढू शकत नाही हे खूप अस्वस्थ करणारे सत्य आहे? तमिळनाडूचे मुख्यमंत्री राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) विरोधात कसे लढत आहेत ते पाहा. लक्षात ठेवा की सीबीएसईने जारी केलेल्या अधिसूचनेत राय, उरुंग, तमांग, शेर्पा, संस्कृत, उर्दू, मराठी, गुजराती, मणिपुरी, तिबेटी, भोटी, तेलुगू, बोडो, तंगखुल, भुतिया, काश्मिरी, मिझो आणि थाई भाषांचा समावेश आहे; परंतु प्रादेशिक भाषांच्या यादीतून पंजाबी भाषा काढून टाकण्यात आली आहे.

मसुद्यातून पंजाबी भाषा काढून टाकल्याबद्दल पंजाबचे शिक्षण मंत्री हरजोत बैन्स यांनी कडक टीका केली होती. सीबीएसई दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षांमधून पंजाबी ही दुसरी भाषा म्हणून काढून टाकण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप बैन्स यांनी केला. पंजाबी भाषा नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या या योजनेला त्यांचा तीव्र आक्षेप असल्याचे बैन्स म्हणाले.

अकाली दलाचे नेते परमबंस रोमाना यांनीही केंद्र सरकारवर टीका केली आणि पंजाबी भाषा संपवण्याचा कट रचल्याचा आरोप केला. ते म्हणाले की तुम्ही नवीन अभ्यासक्रमातून पंजाबी का वगळली आहे, हा कटाचा भाग आहे का?

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
CITY_27FEB_2025_015
27 Feb 2025

# शिवरायांच्या कार्यकर्तृत्वावर अभ्यासक्रम

## स्वतंत्र पदव्युत्तरबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची माहिती

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २६ -** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून छत्रपती शिवाजी महाराजांवर पदव्युत्तर (एम.ए.) अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. पुणे विद्यापीठाच्या संरक्षण आणि सामरिक शास्त्र विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराजांचे व्हिजन अँड नेशन बिल्डिंग यावर हा पूर्णवेळ एमए अभ्यासक्रम असेल, अशी माहिती विद्यापीठातर्फे देण्यात आली.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात विद्यापीठाने या अभ्यासक्रमाची घोषणा केली. नव्या अभ्यासक्रमामुळे शिवप्रेमींना महाराजांच्या कारकिर्दीची इत्थंभूत माहिती मिळणे सोपे होणार आहे. या दोन वर्षाच्या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी, शिवरायांनी केलेले युद्ध, त्यासाठीची रणनीती आणि प्रशासनावरील त्यांचे विचार या अभ्यासक्रमाचा समावेश असणार आहे.

राष्ट्रीय सुरक्षा आणि धोरणात्मक विचारसरणीसाठी त्यांचा दृष्टिकोन, भारतीय राष्ट्रनिर्मिती प्रक्रियेवर त्यांचा प्रभाव, १७व्या शतकातील दख्खनच्या भौगोलिक, सामाजिक आणि राजकीय वातावरणाबद्दल विद्यार्थ्यांना माहिती मिळणार आहे.

या अभ्यासक्रमाचे उद्दिष्ट भारतीय राष्ट्र उभारणीसाठी छत्रपती शिवाजी महाराजांचे आदर्श विचार आणि सध्याच्या काळात त्याची प्रासंगिकता पसरवणे असा असल्याचे विद्यापीठाच्यावतीने सांगण्यात आले. अभ्यासक्रमाची सविस्तर माहिती लवकरच विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाणार आहे. या अभ्यासक्रमाची घोषणा करताच विद्यार्थ्यांकडूनही त्यास उत्तम प्रतिसाद मिळत आहे.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# हिंदीच्या आडून संस्कृत लादण्याचा प्रयत्न

## नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणावर मुख्यमंत्री स्टॅलिन यांचे पुन्हा टीकास्त्र

**चेन्नई, ता. २७ (पीटीआय) :** ''हिंदी हा तर मुखवटा असून केंद्राला त्रिभाषा धोरणाच्या माध्यमातून तमिळनाडूमध्ये संस्कृतचा प्रसार करायचा आहे,'' असा आरोप तमिळनाडूचे मुख्यमंत्री आणि द्रमुक पक्षाचे प्रमुख एम. के. स्टॅलिन यांनी गुरुवारी केला. केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणातील त्रिभाषा धोरणाविरोधात त्यांनी आघाडी उघडली आहे.

हिंदीच्या वर्चस्ववादी भूमिकेमुळे बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेश या राज्यांतील मैथिली, ब्रजभाषा, बुंदेलखंडी आणि अवधी यांसारख्या अनेक भाषा नष्ट करून टाकल्या आहेत, असे स्टॅलिन यांनी कार्यकर्त्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे.

''उत्तरेकडील सुमारे पंचवीसहून अधिक स्थानिक बोलीभाषा हिंदी-संस्कृतच्या वर्चस्ववादी भूमिकेमुळे नष्ट झाल्या आहेत. मात्र मागील शतकापासून सुरू असलेल्या द्रविड चळवळीमुळे तमिळ भाषेचे आणि तमिळ संस्कृतीचे संरक्षण झाले आहे,'' असा दावा त्यांनी केला. हिंदी आणि संस्कृत भाषा लादली जात असल्यानेच तमिळनाडू नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विरोध करत आहे, असेही ते म्हणाले.



### 'केवळ संस्कृतला प्रोत्साहन'

■ नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार त्रिभाषांमध्ये परदेशातील भाषाही निवडता येते असा दावा भाजपकडून केला जात असला तरी प्रत्यक्षात मात्र अनेक राज्यांकडून संस्कृत भाषा निवडण्याला प्रोत्साहन दिले जात आहे, असा दावा स्टॅलिन यांनी केला आहे. भाजपचे राज्य असलेल्या राजस्थानात उर्दू ऐवजी आता संस्कृत शिक्षकांच्या नेमणुका केल्या जात आहेत, असा दावा स्टॅलिन यांनी केला. ''जर तमिळनाडूने नव्या शैक्षणिक धोरणाचा स्वीकार केला तर आमच्या मातृभाषेकडे दुर्लक्ष केले जाईल आणि संस्कृतला प्राधान्य देण्यात येईल,'' असे ते म्हणाले. नव्या शैक्षणिक धोरणानुसार संस्कृत भाषा ही शाळेत तर तमिळ ही ऑनलाईन पद्धतीने शिकवली जाऊ शकते, असा दावाही त्यांनी केला.

Sakal 28.2.2025

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# हिंदी लादू देणार नाही : स्टॅलीन

**चेन्नई : वृत्तसंस्था**

हिंदीला राज्यावर लादू देणार नाही आणि तमिळ व तिच्या संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगत केंद्र सरकारच्या हिंदी लादण्याच्या कथित प्रयत्नांना विरोधाची भूमिका तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलीन यांनी घेतली.

हिंदी लादण्याला विरोध करू. हिंदी हा मुखवटा आहे, संस्कृत हा त्यामागे लपवलेला चेहरा आहे, असे स्टॅलीन यांनी पक्ष कार्यकर्त्यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशमधील मैथिली, ब्रजभाषा, बुंदेलखंडी आणि अवधी या भाषा हिंदीच्या आक्रमणामुळे नामशेष झालेल्या आहेत. हिंदी आणि संस्कृतच्या आक्रमकपणामुळे लुप्त झाल्या. शेकडो वर्षांची परंपरा असणारी तमिळी संस्कृती आणि भाषा सुमारे शंभर वर्षांच्या द्रविडी चळवळीच्या संघर्षामुळे बचावली आहे, असेही ते म्हणाले.

**शिक्षण धोरणामुळे वाद**

राष्ट्रीय शिक्षण धोरणात तीन भाषांच्या शिक्षणाची मांडणी करण्यात आली आहे. त्यात इंग्रजी, हिंदी आणि स्थानिक भाषेचा समावेश आहे. त्याद्वारे हिंदी लादण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप सत्ताधारी द्रमुकने केला आहे. तो केंद्राने फेटाळला आहे.

Pune Edition
Feb 28, 2025 Page No. 02
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
City_28Feb_2025_001
28 Feb 2025

# हिंदीमुळे उत्तर भारतातील अनेक भाषा नष्ट

**चेन्नई, दि. २७** - तमिळनाडूमध्ये हिंदीविरुद्धच्या लढ्याची धार आणखी तीव्र होत चालली आहे. भाषायुद्धास तयार असलेल्या मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी पुन्हा एकदा हिंदीविरोधात तलवार उपसली आहे. यासंदर्भात त्यांनी पक्षकार्यकर्त्यांसाठी पत्र लिहिले आहे. हिंदीमुळे उत्तर भारतातील २५ हून अधिक भाषा नष्ट झाल्या असून, तमिळनाडूवर हिंदी लादण्यास आम्ही विरोध करू, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे.

राष्ट्रीय शिक्षण धोरणामधील (एनईपी) त्रिभाषिक सूत्राद्वारे केंद्र सरकार हिंदी लादण्याचा प्रयत्न करीत असल्याच्या आरोपाचा गुरुवारी त्यांनी पुनरुच्चार केला.



कार्यकर्त्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्रात स्टॅलिन म्हणतात की, बिहार, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात बोलल्या जाणाऱ्या मैथिली, ब्रजभाषा, बुंदेलखंडी आणि अवधी यांसारख्या अनेक उत्तर भारतीय भाषा वर्चस्ववादी हिंदीमुळे नष्ट झाल्या आहेत. जागरूक असल्यानेच, शतकानुशतके चाललेली द्रविड चळवळ आणि विविध चळवळींनी तमिळ, तसेच तिच्या संस्कृतीचे रक्षण केले आहे. केंद्र शिक्षण धोरणाद्वारे हिंदी आणि संस्कृत लादण्याचा प्रयत्न करीत असल्याने तमिळनाडू एनईपीला विरोध करीत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

एनईपीनुसार, तिसरी भाषा ही विदेशी भाषादेखील असू शकते, भाजपच्या दाव्याला एम. के. स्टॅलिन यांनी उत्तर दिले आहे. त्रिभाषा धोरण कार्यक्रमानुसार, अनेक राज्यांमध्ये फक्त संस्कृतचा प्रचार केला जात आहे. भाजपशासित राजस्थानमध्ये उर्दू शिक्षकांऐवजी संस्कृत शिक्षकांची नियुक्ती केली जात आहे, असे **(पान २ पहा)**

# हिंदीमुळे उत्तर भारतातील अनेक भाषा नष्ट

सांगून ते म्हणाले, तमिळनाडूने त्रिभाषा धोरण स्वीकारले तर मातृभाषेकडे दुर्लक्ष केले जाईल आणि भविष्यात संस्कृतीकरण होईल. एनईपीच्या तरतुदींमध्ये असे म्हटले आहे की संस्कृत व्यतिरिक्त इतर भारतीय भाषा शाळांमध्ये शिकवल्या जातील आणि तमिळसारख्या इतर भाषा ऑनलाइन शिकवल्या जाऊ शकतात, असा दावाही त्यांनी केला.

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

**लोकमत**

# हिंदीने २५ भाषा संपविल्या, आम्ही 'तमिळ'चे रक्षण करू



**चेन्नई** : तामिळनाडूवर हिंदी भाषा लादण्याच्या प्रयत्नांचा आम्ही प्राणपणाने विरोध करू. हिंदी भाषा हा मुखवटा व त्याच्या आड दडलेली संस्कृत भाषा हा खरा चेहरा आहे. तमिळ भाषा व संस्कृतीचे रक्षण करणे, हे आमचे कर्तव्य आहे, असे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी गुरुवारी सांगितले.

ते म्हणाले की, राष्ट्रीय शिक्षण धोरणांतर्गत त्रिभाषा सूत्राद्वारे हिंदी भाषा लादण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न असल्याचा स्टॅलिन यांचा आरोप केंद्र सरकारने याआधीच फेटाळून लावला आहे. हिंदी भाषेच्या विरोधात 'द्रमुक'ने १९६५ साली आंदोलन केले होते. तसेच आंदोलन आम्ही आता दुसऱ्यांदा उभारू, असे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी द्रमुक कार्यकर्त्यांना लिहिलेल्या एका पत्रात म्हटले आहे.

ते म्हणाले की, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशातील मैथिली, ब्रजभाषा, बुंदेलखंडी, अवधी या भाषा हिंदीच्या प्रभावामुळे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. उत्तर भारतातील २५ हून अधिक भाषांचा हिंदी-संस्कृतच्या वर्चस्वामुळे ऱ्हास होत आहे. मात्र, किमान शतकभर चाललेल्या द्राविडी चळवळीमुळे तमिळ भाषा व संस्कृतीचे रक्षण करण्यात यश आले आहे. त्रिभाषा सूत्रानुसार तिसऱ्या क्रमांकावर एखादी विदेशी भाषा असू शकते, असे सांगितले जाते; पण भाजप अनेक राज्यांमध्ये तिसरी भाषा म्हणून संस्कृतचा आग्रह धरत आहे, असा आरोपही एम. के. स्टॅलिन यांनी केला. (वृत्तसंस्था)

### 'तमिळ भाषेची उपेक्षा होण्याची भीती'

१ तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन म्हणाले की, भाजपशासित राज्यात उर्दू शिक्षकांच्या ऐवजी आता संस्कृती शिक्षकांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२ तामिळनाडूने राष्ट्रीय शिक्षण धोरणातील त्रिभाषा सूत्र स्वीकारले तर तमिळ या मातृभाषेची उपेक्षा होईल व भविष्यात संस्कृतचा वरचष्मा वाढेल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

Pune Main
Page No. 9 Feb 28, 2025
Powered by: erelego.com

**सामना**

# हिंदीने २५ भाषांना संपवले

## स्टॅलिन यांचा पुन्हा हल्ला; भाषा युद्ध चिघळणार



चेन्नई, दि. २७ (वृत्तसंस्था) – तामीळनाडूत हिंदीविरोधातील वाद आणखी चिघळत चालला आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी आज पुन्हा सरकारच्या हिंदी लादण्यावरून प्रचंड संताप व्यक्त केला. हिंदी भाषेच्या लादण्यामुळे गेल्या १०० वर्षांत उत्तर हिंदुस्थानातील तब्बल २५ भाषा संपवल्या, अशी टीका स्टॅलिन यांनी आज 'एक्स'वरून केली. त्यामुळे तामिळनाडूतील भाषिक युद्ध आणखी चिघळणार आहे.

दुसऱ्या राज्यांतील माझ्या प्रिय भगिनी आणि बांधवांनो, तुम्ही कधी विचार तरी केला आहे का की, हिंदीने किती भाषा गिळंकृत केल्या, असा सवाल करतानाच 'भोजपुरी', 'मैथिली', 'अवधी', 'ब्रज', 'बुंदेली', 'गढवाली', 'कुमाऊंनी', 'मगधी', 'मारवाडी', 'मालवी', 'छत्तीसगढी', 'संथाली', 'अंगिका', 'हो', 'खरिया', 'खोरठा', 'कुरमाली', 'कुरुथ', 'मुंडारी' व अशा अनेक भाषा तग धरण्यासाठी संघर्ष करत आहेत, असे स्टॅलिन म्हणाले.

हिंदी लादण्याचा कडाडून विरोध सुरूच राहील. कारण हिंदी एक मुखवटा आणि संस्कृती लपवणारा चेहरा आहे. द्रविड नेते आणि माजी मुख्यमंत्री अण्णादुराई यांनी दशकांपूर्वी द्विभाषिक धोरण लागू करण्यात आले होते. त्याचा उद्देशच तामिळींवर हिंदी आणि संस्कृत या भाषा असलेल्या आर्य संस्कृतीला लादता कामा नये, असे म्हटले आहे.

Pune Edition
Feb 28, 2025 Page No. 5
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

# प्राध्यापक भरतीवरील बंदी उठली : पाटील

## नवीन कार्यपद्धतीनुसार होणार भरती

मुंबई, ता. २७ : राज्यातील अकृषिक विद्यापीठांमधील सहाय्यक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांवरील भरती प्रक्रियेवर राजभवन कार्यालयाने घातलेली बंदी गुरुवारी उठवण्यात आली. राज्यातील अकृषिक विद्यापीठांमधील अध्यापक पदांच्या भरती प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे. निवड प्रक्रियेतील अधिक पारदर्शकतेसाठी अध्यापक भरती प्रक्रियेत गुणांकन पद्धतीचा नव्याने अवलंब होणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.



ते म्हणाले, ''राज्यपाल तथा कुलपती यांच्या मार्गदर्शनानुसार विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवडप्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. यात शैक्षणिक पात्रता आणि मुलाखतीमधील कामगिरी गृहीत धरली जाईल. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण, तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण आहेत. एकत्रित १०० गुणापैकी किमान ५० टक्के गुण मिळवलेले उमेदवार अंतिम निवडीसाठी पात्र ठरतील.''

Sakal 28.2.2025

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती

# प्राध्यापक भरतीला मान्यता

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**मुंबई:** राज्यातील अकृषी विद्यापीठातील प्राध्यापकपदाच्या भरती प्रक्रियेला मान्यता देण्यात आली आहे. निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता येण्यासाठी यापुढे प्राध्यापकपदाच्या भरतीसाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब होणार आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी दिली.

राज्यपाल तथा कुलपती यांच्या मार्गदर्शनानुसार राज्यातील विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापकपदांच्या निवड प्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये शैक्षणिक आणि मुलाखतीमधील कामगिरी गृहित धरण्यात येणार आहे. या दोन्ही बाबी एकत्रित करून अधिक पारदर्शक, निष्पक्ष निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण देण्यात येणार आहेत. एकत्रित १०० गुणांपैकी किमान ५० टक्के गुण मिळवलेल्या उमेदवारांनाच अंतिम निवडीसाठी पात्र ठरविण्यात येईल, असे पाटील यांनी सांगितले.

अध्यापन क्षमता अथवा संशोधन प्रावीण्य यांचे मूल्यमापन परिसंवाद अथवा व्याख्यान प्रात्यक्षिक, अध्यापन आणि संशोधन यामधील नवीनतम तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेवरील चर्चा या बाबी मुलाखतीच्या टप्प्यावर विचारात घेण्यात येतील.

28/02/2025 | Mumbai | Page : 08
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# राज्यात प्राध्यापक भरतीला मान्यता

### भरती प्रक्रियेसाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब

**मुंबई, (प्रतिनिधी) :** राज्यातील अकृषी विद्यापीठातील प्राध्यापक पदाच्या भरती प्रक्रियेला मान्यता देण्यात आली आहे. निवड प्रक्रियेत अधिक पारदर्शकता आणि निष्पक्षता येण्यासाठी, यापुढे प्राध्यापक पदाच्या भरतीसाठी नवीन कार्यपद्धतीचा अवलंब होणार असल्याची माहिती उच्च आणि तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी दिली.

राज्यपाल तथा कुलपती यांच्या मार्गदर्शनानुसार, राज्यातील विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी गुणांकन पद्धती निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये शैक्षणिक प्रमाणपत्रे आणि त्यांची मुलाखतीमधील कामगिरी गृहीत धरण्यात येणार आहे. या दोन्ही बाबी एकत्रित करून अधिक पारदर्शक, निष्पक्ष निवड प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापनाला ८० टक्के गुण तर मुलाखतीसाठी २० टक्के गुण देण्यात येणार आहे. एकत्रित १०० गुणांपैकी किमान ५० टक्के गुण मिळवलेल्या उमेदवारांनाच अंतिम निवडीसाठी पात्र असतील, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

**(पान ५ वर)**

# राज्यात प्राध्यापक भरतीला मान्यता

**(पान ३ वरून)**

अध्यापन क्षमता अथवा संशोधन प्राविण्य यांचे मूल्यमापन परिसंवाद अथवा व्याख्यान प्रात्यक्षिक, अध्यापन आणि संशोधन यामधील नवीनतम तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेवरील चर्चा या बाबी मुलाखतीच्या टप्प्यावर विचारात घेण्यात येतील. निवड समितीच्या बैठकांचे दृक-श्राव्य चित्रीकरण करण्यात येणार आहे. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दृक-श्राव्य चित्रीकरण, बैठकीला उपस्थित असलेल्या निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने सीलबंद करण्यात येईल. मुलाखती पूर्ण होताच त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर करण्यात येईल. ही सर्व निवड प्रक्रिया सहायक प्राध्यापक पदासह सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी लागू राहील, असेही पाटील यांनी सांगितले.

नवीन निवड प्रक्रियेच्या अधीन राहून विद्यापीठांमधील सध्या सुरु असलेली अध्यापकांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच, भविष्यात होणाऱ्या विद्यापीठांमधील अध्यापकांच्या निवड प्रक्रियेसाठी याच कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. यामुळे विद्यापीठांमध्ये पारदर्शक आणि जलद निवड प्रक्रिया राबविणे शक्य होणार आहे. या सुधारित कार्यपद्धतीमुळे गुणवत्ताधिष्ठित प्राध्यपकांची निवड होईल. तसेच, उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यास मदत होईल, असा विश्वास पाटील यांनी व्यक्त केला.

Kesari 28.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# 'एमएसबीटीई' विद्यार्थ्यांमधून घडवणार उद्योजक

**पंचवीस महाविद्यालयांची हब संस्था म्हणून निवड | सीओईपीच्या भाऊ इन्स्टिट्यूटबरोबर एमएसबीटीईचा करार**

**पुढारी विशेष**

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**अभियांत्रिकीचे पदविका शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला प्रोत्साहन देऊन तांत्रिक क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधायला लावायचे. त्यांच्यामध्ये उद्योजक होण्यासाठी आवश्यक गुण तयार करण्यासाठी राज्य तंत्रशिक्षण मंडळ अर्थात एमएसबीटीईने पावले उचलली आहेत. त्यासाठी पुण्यातील सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठातील भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इनोवेशन, अंत्रप्रीन्युअरशिप ॲन्ड लीडरशीप यांच्याशी सामंजस्य करार केला असून, २५ अभियांत्रिकी महाविद्यालयांची हब संस्था म्हणून निवड केली असल्याची माहिती एमएसबीटीईच्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.**

अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, राज्यातील पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविणाऱ्या मंडळाशी संलग्नित संस्था तसेच स्वायत्त संस्थांमधून शिकणाऱ्या विद्यार्थी व अध्यापकांमध्ये इनक्युबेशन, स्टार्टअप आदींबाबत जागरूकता निर्माण करणे. विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला प्रोत्साहन देऊन तांत्रिक क्षेत्रातील समस्यांवर उपाय शोधणे, अध्यापक व विद्यार्थी यांना स्टार्टअपसाठी उपलब्ध असलेल्या परिसंस्थेची ओळख करून देणे ही उद्दिष्टे लक्षात घेऊन राज्य तंत्रशिक्षण मंडळ अर्थात एमएसबीटीईने सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठातील भाऊ इन्स्टिट्यूट ऑफ इनोवेशन, अंत्रप्रीन्युअरशिप ॲन्ड लीडरशीप, पुणे यांच्याशी सामंजस्य करार केलेला आहे. या सामंजस्य करारात इनक्युबेशनशी संबंधित जागरूकता निर्माण करणे, नवसंकल्पना तयार करण्यासाठी मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना उद्योजक बनण्यास प्रोत्साहित करणे, संशोधन व विकास, नेटवर्किंगच्या संधी प्रदान करणे आदी बाबींचा समावेश आहे. हा प्रकल्प निवडक अभियांत्रिकी पदविका संस्थांमधून हब आणि स्पोक मॉडेल या धर्तीवर राबविण्यात येणार आहे.



**या जिल्ह्यात आहेत हब संस्था**

- छ. संभाजीनगर - ७ संस्था
- पुणे - ६ संस्था
- नागपूर - ६ संस्था
- मुंबई - ६ संस्था
- एकूण - २५ हब संस्था

हब संस्थांची निवड करण्यासाठी मंडळाने राज्यातील पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविले होते. आलेल्या प्रस्तावांची निकषांनुसार छाननी प्रक्रिया करून २५ संस्थांची हब संस्था म्हणून निवड करण्यात आली आहे. या हब संस्थांच्या प्राचार्यांनी त्यांच्या संस्थेत कार्यरत असणाऱ्या अध्यापकांमधून एक प्रकल्प समन्वयक व विभागप्रमुख दर्जाचा प्रत्येकी एक प्रमुख अन्वेषक यांची निवड करून त्यांची नावे एमएसबीटीईला कळवायची आहेत. संबंधित हब संस्थांसाठी आता पुण्यात प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणादरम्यानच एमएसबीटीई, सीओईपीचे भाऊ इन्स्टिट्यूट आणि हब संस्था यांमध्ये त्रिस्तरीय करारदेखील करण्यात येणार असल्याचेदेखील अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

My Pune Edition
Feb 28, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Education*

THE HINDU

**News**

# UGC to release norms to end caste bias in colleges, varsities

**The UGC has received 1,314 complaints on caste discrimination under 2012 Regulations, out of which 1,276 have been resolved; the top court had directed UGC to collate this data on Jan. 3**

**Krishnadas Rajagopal**
NEW DELHI

The University Grants Commission (UGC) on Thursday informed the Supreme Court that new regulations to prevent caste discrimination in higher educational institutions and universities across India have been drafted and will be placed in the public domain for soliciting comments.

The UGC was responding to a Supreme Court order in January on a petition filed six years ago by the mothers of Rohith Vemula and Payal Tadvi, represented by advocates Prasanna S. and Disha Wadekar, who had appealed to the Supreme Court to act against the "rampant" caste discrimination in universities. Rohith Vemula, a Ph.D. scholar at Hyderabad Central University, and Payal Tadvi, a tribal student of Topiwala National Medical College, died by suicide in January 2016 and May 2019, respectively, after being subject to on-campus caste bias.

The UGC said its expert panel chaired by Shailesh N. Zala, former Vice-Chancellor of Maharaja Krishnakumarsinhji Bhavnagar University in Gujarat, had revisited the existing UGC regulations and schemes concerning the promotion of members of the Scheduled Castes, Scheduled Tribes, and Other Backward Classes and Persons with Disabilities in higher education institutions.



> The draft UGC (Promotion of Equity in Higher Education Institutions) Regulations, 2025 are under the process of approval and would be placed in the public domain... Thereafter, it shall be notified as per procedure prescribed
>
> **UNIVERSITY GRANTS COMMISSION**

"The draft University Grants Commission (Promotion of Equity in Higher Education Institutions) Regulations, 2025 are under the process of approval and would be placed in the public domain... Thereafter, it shall be notified as per procedure prescribed," the UGC affidavit filed in the apex court said.

The court had on January 3, directed the UGC to collate the total number of complaints of caste discrimination received under its 2012 Regulations across higher educational institutions.

**Six weeks' time**

A Bench of Justice Surya Kant and Ujjal Bhuyan had given the Commission six weeks to collect the data on how many Central, State, deemed and private universities and institutions of higher learning had set up Equal Opportunity Cells under 2012 Regulations; the number of complaints received by them; and action taken on them. The UGC affidavit said that it had received 3,522 responses from higher educational institutions with information the court had asked for. Based on the information received, the UGC said 3067 Equal Opportunity Cells and 3273 SC/ST Cells were set up. "The number of total caste discrimination complaints received by these Cells so far is 1503, out of which 1426 complaints have been resolved," the UGC said. It added that 1314 complaints were received under the 2012 Regulations, out of which 1276 were resolved.

"The UGC is making all possible efforts to curb the menace of discrimination in higher education institutions and is also trying to effectively curb and control any such incidents by regular monitoring and setting up of helpline so as to ensure no complaint is left unattended or unresolved," the Commission said. In January, Justice Bhuyan had said it was time the UGC showed "some sympathy" in this sensitive issue. Senior advocate Indira Jaising, appearing for the mothers, said the UGC must come clean on whether the 820-odd universities and other higher educational institutions were actually implementing the 2012 Regulations.

The Hindu 28.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Education*

# UGC issues draft norms to promote equity in varsities

**Sanjay Maurya**
letters@hindustantimes.com

**NEW DELHI:** The University Grants Commission (UGC) on Thursday issued draft guidelines for the establishment of equal opportunity centre (EOC) in higher education institutions (HEIs) to oversee effective implementation of policies and programmes to eradicate discrimination.

The development comes after the Supreme Court on January 3 directed the higher education regulator to notify within six weeks new regulations to combat caste-based discrimination and suicides in higher education institutions. The directive from the apex court came during the hearing of a 2019 petition filed by Radhika Vemula and Abeda Salim Tadvi, mothers of Rohith Vemula and Payal Tadvi, who died by suicide in 2016 over alleged caste-based discrimination.

The objective behind the move is to eradicate discrimination on the basis of religion, race, gender, place of birth, and caste, especially against the members of Scheduled Castes (SC) and Scheduled Tribes (ST), socially and educationally backward classes, economically weaker sections (EWS), or any of them, and to promote full equity and inclusion among the stakeholders in HEIs. UGC will accept

**THE HIGHER EDU INSTITUTIONS WILL SET UP EQUAL OPPORTUNITY CENTRES TO OVERSEE POLICIES TO ERADICATE DISCRIMINATION**

feedback on the draft guidelines from stakeholders till March 28.

UGC in its draft norms have asked all HEIs to establish EOC to provide guidance and counselling concerning academic, financial, social, and other matters, and to enhance the diversity within the campus.

According to draft norms, the head of the institution will nominate a permanent professor as the EOC coordinator who will coordinate with civil society, local media, police, district administration, non-government organizations working in the field, faculty members, staff, and parents to realise the objective of these regulations.

EOC will have a 10-member equity committee constituted by the head of the institution to manage the functioning of the centre and to inquire into discrimination complaints. The committee will be chaired by the head of the institution (ex-officio) and include four senior faculty members, two civil society representatives, and two student special invitees based on merit, sports, or co-curricular achievements. The committee will have at least one woman and one member each from SC and ST categories. The chairperson and members will serve a two-year term, while special invitees will have a one-year term.

According to the draft norms, each HEI will have "equity squads" to prevent discrimination on campus, with mobile teams visiting vulnerable spots and reporting to EOC coordinator. Every unit, department, faculty, school, or facility have to appoint an "equity ambassador" to promote equity and report violations promptly.

Hindustan Times 28.2.2025

# Why TN, Centre are clashing over NEP's 3-language formula

**ABHINAYA HARIGOVIND & RITIKA CHOPRA**
NEW DELHI, FEBRUARY 27

**EXPLAINED EDUCATION**

THE CENTRE has withheld funds for the Samagra Shiksha scheme in Tamil Nadu due to the state's refusal to implement the New Education Policy (NEP) of 2020. In a strongly-worded letter to the Prime Minister, Tamil Nadu Chief Minister M K Stalin last week sought the release of Rs 2,152 crore pending for the centrally-sponsored scheme meant to support the provisions of the RTE Act.

At the heart of the clash between the BJP-led Centre and DMK-ruled Tamil Nadu is the so-called "three-language formula" that is a part of the NEP. While the Centre maintains that this policy is meant to ensure that youth get employment across regions, Tamil Nadu has long viewed it as an attempt to impose Hindi on the state.

Tamil Nadu has an almost century-old history of anti-Hindi agitations. Unlike most other states – including southern states such as Kerala and Karnataka – it follows a two-language formula in which students are taught only Tamil and English.

### Language debate in education

The debate over language policy in education – regarding both the medium of instruction and teaching of languages – has existed since Independence. The University Education Commission of 1948-49, chaired by Dr Sarvepalli Radhakrishnan, who went on to become the second President of India, examined this topic in detail.

This was a political hot potato even then. The Commission's report notably stated: "No other problem has caused greater controversy among educationists and evoked more contradictory views from our witnesses. Besides, the question is so wrapped up in sentiment that it is difficult to consider it in a calm and detached manner."

The Radhakrishnan Commission favoured Hindi (Hindustani) as India's federal language, to be used for all federal activities – administrative, educational and cultural – while regional languages would serve the provinces.




TN CM M K Stalin (*left*), Union Education Minister Dharmendra Pradhan. PTI

At the same time, the Commission recognised that immediately abandoning English would be impractical. It stated that English would have to continue as "the medium for Federal business" till such time that all provinces are ready for the change, having "spread the Federal language adequately".

### Three language formula

It was this Commission that first proposed what would later become the three-language formula for school education.

"In order to enable every region...to take its proper share in Federal activities, and to promote inter-provincial understanding and solidarity, educated India has to make up its mind to be bilingual, and pupils at the higher secondary and university stages will have to know three languages," the Radhakrishnan Commission said.

This meant that beyond one's regional language, every person should "be acquainted with the Federal language" and have "the ability to read books in English".

This proposal was accepted by the National Education Commission of 1964-66 (Kothari Commission), and was incorporated into the National Policy on Education, 1968 passed by the Indira Gandhi government.

For secondary education, the formula proposed that students learn "a modern Indian language, preferably one of the southern languages, apart from Hindi and English in the Hindi-speaking States" and "Hindi along with the regional language and English in the non-Hindi speaking States."

The National Policy on Education of 1986, passed by the Rajiv Gandhi government, and the latest NEP of 2020, too retained this formula, although the latter provides for greater flexibility in its implementation.

Unlike previous education policies, the 2020 NEP makes no mention of Hindi.

"The three languages learned by children will be the choices of States, regions, and of course the students themselves, so long as at least two of the three languages are native to India," the policy states.

This means that in theory, a state can teach any two Indian languages – with neither of them being Hindi – and English.

### Centre's shifting stand

Over several years, the Centre has maintained that education is in the Concurrent List of the Constitution, and that the implementation of the three-language formula is the responsibility of the states.

In 2004, then Union Human Resource Development Minister Arjun Singh of the Congress said in Parliament: "The role of the Central Government in the matter of the implementation of the three-language formula is recommendatory. Implementation of this formula is the sole responsibility of the State Governments."

HRD Minister Smriti Irani, of the BJP, reiterated this position in 2014, saying that it was up to the states to finalise their own curricula and syllabi.

However, now, the Ministry of Education has linked the release of Samagra Shiksha funds to the implementation of the NEP, effectively forcing the hands of the states when it comes to their respective education policies.

The Indian Express 28.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Miscellaneous*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# ... अन् ३० हजार दुर्मीळ पुस्तकांचे झाले डिजिटायझेशन

**राज्यातील १३५ सरकारमान्य शतायु ग्रंथालयांचा समावेश : 'ग्रंथ संजीवनी' पोर्टलवर पुस्तके उपलब्ध; टप्प्याटप्प्याने होणार डिजिटाईज**

पुढारी विशेष

सुवर्णा चव्हाण
पुढारी प्रतिनिधी

**पुणे : महाराष्ट्रातील ग्रंथालयांमध्ये दुर्मीळ पुस्तकांचा मोठा खजिना आहे. काही पुस्तके शंभर वर्षे जुनी आहेत, तर काही ८० वर्षे जुनी... हाच पुस्तकांचा खजिना योग्य पद्धतीने पुढील पिढीपर्यंत पोहचावा, यासाठी राज्य सरकारच्या ग्रंथालय संचालनालयामार्फत राज्यभरातील १३५ सरकारमान्य शतायु ग्रंथालयांमधील दुर्मीळ पुस्तकांच्या डिजिटायझेशनचे काम हाती घेतले आहे.**



> राज्यातील १३५ शतायु ग्रंथालयांकडून आपण त्यांच्याकडे असलेल्या दुर्मीळ पुस्तकांची यादी मागवली होती. ग्रंथालयांनी पुस्तकांची यादी आम्हाला पाठवली आहेत. त्यानुसार टप्प्या-टप्प्याने विविध ग्रंथालयांमधील दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशन करण्यात येणार आहे आणि निधी उपलब्ध करून दिला जात आहे.
>
> - **अशोक गाडेकर,** प्रभारी ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय

पहिल्या टप्प्यात आतापर्यंत सुमारे ३० हजार दुर्मिळ पुस्तकांचे डिजिटायझेशनचे काम पूर्ण झाले असून, आता ही पुस्तके डिजिटल स्वरूपात 'ग्रंथ संजीवनी' नावाच्या पोर्टलवर उपलब्ध आहेत. येत्या काळात राज्यभरातील 'अ' दर्जा असलेल्या सर्वच ग्रंथालयातील दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशन होणार असून, आता दुर्मीळ पुस्तके ऑनलाइन पद्धतीने वाचकांना वाचायला मिळणार आहेत. महाराष्ट्रात अनेक ग्रंथालयांमध्ये दुर्मीळ पुस्तके आहेत, ज्यांना काळाप्रमाणे डिजिटायझेशनची गरज आहे. या पुस्तकांचा वारसा जतन व्हावा आणि ही पुस्तके पुढील पिढीलाही वाचायला मिळावीत, यासाठी ग्रंथालय संचालनालयाने पुस्तकांच्या डिजिटायझेशनचा उपक्रम राबविला जात आहे. गेल्या दोन वर्षांत आतापर्यंत ३० हजारांहून अधिक पुस्तकांचे डिजिटायझेशन झाले आहे. या उपक्रमाविषयी दै. 'पुढारी'ने माहिती जाणून घेतली. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात असल्याचे ग्रंथालय संचालनालयाचे प्रभारी ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी सांगितले.

गाडेकर म्हणाले, संचालनालयाकडून दुर्मिळ पुस्तकांच्या डिजिटायझेशनचे काम हाती घेण्यात आले आहे. डिजिटायझेशनसाठी पहिल्या टप्प्यात 'अ' वर्गाच्या ग्रंथालयांना निधी दिला जात आहे. त्या निधीच्या माध्यमातून ग्रंथालयांकडून पुस्तकांचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे. एशियाटिक सोसायटीतील ३० हजार दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशनचे काम पूर्ण झाले आहे. 'ग्रंथ संजीवनी' या पोर्टलवर ही पुस्तके वाचायला मिळत आहेत. मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाला आम्ही तीन कोटींचा निधी दिला असून, येथेही पुस्तकांच्या डिजिटायझेशनचे काम सुरू होत आहे. पुण्यातील पुणे मराठी ग्रंथालयातही पुस्तकांचे डिजिटायझेशन करण्यात येत आहे. राज्य मराठी विकास संस्थेच्या सहकार्यातून पुण्यातील शासकीय विभागीय ग्रंथालयातील दुर्मीळ पुस्तकांचेही डिजिटायझेशनचे काम केले जात आहे.

My Pune Edition
Feb 03, 2025 Page No. 01
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Miscellaneous*

लोकसत्ता

# दुर्मीळ पुस्तकांच्या जतनाचा साहित्यप्रेमींना लाभ

**विद्याधर कुलकर्णी, लोकसत्ता**

**पुणे नगर वाचन मंदिराचा आज वर्धापनदिन; आवडीची आणि अभ्यासाची दुर्मीळ पुस्तके 'पेन ड्राईव्ह'मधून घरी नेणे शक्य**

**पुणे :** दुर्मीळ पुस्तकांचे डिजिटायझेशनच्या माध्यमातून जतन करण्याच्या 'पुणे नगर वाचन मंदिर' संस्थेच्या प्रकल्पाद्वारे एक हजाराहून अधिक पुस्तके ऑनलाईन माध्यमातून ठेवण्यात आली असून, त्याचा साहित्यप्रेमींना विनाशुल्क लाभ मिळत आहे. 'लोकसत्ता'च्या 'सर्व कार्येषु सर्वदा' उपक्रमातून मिळालेल्या निधीतून संस्थेने सुरू केलेल्या दुर्मीळ पुस्तकांच्या जतन करण्याच्या प्रकल्पाला गती आली असून, पाचशेहून अधिक साहित्यप्रेमी वाचकांनी त्यांच्या आवडीची आणि अभ्यासाची दुर्मीळ पुस्तके 'पेन ड्राईव्ह'मध्ये घरी नेली आहेत.

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांनी ८ फेब्रुवारी १८४८ रोजी स्थापन केलेली पुणे नगर वाचन मंदिर ही संस्था शुक्रवारी १७८ व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे हे संस्थेचे पहिले अध्यक्ष होते. लोकहितवादी यांच्याकडून प्रेरणा घेत स्थापनेच्या शतकोत्तर अमृतमहोत्सवानंतर संस्थेने आपल्याकडील दुर्मीळ ज्ञानभांडार सर्वसामान्यांसाठी खुले करून देण्याचा निर्णय घेत लोकहिताचे काम केले आहे.

वर्धापनदिनानिमित्त संस्थेमध्ये शुक्रवारी आयोजित कार्यक्रमात विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत, अशी माहिती पुणे नगर वाचन मंदिराचे अध्यक्ष मधुमिलिंद मेहेंदळे यांनी दिली.

'लोकसत्ता'च्या 'सर्व कार्येषु सर्वदा' उपक्रमातून मिळालेल्या निधीतून संस्थेने राबविलेल्या दुर्मीळ पुस्तकांच्या डिजिटायझेशन प्रकल्पाला गती मिळाली. आतापर्यंत एक हजाराहून अधिक पुस्तके स्कॅन करून 'विकिपीडिया कॉमन्स'वर आणि संस्थेच्या संकेतस्थळावर ठेवण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने साठ वर्षांपूर्वीची आणि जी सध्या उपलब्ध होत नाहीत, अशा पुस्तकांचा समावेश आहे. संस्थेच्या संग्रहातील पुस्तकांबरोबरच भोर, वाई, हैदराबाद, माथेरान, पुणे मराठी ग्रंथालय आणि स. प. महाविद्यालयाचे ग्रंथालय येथूनही काही पुस्तके मिळवून ती जतन करण्यात आली आहेत. पुणे नगर वाचन मंदिरामध्ये एक संगणक ठेवण्यात आला आहे. त्या माध्यमातून वाचक संकेतस्थळ उघडून जतन करण्यात आलेल्या पुस्तकांपैकी त्यांच्या आवडीचे आणि अभ्यासाचे पुस्तक 'पेन ड्राईव्ह'च्या माध्यमातून डाऊनलोड करून घरी घेऊन जाऊ शकतात. त्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. आतापर्यंत पाचशेहून अधिक साहित्यप्रेमी, अभ्यासक आणि सामान्य वाचकांनी या सुविधेचा लाभ घेतला आहे, असे मेहेंदळे यांनी सांगितले.



### परदेशातील मुलांना मराठी शिकण्यासाठी व्हिडीओ

उद्योग आणि व्यवसायानिमित्त परदेशी स्थायिक झालेल्या मराठीजनांच्या पुढील पिढीला मराठी शिकण्यासाठी आणि भाषेची गोडी लागावी या उद्देशातून पुणे नगर वाचन मंदिराने ज्ञान प्रबोधिनीच्या सहकार्याने व्हिडीओची निर्मिती केली आहे. कोणत्या भाजीला इंग्रजीमध्ये काय म्हणतात आणि मराठीमध्ये त्याचा उच्चार कसा करायचा याची माहिती देणारे तसेच दैनंदिन जीवनात उपयोगी पडणारे मराठी शब्द यांची माहिती या पाच मिनिटांच्या चित्रीकरणातून देण्यात आली आहे. अशा स्वरूपाचे १५ व्हिडीओ करण्यात आले असून, वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात शुक्रवारी (८ फेब्रुवारी) त्याचे औपचारिक उद्घाटन होणार आहे, असे मधुमिलिंद मेहेंदळे यांनी सांगितले.

07/02/2025 | Pune | Page : 20
Source : https://epaper.loksatta.com

# *News Paper Clippings During February 2025*

## *Section: Miscellaneous*

प्रचंड खपाचे एकमेव निःपक्ष व निर्भिड दैनिक

पुढारी

स्थापना १९३९

www.pudhari.com

पुढारी ANCHOR

# मराठी साहित्यविश्वात अनुवादकांचा तुटवडा

## प्रकाशकांचे अनेक प्रकल्प रखडले; दर्जेदार साहित्य देशविदेशातील वाचकांपर्यंत पोहचेना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

मराठी साहित्य इतर भाषांमध्ये अनुवादित का होत नाही? तर याचे कारण म्हणजे मराठी साहित्यविश्वात असलेला अनुवादकांचा तुटवडा. मराठीतून इतर भाषांमध्ये अनुवाद करणाऱ्या अनुवादकांची संख्या कमी असल्याने मराठीतील साहित्य इतर प्रांतात पोहचत नसल्याची परिस्थिती सध्या आहे. यामुळे मराठीतील पुस्तके इतर भाषांमध्ये अनुवादित होण्याचे प्रमाण घटले असून, प्रकाशकांचे अनुवादाचे अनेक प्रकल्पही रखडले आहेत. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला, तरी अनुवादकच नसल्याने मायमराठीतील दर्जेदार साहित्य इतर देशविदेशातील वाचकांपर्यंत पोहचत नसल्याची परिस्थिती साहित्यविश्वात आहे.

इंग्रजी, हिंदीसह काही प्रादेशिक भाषांमधील साहित्य मराठीत येण्याचे प्रमाण वाढत आहे. परंतु, मराठीतील दर्जेदार पुस्तके इतर भाषांमध्ये अनुवादित होण्याची प्रक्रिया थंडावली आहे. मराठीतील पुस्तके इतर प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करणाऱ्या अनुभवी अनुवादकांची कमतरता प्रकाशकांना भासत आहे. काही प्रकाशकांनी अनुवादक न मिळाल्यामुळे, तर काहींनी अनुवादकांचे मानधन परवडत नसल्यामुळे अनुवादकाचे प्रकल्प पुढे ढकलले आहेत.

चपराक प्रकाशनचे घनश्याम पाटील म्हणाले, 'मराठीतील शब्दांची जाण आणि इतर भाषांमधील शब्दांची जाण असणारे अभ्यासपूर्ण अनुवादक मिळणे अडचणीचे ठरत आहे. जे अनुवादक काम करतात, ते अनुवादाच्या प्रक्रियेला वेळ लावतात, त्यामुळे त्यांना काम देणे खूप अडचणीचे जाते. आम्हा प्रकाशकांना यामुळे खूप मर्यादा येतात. मराठीसह इतर भाषांची जाण असणाऱ्या अनुवादकांची संख्या वाढायला हवीच. तेव्हाच मराठीतील दर्जेदार साहित्य इतर भाषांमध्ये येऊ शकेल. दिल्लीत होणाऱ्या ९८ व्या साहित्य संमेलनात 'अनुवाद : मराठीतून इतर भाषेत' या विषयावरील परिसंवादाचे आयोजन केले आहे. त्यामुळे या विषयावर चर्चा होऊ शकेल.

'संस्कृती प्रकाशन'च्या सुनीताराजे पवार म्हणाल्या, 'अनुवादाची प्रक्रिया दीर्घकाळ चालणारी प्रक्रिया आहे. त्यामुळे दीर्घकाळ काम करणारे अनुवादक मिळणे आताच्या घडीला अवघड बाब म्हणावी लागेल. तसेच, अनुवादकांचे मानधनही जास्त असल्याने तेही प्रकाशकांना परवडणारे नाही. त्याशिवाय मराठीतील पुस्तकांचा इतर भाषांमध्ये अनुवाद झाल्यावर त्या-त्या प्रादेशिक भाषांमधील वाचकांपर्यंत पुस्तक पोहचविणाऱ्या प्रकाशकांची आणि पुस्तक वितरकांचीही कमतरता आहे.

> “ अनुभवी अनुवादक आहेत. पण, त्यांची संख्या बोटावर मोजण्याइतकीच आहे. त्यामुळे मराठीतून इतर भाषांमध्ये होणाऱ्या अनुवादाची प्रक्रिया आत्ताच्या घडीला थंडावली आहे. तसेही मराठीतील पुस्तकांचे इतर भाषांमध्ये अनुवाद होण्याचे प्रमाण मोजकेच आहे. त्यातही अनुवादकच नसल्याने मराठीतील साहित्य इतर भाषांमध्ये कसे पोहचणार? मराठीतून इंग्रजी आणि हिंदी भाषेत अनुवाद करणारे अनुवादक उपलब्ध आहेत. पण, इतर प्रादेशिक भाषांमध्ये अनुवाद करणाऱ्यांची संख्या फारशी नाही. ती वाढली पाहिजे. तेव्हाच मराठीतील साहित्य इतर भाषांमध्ये पोहचू शकेल.
>
> **- चेतन कोळी,** प्रकाशक

My Pune Edition

Feb 12, 2025 Page No. 03

Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

### *Section: Miscellaneous*

# सर्वांना मिळणार पेन्शन ?

**वृत्तसंस्था,** नवी दिल्ली

केंद्र सरकार देशातील सर्व नागरिकांसाठी सार्वत्रिक पेन्शन योजना (युनिव्हर्सल पेन्शन स्कीम) सुरू करण्याच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे त्यात असंघटित क्षेत्रातील लोकांचाही समावेश असेल. सद्यस्थितीत बांधकाम कामगार, घरकाम करणारे कर्मचारी, 'गिग वर्कर्स' यांना केंद्र सरकारमार्फत चालविण्यात येणाऱ्या पेन्शन योजनांचा लाभ मिळत नाही.

सर्व पगारदार कर्मचारी आणि स्वयंरोजगार करणाऱ्यांनाही या योजनेचा लाभ होणार आहे. यासाठी सरकार योजनेची निर्मिती करीत असून, त्यानंतर संबंधितांकडून प्रस्ताव घेण्यात येणार आहेत. 'इकॉनॉमिक टाइम्स'च्या वृत्तानुसार, ही योजना सध्याच्या पेन्शन योजनांना एकाच प्लॅटफॉर्मवर आणण्याचे काम करील; जेणेकरून जास्तीत जास्त लोकांना संरक्षण देता येईल. 'एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन' या योजनेवर काम करीत असून, राज्य सरकारच्या योजनांशी ही योजना जोडण्याचा विचार केंद्र सरकार करत आहे. ही योजना अंमलात आल्यास भारतातील सामाजिक सुरक्षेला नवी दिशा मिळू शकते. अमेरिका, कॅनडा, रशिया, चीन आणि युरोपातील अनेक देशांमध्ये सार्वत्रिक पेन्शन प्रणाली कार्यरत असून, ती निवृत्तीनंतर वृद्धांना आर्थिक सुरक्षा प्रदान करते

## केंद्र सरकारचा विचार सुरू; राज्य सरकारांच्या योजनाही जोडणार




### सध्याच्या पेन्शन योजनांपेक्षा वेगळी कशी ?

सूत्रांच्या माहितीनुसार, ही नवी योजना सध्याच्या 'एम्प्लॉइज प्रॉव्हिडंट फंड ऑर्गनायझेशन'पेक्षा (ईपीएफओ) वेगळी आहे. नव्या योजनेत सरकार अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या योजना एकत्र करून 'युनिव्हर्सल स्कीम'ची निर्मिती करू शकते. ऐच्छिक तत्त्वावर कोणत्याही नागरिकासाठी सुरक्षित पर्याय म्हणून या योजनेकडे पाहिले जाऊ शकते.

### 'युनिफाइड पेन्शन योजना' १ एप्रिलपासून

केंद्र सरकारने सरकारी नोकरदारांसाठीच्या नवीन पेन्शन योजनेला मंजुरी दिली. 'युनिफाइड पेन्शन स्कीम' (यूपीएस) असे या नव्या पेन्शन योजनेचे नाव आहे. ही योजना एक एप्रिल २०२५ पासून लागू होणार आहे. याअंतर्गत एखाद्या कर्मचाऱ्याने २५ वर्षे काम केले असेल, तर निवृत्तीपूर्वी नोकरीच्या शेवटच्या १२ महिन्यांच्या मूळ वेतनाच्या ५० टक्के रक्कम ही पेन्शन म्हणून दिली जाणार आहे. जर एखाद्या कर्मचाऱ्याने १० वर्षांनंतर नोकरी सोडली, तर त्याला दरमहा दहा हजार रुपये पेन्शन मिळेल. याचा फायदा सुमारे २३ लाख कर्मचाऱ्यांना होणार आहे. त्याचबरोबर सरकारी कर्मचाऱ्याचा सेवेदरम्यान मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना कर्मचाऱ्याच्या मृत्यूपर्यंत मिळणाऱ्या पेन्शनच्या ६० टक्के रक्कम मिळणार आहे.

### राष्ट्रीय पेन्शन योजनेचे काय होणार ?

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ही नवी योजना सुरू झाली, तरी ती राष्ट्रीय पेन्शन योजनेची (एनपीएस )जागा घेणार नाही किंवा त्यामध्ये विलीन होणार नाही. म्हणजेच 'युनिव्हर्सल पेन्शन स्कीम'चा राष्ट्रीय पेन्शन योजनेवर कोणताही परिणाम होणार नाही.

### अन्य पेन्शन योजना कोणत्या ?

देशात सध्या 'एनपीएस' आणि 'अटल पेन्शन' योजना सुरू आहे. असंघटित क्षेत्रासाठीही अनेक सरकारी पेन्शन योजना कार्यरत आहेत. त्यापैकीच एक म्हणजे 'अटल पेन्शन योजना'. या योजनेत व्यक्ती ६० वर्षांची झाल्यानंतर दरमहा १००० के १५०० रुपयांचा परतावा मिळणार आहे. याशिवाय पंतप्रधान श्रमयोगी मानधन योजनादेखील (पीएम-एसवायएम) सुरू आहे. यामध्ये फेरीवाले, घरकामगार, मजूर यांना केंद्र सरकारकडून आर्थिक मदत केली जाते. त्याचबरोबर शेतकऱ्यांसाठीही पंतप्रधान किसान मानधन योजना सुरू आहे. यामध्ये शेतकरी ६० वर्षांचा झाल्यानंतर सरकार दरमहा ३००० रुपयांची मदत देते.

Maharashtra Times 27.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

## मराठी भाषा गौरव दिन

लोकमत

प्रासंगिक

# अभिजात मराठी : वाटा आणि वळणे



उज्ज्वला गोखले
लेखिका आणि प्राध्यापिका

**केंद्र सरकारच्या वतीने माय मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा नुकताच मिळाला आहे. मात्र, दीड ते दोन हजार वर्षांपासून मराठी भाषा ही अस्तित्वात आहे. आजपर्यंत भाषेची वाटचाल कशी झाली, तिच्या स्वरूपात केव्हा आणि कोण-कोणते बदल झाले. मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने बदलांचा आढावा घेण्याचा हा प्रयत्न.**

भाषा आधी बोलली जाते. त्यातील लोककथा लोकगीते प्रत्यक्ष इतरांना सांगून पुढच्या पिढीपर्यंत जातात. काही महत्त्वाच्या घडामोडींविषयीची माहिती शेकडो, हजारो वर्षे टिकावीत, यासाठी माणसाने वेगवेगळ्या उपाय शोधून काढले. त्यासाठी निवडक मजकूर त्याने दगडावर मग धातूच्या पत्रावर कोरला. देवळातले विरगळ शिल्पे यातूनही तो काही सांगू इच्छित होता. त्यामुळेच आज आपल्याला शिलालेख, ताम्रपट भूर्जपत्रे यातून प्राचीन इतिहास कळतो.

मराठी भाषेच्या संदर्भात देखील माणसांनी हे असे बरेच शिलालेख, ताम्रपट, चित्र कोरले. त्यामुळे आपल्याला मराठी भाषा दीड-दोन हजार वर्षापूर्वीपासून अस्तित्वात आहे, हे कळले. अभिजात भाषेचा दर्जा मिळाला यालाही एक कारण आहे.

जुन्नरच्या नाणेघाटात प्राकृत ब्राह्मणी लिपी लिहिलेला शिलालेख मिळाला. अभ्यासकांनी तो परिश्रमपूर्वक वाचला. त्यात मराठी लोकांचा उल्लेख 'महारठी' असा केलेला आहे. श्रवणबेळगोळ, कर्नाटक येथे भगवात महावीरांच्या पायांशी दोन मराठी ओळी कोरलेल्या आहेत. त्या आपल्यालाही सहज वाचता येतात.

पहिली ओळ श्री चावूण्डराये करवियले इ.स.९८३, दुसरी ओळ श्री गजराज सुत्ताले करविले इ.स. ११९६.१७, मराठी भाषेचे लिखित स्वरूप म्हणून हा शिलालेख महत्त्वाचा ठरतो. दिवे आगर येथील ताम्रपट इसवी इ.स. १०६० मधील आहे. संपूर्ण मराठी असलेला हा ताम्रपट अस्सल आणि अद्वितीय आहे. महाराष्ट्रात भूर्जपत्रे, ताडपत्रे यांचा उपयोग फार कमी झाला. श्रीपती कृत ज्योतिष रत्नमाला या ग्रंथाचे पत्रावरील मजकुराचे नमुने अहिल्यानगर ऐतिहासिक संग्रहालयात ठेवले आहेत.



दिवे- आगर ताम्रपट, शके ९८२.





श्रवणबेळगोळ येथील दोन शिलालेख, शके १०३८-३९.

२००० वर्षापूर्वी लिहिले गेलेल्या गाथासप्त या ग्रंथात त्याकाळचे समाजजीवन कसे होते ते कळते. आपल्याकडे ग्रामीण भागात स्त्रिया दळण दळताना स्वतःच्या सुख-दुःखाच्या नातेसंबंधाविषयी ओव्या गात. त्याचप्रमाणे दोन हजार वर्षापूर्वी स्त्रियांनी रचलेल्या सुभाषित वजा गाथा सातवाहन कुलातील हाल राजाने संग्रहित केला. त्याने स्वतःही काही गाथा रचल्या.

अशा निवडक ७०० ग्रंथाचा संग्रह त्याने केला. त्याला गाथासप्तशती अर्थात गाथासत्तई हे नाव दिले. यातील प्रत्येक गाथा स्वतंत्र आहे. त्यावेळचे ग्रामीण जीवन, रूढी-परंपरांभोवतालचा परिसर याविषयी माहिती यामध्ये मिळते. या गाथांमधील भाषा ही २००० वर्षापूर्वी मराठीचे प्राचीन रूप जसे होते त्याप्रमाणे आहे. दीपचंदा, महावंश का प्राचीन ग्रंथांमधून मराठी भाषकांचा उल्लेख आहे. उद्योतनसूरीने लिहिलेल्या कुवलयमाला (इ.स. ७७८) या ग्रंथात मराठी भाषेच्या अस्तित्वाचा पुरावा मिळतो. त्यातील १८ भाषांच्या उल्लेखात 'मरहट्ट'चा उल्लेख आहे. त्यात मराठी माणसाचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

'दडमडह सामलंगे साहिरे अहिमाण कलहसिलेय, दिण्णले गहिण्णले उल्लुविरे तत्थ मरहट्टे' म्हणजे बळकट, ठेंगणे, सावळ्या अंगाचे काटक, अभिमानी, भांडखोर दिण्णले (दिले), गहिण्णले (घेतले) असे बोलणाऱ्या मरहटठ्यास त्याने पाहिले होते. आजही हे वर्णन पुष्कळसे खरे आहे. माणसांचे उल्लेख वेगवेगळ्या प्रकारे बदलत गेले. महारठी, मरहठ्ठ, मरहट्टे अशा प्रकारे बदलत गेले. मरारी भाषेचे उल्लेख महाराष्ट्री महारठ्ठी-मरहट्टी आणि मऱ्हाटी असे बदलत गेले. काही विद्वानांच्या मते मराठी भाषेची निर्मिती संस्कृत- प्राकृत- अपभ्रंश- महाराष्ट्री अशी रूपांतर होत होत झाली.

इ.स. २००० वर्षापूर्वीच्या नाणेघाट शिलालेखापासून नंतरच्या काळात सापडलेल्या शिलालेखांमध्ये अनेक मराठी वळणाचे शब्द सापडतात. उदा. : वखली, घोरपड, कोकण, अमात्यु, प्रधानु, करवून, येझ. म्हणजेच मराठी भाषा वेगवेगळ्या स्थित्यंतरांच्या २००० वर्षापासून अस्तित्वात आहे असे दिसून येते .

Hello Pune
Page No. 6 Feb 27, 2025
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

## *मराठी भाषा गौरव दिन*

# मराठीसाठी सीमोल्लंघनाची वेळ

भाष्य



आनंद काटीकर

**आपला महाराष्ट्र आणि मराठी भाषा यांचा अभिमान आपल्या सर्वांनाच असतो. आपल्या भाषेला अभिजात दर्जा मिळाला आहे. आता पुढे काय करायला हवे, याविषयाची रूपरेखा मांडणारा लेख. आजच्या मराठी भाषा गौरव दिनानिमित्त.**

अभिजात भाषेच्या दर्जासाठी केंद्र सरकारने चार निकष ठरवलेले आहेत. हे चार निकष जी भाषा पूर्ण करेल, त्या भाषेला हा अभिजाततेचा दर्जा मिळेल, असे घोषित करण्यात आले. त्यानुसार आतापर्यंत २००४ मध्ये तमिळ आणि २००५ मध्ये संस्कृत भाषेला असा दर्जा मिळाला. त्यानंतर तेलुगु (२००८), कन्नड (२००८), मल्याळम (२०१३)आणि उडिया (२०१४) याही भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. आत्ता २०२४ मध्ये हे निकष सुधारित करण्यात आले आणि मग मराठीसोबत पाली, प्राकृत, बांगला आणि आसामी या भाषांनाही हा अभिजात दर्जा देण्यात आला. २०२४ चे नवीन सुधारित निकष पुढीलप्रमाणे –

१) त्या भाषेचा १५०० ते २००० वर्षे प्राचीन नोंदीकृत इतिहास असावा आणि त्या काळात साहित्यनिर्मिती झालेली असावी. २) प्राचीन साहित्य / ग्रंथांचा संग्रह, ज्याला त्या भाषकांच्या पिढ्या आपला वारसा मानतात. ३) ज्ञानग्रंथ, विशेषत: गद्यग्रंथ याव्यतिरिक्त कविता, पुरालेखीय आणि शिलालेखीय पुरावे. ४) ही अभिजात (शास्त्रीय) भाषा आणि त्यातील साहित्य त्या भाषेच्या सध्याच्या स्वरूपापासून वेगळे असू शकते किंवा त्याच्या शाखांच्या नंतरच्या प्रकारांशी विसंगत असू शकते.

पूर्वी चौथा निकष अभिजात भाषेचे रूप आणि आजचे रूप यात समान धागा असावा, असा होता, मात्र तो निकष बदलल्यामुळे मराठीला अभिजात दर्जा मिळण्याचा मार्ग सुकर झाला. हाल सातवाहन काळात, म्हणजे सामान्यत: इसवीसन तिसऱ्या-चौथ्या शतकात लिहिला गेलेला 'गाथासप्तशती' हा अभिजात मराठी भाषेतील एकमेव ग्रंथ आज उपलब्ध आहे. या संकलित ग्रंथातील माहाराष्ट्री प्राकृत ही भाषा मराठीचे आद्यरूप आहे, असे आपण अभिजात भाषेच्या अहवालात नोंदवले आहे. गाथा सप्तशती, विविध शिलालेख-ताम्रपट, महानुभाव साहित्य, विवेकसिंधू, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथ, साधने यांतील मराठी बदलत गेलेली आहे, असे आपल्याला दिसते. म्हणजेच आपली अभिजात मराठी भाषा आजवर बदलत गेली आहे, हे लक्षात ठेवायला हवे.

अभिजात भाषा म्हणून घोषित झालेल्या भाषांच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून मिळालेल्या निधीतून प्रामुख्याने प्राचीन भाषेच्या विकासाचे प्रकल्प सुरू केले गेले आहेत. या संदर्भात आपल्याला पुढे काय काय करावे लागेल यावर आता मंथन व्हायला हवे. त्यासंदर्भातील काही मुद्दे.

१) नवीन पिढीला ही जुनी भाषा शिकवणे आवश्यक ठरेल. हे शिकवताना संस्कृत - प्राकृत - अपभ्रंश



चित्र : दीपक संकपाळ

ही मालिकाही बघावी लागेल. त्या तीनही भाषांचा तौलनिक अभ्यास करावा लागेल. त्यामध्ये; भाषेची वैशिष्ट्ये नोंदवणे, व्याकरण अभ्यासणे, साम्यभेद शोधणे, शब्दसंग्रह पाहणे इत्यादी गोष्टी आवर्जून कराव्या लागतील.

२) अभिजात मराठी आणि प्राकृत, अपभ्रंश भाषांतील विविध साहित्यकृती आधुनिक भारतीय आणि आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये रूपात रूपांतरित कराव्या लागतील. येथे बहुभाषिक मराठी माणसाला खूप काम मिळू शकेल.

३) मराठीच्या विविध बोलींचे सर्वेक्षण करण्यासाठी निधी मिळेल. जॉर्ज गिअर्सन या इंग्रजी अधिकाऱ्याने १९१८ ते १९२६ दरम्यान केलेल्या भारताच्या भाषिक सर्वेक्षणानंतर पुण्यातील डेक्कन कॉलेजने २०१८ ते २०२४ या कालावधीमध्ये महाराष्ट्रातील मराठी भाषेचे लघुसर्वेक्षण 'महाराष्ट्राचा भाषिक नकाशा आणि मराठीच्या बोलींचे प्रतिमांकन' या शीर्षकाखाली पूर्ण केले आहे. याचे उत्तम संकेतस्थळही तयार झालेले आहे. या प्रकारचे सर्वेक्षण संपूर्ण महाराष्ट्रात आणि मराठी माणसं ज्या ज्या प्रांतात जाऊन स्थायिक झाली तेथे जाऊन करणे आवश्यक आहे. त्यामुळे मराठीच्या आजवरच्या वाटचालीचा एक चांगला आलेख आपल्याला मिळू शकेल. त्याचबरोबर मराठी आणि अन्य भारतीय भाषांचा परस्परसंबंधही अधिक चांगल्या तऱ्हेने उलगडेल.

४) आजच्या महाराष्ट्रात आणि बृहन्महाराष्ट्रात सापडणाऱ्या मराठीचे शिलालेख, ताम्रपट यांचे उत्तम संकलन आणि संवर्धन व्हावे. त्यांच्या प्रतिमा निर्माण करून प्रत्यक्ष आणि आभासी संग्रहालय तयार करावे. शिलालेख आणि ताम्रपटात लिहिलेल्या घटना, व्यक्ती, स्थाने यांची माहात्म्ये शोधून काढावी लागतील. तसे संशोधक तयार करावे लागतील.

५) गावोगावी मराठीचे ऐतिहासिक संदर्भ नोंदवणारे लोक असावेत. नाणेघाट, इनामगाव (शिरूर), तेर(धाराशिव) इत्यादींसारख्या विविध पुरातत्त्व स्थानी उत्तम मार्गदर्शक प्रशिक्षित करावे.

६) पर्यटनसंस्थांनी अशा अभिजात मराठीच्या सर्व स्थानांना स्पर्श करणाऱ्या नि योग्य ती माहिती देणाऱ्या सहलींचे नियोजन करावे. ही सहलसंकल्पना विकसित करावी.

७) मराठी भाषेत झालेले ऐतिहासिक बदल स्वतंत्रपणे सोदाहरण नोंदवून त्याआधारे विविध साहित्यकृती निर्माण होतील, असे उपक्रम हाती घ्यावेत.

८) भारतातील सर्व अभिजात भाषांमधील, भाषिक आणि साहित्यिक कृतींची चर्चा करणे, त्या समजून घेणे, त्यांचे भाषांतर करणे असे उपक्रम वाढीस लावावे.

९) सर्व अभिजात भाषांनी आपला इतिहास, संस्कृती यांच्याआधारे, परस्परसंवाद वाढवून आपला समान सांस्कृतिक धागा बळकट करावा.

१०) महाविद्यालये आणि विद्यापीठे यांतून अभिजात मराठीचे उत्तम अभ्यासक तयार व्हावेत, यासाठी अध्यापनात आणि अभ्यासक्रमात आवश्यक ते बदल घडवावेत.

११) आज विद्यार्थ्यांना मराठी शिकवताना केवळ साहित्य म्हणून शिकवू नये, तर त्यांच्याकडून भाषेचा अभ्यास आग्रहाने करवून घ्यावा. त्यासाठी अभ्यासक्रमात भाषेच्या अभ्यासाला ४०टक्के स्थान द्यावे आणि उर्वरित ६०% भागात साहित्य शिकवावे.

१२) मराठीचे भाषारूप आणि व्याकरण कसकसे बदलत गेले, याचा अभ्यास करताना प्राचीन रूप आणि आजची मराठी यांचा तौलनिक अभ्यास करावा.

१३) मराठी भाषा, भाषाविज्ञान, संस्कृतिअभ्यास, इतिहास आणि पुरातत्त्वविद्या अशा विविध विषयांचा एकत्रित अभ्यास करणारे विद्यार्थी असतील तर त्यांना अभिजात भाषाविषयक विविध प्रकल्पांमध्ये चांगल्या पद्धतीने सहभाग नोंदवता येईल.

आपली भाषा अभिजात पदवीस पोहोचली आहे. आता ती प्रगत आणि आधुनिक बनवण्यासाठी सक्रिय होणे, हे आपले कर्तव्य आहे. हे उद्दिष्ट गाठताना भाषेच्या अभिजात रूपाकडे दुर्लक्ष न करता, तिच्या इतिहासाच्या आधारे, आपल्या वर्तमानाचे निरीक्षण करावे आणि दमदार भविष्याकडे पावले टाकावीत. तसे सीमोल्लंघन करण्याची वेळ समीप आलेली आहे. आजच्या मराठी भाषागौरव दिनानिमित्त सर्व मराठीजनांनी तसा संकल्प करावा.

■ लेखक फर्ग्युसन महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक आहेत.

Sakal 27.2.2025

# *News Paper Clippings During February 2025*

## मराठी भाषा गौरव दिन

रंग आणि रंग

# अस्सल वाङ्मयीन परंपरा

**डॉ. नीलिमा गुंडी**

मराठी भाषा काही वैशिष्ट्यपूर्ण परंपरांमुळे इतर भारतीय भाषांमध्ये उठून दिसते.यातील एक परंपरा म्हणजे शतकानंतरही चालू असलेली दिवाळी अंकांची परंपरा. दिवाळी अंक जाणीवपूर्वक काढण्याचे श्रेय 'मासिक मनोरंजन' (संपादक का. र. मित्र ) या अंकाला जाते . १९०९ मध्ये निघालेल्या 'मनोरंजन' च्या अंकात आकर्षक मुखपृष्ठ, वैचारिक व ललित लेखन, कविता, चित्रे, व्यक्तिदर्शन आदी भरगच्च मजकूर जाहिरातींसह समाविष्ट होता. पुढे त्यात भर पडत गेली. दिवाळी अंकांची वाचकप्रियता आजही टिकून आहे. त्यांच्यात वाचकांचा वयोगट, विषय, आशयसूत्र यामुळे विविधता दिसते. हल्ली डिजिटल व्यासपीठावरही दिवाळी अंक निघत आहेत. या अंकांच्या निर्मितीमागे कलात्मकता, मनोरंजन याबरोबरच राजकीय-सामाजिक घडामोडींचा वेध घेण्याची प्रेरणा दिसते. मराठी वाचनसंस्कृतीसाठीचे या अंकांचे योगदान विसरता येणार नाही .

'मनोरंजन'च्या पहिल्या अंकात गं. रा. मोगरे यांची 'महाराष्ट्रजनविज्ञापना' ही कविता आहे. त्यात मराठीच्या विकासासाठी वाचकांना विनंती आहे, ती अशी : ''विविध कलाकौशल्यी शास्त्रांवरही हिची प्रभा पाडा/धाडा हिच्या यशाचा परिमल दाही दिशांना धाडा.'' आज शंभर वर्षांनंतरही ही विनंती अर्थपूर्ण ठरते. 'लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रात 'साधारणांचे युग' अवतरले, हे कुसुमावती देशपांडे यांचे सामाजिक भाष्य करणारे विधान 'मौज' (१९४५) च्या दिवाळी अंकात आले आहे. वाङ्मयीन-सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवण्याचे काम काही अंकांनी केले आहे. 'अनुष्टुभ' (१९९०) चा दिवाळी अंक ज्ञानेश्वरी सप्तशताब्दीनिमित्त निघाला होता. 'उत्तम अनुवाद'(२०१०) चा अंक नोबेल आणि ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त साहित्यिकांच्या लेखनाला वाहिलेला आहे. 'भाषा आणि जीवन' (२०१२)चा दिवाळी अंक बोली विशेषांक आहे. 'दीपावली', 'किर्लोस्कर', 'ललित', 'साधना', 'हंस', 'साप्ताहिक सकाळ', 'अक्षर', 'ऋतुरंग', 'अंतर्नाद' आदी दिवाळी अंक उल्लेखनीय असतात. हंसा वाडकर यांचे 'सांगत्ये ऐका' हे आत्मकथन 'माणूस'च्या दिवाळी अंकांत आले होते. स्त्रियांसाठीच्या 'माहेर', 'ललना', 'मेनका' या अंकांबरोबरच नवजाणिवेचा प्रकाश पोहोचवणारे 'स्त्री', 'बायजा', 'मिळून साऱ्याजणी' आदी दिवाळी अंकही महत्त्वाचे आहेत. एकंदरित दिवाळी अंकांनी मराठी मनाच्या संवेदनशीलतेचा आवाका वाढवण्याचा प्रयत्न केला आहे.

आपली दुसरी वाङ्मयीन परंपरा म्हणजे दरवर्षी भरणारे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन. ही परंपरा आता शतकपूर्तीच्या जवळ आली आहे. न्यायमूर्ती म. गो. रानडे यांच्या प्रेरणेतून १८७८ पासून सुरू झालेली ही परंपरा म्हणजे मराठी भाषेचा मानबिंदू आहे. 'मराठी भाषा' हे संमेलनाचे एक आस्थाकेंद्र असते. मराठीची स्थितीगती, मराठी शाळांची परवड, जागतिकीकरणाचा प्रादेशिक भाषांवर होणारा प्रतिकूल परिणाम आदी विषय यांत चर्चिले गेले आहेत. मुळात १९४६च्या संमेलनात ग. त्र्यं. माडखोलकर यांनी अध्यक्षीय भाषणात संयुक्त महाराष्ट्राची मागणी केल्यामुळे मोठा लढा उभारला गेला. त्यातून महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. तेव्हा संमेलनाध्यक्ष हे सांस्कृतिक नेते असतात.

वसंत बापट यांनी १९९९मध्ये आपल्या अध्यक्षीय भाषणात मराठी भाषेची महासनद सिद्ध करण्याची गरज प्रतिपादन केली होती. राजेंद्र बनहट्टी यांनी मराठी दैनंदिन व्यवहारातून हद्दपार होण्याची भीती व्यक्त केली होती . सुभाष भेंडे यांनी मराठीवर प्रेम करताना इंग्रजी हद्दपार करण्याची टोकाची भूमिका घेऊ नये, असे म्हटले होते.अरुण साधू यांनी ज्ञानभाषेसाठी विविध क्षेत्रांची परिभाषा आवश्यक मानली होती. डहाके यांच्या मते बोली व प्रमाण भाषा यांना जोडणारा पूल पाहिजे. 'मोठा बहुजन समाज आस्थेने भाषेकडे वळतो आहे, तिचे स्वतःचे झरेझिरपे वाहते झाले आहेत,' असे केशव मेश्राम यांचे म्हणणे होते. अरुणा ढेरे यांनी आपली भाषाशिक्षणाबाबतची व्यवस्था पुरेशी सक्षम नसल्याची खंत व्यक्त केली होती. रा. ग. जाधव यांनी म्हटले होते की, ज्ञानभाषा म्हणजे व्यवहारातील नवी वर्णव्यवस्था नव्हे. ती सर्वांना खुली असते. ज्ञानभाषेचा संबंध समाजाच्या ज्ञानतृष्णेशी निगडित असतो. हे पूर्वाध्यक्षांचे विचार आजही मार्गदर्शक आहेत.

शेवटी या परंपरांचे प्रवाहीपण आपण जपले पाहिजे; कारण या परंपरा आपल्या समाजाचा'रसज्ञतेचा निर्देशांक' (एस्थेटिक कोशंट) वाढवण्यासाठी आहेत.

Sakal 27.2.2025

## *News Paper Clippings During February 2025*

## मराठी भाषा गौरव दिन

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

# मराठी भाषा संवर्धनाचे आव्हान

**मराठी भाषेच्या सद्यस्थितीवर मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी परखड भाष्य केले आहे. मराठी राजभाषा दिनानिमित्त त्यांच्या विचारांचा घेतलेला परामर्श.**

**सुरेश पवार**

'ग्रंथात अथवा पुस्तकात राहून भाषा जिवंत राहणार नाही, ती बोलली जाईल, तेव्हाच जिवंत राहील,' असे अतिशय वास्तव उद्गार नवी दिल्लीत पार पडलेल्या अठ्याण्णवव्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांनी काढले आहेत. मराठी साहित्य संमेलन नेहमीप्रमाणे आणि अपेक्षेप्रमाणे थाटामाटात आणि उत्साहात पार पडले. नेहमीचे कार्यक्रम आणि सोपस्कार झाले. अशा साहित्य संमेलनाच्या सोहळ्यातून काय आणि किती साध्य होते, हा प्रश्न बाजूला ठेवला तरी साहित्य क्षेत्रातील सरदार, शिलेदार आणि रसिक वाचक एकत्र येतात, काही आदान-प्रदान होते; पण मराठी भाषेच्या वृद्धी आणि विकासासाठी अशा संमेलनाचा हातभार किती लागतो, याचे उत्तर बहुधा संदिग्धच असेल. मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला. त्या पार्श्वभूमीवर झालेल्या या पहिल्याच संमेलनात अध्यक्षा डॉ. भवाळकर यांनी मराठी भाषेच्या विद्यमान स्थितीवर अचूक बोट ठेवले आहे. त्यांचे हे उद्गार औचित्यपूर्ण आहेत शिवाय भावी काळातील मराठी भाषेच्या स्थितीबद्दल इशारा देणारेही आहेत. त्यामुळे त्याची गांभीर्याने दखल घ्यायला पाहिजे.

भाकरी का करपली, घोडा का अडला आणि पान का सडले, या तिन्ही प्रश्नांचे एकच उत्तर येते. ते म्हणजे न फिरविल्याने! म्हणजेच प्रवाही न राहिल्याने. मराठी भाषेची सद्यस्थिती लक्षात घेता, ती प्रवाही राहिली आहे का, याबाबत निश्चितपणाने होकारात्मक उत्तर देणे कठीण आहे. मराठी भाषेतील शब्दसंख्या घटत असल्याचे विदारक वास्तव समोर आले असताना मराठी भाषा समृद्ध आणि अधिक विकसित होत आहे, असे म्हणणे धाडसाचे ठरणार आहे.

**शब्दसंख्येत घट**

१८५७ मध्ये मोल्सवर्थ यांनी मराठी शब्दकोश तयार केला. त्यात ६० हजार शब्द होते. १९३२ मध्ये मराठी शब्दकोशाचे आठ खंड प्रकाशित झाले. त्यामधील शब्दसंख्या एक लाख ३० हजारांवर होती. बारा वर्षांपूर्वी म्हणजे २०१३ मध्ये प्रकाशित झालेल्या मराठी शब्दकोशातील शब्दसंख्या १ लाख १३ हजार एवढी होती. १७ हजार शब्दांची घट झाली. म्हणजे सुमारे ८० वर्षांत मराठी भाषेत १३ टक्के शब्दांची घट झाली. मराठी भाषा प्रवाहित असती, तर नवे नवे शब्द प्रचलित होऊन शब्दसंख्या वाढली असती. याचाच अर्थ आपल्या बोलण्यातील आणि रोजच्या वापरातील शब्द कमी होत गेले. मराठी बोलणाऱ्यांची संख्या कमी झाली. डॉ. भवाळकर यांचे निरीक्षण अगदी अचूक आहे, हेच या आकडेवारीतून स्पष्ट होते.

मराठीची शब्दसंख्या कमी होत असताना विज्ञान, तंत्रज्ञानाची भाषा समजली जाणाऱ्या अर्थात ज्ञानभाषा इंग्रजी भाषेची समृद्धी डोळे दीपवणारी आहे. ऑक्सफर्डच्या अलीकडील शब्दकोशात सहा लाख इंग्रजी शब्द आहेत, तर कॉलिन्सच्या शब्दकोशात तब्बल ७ लाख ५० हजार इंग्रजी शब्दसंख्या आहे. इंग्रजीने फ्रेंच, जर्मन, पोर्तुगीज, इटालियन, स्पॅनिश, रशियन अशा युरोपियन भाषांतील शब्द आत्मसात केलेच शिवाय ज्या ज्या देशात इंग्रजांनी वसाहती केल्या, राजवटी स्थापन केल्या, त्या त्या देशातील, प्रांतातील अनेक शब्दही आपल्या भाषेत प्रचलित केले. अरबी, फार्सी, तुर्की, उर्दूसह मराठीतील घेराव, बंदसारख्या शब्दांनी इंग्रजी भाषेची व्याप्ती वाढलेली आहे.

गेल्या ५०-६० वर्षांत आर्थिक, औद्योगिक बदल होत गेले. ग्रामीण भागात फार मोठे संक्रमण झाले. बलुतेदार, अलुतेदार जवळजवळ संपुष्टात आले. सर्वच क्षेत्रात कमी जास्त प्रमाणात स्थित्यंतरे झाली. त्याचा परिणाम ६०-७० वर्षांपूर्वीचे शब्द विस्मरणात आणि अडगळीत जाण्यात झाला. साधे स्वयंपाक घरातील शब्द घ्या. जाते, पाटा-वरवंटा, खलबत्ता, चूल, वैल, घंगाळ, बंब, होन, उखळ, मुसळ, मुगल हे शब्द नव्या पिढीला अपरिचित आहेत आणि जुनी पिढीही ते शब्द विसरत चालली आहे. १९७० च्या दशकापासून गेल्या ५०/६० वर्षांत तंत्रज्ञान आणि विज्ञानाने गरुडझेप घेतली. भारतात १९८० च्या दशकात संगणक युगाचा प्रवेश झाला आणि आता 'एआय'ची महाक्रांती उंबरठ्यावर आहे. या अनुषंगाने या तंत्र विज्ञानाची परिभाषा असलेले इंग्रजी शब्द मराठी भाषेत जसेच्या तसे रूढ झाले आहेत. मोबाईलवर भ्रमणध्वनी असा मराठी प्रतिशब्द असला, तरी तो कोणी वापरत नाही. मोबाईलबरोबर, व्हॉटस्‌ॲप, यूट्यूब, रिंगटोन असे अनेक शब्द आता लोकांच्या नित्य बोलण्यात आले आहेत. असे नवे शब्द वापरात आले असले, तरी एकूणच मराठी भाषेचा म्हणून दैनंदिन जीवनातील वापर कमी होत चालला आहे.

**काही शहरात हिंदीचा प्रभाव**

मुंबई महानगरात एकेकाळी म्हणजे संयुक्त महाराष्ट्र लढ्यावेळी मराठी भाषिकांची संख्या ४५ टक्के होती. ती आता २८ टक्क्यांवर आली आहे. महानगर मुंबईत टॅक्सीपासून पानपट्टीपर्यंत, दुकानापासून मॉलपर्यंत आणि साध्या हॉटेलपासून फाईव्ह स्टार हॉटेलपर्यंत हिंदी हीच मुख्य संवादाची भाषा बनली आहे आणि भाजी बाजारातही मराठी शब्द चुकूनच ऐकू येतो. नागपूर महानगरावर प्रथमपासून हिंदीचा पगडा आहे. त्यात बदल नाही. आता मुंबईप्रमाणे ठाणे, पालघर भागातही हिंदी भाषा मराठीची जागा घेऊ पाहत आहे. पुणे हे मराठी भाषेचे प्रमाण मानले जाणारे शहर; पण अलीकडे 'आयटी'मुळे पुण्यातही हिंदीचा चंचुप्रवेश होत आहे. मराठवाड्यात छ. संभाजीनगरसह काही भागांत हिंदी, उर्दूचा प्रादुर्भाव आहे.



म्हणजे महाराष्ट्राच्या साधारणपणे २० ते २५ टक्के भागात, प्रदेशात दैनंदिन व्यवहारात मराठीचा वापर कमी होत चालला आहे. दैनंदिन संभाषणात मराठी नाही, तर मग त्या भागातील, प्रदेशातील दुकानावरचे फलक, जाहिरातीची होर्डिंग्ज ही हिंदी आणि इंग्रजीत असली, तरी नवल वाटण्याचे कारण नाही.

**मराठीचा सरस्वतीचा दरबार राहिला नाही**

एकेकाळी मराठी मासिके आणि नियतकालिके ही मराठी भाषा समृद्ध करणारी वाचकप्रिय साधने होती. आता त्यांचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. दिवाळी वार्षिकातून त्याची काही चुणूक दिसते; पण अशा वार्षिकांचा खपही पूर्वीच्या खपाच्या तुलनेत कमी झाल्याचे जाणवत आहे. विसाव्या शतकात अनेक अतिरथी, महारथी साहित्यिक, नाटककार, कवी आणि निबंधकारांनी सरस्वतीचा दरबार समृद्ध झाला होता. आता या दरबारात त्यांची उणीव भासत आहे. साहित्य क्षेत्राबरोबर मराठी चित्रसृष्टीने आणि रंगभूमीने यापूर्वी निर्माण केलेले मानदंड आता अपवाद वगळता दिसत नाहीत. मराठी भाषेच्या भरभराटीला जो घुणा लागला, त्याला अशी काही कारणे आहेत.

**देशात दहा टक्के मराठी भाषिक**

देशातील प्रमुख २२ भाषांत मराठीचा क्रमांक तिसरा आहे. देशातील दहा टक्के लोक मराठी बोलतात; पण मराठी शब्दसंख्येची घसरण होत राहिली, तर आणखी काही वर्षांनी मराठीचे तिसरे स्थान दुसरी भाषा घेण्याची भीती आहे. काही वर्षांपूर्वी वृत्तपत्रे आणि नियतकालिके यामध्ये दर्जेदार मराठीचा वापर होत असे. प्रसंगानुसार चपखल म्हणी आणि वाक्प्रचारांचा उपयोग होत असे. आता प्रसिद्ध होणाऱ्या मराठी बातम्यांत आणि लेखांत मराठी व्याकरणाचा अचूक वापर, अचूक मराठी शब्द यांची उणीव जाणवते, असा काही वेळा अनुभव येतो. महाविद्यालयात आणि विद्यापीठात मराठी विषय घेणारे विद्यार्थी दुर्मीळ होत आहेत. इंग्रजी माध्यमांच्या शाळांतून शिकणाऱ्या नव्या पिढीचा संवाद आता इंग्रजीतूनच होऊ लागला आहे. इंग्रजी माध्यमाला विरोध असायचे कारणच नाही; पण मराठी भाषेचे संरक्षण आणि संवर्धन होणे आवश्यकच आहे.

**मराठी भाषेचे प्राचीनत्व**

ज्ञानियांचा राजा श्री ज्ञानदेव यांनी १२९० मध्ये श्री ज्ञानेश्वरी लिहिली. त्या आधी १२८४ मध्ये म्हाईंभट यांनी श्री चक्रधरस्वामींच्या लीला वर्णणारे लीळाचरित्र लिहिले होते. १२८७मध्ये महदंबेने धवळे (पूर्वार्ध) लिहिले होते. तेराव्या शतकाअखेर अत्यंत समृद्ध असे मराठी भाषेतील ग्रंथ निर्माण झाले होते. मराठी भाषेचे वैभव या ग्रंथातून प्रकट झाले होते. त्या आधी बाराव्या शतकात मुकुंदराज यांनी विवेकसिंधु लिहिल्याचे म्हटले जाते, तर त्याआधी अकराव्या शतकात श्रीपती या ज्योतिष पंडिताने ज्योतिष रत्नमाला नावाचा ज्योतिषविषयक ग्रंथ लिहिल्याचे म्हटले जाते. मात्र, या दोन्ही ग्रंथांच्या काळाविषयी तज्ज्ञांमध्ये दुमत आहे. ही ग्रंथनिर्मिती चौदाव्या शतकातील असल्याचे म्हटले जाते.

**मध्ययुगीन शिलालेख**

महाराष्ट्र आणि कर्नाटकात उपलब्ध झालेल्या शिलालेखांवरूनही मराठी भाषेचे प्राचीनत्व लक्षात येते. श्रवणबेळगोळ येथील गोमटेश्वर मूर्तीच्या तळभागी एका शिलेवर 'श्री चावुंडराये करवियले, श्री गंगराजे सुत्ताले करवियले' असा मराठी भाषेतील शिलालेख आहे. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार यांच्या मते हा शिलालेख ९८३ चा आहे. पुणे जिल्ह्यातील सासवडजवळील पूर येथील १२८५ चा यादवकालीन शिलालेख, पंढरपूर येथील ११८९ मधील विठ्ठल मंदिराच्या स्थापनेसंबंधीचा शिलालेख, त्यानंतर तिथलाच १२७३ चा विठ्ठल मंदिर जीर्णोद्धाराचा शिलालेख, अंबाजोगाई मंदिराच्या प्रवेशद्वारावरील १२४० मधील दोन शिलालेख असे अनेक शिलालेख मराठी भाषेची प्रदीर्घ परंपरा स्पष्ट करणारे आहेत.

**मराठी संवर्धनासाठी सर्वंकष प्रयत्नांची आवश्यकता**

शिलालेखांतून मराठी भाषेची लिखित मोहर दहाव्या शतकापासून असल्याचे दिसून येते. बोली भाषा लिखित स्वरूपात यायला आणि पुढे भाषेने व्यावहारिक स्वरूप धारण करायला दोनशे-अडीचशे वर्षांचा काळ जातो, असे म्हणता येईल. या हिशेबाने किमान नवव्या शतकात मराठी भाषा व्यवहारात अस्तित्वात होती, असा तर्क करता येतो. काही तज्ज्ञांच्या मते मराठी भाषेचे अस्तित्व याही खूप मागे जाऊ शकते. तत्कालीन संस्कृत नाटकातून 'महाराष्ट्रीक' असे पात्र असून या पात्राच्या तोंडी मराठी वाक्य असे. मराठी भाषेची अशी शेकडो वर्षांची उज्ज्वल परंपरा आहे. ती अधिक वैभवशाली व्हावी, चिरकाल टिकाऊ आणि ज्ञान भाषेच्या दिशेने तिची वाटचाल व्हावी, या दृष्टीने सर्वंकष प्रयत्न होणे अगत्याचे आहे. डॉ. तारा भवाळकर यांच्या इशाऱ्यातून हा बोध घ्यायला हवा.

Pune Edition
Feb 27, 2025 Page No. 06
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During February 2025*

## मराठी भाषा गौरव दिन

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com
CITY_27FEB_2025_004
27 Feb 2025

# मराठी भाषेचा जागर

**विशेष**

– भारती सावंत

**आज मराठी भाषा गौरव दिन. हा दिवस कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनानिमित्त साजरा केला जातो. मराठी भाषेचा गौरव करतानाच मराठी भाषेच्या विकासासाठी जागरही करणे आवश्यक आहे.**

भाषा ही मुळात साहित्यनिर्मितीसाठी जन्माला आलेली नाही. भाषा हे समाजोपयोगी साधन आहे. फुलांचा उपयोग देवपूजेसाठी किंवा शृंगारासाठी केला जातो, हस्तिदंतातून सुबक मूर्ती बनवल्या जातात, चंदनातून सुगंधी तेल काढले जाते. पण मुळात या वस्तू काही या कामासाठी जन्माला आलेल्या नाहीत. आपली गरज भागविण्याच्या आणि जिज्ञासा तृप्त करण्यासाठी माणसाने हे शोध लावलेले आहेत. एकमेकांशी व्यवहार किंवा विनिमय तसेच सुसंवाद सुरळीत चालावा म्हणून भाषा अस्तित्वात आलेली आहे. इंग्रजी माध्यमातून शिकलो आणि फाडफाड इंग्रजी बोलू लागलो पण पायाला काटा टोचला की तोंडातून 'आई गं' असा उद्‌गार निघतो आणि समोर साप दिसला तर लगेच 'बापरे!' असाच शब्द बाहेर पडतो. मनातील भावना सहजपणे बाहेर पडतात त्या मायबोलीतच.

खरे पाहता भारत हा कमळाच्या फुलाप्रमाणे आहे. कमळाला अनेक पाकळ्या असतात. तसे भारतात अनेक भाषा जन्माला आल्या आहेत. परंतु प्रत्येकजण आपल्या मायबोलीतूनच भाषेचा गोडवा गात असतो. आपणास ज्ञान वाढवायचे असेल, तर आपले मातृभाषेतील साहित्य वाचावे असे शिक्षणतज्ज्ञांनी स्पष्ट केले आहे. तसे पण सर्वांनाच आपली मायबोली सर्वात जास्त प्रिय असते. आपण आपल्या मायबोलीतूनच अतिशय छानरित्या व्यक्त होत असतो. आपल्याला काय म्हणायचे आहे हे आपण मायबोलीतच स्पष्टपणे सांगू शकतो. आपल्याला समजलेल्या, उमजलेल्या ज्ञानाचा आविष्कार मातृभाषेतून करणे सोयीचे होते.

महाराष्ट्राची अस्मिता आणि मराठी संस्कृतीचे जाज्वल्य दर्शन घडते ते आपल्या साहित्य व कला परंपरेतून! पु. ल. देशपांडे, आचार्य अत्रे, ग. दि. माडगूळकर, रा. ग. गडकरी, कवी कुसुमाग्रज, कवी केशवसुत यांनी मराठी साहित्य समृद्ध केले आहे. कवयित्री शांता शेळके, इंदिरा संत, पद्मा गोळे यासारख्या चतुरस्त्र कवयित्रींनी आपल्या काव्यांमधून सासुरवाशिणी आणि माहेरवाशिणींच्या व्यथांचे, सुखदु:खाचे यथार्थ वर्णन साधले आहे. मराठी भाषेचा गोडवा, त्यातले माधुर्य वाटण्याचे काम अनेक साहित्यिकांनी केले. महात्मा फुले, लोकहितवादी, विष्णुशास्त्री चिपळूणकर, प्र. के. अत्रे, मोरोपंत, रा. ग. गडकरी तसेच कितीतरी आधुनिक सारस्वतांनी आपल्या कल्पनेचे, रचनेचे बाळकडू मराठी वाचकांना पाजले आहे. 'मराठी असे आमुची मायबोली' कवी यशवंतांनी या ओळीमध्ये मराठी भाषेविषयीची आपुलकी व्यक्त केली आहे.

पंतकवी मोरोपंत नि श्रीधरपंतांनीही मराठीला उच्च दर्जा मिळवून दिला आहे.




संतकवींनी डफावर थाप देऊन शाहिरी पोवाडे रचले. वीरांना लढाईसाठी प्रेरणा देण्याहेतू पोवाडे नि शृंगारिक मनोरंजनपर लावण्यांची रचना केली. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी इंग्रजीला 'वाघिणीचे दूध' असे संबोधून मराठीतून निबंधमाला लिहिली. ग. दि. माडगुळकर, साने गुरुजी, कुसुमाग्रज, भा. रा. तांबे, केशवसुत, माधव ज्युलियन, ठोंबरे अशा कितीतरी साहित्यिकांनी ही साहित्यदिंडी पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवली आहे.

आपला व्यक्तिमत्त्व विकास साधण्यासाठी आपल्याला प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण मातृभाषेतूनच घ्यायला हवे. सावरकरांना देखील मराठीचा मोह आवरला नाही आणि त्यांनी 'ने मजसी ने मातृभूमीला सागरा प्राण तळमळला' असे सागराला उद्देशून म्हणत काव्य बनवले आहे.

एवढेच कशाला निरक्षर असणाऱ्या बहिणाबाई चौधरी यांनी 'अरे संसार संसार, जसा तवा चुल्ह्यावर। आधी हाताला चटके, मग मिळते भाकर।।' असे म्हणत दुःख दारिद्र्याचे वर्णन आपल्या अष्टाक्षरी काव्यांमधून संसाराचे चित्रण करताना केले आहे. 'मन वढाय वढाय उभ्या पिकातलं ढोर' म्हणत बहिणाबाई चौधरींनी खान्देशी भाषेला प्रतिभासंपन्न बनवले. कितीतरी स्त्रीसंतांनी जात्यावरील ओव्या, गवळणी, विराण्या, अभंग, कीर्तन या सर्व रचनेतून आपल्या भाषेचे महत्त्व नि भाषेचा रसाळपणा वर्णिलेला आहे.

साहित्यातील सर्वोच्च ज्ञानपीठ पुरस्कार मिळवणारे ज्येष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर यांचा या दिवशी जन्म झाला. त्यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी मराठी भाषेला ज्ञानभाषा बनवण्यासाठी अथक परिश्रम घेतले. त्यांच्या स्मृतीचे स्मरण म्हणून मराठी भाषा गौरव दिवस २७ फेब्रुवारीला साजरा केला जातो.

मराठी ही आपल्यासाठी केवळ एक भाषा नसून ममतेचे, वात्सल्याचे आणि संस्काराचे बोल आहेत तसे आईचे बोल लेकरासाठी हळुवार आणि प्रेमळ असतात व वेळप्रसंगी जी आई मुलाच्या चांगल्यासाठी कठोर शब्द बोलते तशीच ही आपली मराठी आहे. तिच्या शब्दाची शक्ती प्रचंड आहे. म्हणून जागतिकीकरणाच्या या स्पर्धेत आपण कितीही पुढारलेलो असलो तरीसुद्धा मराठी भाषेचे विस्मरण होऊ नये. छत्रपती शिवाजी महाराजांनी या माय मराठी भाषेचे संस्कृतीचे रक्षण केले होते. त्याची आठवण ठेवून आपण आपल्या भाषेचा गौरव करायला हवा. आपण या समाजाचे काही देणे लागतो आणि त्याच्यातून उतराई होण्यासाठी आपण आपल्या भाषेचा अभिमान बाळगायला हवा. आपली मराठमोळी ही भाषा टिकविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीकडून, मराठी माणसाकडून हाच प्रयत्न व्हायला हवा. मी आता मराठीतच बोलणार असे कटाक्षाने आणि निक्षून मनाशी ठरवले तर आपली प्रतिभासंपन्न आणि ज्ञानेश्वरांची ही रसाळ मायबोली आज फक्त महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारताच्या नकाशात आपला ठसा उमटवून जाईल.

या सह्याद्रीच्या कडेकपाऱ्यातून फक्त मराठीचाच नाद उमटवण्यासाठी आपण आपले व्यक्तिमत्त्व मराठीतूनच साकार करण्याचा विडा आज उचलायला हवा.

आपल्या मराठीचे हे लेणं आपल्या पुरतंच सीमित न ठेवता तिचा डंका परदेशी पोचवण्याचे काम आपणच करायला हवं. आपल्या पूर्वजांनी लिहून ठेवलेलं मराठी लिखाणाचं हे दालन सर्वांसाठी उघडायला हवं. माझी ही मायबोली फक्त पुस्तकापुरती, पाठांतरापुरती न राहता प्रत्येक हृदयात, तनामनात आणि नसानसात रोवली पाहिजे, भिनली पाहिजे आणि जपलीही पाहिजे. प्रत्येक आईबापाने मराठी संस्कृतीची जपणूक करण्यासाठी आपल्या मुलाला मराठीमातीवरच्या मराठी शाळेतच प्रवेश घेण्याचे निश्चित केले पाहिजे. तरच आपली शिवरायांची मातृभूमी, मायबोली टिकून राहील आणि मराठीचा वारसा अखंड जपला जाईल.

# *Upcoming Events*

## *March 2025*

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 ***Yashwantrao Chavan Jayanti***  | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 ***Shahid Din***  |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 31 | | | | | | |




***Other than the Photos of Modern College Pune-5 and Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com***